॥ ॐ नमः ॥

गौडसारस्वत ब्राम्हणांचा

इतिहास.



लेखक व प्रकाशक,
रामचंद्र नरहर सोहनी- वकील-गडहिंग्लज.

मुद्रक.
दत्तात्रेय गोविंद सडेकर- प्रो० धनंजय-प्रेस.
खानापूर- बेळगांव.
फेब्रुवारी १९३७

किंमत एक रुपया

पुस्तककर्त्याची--प्रस्तावना.

आमच्या या हिंदुस्थान देशांतील हिंदुलोकांत अनेक जातींचे व पोट-जातींचे लोक राहत आहेत. अलिकडे शिक्षणाचीं साधनें बरींच उपलब्ध झाल्यामुळें, त्या लोकांत शिक्षणाचा प्रसार एकसारखा वाढत चालला आहे व शिक्षणप्रसारामुळें बहुतेक जातींच्या समाजांत सुशिक्षितांची संख्या जास्त जास्त वाढत चाललेली दिसत आहे. अज्ञानावस्था कमी होत चालली असून बहुतेक समाजाचें लक्ष आपल्या समाजाची उन्नति कशी होईल या ध्येयाकडे वेधून राहिलें आहे. अशा स्थितींत त्या समाजाच्या प्रगतीला अवश्य असणाऱ्या साधनांची प्राप्ति करून घेण्याकडे व त्या साधनांचा उपयोग करून घेण्याकडे त्या त्या समाजांतील सुशिक्षितांचें लक्ष जाणें स्वाभाविक आहे. अशा साधनांपैकींच मागील इतिहास हें एक साधन असल्यानें आपआपल्या समाजाचा मागील इतिहास मिळवून तो लिहून ठेवण्याकडे बहुतेक समाजांतील लोकांची प्रवृत्ति दिसून येत आहे. त्याप्रमाणेंच आमच्या गौड-सारस्वत ब्राह्मण समाजाचा इतिहास प्राचीनकाळापासूनचा मिळवून तो एकत्रित करून छापविल्यास आमच्या समाजास त्याचा उपयोग होईल, असें मनांत आल्यामुळें त्या कार्यास हात घालण्याचा निश्चय करून बऱ्याच दिवसांपासून कामास सुरवात केली परंतु इतिहास लेखकांस या देशांत जी एक मोठी अडचण सामान्य रीतीनें सर्वांस नडविते, तिचा प्रत्यय मलाहि येणें स्वाभाविक

आहे. असा प्रत्यय आला व त्यामुळें कांहीं काळ माझें मन निराश झालें तें अडचण ह्मणजे, हिंदु समाजांतील लोकांचे प्राचीन कालांतील इतिहास, पद्धतशीर व सालनिहायवार लिहिलेले नाहींत ही होय. ही अडचण हिंदूंतील सर्व समाजांस नडविते हें मशहूर आहे.

आह्मां हिंदुलोकांचे प्राचीन ग्रंथ श्रुति (वेद), स्मृति, पुराणें, रामायण, महाभारत, भागवत इत्यादि ग्रंथ होत. यांतील पुराणें, रामायण, महाभारत या ग्रंथांस इतिहास ग्रंथ ह्मणतात. त्यांत भारतवर्षांतील राजे, ऋषि व इतर व्यक्तींचीं चरित्रें व इतर वर्णनें लिहिलीं आहेत. तसेंच वेदांच्या अंगभूत इतर ग्रंथ ह्मणजे उपनिषदें, ब्राह्मण वगैरे ग्रंथांत प्रसंगविशेषीं कित्येक व्यक्तींचीं वर्णनें लिहिलीं आहेत. ते सर्व उल्लेख ह्मणजे इतिहासच होत; परंतु त्यांत अतिशयोक्तींचीं वर्णनें व अशक्य अशा गोष्टी लिहिल्या असल्यामुळें अलिकडील तर्कपद्धतीनें विचार करणाऱ्यांच्या कसोटीस त्या पटत नाहींत व या कारणानें त्या गोष्टींवर त्यांचा भरंवसा बसत नाहीं. याचा परिणाम असा झाला आहे कीं, प्राचीन ग्रंथांतील गोष्टी सर्वच काल्पनिक आहेत, त्या वाचणें अगर ऐकणें ह्मणजे अंधश्रद्धेचें व वेडगळपणाचें लक्षण आहे, असी समजूत रूढ झाली असून तीमुळें प्राचीन ग्रंथांकडे सामान्य सुशिक्षित लोकांचें दुर्लक्ष होत चाललें आहे. अशा परिस्थितींत त्या ग्रंथांतील आधारावर इतिहास लिहिल्यास समाजांतील तरुणपिढीच्या मंडळींकडून " हां ! हां ! पुराणांतील गोष्टींवरून इतिहास लिहिला होय ! " या शब्दांनीं आमची संभावना होणार; हा विचार मनांत आला. व त्यामुळें सालनिहायवार प्राचीन इतिहास नाहीं, करितां हें काम सोडून दिलेलें बरें, असें वाटून मन निराश झालें व कांहीं दिवस हें काम बंदही केलें होतें परंतु " अडचणीच्या प्रसंगीं थोर पुरुषांचीं वचनें मार्गदर्शक होतात, " ह्या न्यायानें सर रामकृष्ण गोपाळ भांडारकर, लोकमान्य टिळक, रा. शंकर बाळकृष्ण दीक्षित व भारताचार्य रा॰ब. चिंता-

मण राव वैद्य यांचे कांहीं लेख वाचनांत आले. त्यांत त्यांनीं प्राचीन ग्रंथांतील गोष्टींचे आधार घेतले आहेत असें दिसून आलें. इतकेंच नव्हे तर इतिहासाचें संशोधन करितां करितां, पौराणिक कथा, आख्यायिका व दंतकथा यांतच आपला प्राचीनतम इतिहास सांठविला असल्याचें त्यांना आढळून आलें, असें आपलें मत त्यांपैकीं कांहींनीं लिहून ठेविलें आहे, पौराणिक गोष्टींवर आक्षेप घेणाऱ्या मंडळींच्या मतांत बदल होण्या जोगे हे लेख असल्यानें मनास थोडा धीर आला. वाचकांना समजण्या-करितां त्यांनीं जे उल्लेख केले आहेत त्यांतील कांहींचे उतारे येथें देतों:—

१ सर रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांनीं 'दक्षिणेचा प्राचीन इति-हास ' हा ग्रंथ इंग्लिश भाषेंत लिहिला आहे त्याचें मराठी भाषांतर श्री. ना. वि. बापट यांनीं सन १८८७ सालीं छापविलें आहे. त्यांत दक्षिणेंतील अंध्रभृत्यवंशाचे जे राजे झाले, त्यांची ठोकळमानानें संख्या वायु, विष्णु, भागवत व मत्स्य या पुराणांत किती किती सांगितली आहे तें लिहून त्याबद्दलचें एक कोष्टकच दिलें आहे. (पृष्ठ ६९।७०।७१) व त्या बुकांत कित्येक ठिकाणीं कोरीव लेखांतील राजे व पुराणांत सांगितलेले राजे यांचा मेळ दाखविला आहे.

२ लोकमान्य टिळक यांनीं आपल्या ' आर्टिक होम इन धि वेदाज ' या ग्रंथाच्या आरंभीं म्हटलें आहे कीं, ' कोणत्याहि राष्ट्राच्या पूर्वपीठिकेचा मागोवा काढितां काढितां, अखेर आपण त्या राष्ट्राच्या पौराणिक आख्यायिका व दंतकथांपर्यंत जाऊन पोहोंचतों व त्या आख्यायिका व दंतकथांतच त्या राष्ट्राचा प्राचीनतम इतिहास सांठविला असल्यानें त्यांच्या सत्यार्थ प्रतीतीनेंच तो उपलब्ध होतो. '

३ कै. शंकर बाळकृष्ण दीक्षित हे आपल्या ' भारत वर्षीय भूवर्णन ' या बुकाच्या उपोद्घातांत म्हणतात:—' आतां सर्वच पुराणाचे सर्वच भाग प्राचीन असें म्हणतां येणार नाहीं हें खरें. त्यांचे बरेच भाग प्रक्षिप्त

असतील, अशी शंका घेण्यास जागा आहे. थोडासा आधार असला तर त्यावर कोणी अतिशयोक्ति करील, परंतु मूळ कांहीं तरी असलें पाहिजे. निदान देश, नद्या, ग्रामांचीं सर्व नांवें काल्पनिक रचिलीं असें म्हणणें साहस होय. तेव्हां पुराणांची रचना अर्वाचीन असें घटकाभर कबूल केलें तरी त्यांत वर्णिलेली स्थिति प्राचीन असली पाहिजे. महाभारतांतील देश-वर्णन, पांडवांच्या वेळचें म्हणून केलेलें आहे व त्यांतील पुष्कळ देशांचीं नांवें वेदांत आढळतात. तेव्हां पुराणांत जीं वर्णनें आढळतात तीं कल्पनेच्या पदरचीं म्हणण्यापेक्षां कोणत्या तरी आधारानें लिहिलीं असतील, हें म्हणणें सयुक्तिक आहे. महाभारतांतील ज्या नद्या सकृद्दर्शनीं कविकपोल-कल्पित दिसतात, त्यांपैकीं कांहीं शिकंदराच्या वेळीं प्रसिद्ध होत्या असें युरोपियन ग्रंथकारांच्या लेखांवरून दिसतें, असो.' (पृष्ठ १०।११)

४ राव ब० चिंतामणराव वैद्य यांनीं '**महाभारताचा उपसंहार**' हें पुस्तक लिहिलें आहे. त्यांत सूर्यवंशी क्षत्रिय व चंद्रवंशी क्षत्रिय यांची परंपरा दाखविली आहे. त्यांत सूर्यवंशी क्षत्रियांचा मूळ पुरुष विवस्वान् व चंद्रवंशी क्षत्रियांचा मूळ पुरुष चंद्र ही पौराणिक कल्पना बाजूस ठेविली तरी पुढील क्षत्रियांच्या परंपरेंतील राजांचीं नांवें व त्यांच्या वंशावळी यांचा उल्लेख करते वेळीं पुराणांतील त्यांच्या उल्लेखावर भरंवसा ठेविला आहे. तसेंच मध्ययुगीन भारत भाग २ यांत ब्राम्हण व क्षत्रिय या दोहोंचीं वर्णनें देतांना शिलालेखांतील उल्लेख व प्राचीन ग्रंथांतील उल्लेख यांचा मेळ कोठवर जमतो याचा उल्लेख कांहीं कांहीं ठिकाणीं दिला आहे. त्यांचे साग्र उतारे या ठिकाणी देणें स्थलसंकोचामुळें अप्रयो-जक असल्यानें दिले नाहींत. जिज्ञासूंनीं जरूर वाटल्यास त्या ग्रंथांतील त्या संबंधाचीं प्रकरणें पहावींत. मासल्या करितां त्यांचें एक विधान येथें देतों ' चंद्रवंशी राजपुतांचा विचार करितां त्यांचें गोत्र बहुधा अत्रि असतें आणि पुराणांत चंद्राचा अत्रि पिता असल्यानें अत्रि हा त्यांचा

निःसंशय प्रारंभींचा उत्पन्नकर्ता होय. ' (मध्ययुगीन भारत भाग १ पृष्ठ ६९६)

इ. सनापूर्वी सुमारें ५०।६० वर्षांपासून परंदेशाचे बादशहा यांच्या हिंदुस्थानावर स्वाऱ्या झाल्या त्या स्वाऱ्यांचीं व हिंदुस्थानांतील राजे व शहरें इत्यादिकांचीं वर्णनें त्या बादशहांच्या इतिहासकारांनीं लिहून ठेविलीं आहेत. तसेंच परदेशांतील कांहीं प्रवासी हिंदुस्थानांत वरचेवर येऊन गेले त्यांनींहि या देशांतील राज्यें, शहरें, नद्या, प्रसिद्ध स्थळें व प्रसिद्ध व्यक्ति यांचीं वर्णनें लिहून ठेविलीं आहेत. त्यांचीं भाषांतरें अलि-कडे इंग्रजींत प्रसिद्ध झालीं आहेत. त्यांतहि आमच्या प्राचीन ग्रंथांतील उल्लेखांचे आधार घेतलेले आढळतात. स्ट्राबो, डायो, होरस, कर्टिअस, एरियन् हे शिकंदर बादशहाचे इतिहासकार, प्लीनी, पेरिप्लुस, मेगास्थनिस हे ग्रीक ग्रंथकार, बिलाडूर, इस्टारनरी, इबनहानकोट, फेरिस्ता, आबूरि हान वगैरे मुसलमानग्रंथकार, मासन्, टालमी वगैरे युरोपियन प्रवासी या लोकांनीं वर लिहिल्या प्रकारचीं बुकें लिहिलीं आहेत. त्या ग्रंथाधारें सन् १८७१ इ. सालीं अलेक्झंडर, कनिंगहॅम यांनीं एक बुक (Ancient geogruphy of Indiyas) या नांवाचें लिहिलें आहे. चिनी प्रवासी फाहिआन, संगयून व ह्युएनसंग यांनींही या विषयावर बुकें लिहिलीं आहेत. त्यांच्या ग्रंथांतील लेखांचे कांहीं कांहीं आधार कनिंगहॅम यांनीं आपल्या ग्रंथांत घेतले आहेत. या एकंदर ग्रंथांवरून हिंदुस्थानचा प्राचीन इतिहास बराच प्रकाशित झाला आहे.

वर लिहिलेले परदेशीय ग्रंथकार यांच्या ग्रंथांवरून आमच्या पुराण-ग्रंथांतील पुष्कळ गोष्टींची सत्यता पटते. त्यांतील कांहीं गोष्टी येथें देतों:-

१ हिमालयांतील डोंगरी संस्थानांपैकीं ' जालंदर ' या संस्थानाचे राजे ' कटोच ' क्षत्रिय आहेत. त्या घराण्याची वंशावळ भारतीय युद्धा-च्या कालापासून चालू कालापर्यंतची सान्नीलायख अशी सांपडली आहे.

त्या घराण्याचा मूळ पुरुष सुशर्मा राजा हा भारतीय युद्धांत दुर्योधनाच्या बाजूनें लढला असें वर्णन महाभारतांत आहे. सुशर्मा या राजापासूनची सारी वंशावळ त्या ठिकाणीं आहे. टालमी नांवाचा परदेशीय भूगोलशास्त्रवेत्ता इ. स. सुमारें (१५०) या सुमारास हिंदुस्थानांत येऊन गेला. त्या वेळीं त्या देशाची राजधानी जालंधर शहर ही होती. (भारतवर्षीय भूवर्णन पृष्ठ १२७ व १२८) (मध्ययुगीन भारत भाग ३ पृष्ठ ४७०।७२)

२ महाभारतांत ' मद्र ' देशाची राजधानी ' शाकल ' ही 'आपगा' नदीवर होती असें वर्णन आहे. (महाभारत सभापर्व अ० ३२) या शहरास शिकंदरानें ' संगल ' व गौतमबुद्धानें ' सागल ' असें म्हटलें आहे. चिनी प्रवासी ह्यूएनसंग (इ. स. ६२९) ह्यानें ' शाकल ' चें राज्य सिंधू व व्यास ह्या नद्यांच्या मधें होतें असें लिहिलें आहे. या प्रदेशास अजूनही ' मद्रदेश ' म्हणतात. (भा० व० भूवर्णन पृ० १३९)

३ काठेवाडाजवळचा प्रदेश पूर्वी महाभारत व पुराणें यांत ' सुराष्ट्र ' या नांवानें प्रसिद्ध आहे. त्यावरील ' सौराष्ट्र ' नावाचें राज्य इ. स, ३१९ मध्यें नाहींसें झालें. त्याजागीं ' वल्लभ ' राज्य झालें. त्याची राजधानी ' वल्लभी ' झाली ' वल्लभी शक ' इ. स. ३१९ पासून सुरु झाला. त्या राजांचा लोप झाला याचें दर्शक हा शक आहे असें अबुरिहान हा म्हणतो. (भा. व. भूवर्णन पृष्ठ १७८)

४ महाभारतांतील पुण्यश्लोक राजा युधिष्ठिर यांचा शक चालू आहे. त्यावरूनहि युधिष्ठिर हा राजा होऊन गेला ही गोष्ट खरी मानावी लागते.

५ पंजाब प्रांतांतील ' हरप्पा ' या गांवीं व सिंध प्रांतांतील ' मोहेंजो-दारो ' या ठिकाणीं अलिकडे सापडलेल्या प्राचीन अवशेषांची हकिकत या पुस्तकाचें प्रकरण २ यांत दिली आहे. व त्या संबंधानें युरोपियन ग्रंथकार मि. पंडेल यांचें मत त्याच प्रकरणांत दिलें आहे. त्यांत त्यांनीं हिंदूंच्या वेदांत, पुराणांत जी राजवंशांची व अग्निकुळांची परंपरा वर्णिली आहे, ती वस्तुतः सत्य आहे असें स्पष्ट मत लिहून ठेविलें आहे.

अशीं अनेक उदाहरणें वाचून मनास थोडा धीर आल्यामुळें हें काम पुन: हातीं घेतलें व प्राचीन ग्रंथांतील माहिती आधारभूत मानून तिच्याच अनुरोधानें अर्वाचीन इतिहासांतील मिळाला तितका भाग यांत एकत्र केला आहे. आतां प्राचीन इतिहासांतील (पुराणादिकांतील) वर्णनांची तरफदारी केल्यामुळें त्यांतील सर्व वर्णनें खरीं मानावीं कीं काय? त्यांत जी अतिशयोक्ती लिहिली आहे व अशक्य गोष्टी सांगितल्या आहेत, त्या अंधश्रद्धेनें खऱ्या मानाव्या कीं काय? असा कित्येकांचा प्रश्न येईल त्याचें उत्तर माझ्या अल्प मतीस सुचतें तें असें, कीं, प्राचीन मूळ ग्रंथ संस्कृत भाषेंत काव्यमय श्लोकांत लिहिले आहेत. काव्यमय कथानकांत व वर्णनांत अतिशयोक्ती व कविकल्पनांचें निरंकुशत्व असणें हा कवि- सांप्रदाय सर्वत्र आहे. अर्वाचीन कालांतील कविवर्गाच्या काव्यांतहि हा कविसांप्रदाय दिसून येतोच. करितां त्यांतील अतिशयोक्ति व कविकल्पना हीं वगळून मुख्य इतिहास ग्राह्य मानण्यास हरकत दिसत नाहीं. आपले प्राचीन ग्रंथ ह्मणजे आपल्या संस्कृतीचा आपल्या पूर्वजांनीं सांठविलेला ठेवा आहे अशी भावना ठेवून त्याकडे कुतूहल दृष्टीनें पाहावें अशी वाचक वर्गाकडे माझी नम्र विनंति आहे.

ग्रंथलेखनाचा माझा हा पहिलाच प्रयत्न आहे. त्यांत साधनसामुग्री- चीहि बरीच उणीव आहे. शिवाय इतिहासासारख्या प्रगल्भ व गंभीर विषयावर मार्मिक लेख लिहिण्या इतकी माझी योग्यता अगर विद्वत्ता नाहीं परंतु आपल्या हातून होईल तितकी समाजसेवा घडावी, असें मनानें घेतल्यामुळें ‘ आकाश अंत न कळोनिहि अंतरिक्षीं । आकाश आक्रमिति शक्त्यनुसार पक्षी ॥ ’ या पंडितोक्ती प्रमाणें ही अल्प सेवा पुस्तकरूपानें समाजापुढें ठेविली आहे. मनुष्य हा चुकीस पात्र आहे या तत्वास अनु- सरून यांत बऱ्याच चुका व दोष असण्याचा संभव आहे तरी हंस क्षीर न्यायानें वाचकांनीं गुणलेशाचा स्वीकार करून चुका व दोष दुरुस्त

करण्याबद्दल मला सूचना करावी ह्मणजे सुदैवानें दुसरी आवृत्ति काढ-ण्याचा प्रसंग आल्यास शक्य ती त्यावेळीं मी दुरुस्ती करीन.

या पुस्तकांत ज्या ज्या ग्रंथांचा आधार घेतला आहे, त्या त्या ग्रंथांची यादी या सोबत जोडिली आहे. त्या ग्रंथांचा मला फार उपयोग झाला असल्यानें त्या ग्रंथांच्या विद्वान संपादकांचा मी अत्यंत ऋणी आहे. त्यांतील एक दोन ग्रंथकारांचा व माझा कांहीं गोष्टींसंबंधानें प्रामाणिक-पणें मतभेद झाल्यामुळें त्यांच्या विरुद्ध मत नमूद करावें लागलें तथापि त्यांच्या संबंधानें माझ्या मनांतील पूज्यभाव यत्किंचित कमी झालेला नाहीं, हें येथें प्रांजळपणें लिहून ठेवीत आहें.

या पुस्तकाच्या छपाईचें व प्रूफें तपासण्याचें काम माझे परम स्नेही-कर्मवीर श्री. दत्तोपंत सडेकर ' धनंजय ' प्रेसचे मालक—खानापूर यांनीं चांगल्या प्रकारें केलें याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहे.

शेवटीं दयाघन परमेश्वराच्या कृपेनें हें कार्य शेवटास गेल्याबद्दल त्याचे उपकार मानून व त्यास वंदन करून ही अल्पकृति वाचकांच्या हातीं देतों.

गडहिंग्लज, ता. १।२।३७

पुस्तककर्ता,
रामचंद्र नरहर सोहनी.



या पुस्तकांत ज्या ग्रंथांतील लेखांचा आधार घेतला आहे त्या ग्रंथांची यादी.

---

१ मनुस्मृति–महाराष्ट्र भाषांतरसहित श्री वि. वा. बापट शास्त्री कृत
२ महाभारत–श्रीमन्नीलकंठ विरचित टीकयासमेतः (संस्कृत) वन-पर्वात्मको द्वितीयोभागः पंडित रामचंद्रशास्त्री किंजवडेकर कृत.
३ श्रीमन्महाभारतार्थ–(महाभारताचें सुबोध मराठी भाषांतर) तृतीयखंड आचार्यभक्त श्री. विष्णु वामन बापट शास्त्री पुणें.
४ " " चतुर्थखंड.
५ श्रीमन्महाभारताचें भाषांतर—श्री. चिपळूणकर मंडळीकृत.
६ मार्कंडेय पुराण कै. का. वा. लेले शास्त्री वाई–यांनीं केलेलें सटीक बुक.
७ भारतवर्षीय प्राचीन ऐतिहासीक कोश-कै. र. भा. गोडबोलेकृत.
८ भारतवर्षीय भूवर्णन—कै. शंकर बाळकृष्ण दीक्षित कृत.
९ मध्ययुगीन भारत भाग ३ रा—श्री. राव ब. चिंतामण-राव वैद्य एम. ए. एल, बी. (भारताचार्य यांनीं लिहिलेलें)
१० सारस्वतरत्नमाला भाग १ ला— श्री. ग. रा. शर्मा कृत.
११ सरस्वतिमंडल – कै० रामचंद्र भिकाजी गुंजीकर कृत.
१२ डॉ. सर रा. गो. भांडारकर यांचें चरित्र कर्नाटकी–कृत.
१३ सावंतवाडी संस्थानचा इतिहास–श्री. वि. पु. पिंगुळकर कृत
१४ आद्य जगद्गुरु श्री. शंकराचार्यांचें चरित्र—आठले–कृत.

१५ हिंदी सुमेरी संस्कृति—श्री. दाजी नागेश आपटे बी. ए. एल. एल. बी. बडोदें कृत.

१६ पंडित मोतिलाल नेहरू यांचें चरित्र—श्री. राजाराम प्रल्हाद कानिटकर एम. ए. कृत.

१७ सर्वसंग्रह भाग १ ला—श्री. दं. गो. सडेकर-कृत.

१८ गोमंतक परिचय—प्रो. बाळकृष्ण वामन सावर्डेकर-कृत.

१९ श्रीशांतादुर्गा देवस्थानचा इतिहास श्री. वि. रं. शेळडेकर-कृत.

२० श्रीमंगेश देवस्थानाचा इतिहास श्री. श्री. व्यं. वागळे-कृत.

२१ श्रीसंतसंघपुस्तक माळेचें संपूर्ण माहिती पत्रक श्री. थळी-कृत.

२२ गौडसारस्वत ब्राह्मण ज्ञातींतील श्री. स्वामसिंघ पुस्तक. थळी. कृत.

२३ दक्खनचा (दक्षिणेचा) इतिहास डॉ० रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांच्या मूळ इंग्रजी ग्रंथावरून मराठींत श्री. बापट- कृत.

२४ भारत-इतिहास संशोधक मंडळ शके १८३४ (आश्वीन —फाल्गुन) श्री. खंडेराव चिंतामण मेहेंदळे कृत अहवाल.

२५ सदर प्रमाणें चैत्र—भाद्रपद अहवाल.

२६ संयुक्त गौड ब्राम्हण परिषदेचें तृतीय अधिवेशन, प्रकाशक सदानंद त्रिंबक भांडारे व बाजी विष्णु नेरूरकर.

२७ कल्याणमासिकाचा वेदांत अंक भाग ११, अंक १२

२८ आर्योंका मूलस्थान देवीदत्तशुक्ल लक्ष्मीव्यंकटेश्वर प्रेस मुंबई


२९. भक्तमणिमाला श्री. ह. भ. प. पांगारकर कृत.

३० श्रीगुरुपरम्परामृत—पंडित कुमठानारायणाचार्य-कृत.

अनुक्रमणिका.



श्रीदेवीशांतादुर्गा कैवल्यपूर.




श्रीमांगिरीश (मंगेशी)



श्रीमहालसादेवी (महाडदल.)



श्रीदत्तमहाराज (सांखळी–गोवा.)



श्रीगोकर्णमठाधीश श्रीमदिंदिराकांततीर्थ व श्रीमत्कमलानाथतीर्थ श्रीपादवडेर.

[illegible]



श्रीकैवल्यपुराधीश

श्रीमत्पूर्णानंद सरस्वति स्वामी-महाराज.



स्व. न्यायमूर्ति नामदार का. त्रि. तेलंग.
मुंबई हायकोर्ट जज्ज.

॥ श्रीशं वन्दे ॥

सारस्वत—ब्राह्मणांचा इतिहास.

प्रकरण पहिलें.

‘ सरस्वती ’ नदी व ‘ सारस्वत ’ प्रदेश.

‘ इतिहास ’ ह्मणजे मागें घडून गेलेल्या गोष्टींचा संग्रह होय. ज्या वस्तूंचा शेवट झाला, त्या वस्तूंची उत्पत्ति, स्थिति व लय या अवस्था व त्या घडून येतांना ज्या अनेक लहानमोठ्या गोष्टी घडून आल्या त्या सर्वांचा इतिहास या शब्दांत समावेश होतो. तसेंच ज्या वस्तु विद्यमान आहेत, त्या वस्तूंचा इतिहास ह्मणजे त्या वस्तूंच्या उत्पत्तीपासून विद्यमान कालापर्यंत त्यांचीं जीं स्थित्यंतरें झालीं व तीं स्थित्यंतरें देतांना ज्या अनेक लहानमोठ्या अनुषंगिक गोष्टी घडून आल्या त्यांचा संग्रह असा अर्थ मानितां येईल. वस्तूप्रमाणेंच प्राणी, वनस्पति, व इतर सृष्ट पदार्थ यांचे इतिहास त्यांच्यापाशीं संलग्न आहेतच. प्रत्येक प्राणी व त्याचा समाज यांचा इतिहास (कालघटनेमुळें), इतर नैसर्गिक कारणांमुळें व त्यांच्या कृतीमुळें घडून गेलेला असतो, नेहमीं घडत असतो, करितां इतिहास या शब्दाची व्याप्ति फार मोठी आहे. एखाद्या मनुष्याचा इतिहास लिहिणें झाल्यास, सर्व बाजूंनीं परिपूर्ण असा त्याचा इतिहास लिहितां येईल कीं नाहीं, याची शंका आहे, कारण त्याचे ठळक गुण, कर्तृत्व, त्याची वागणूक

इत्यादि मुख्य मुख्य गोष्टींचा इतिहास लिहिला जातो; परंतु त्याच्या आयुष्यांतील क्षणोक्षणीं घडलेल्या बारीकसारीक गोष्टी सर्वच त्यांत येऊं शकतील असें नाहीं. तसेंच कांहीं गोष्टी गौण ह्मणून वगळल्या जातात, तर कांहींची पूर्ण माहिती नसल्यामुळें वगळल्या जातात. इतिहास या शब्दांत बऱ्यावाईट, लहानथोर, कृतीनें घडलेल्या, अगर नैसर्गिकरीत्या घडून आलेल्या अशा सर्वच गोष्टींचा समावेश होत असल्यानें त्याचा संपूर्ण इतिहास लिहिला गेला आहे, असें ह्मणतां येणार नाहीं.

एका व्यक्तीच्या इतिहासाची स्थिति या प्रकारची आहे, तर एखाद्या समाजाचा इतिहास लिहिणें हें किती अवघड आहे हें सांगावयास नकोच. तशांत आमच्या या हिंदुस्थानदेशांत प्राचीनकालीं कोणत्याही गोष्टीचा भरंवशालायक असा इतिहास लिहिलेला आढळत नाहीं. अतिप्राचीन ग्रंथ ह्मणजे वेदग्रंथ होत. त्यांतहि ऋग्वेदसंहिता सर्वांत जुनी आहे; परंतु त्या संहितेचा काल किती प्राचीन आहे हें ठरविण्यास साधन नाहीं. शिवाय त्या संहितेंतही ऐतिहासिक गोष्टी संगतवार नाहींत. इतिहास या दृष्टीनें त्या लिहिलेल्या नाहींत. तसेंच इतर श्रुतिग्रंथांत इतिहास हा मुख्य विषय नसल्यानें प्राचीन इतिहास लिहिण्यास त्यांचा विशेष उपयोग नाहीं. उपनिषदें, महाभारत, श्रीमद्भागवत व इतर पुराणग्रंथ यांतील वर्णनें हीं निराळ्या पद्धतीनें व निराळ्या कारणांकरितां लिहिलीं असल्यानें एखाद्या समाजाचा साद्यंत इतिहास लिहिण्यास त्यांचा भरपूर उपयोग होण्याजोगा नाहीं. अशा स्थितींत एखाद्या समाजाचा इतिहास

लिहिण्याचें काम हातीं घेणें ह्मणजे धाष्टर्य करणें होय; परंतु **श्रुति, स्मृति, पुराणविषयक** ग्रंथांत व **महाभारत, भागवत, रामायण** इत्यादि इतिहास ग्रंथांत ठिकठिकाणीं ऐतिहासिक माहिती त्रोटक त्रोटक अशी सांपडते. सारस्वत ब्राह्मणसमाजासंबंधाची त्यांतील माहिती एका बुकांत संग्रहीत करावी अशा हेतूनें हा अल्प प्रयत्न करीत आहें.

सारस्वत ब्राह्मणांचा इतिहास प्राचीनकालापासून संगतवार व विस्तृत असा लिहिलेला आढळत नाहीं. निदान माझ्या वाचनांत तरी आलेला नाहीं. वंदनीय पुरुष कै० रामचंद्र भिकाजी **गुंजीकर** यानीं दक्षिणेंतील सर्व ब्राह्मणासंबंधाची ऐतिहासिक माहिती महत्प्रयासानें एकत्र करून '**सरस्वती-मंडल**' पुस्तकांतून सन १८८४ सालीं प्रसिद्ध केली आहे. त्यांत सारस्वत ब्राह्मणांचाहि इतिहास लिहिला आहे. तो इतिहास लिहून प्रसिद्ध केल्यामुळें आमच्या समाजावर त्यांचे महदुपकार झाले आहेत व त्याबद्दल आमचा समाज त्यांचा सदैव ऋणी आहे. त्या इतिहासांत लिहिलेल्या प्राचीन आधारांवरून ते ग्रंथ वाचण्याची इच्छा उत्पन्न झाली. त्याप्रमाणें वाचन चालूं असतां त्यांत आमच्या समाजाच्या इतिहासाचा जो भाग आढळला तो एकत्र लिहून ठेवावा असें मला वाटल्यावरून तसें करण्याचा हा प्रयत्न केला आहे. अर्थात् कै० गुंजीकर यांनीं जो वृक्ष लाविला त्याचेंच एक फल प्रस्तुत पुस्तक आहे असें प्रांजलपणें वाचकांस कळवून मुख्य विषयाकडे वळतों.

नदीच्या कांठच्या प्रदेशास ' माहेयें ' इत्यादि नांवें दिलेलीं आढळ-तात. त्याचप्रमाणें सरस्वती नदीच्या कांठच्या प्रदेशास ' सारस्वत ' या नांवानें संबोधिलेलें आहे. अर्थात सारस्वत ब्राह्मणांचा मूळ प्रदेश सारस्वत देश आहे हें स्पष्ट आहे. आतां सरस्वती नदीच्या कांठचा प्रदेश हिंदुस्थानांत कोठें आहे हें स्पष्ट करण्याकरितां सरस्वती नदीचें वर्णन व स्थान याविषयीं माहिती येथें देणें अवश्य आहे. करितां ती माहिती प्रथम येथें देतों:—

पंजाबांत सिंधू नदीचे मोठे पांच प्रवाह आहेत. त्यांतील पूर्वेकडील प्रवाह सतलज नदी हा होय. या नदीला आमच्या प्राचीन ऋग्वेदादि ग्रंथांत शतद्रु म्हटलें आहे[१]. त्या नदीच्या पूर्वेस कांहीं अंतरावर व यमुना नदीच्या पश्चिमेस कांहीं अंतरावर सरस्वती नदी आहे. या नदीचा उगम हिमालय पर्वतांत आहे. तेथें तिचे सात प्रवाह आहेत. ते प्रवाह प्रथम पूर्व-पश्चिम वाहत जाऊन पुढें एकत्र झाले व तो प्रवाह दक्षिणेकडे वळला व तसा वाहत वाहत कच्छच्या रणाच्या पूर्वेकडील बाजूनें येऊन आरबी समुद्रास मिळाला होता, असें प्राचीन ग्रंथां-वरून दिसतें. ऋग्वेदांतील मंडल ७ सूक्त ९५ यांतील दुसऱ्या ऋचेंत " पर्वतापासून समुद्रापर्यंत वाहणाऱ्या नद्यांमध्यें शुद्ध अशा फक्त एका सरस्वती नदीनें त्याची (नहुषराजाची) प्रार्थना ध्यानांत घेतली " असा उल्लेख आहे. महाभारतांतील शल्यपर्वांत बलरामाच्या तीर्थयात्रेचें वर्णन आहे. ती तीर्थयात्रा त्यानें सरस्वती नदींतील

१ भारत भीष्म० अध्याय ९--१ भारत शल्य० अध्याय ३७ ते ५४, भागव० स्कं० १ अ० १, १ भा० भूवर्णन पृष्ठ १७,

उपलब्ध असलेल्या प्राचीन ग्रंथांपैकीं श्रुति (वेद) स्मृति, उपनिषदें, व कांहीं पुराणें यांत ब्राह्मणजातीबद्दल जे उल्लेख आहेत त्यांत ब्राह्मणांतील मुख्य दोन भेद (गौड-द्राविड) या भेदांचा उल्लेख नाहीं. यावरून प्राचीनकालीं सर्व ब्राह्मणजाति एकच होती हें निर्विवाद आहे. अलिकडील इतिहासलेखकहि ही गोष्ट कबूल करितात. पुढें बऱ्याच कालानंतर हे भेद अस्तित्वांत आले आहेत. ते कधींपासून अस्तित्वांत आले, याबद्दल मतभेद आहे. त्याबद्दलचें जास्त विवेचन पुढें क्रमानें येईल. याठिकाणीं ते मुख्य दोन भेद व त्याचे पांच पांच पोटभेद आहेत ते प्रथम लिहितों. मुख्य दोन भेद गौड व द्राविड हे वर लिहिलेच आहेत. या प्रत्येक भेदाचे पांच पांच पोटभेद झाले आहेत. गौडांचे पोटभेदः—(१ सारस्वत) (२ कान्यकुब्ज) (३ गौड) (४ मैथिल) (५ उत्कल) हे होत. व द्राविडांतील पोटभेदः—(१ द्रविड) (२ महाराष्ट्र) (३ अंदर-आंध्र-तैलंग) (४ कर्नाटक) आणि (५ गुर्जर) हे होत.[२] हीं नांवें त्या पोटभेदांतील ब्राह्मणाच्या राहण्याच्या देशावरून त्यांना प्राप्त झालीं आहेत. प्राचीनकालीं त्या त्या नांवाचे देश होते असें त्यावेळच्या ग्रंथांवरून दिसून येतें. त्यावेळीं बऱ्याच नद्यांच्या आसपासच्या प्रदेशास त्या त्या नद्यांच्या नांवावरून संबोधिलेलें आढळून येतें. उदाहरणार्थ, यमुना नदीच्या कांठच्या प्रदेशास ' यामुन[३] ' महीं

१ मध्ययुगीन भारत भाग ३ पृष्ठ ५५० व सरस्वतीमंडल पृष्ठ २, २ स्कंद-पुराण, सह्याद्रिखंड, स्टीलचा हिंदु लॉ पृष्ठ (७९) मांडवेकरकृत मराठी हिंदुशास्त्र भाग १ पृष्ठ ११०, ३ भाग स्कं० १ अध्याय १०.

नदीच्या कांठच्या प्रदेशास ' माहेयं ' इत्यादि नावें दिलेलीं आढळतात. त्याचप्रमाणें सरस्वती नदीच्या कांठच्या प्रदेशास ' सारस्वत ' या नांवानें संबोधिलेलें आहे. अर्थात सारस्वत ब्राह्मणांचा मूळ प्रदेश सारस्वत देश आहे हें स्पष्ट आहे. आतां सरस्वती नदीच्या कांठचा प्रदेश हिंदुस्थानांत कोठें आहे हें स्पष्ट करण्याकरितां सरस्वती नदीचें वर्णन व स्थान याविषयीं माहिती येथें देणें अवश्य आहे. करितां ती माहिती प्रथम येथें देतों:—

पंजाबांत सिंधू नदीचे मोठे पांच प्रवाह आहेत. त्यांतील पूर्वेकडील प्रवाह सतलज नदी हा होय. या नदीला आमच्या प्राचीन ऋग्वेदादि ग्रंथांत शतद्रु म्हटलें आहे[३]. त्या नदीच्या पूर्वेस कांहीं अंतरावर व यमुना नदीच्या पश्चिमेस कांहीं अंतरावर सरस्वती नदी आहे. या नदीचा उगम हिमालय पर्वतांत आहे. तेथें तिचे सात प्रवाह आहेत. ते प्रवाह प्रथम पूर्व-पश्चिम वाहत जाऊन पुढें एकत्र झाले व तो प्रवाह दक्षिणेकडे वळला व तसा वाहत वाहत कच्छच्या रणाच्या पूर्वेकडील बाजूनें येऊन आरबी समुद्रास मिळाला होता, असें प्राचीन ग्रंथांवरून दिसतें. ऋग्वेदांतील मंडल ७ सूक्त ९५ यांतील दुसऱ्या ऋचेंत " पर्वतापासून समुद्रापर्यंत वाहणाऱ्या नद्यांमध्यें शुद्ध अशा फक्त एका सरस्वती नदीनें त्याची (नहुषराजाची) प्रार्थना ध्यानांत घेतली " असा उल्लेख आहे. महाभारतांतील शल्यपर्वांत बलरामाच्या तीर्थयात्रेचें वर्णन आहे. ती तीर्थयात्रा त्यानें सरस्वती नदींतील

१ भारत भीष्म० अध्याय ९--१ भारत शल्य० अध्याय ३७ ते ५४, भागव० स्कं० १ अ० १, ३ भा० भूवर्णन पृष्ठ ३७,

पासून सात प्रवाह आहेत, त्यांमधील प्रदेशास 'सप्त सारस्वत' म्हटलें आहे[1]. वस्तुतः 'सारस्वत' व 'सप्त सारस्वत' या दोन नांवांनीं संबोधिलेले देश एकच होत; परंतु ज्याठिकाणीं तिचे सात प्रवाह वाहत आहेत, त्याठिकाणीं त्या देशाचे सात विभाग नैसर्गिकरीत्या झाले असल्यानें त्या सर्व विभागांस एकत्र नांव 'सप्तसारस्वत' असें पडलें होतें असें दिसतें. या सात प्रवाहांचीं नावें. सुप्रभा, कांचनाक्षी, विशाल, मनोरमा, ओघवती, सुरेणु आणि विमलोदका हीं होत[2]. भारतीय युद्धांत भीष्माचार्य हे शरपंजरीं पडले होते, ते यांतील ओघवती नदीच्या कांठीं पडले होते व तेथेंच त्यांनीं शांतिपर्व व अनुशासनपर्व हीं पर्वें धर्मराजास सांगितलीं असें वर्णन शांतिपर्वांत आहे[3].

सरस्वती नदी व तिच्या कांठचा प्रदेश याबद्दल वर्णन ऋग्वेदांत पुष्कळ ठिकाणीं आहे. त्यांतील या नदीसंबंधीं कांहीं वर्णन येथें देतों—

ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलांतील सूक्त ७५ वें. कांहीं नद्यांच्या प्रार्थनेबद्दल आहे. त्यांतील ५ वी ऋचा अशी आहेः—

इमंमे गंगे यमुने सरस्वति शतद्रु स्तोमंसचता परुष्ण्या ॥
असिक्न्या मरुद्वृधे वितस्तयार्जीकीये शृणुह्या सुषोमया ॥५॥

अर्थ—हे गंगे, यमुने, सरस्वति, शतद्रू तुह्मी परुष्णी आणि असिक्नी या नद्यांसह हें माझें स्तोत्र स्वीकारा. हे मरुद्वृधे तूं वितस्तेसह आणि आर्जिकीये तूं सुषोमेसह (माझें स्तोत्र ऐक.)

यांतील कांहीं नद्यांचीं नावें हल्लीं प्रचारांत वेगळीं आहेत तीं कै० शंकर बाळकृष्ण दीक्षित यांनीं आपल्या 'भारतवर्षीय भूवर्णन'

१ अ० ३७ ते ४०. २ शल्यपर्व अ० ३७. ३ अ० ५०. ४ भारत भूवर्णन पृ० २१२ २१३.

तीर्थसंबंधानें सरस्वती नदीच्या मुखापासून उगमापर्यंत केली आहे. आरबी समुद्राच्या किनाऱ्यावर द्वारकेच्या पूर्वेस कांहीं अंतरावर प्रभास ह्मणून तीर्थ आहे. तेथें सरस्वती नदी समुद्रास मिळाली होती. तेथून त्यानें तीर्थयात्रेस आरंभ केला असें वर्णन आहे. मार्कंडेय पुराण अ० ५४ यांत नद्यांचें वर्णन आहे, त्यांत सरस्वतीचा उगम हिमालय पर्वतांत असून ती समुद्रास मिळते, असा उल्लेख आहे. महाभारत वनपर्व अध्याय ८२ यांत तीर्थस्नानांचें वर्णन आहे त्यांत सरस्वती नदी व सागर यांच्या संगमस्थानाचें वर्णन दिलें आहे[3].

सरस्वतीनदी व सागर यांच्या संगमाबद्दल येथें इतकें लिहिण्याचें कारण हल्लीं सरस्वती नदीचा प्रवाह समुद्रापर्यंत दृश्य स्वरूपांत नाहीं. उगमापासून राजपुतान्यांतील वाळवंटापर्यंत प्रवाह चालू आहे. पुढें त्या वाळवंटांत तो गुप्त झाला आहे. ज्याठिकाणीं तो प्रवाह गुप्त झाला त्याठिकाणीं '**विनशन**' नांवाचें तीर्थ आहे[4]. हा प्रवाह गुप्त होऊनहि पुष्कळ काल लोटून गेला आहे. मनुस्मृति हा ग्रंथ अति प्राचीन मानिला आहे, त्यांत सरस्वती नदीचा प्रवाह वरील ठिकाणीं गुप्त झाल्याचा उल्लेख आहे[5]. अर्थात, त्यापूर्वींच हा प्रवाह गुप्त झाला आहे असें मानावें लागतें; परंतु त्यानंतर आज-पर्यंत किती काल गेला आहे, हें ठरविणें अशक्य आहे. असो.

महाभारतांत शल्यपर्वांत या विनशन तीर्थापासून सरस्वतीच्या उगमा-पर्यंतच्या सर्व प्रदेशास '**सारस्वत**' असें ह्मटलें आहे. त्यांतच उगमा-

---

१ शल्यपर्व अ० ३५, २ अ० ५४ श्लोक १६।१२।?, ३ श्लोक ६०, ४ वन पर्व अ० ८२ श्लोक १११, ५ अध्याय २ श्लोक २१

पासून सात प्रवाह आहेत, त्यांमधील प्रदेशास 'सप्त सारस्वत' ह्मटलें आहे[1]. वस्तुतः 'सारस्वत' व 'सप्त सारस्वत' या दोन नांवांनीं संबोधिलेले देश एकच होत; परंतु ज्याठिकाणीं तिचे सात प्रवाह वाहत आहेत, त्याठिकाणीं त्या देशाचे सात विभाग नैसर्गिकरीत्या झाले असल्यानें त्या सर्व विभागांस एकत्र नांव 'सप्तसारस्वत' असें पडलें होतें असें दिसतें. या सात प्रवाहांचीं नावें. सुप्रभा, कांचनाक्षी, विशाल, मनोरमा, ओघवती, सुरेणु आणि विमलोदका हीं होत[2]. भारतीय युद्धांत भीष्माचार्य हे शरपंजरीं पडले होते, ते यांतील ओघवती नदीच्या कांठीं पडले होते व तेथेंच त्यांनीं शांतिपर्व व अनुशासनपर्व हीं पर्वें धर्मराजास सांगितलीं असें वर्णन शांतिपर्वांत आहे[3].

सरस्वती नदी व तिच्या कांठचा प्रदेश याबद्दल वर्णन ऋग्वेदांत पुष्कळ ठिकाणीं आहे. त्यांतील या नदीसंबंधीं कांहीं वर्णन येथें देतों—

ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलांतील सूक्त ७५ वें. कांहीं नद्यांच्या प्रार्थनेबद्दल आहे. त्यांतील ५ वी ऋचा अशी आहेः—

इमंमे गंगे यमुने सरस्वति शतद्रु स्तोमंसचता परुष्ण्या ॥
असिक्न्या मरुद्वृधे वितस्तयार्जीकीये शृणुह्या सुषोमया ॥५॥

अर्थ—हे गंगे, यमुने, सरस्वति, शतद्रू तुह्मी परुष्णी आणि असिक्नी या नद्यांसह हें माझें स्तोत्र स्वीकारा. हे मरुद्वृधे तूं वितस्तेसह आणि आर्जिकीये तूं सुषोमेसह (माझें स्तोत्र ऐक.)

यांतील कांहीं नद्यांचीं नावें हल्लीं प्रचारांत वेगळीं आहेत तीं कै० शंकर बाळकृष्ण दीक्षित यांनीं आपल्या 'भारतवर्षीय भूवर्णन'

१ अ० ३७ ते ४०. २ शल्यपर्व अ० ३८. ३ अ० ५०. ४ भारत भूवर्णन पृ० २१२।२१३.

या बुकांत दिलीं आहेत. तीं अशीं — शतद्रु = सतलज, परुष्णी = रावी, असिक्नी = चिनाब, वितस्ता = झेलम, आर्जीकीया = व्यास, हीं हल्लींचीं नांवें आहेत. सतलज, रावी, चिनाब, झेलम, व्यास, ह्या नद्या सिंधु नदीच्या शाखा आहेत, हें वाचकांस विदित आहेच. बाकीच्या नद्यांचीं नांवें (गंगा, यमुना, सरस्वति) हीं प्राचीन-कालापासून आजतागाईत कायम आहेत. त्यांतील सरस्वती नदीचें वर्णन व ती देवता समजून तिची प्रार्थना इत्यादि ऋग्वेदांतील मंडल २।३।७।८ यांत आहे. त्यासंबंधाचें थोडक्यांत वर्णन सदरच्या भूवर्णन या बुकांत दिलें आहे[1]. त्याचाच उतारा येथें घेतों—

सरस्वती—ही ऋग्वेदसंहितेंत पुष्कळ प्रसिद्ध आहे. सातव्या मंडलांतील ९५ आणि ९६ हीं सूक्तें सरस्वती आणि सारस्वत यांविषयीं आहेत. सरस्वती ही नदीरूपानें वर्णिलेली असते व देवता असें समजूनहि तिचें वर्णन असतें तथापि देवतास्वरूपांतहि तिचें मूलरूप गर्भित असतें. सरस्वतीचा उल्लेख पुष्कळ स्थलीं आला आहे. त्यांतून कांहीं प्रसिद्ध स्थलें सांगतों.

नित्वा दधेवर आपृथिव्या इळायास्पदे सुदिनत्वेंअान्हां ॥
दृषद्वत्यां मानुषआपयायां सरस्वत्यां रेवदग्नेदिदीही ॥

(ऋ० सं० ३।२४।४)

अर्थ—" हे अग्ने, शुभदिनीं मी तुला पृथ्वीवरच्या पवित्रस्थानीं स्थापितों. हे संपत्तिमान अग्ने ! तूं दृषद्वती, आपया आणि सरस्वती यांच्या तीरांवरील मनुष्यसमुदायामध्यें प्रकाशित हो. "

\+ \+ \+

१ पृष्ठ ३०।३१.

" ७-९६-२ आणि ८-२१-१८ यांत तिष्या कांठचे राजे व लोक असा उल्लेख आला आहे. "

चित्र इद्राज राजका इदन्यके यकें सरस्वतीमनु । पृष्ठ (३१)

\+ + +

" २-४१-१६ यांत सरस्वतीस ' अंबितमा, नदितमा, देवीतमा " (मातांमध्यें श्रेष्ठ माता, नद्यांमध्यें श्रेष्ठ नदी, देवीमध्यें श्रेष्ठ देवी) असें ह्मटलें आहे. (पृष्ठ ३१)

\+ + +

" ६-६१-३० आणि ७-३६-६ यांत सरस्वतीस " सप्तस्वसा, सप्तथी, सिंधुमाता " अशीं विशेषणें आहेत. " (पृष्ठ ३१)

\+ + +

" एकंदरींत ऋग्वेदांत सरस्वतीचा महिमा मोठा आहे. सांप्रत जशी गंगा तशी पूर्वीं सरस्वती होती. " (पृष्ठ ३२)

" वर एका ऋचेंत (३--२४-४) सरस्वती आणि दृषद्वती यांच्या पवित्र प्रदेशीं अग्नीची स्थापना केल्याचा उल्लेख आहे. या दोन नद्यांमधील प्रदेशास कुरुक्षेत्र ह्मणतात. तें अति पवित्र मानिलेलें आहे. हें सांप्रत यमुनेच्या पश्चिमेस फार प्रसिद्ध स्थान आहे. याच्या पवित्रतेविषयीं ऋक्संहितेंतहि उल्लेख आला आहे. तसा इतर वेदांतहि आला आहे. " (पृष्ठ ३२--३३)

\+ + +

सरस्वतीचे पुराणांत वर्णिलेले रूप्तप्रवाह यांचें मूळ सप्तधा, सप्तस्वसा; सप्तथी, या शब्दांत आहे. आणि वस्तुतः सांप्रतहि सरस्वतीचे

सात प्रवाह आहेत. एकंदरींत सरस्वती व तिच्या समीपचा प्रदेश हीं अति प्राचीन कालापासून परंपरेनें आजपर्यंत परमपूज्य मानीत आले आहेत " (पृष्ठ ३३)

कै० दीक्षित यांच्या वरील लेखांत सरस्वती व दृषद्वती या दोन नद्यांमधील प्रदेशास ' कुरुक्षेत्र ' ह्मणतात असा जो उल्लेख आहे, तो ब्राह्मण ग्रंथांतील वचनांवरून त्यांनीं घेतला आहे, असें, त्यांच्याच लेखावरून दिसतें. कारण ऋग्वेदांतील स्थलांची माहिती त्यांनीं त्या बुकाचीं पानें ३४।३५।३६ यांत दिली आहे. त्यांत कुरुक्षेत्राचा उल्लेख नाहीं. पुढें पान ३८ वर "ऐतरेयब्राह्मण ८-१४ यांत उत्तरकुरु, उत्तरमद्र यांचीं नांवें आलीं आहेत " असें ह्मटलें आहे. व पान ४५ वर " तैत्तिरीय ब्राह्मण, शतपथ ब्राह्मण, जाबालोपनिषत् आणि रामतापिनी यांत कुरुक्षेत्राचा उल्लेख आला आहे " असें म्हटलें आहे. यावरून ऋग्वेदकालानंतर व ब्राह्मणकालापूर्वी ' कुरुक्षेत्र ' हें नांव प्रचारांत आलें आहे. असें वाटतें. मनुस्मृतीमध्यें या दोन नद्यांमधील प्रदेशास ' ब्रह्मावर्त ' ह्मटलें आहे व कुरुक्षेत्र देश वेगळा दर्शविला आहे. त्या स्मृतीमधील वर्णन आहे तें असें:—

सरस्वती दृषद्वत्योर्देवनद्योर्यदंतरं ।
तं देवनिर्मितं देशं ब्रह्मावर्तं प्रचक्षते ॥ १७ ॥
कुरुक्षेत्रं च मत्स्याश्च पंचालाः शूरसेनकाः ।
एषब्रह्मर्षिदेशो वै ब्रह्मावर्तादनंतरः ॥ १९ ॥

(अध्याय २)

अर्थः—सरस्वती आणि दृषद्वती या देवनद्यांमधील जो प्रदेश त्या देवनिर्मित प्रदेशास ब्रह्मावर्त ह्मणतात. ॥१७॥ कुरुक्षेत्र, मत्स्य, पंचाल, शूरसेन हा ब्रम्हर्षि देश होय. हा ब्रह्मावर्तानंतर आहे ॥१९॥

याप्रमाणें मनुस्मृतींत 'ब्रम्हावर्त' व कुरुक्षेत्र हे दोन देश वेगळे दर्शविले आहेत. परंतु ते दोनीहि देश सरस्वतीच्या कांठीं असून सारस्वत देशाचे पोटविभाग आहेत. ब्राम्हणकालापूर्वी या प्रदेशावर 'कुरु' राजाचें राज्य होतें त्यामुळें या सर्व देशास कुरुदेश असें नांव मिळाले व त्या देशाचेच पोट विभाग पुढें ब्रम्हावर्त, कुरुक्षेत्र, कुरुजांगल, कुरुवर्णक इत्यादि नांवानें पुढील ग्रंथांत वेगवेगळे दर्शविले आहेत असें दिसतें. याबद्दलचें जास्त विवेचन पुढें क्रमानें येईल.

सांप्रतच्या राजपुताना देशास महाभारतांत 'मरुधन्व' असें नांव दिलेलें आढळतें. पांडव वनवासास गेले ते प्रथम "द्वैतवनां"त राहिले नंतर "काम्यकवनां"त राहिले असें वनपर्वांत वर्णन आहे.[1] हीं दोनीहि वनें सरस्वती नदीतीरीं होतीं असें त्यांतील उल्लेखावरून समजतें. त्यांतील "द्वैतवन" हें 'मरुधन्व' देशासमीप होतें[2], व 'काम्यकवन' कुरुजांगल या प्रदेशांत होतें[3]. ह्या वनांच्या प्रदेशाचें स्पष्टीकरण कै० दीक्षित यांच्या भा० भूवर्णन ह्या बुकांत केलें आहे तें असें:—

"यावरून हीं वनें फार तर दहा-पांच कोशांच्या अंतरानें असतील. तीर्थयात्रेहून उत्तरेकडून पांडव आले त्यांस प्रथम द्वैतवन

१ भारतवनपर्व अ० २ ० भारतवन० अ० ३

२ भारतशल्यपर्व अ० ३७ व वनपर्व अ० १५७

३ भारतवनपर्व अ० १० मैत्रेयवाक्यं.

लागलें. मग काम्यकवनांत गेले. यावरून उत्तरेकडून येतांना प्रथम द्वैत, मग नैऋत्येस काम्यक असावें असें दिसतें. कारण दोन्हीही सरस्वतीतीरीं होतीं. ती ईशान्येकडून नैऋत्येकडे वहाते. द्वैतवनांत एक मोठें सरोवर होतें असें दिसतें. द्वैतवनाचा उल्लेख जेथें जेथें आला आहे, त्यांतून पुष्कळ ठिकाणीं "द्वैतवनंसरः" असें आढळतें."

(पृष्ठ ८३)

ऋग्वेदसंहितेंत व महाभारतांत सारस्वत देशाचा उल्लेख आला आहे हें वर दाखविलेंच आहे. इतर ग्रंथांतही सारस्वत देशाचा नामनिर्देश आहे. त्यांतील कांहीं उल्लेख याखालीं देतों:--

श्रीमद्भागवत स्कं. १ अ० १० यांत श्रीकृष्ण कुरुदेशांतून आनर्त देशास जात असतां कोणकोणते देश उल्लंघून गेला ते देश सांगितले आहेत. त्यांत सारस्वत देशाचें नांव आलें आहे. तो श्लोकः—

कुरुजांगल पांचालान्शूरसेनान्सयामुनान् ॥
ब्रम्हावर्तं, कुरुक्षेत्रं मत्स्यान् सारस्वतानथ ॥ ३४ ॥

मार्कंडेय पुराणांत अध्याय ५४।५५ यांत भारतवर्षांतील देश सांगितले आहेत त्यांतील उल्लेखः—

भीरुकच्छाः समाहेयाः सहसारस्वतैरपि ॥
श्लोक ५३ ॥ (अ. ५४).

मध्ये सारस्वता मत्स्याः शूरसेनाः समाथुराः
श्लोक ॥७॥ (अ. ५५).

वराहमिहिरकृत बृहत्संहितेंत भारतवर्षांतील देश सांगितले आहेत त्यांत मध्यभाग व आठ दिशा याप्रमाणें नऊ भाग आहेत त्यांतील

१ भारतवर्षीय प्राचीन ऐ., कोश

मध्यभागांत ‘ सारस्वत ’ देशाचें नांव आलें आहे.

“मरुवत्सघोषयामुन सारस्वत मत्स्य माध्यमिकाः” ॥२॥

पुराणग्रंथांपैकीं कित्येक इतर प्राचीन पुराणांतहि सारस्वत देशाचा उल्लेख आहे. त्या सर्वांचा येथें संग्रह करण्याचें कारण नाहीं. ऋग्वेद कालानंतर व ब्राह्मण कालापूर्वी सोमवंशीय अजमीढ राजाचा पौत्र संवरण यास तपती नामक भार्येपासून ‘ कुरु ’ नामक पुत्र झाला, तो राज्यपदावर आल्यावर त्यानें चांगल्या रीतीनें राज्य करून दीर्घ-कालपर्यंत तपाचरण केलें. त्याच्या कारकीर्दींत या देशास ‘ कुरु ’ देश असें नांव पडलें. त्या देशाची राजधानी हस्तिनापूर होती. त्यापासून पूर्वींचें नांव प्रचारांतून कमी होत जाऊन ‘ कुरु ’ देश हें नांव प्रचारांत आलें असावें असें वाटतें. हा ‘ कुरु ’ राजा कौरव–पांडवांचा पूर्वज होता. या राजानें आपल्या देशांपैकीं ज्या स्थलीं तपाचरण केलें. तें स्थल इंद्राच्या आशीर्वादानें पवित्र झालें. तेंच स्थल ‘ कुरुक्षेत्र ’ या नांवानें प्रसिद्ध आहे[3]. या राजाचा राज्य-विस्तार मोठा झाला होता, असें दिसतें. कारण हिमालयपर्वताच्या पलीकडे उत्तरेस “ उत्तर–कुरु ” ह्मणून एक देश होता असें वर्णन ऐतरेय ब्राह्मण ८–१४ यांत आहे. तोच सांप्रतचा **तिबेट** देश असावा. अर्थात हिमालयाच्या उत्तरेसही कुरुराजाचें राज्य होतें असें दिसतें व हिमालयाच्या दक्षिणेस बऱ्याच अंतरावर मथुरावृंदा-वनपर्यंत कुरुदेशाची मर्यादा होती असें दिसतें. कारण उत्तरेस

---

१ मत्स्य पु. अ. ५० भाग ९ स्कं. अ. १२

२ भा. प्राचीन ऐति. कोश पृ. १५०

३ महाभारत, शल्य अ. ५३

सरस्वतीपासून दक्षिणेस वृंदावन, मथुरापर्यंत जो देश आहे, त्यास कुरुक्षेत्रदेश ह्मटलें आहे. असें मनुस्मृतीचा टीकाकार ह्मणतो[1], या कुरुक्षेत्रदेशापैकीं सरस्वती व दृषद्वती या नद्यांच्यामध्यें जो प्रदेश आहे, तेवढ्याच प्रदेशास ' ब्रह्मावर्त ' असें मनुस्मृतींत ह्मटलें आहे[2].

कुरुराजाच्या या दक्षिणेकडील देशास कुरु देश हें नांव बराच काळ चालू होतें. युरोपियन ग्रंथकारांपैकीं टालमीचा भूगोल इ. स. १५० या सालीं लिहिला आहे[3] त्यांत उत्तर कुरुदेशाचें नांव आलें आहे व तेथें अति मोठें दिनमान १४$\frac{2}{3}$ तासांचें होतें असें त्यानें लिहिलें आहे[4]. इ. सनापूर्वी १२६ पासून इ. स. २५० पर्यंत इंडोसिथियन या राजांचें राज्य पंजाबांत व या प्रदेशावर होतें. व पुढें मुसलमानांचें राज्य होतें[5] त्या अवधींत कुरुदेश हें नांव प्रचारांतून कमी होत चाललें व शारकोट, कमालिया, हरप, अकबर, सतगड, अजुधान इत्यादि शहरें, शारकोटप्रांत, मुसलमानप्रांत वगैरे लहान लहान राज्यें अस्तित्वांत आलीं. या प्रांतांत इंडोसिथियन व मुसलमानी राजे व काबूलचे ब्राह्मणी राजे यांचीं नाणीं सांपडतात[6]. यावरून इ.स.च्या पूर्वी एक शतकापासून परकीय अमलाखालीं हा प्रदेश गेला व त्यामुळें

---

१ भारत व भूवर्णन पृष्ठ ४७ खालील टीप
२ मनुस्मृति अध्याय २ श्लोक १७
३ भारत व. भूवर्णन पृष्ठ १४
४ सदरचें बुक पृष्ठ १४३ शारकोट वर्णन
५ सदरचें बुक पृष्ठ १४३
६ सदर बुक पृष्ठें १४१ ते १५१

देशाच्या नांवांत बदल झाला असें दिसून येते. तथापि त्यापैकीं कांहीं काबूलचे ब्राम्हणी राजे जयपाल, आनंगपाल यांचे पूर्वज असावे. जयपाल, आनंगपाल यांच्याविषयीं त्रोटक माहिती प्रसंगानुसार या बुकांत पुढें येईल.

सरस्वती नदीच्या तीरावरील हल्लींचे प्रदेश कोणते व त्या प्रदेशांतील हल्लींचीं शहरें कोणतीं याबद्दलची त्रोटक माहिती येथें देणें योग्य होईल करितां तिचा उगम व प्रवाह यासंबंधानें दोन शब्द येथें लिहितों तिचा उगम हिमालयांतील शिवालिक पहाडांत आहे. हा पहाड सिमल्याजवळ आहे. शिवालिक पहाडांतून तिचा प्रवाह निघून हांसी व हिसार परगण्यांतून भाटनेर शहराजवळून जातो. तिचे प्रथम सात प्रवाह आहेत. त्यांमधील प्रदेशांत हल्लीं कालामिआ, अंबाला, पत्याळ, उरिआ, स्थानेश्वर इत्यादि शहरें आहेत. स्थानेश्वरच्या नैऋत्येकडे कांहीं अंतरावर प्रवाह एक होऊन तसाच पुढें वहात गेला आहे व फेरोपूर, सरसा इत्यादि शहरांकडून पुढें जाऊन मारवाडच्या रेताड स्थानांत गुप्त झाला आहे. तेथून पुढें आरबी समुद्रापर्यंत जरी प्रवाह बंद झाला असला तरी त्या ठिकाणीं पूर्वीचें पात्र असलेलें दिसतें व हिरवाळ गवतामुळें अदृश्य झालेली सरस्वती नदी ओळखतां येते असें महाभारत शल्यपर्वांत वर्णन आहे.

राव ब. चिंतामणराव वैद्य यांनींहि मध्ययुगीन भारत भाग ३ यांत " ठाणेश्वराजवळ सरस्वती नदी आहे व कर्नाळ जिल्ह्याच्या

१ टॉडकृत राजस्थानचा इतिहास भाग २ पृष्ठ २९५
(सारस्वतरत्नमाला पृष्ठ ३ खालील टीप)

गॅझेटिअरमध्यें देशाचें वर्णन करितांना असें ह्मटलें आहे कीं, ठाणे. शहराच्या उत्तरेस कांहीं डोंगराळ प्रदेश आहेत. त्यांतून वर्षाकाळांत भरणाऱ्या सरस्वती वगैरे नद्या येतात." (पृष्ठ १८२)

गुजराथ प्रांतांत अनहिलवाड हें शहर अबूच्या नैऋत्येस ७० मैलांवर आहे. तें सरस्वतीच्या तीरावर असून चौर वंशांतील एक पुरुष वनराजा यानें स्थापिलें असें के० दीक्षित यांनीं लिहिलें आहे. त्यावरून सरस्वतीनदीचा प्रवाह अरबीसमुद्रापर्यंत होता असें दिसून येतें. या एकंदर वर्णनावरून सरस्वती नदी हिमालयापासून निघून समुद्रास मिळत होती. ही प्राचीन ग्रंथांतील गोष्ट खरी मानावी लागते.


महाभारतांतील शल्यपर्वांत बलरामानें तीर्थयात्रा पुरी करतेवेळीं सरस्वतीनदीचें स्तवन केलें आहे. त्याच श्लोकांनीं येथें तिचें स्तवन करून हें प्रकरण पुरें करितों.

" सरस्वतीवास समाः कुतो रतिः ।
सरस्वतीवास समाः कुतो गुणाः ॥
सरस्वतीं प्राप्य दिवंगता जनाः ।
सदास्मरिष्यन्ति नदीं सरस्वतीं ॥
सरस्वती सर्वनदीषु पुण्या ।
सरस्वती लोकशुभावहा सदा ॥
सरस्वतीं प्राप्य जनाः सुदुष्कृतं ।
सदा न शोचन्ति परत्र चेहच ॥ "

१ भारतवर्षीय भूवर्णन पृष्ठ १७६.

अर्थः—“ सरस्वतीवर वास करीत असतां त्या स्थानाविषयीं मनांत जसें प्रेम उत्पन्न होतें, तसें तें इतरत्र कोठून होणार ? सरस्वतीवासांत जे गुण आहेत, ते इतरत्र कोठून आढळणार ? फार काय सांगावें सरस्वतीवर ज्यांना एकदां रहावयास सांपडलें आहे, ते लोक स्वर्गांत गेले तरी त्यांस एकसारखें सरस्वती नदीचें स्मरण होत राहील. सरस्वती ही सर्व नद्यांत पवित्र आहे. ती सदोदित जनांचें कल्याण करीत असते. सरस्वतीची प्राप्ति झाल्यानंतर लोकांस इहलोकीं अथवा परलोकींहि आपल्या अत्यंत भयंकर अशाहि पातकाबद्दल शोक करण्याचा प्रसंग येत नाहीं. तें सर्व येथें भस्म होतें.”

आतां या सारस्वत देशांत ब्राह्मणांची वस्ति कधींपासून झाल्याचा इतिहास सांपडतो याविषयीं विचार पुढील प्रकरणांत करूं.



प्रकरण दुसरें.

ब्रम्हावर्त हें ब्राह्मणांचें मूलस्थान आहे.

पहिल्या प्रकरणांत सरस्वती व दृषद्वती या दोन नद्यांमधील प्रदेशास ब्रह्मावर्त अगर कुरुक्षेत्र असें प्राचीन ग्रंथांत ह्मटलें आहे, त्याबद्दलची माहिती लिहिली, त्यांतील सरस्वती नदी मोठी असून तिजबद्दलचें शक्य तितकें वर्णन त्या प्रकरणांत आलें आहे. परंतु दृषद्वती नदी फारशी प्रसिद्ध नाहीं व ती लहान असल्यानें ती नकाशांतहि काढलेली नसते. हल्लींच्या भूगोलवर्णनांतही त्या नदीचें वर्णन नाहीं, त्यामुळें वाचकांस ती नदी कोठें आहे अशी जिज्ञासा उत्पन्न होणें सहाजिक आहे. करितां त्या नदीसंबंधाची माहिती थोडक्यांत देऊन नंतर या प्रकरणांतील विषयांकडे वळूं.

दृषद्वती नदीचा उल्लेख ऋग्वेदांत, बहुतेक पुराणांत व महाभारतांत आलेला आहे. या नदीचा उगम हिमालयपर्वतामध्यें असून ती हस्तिनापूर व कुरुक्षेत्र (कौरव-पांडवांची युद्धभूमी) या दोहों ठिकाणांच्यामधून वहात जाऊन दक्षिणेकडे वळली आहे. भारतीय युद्ध संपल्यानंतर भीष्माचार्य युद्धभूमीवर शरपंजरीं असतां त्यांनीं पांडवांस नीति सांगितली त्यासंबंधाचें वर्णन शांतिपर्वांत आहे. त्यांत एकदां युधिष्ठिर, अर्जुनादि बंधूंसहित भीष्ममुखींची नीति श्रवण करून हस्तिनापुरास येण्यास निघाला असतां मार्गांत सूर्यास्ताचा समय होत आला, असें पाहून व दृषद्वतीचें तीर अवलोकन करून कृष्णार्जुनादिकांसहित तेथें संध्योपासन करण्यास थांबला व तें

झाल्यावर हस्तिनापुरांत प्रवेशला असें वर्णन शांतिपर्व अ. ५८ यांत आहे. भीष्माचार्य शरपंजरीं पडले होते, ते ओघवती नदीच्या कांठीं पडले होते, असेंहि वर्णन शांतिपर्वांत आहे. ओघवती नदी ही सरस्वती नदीचे जे सात प्रवाह आहेत, त्यांतील एक आहे. अर्थात सरस्वतीच्या त्या प्रवाहाच्या व हस्तिनापुराच्यामध्यें दृषद्वती नदी आहे, हें वाचकांच्या लक्षांत येईल.

या दृषद्वती नदीच्या उत्तरेकडील व सरस्वतीच्या दक्षिणेकडील जो प्रदेश आहे त्याचें महात्म्य प्राचीन ग्रंथांत फार वर्णिलेलें आहे. या प्रांताचा घेर सुमारें ४० किंवा ४८ कोस आहे[१]. या प्रदेशांत अनेक तीर्थस्थानें आहेत व या प्रदेशांत ब्रह्मदेवानें प्रथम प्रजा निर्माण केल्या असें वर्णन महाभारतांतील शल्यपर्वांत आहे. त्या पर्वांतील अध्याय ३९ यांत 'पृथूदक' या क्षेत्रस्थानीं ब्रह्मदेवानें प्रजा निर्माण केल्या असें ह्मटलें आहे. 'प्रथूदक' स्थान या देशांत आहे. या 'प्रथूदक' शहरास हल्लीं 'पेहोआ' ह्मणतात. हें जुनें शहर स्थानेश्वराच्या पश्चिमेस १४ मैलांवर सरस्वतीच्या दक्षिण तीरावर आहे[२]. सरस्वती नदीचा प्रवाह ठाणेश्वरापासून या शहराजवळून जाऊन पुढें दक्षिणेकडे वळला आहे. प्राचीन ग्रंथांत जीं भूगोलवर्णनें आहेत त्यांत प्रथूदकाच्या उत्तरेकडील प्रदेशास उत्तरापथ ह्मटलें आहे[३]. सृष्टीची उत्पत्ती करितांना प्रजा निर्माण

१ भारत वनपर्व भूवर्णन पृष्ठ ७७

२ " " पृष्ठें १८३।१८४

३ मध्ययुगीन भारत भाग ३ पृष्ठ १७

केल्या, त्यांत ब्रह्ममानसपुत्र (महर्षिआदिकरून) प्रथम येथें उत्पन्न झाले, असें वर्णन आहे. करितां या प्रदेशाच्या महात्म्याबद्दल येथें एक दोन उल्लेख घेतों—

तत्र मासं वसेद्वीरः सरस्वत्यां युधिष्ठिर ।
यत्र ब्रह्मादयोदेवा ऋषयः सिद्धचारणाः ॥५॥
गंधर्वाप्परसो यक्षाः पन्नगाश्च महीपते ।
ब्रम्हक्षेत्रं महापुण्यमभिगच्छन्ति भारत ॥ ६ ॥

महाभारत, वनपर्व अ. ८३

अर्थ—हे युधिष्ठिर, जेथें ब्रह्मादि देव, ऋषि, सिद्धादि व गंधर्वादि श्रेष्ठजीव नित्य गमन करितात, त्या सरस्वतीच्या अति पवित्र 'ब्रह्मक्षेत्रां'त बुद्धिमान् पुरुषानें महिनाभर वास करावा.

महाभारतांतील श्लोकांवर नीलकंठीय टीका प्रसिद्ध आहे. त्या टीकेंतील वरील श्लोकांवरील टीका याखालीं देतों—

ततो गच्छेत राजेंद्र कुरुक्षेत्रमिति कुरुक्षेत्र प्रस्तावे बृहस्पतिरुवाच याज्ञवल्क्यं 'यदनु कुरुक्षेत्रं देवानां देवयजनं सर्वेषां भूतानां ब्रह्मसदनं' इति जाबालोपनिषत्सु प्रसिद्ध मनुकुरुक्षेत्रं स्तौति ब्रम्हक्षेत्रमिति ॥

सारांश 'कुरुक्षेत्र' हें देवांचें यजनस्थान व सर्व भूतांचें 'ब्रह्मसदन' आहे. तसेंच वनपर्वांतील त्या अध्यायाच्या शेवटीं कुरुक्षेत्राच्या या भागास पितामहाची उत्तरवेदि म्हटलें आहे, तो श्लोकः—

तरंतुकारंतुकयोर्यदंतरं रामन्हदानांच मचक्रुकस्य च ॥
एतत्कुरुक्षेत्रस्यमंतपंचकं प्रजापतेरुत्तरवेदिरुच्यते ॥२०८॥

अर्थ—तरंतुक, अरंतुक आणि रामऱ्हद व मचक्रुक यांच्या मधील अंतरास कुरुक्षेत्र ह्मणतात. त्यासच स्यमंतपंचक व पितामहाची (ब्रम्हदेवाची) उत्तर वेदि असेंहि ह्मणतात. मचक्रुक, तरंतुक, रामऱ्हद आणि अरंतुक हीं तीर्थे असून त्यांतील अरंतुक हें सारस्वतीवर आहे व त्याच्या समोरचें तरंतुक दृषद्वतीवर आहे. अर्थात मचक्रुक हें पूर्वेस आणि रामऱ्हद हें पश्चिमेस असावें. हीं कुरुक्षेत्राचीं द्वारें सांगितलीं आहेत. (भारतवर्षीय भूवर्णन पृष्ठ ७६।७७)

या वरील वर्णनावरून या दोन नद्यांमधील कुरुक्षेत्राच्या भागास 'ब्रह्मावर्त,' 'ब्रम्हक्षेत्र,' 'ब्रम्हसदन,' 'ब्रह्मदेवाचीवेदि' इत्यादि नांवें दिलीं आहेत. याचें कारण या भारतवर्षांतील ब्रम्हदेवाचें निवासस्थान तें आहे हें होय. पुढें सृष्टि उत्पन्न केल्यावेळीं मानवी प्राणी कसकसे उत्पन्न झाले या संबंधाचें वर्णन त्यांत आहे. तें असें:-

आरंभीं ब्रह्मदेवाच्या दक्षिणांगापासून स्वायंभूमनु उत्पन्न झाला व वामांगापासून त्या मनूची स्त्री शतरूपा ही उत्पन्न झाली[1]. शतरूपा हिला कोठें कोठें सरस्वती व अनंती असेंहि ह्मटलें आहे. या मनूस प्रियव्रत, आणि उत्तानपाद असे दोन पुत्र आणि आकूती, देवहूती आणि प्रसूती अशा तीन कन्या होत्या. या स्वायंभूमनूशिवाय सनक, सनत्कुमार, सनंदन, सनत्सुजात हे चार मानसपुत्र ब्रह्मदेवानें प्रथम उत्पन्न केले व नंतर रुचिऋषि, कर्दमप्रजापति यांची उत्पत्ति झाली. तसेंच दशमहर्षिंहि उत्पन्न झाले ते महर्षि म्हणजे १ मरीचि, २ अत्रि, ३ अंगिरा, ४ पुलस्त्य, ५ पुलह, ६ क्रतु, ७ भृगु, ८

१ भाग० ८ स्कं० अ० १३, (मत्स्य० अ० ४) मनुस्मृति अ० १ श्लोक ३२

वसिष्ट, ९ दक्ष, १० नारद हे होते. मनुस्मृतींत दक्षाच्या स्थानीं प्रचेतस ह्मटलें आहे. हे महर्षि ब्रह्मदेवाच्या देहापासून ह्मणजे कोणी नेत्रांपासून, कोणी मुखापासून, कोणी प्राणवायूपासून असे उत्पन्न झाले होते[2]. पुढें कर्दमप्रजापति यानें सरस्वती नदीच्या तीरीं राहून प्रजा निर्माण व्हावी ह्मणून दुर्घट तप चालविलें तेव्हां प्रत्यक्ष भगवान प्रसन्न होऊन वरदानपूर्वक त्यास बोलले कीं, स्वायंभूमनु तुला आपली कन्या विवाहविधीनें देईल. तिचें तूं पाणिग्रहण करून प्रजा निर्माण करावीस. याप्रमाणें सांगून भगवान अंतर्धान पावले. पुढें अल्पच कालानें स्वायंभूमनूनें आपली कन्या देवहूती ही त्यास भार्यार्थ दिली.[3] तिजपासून कर्दमप्रजापतीस नऊ कन्या झाल्या. त्या-कला, अनुसूया, श्रद्धा, हविर्भुवा, गति, क्रिया, ख्याति, अरुंधती आणि शांति या होत. या नऊ कन्या त्यानें नऊ महर्षिंना दिल्या. त्या याप्रमाणें-कला-मरीचीस, अनुसूया-अत्रीस, श्रद्धा-अंगिराऋषीस, हविर्भुवा-पुलस्त्यास, गति-पुलहास, क्रिया-क्रतूस, ख्याति-भृगूस, अरुंधती-वसिष्ठास, शांति-अथर्वणऋषीस याप्रमाणें दिल्या[4] आणि या प्रजापतीस एक पुत्र झाला, तो कपिलमहामुनि, या नांवानें प्रसिद्ध होता.

१ भाग० ३ स्कं० अ० १२, म० अ० ३ श्लोक ६।७

२ भाग० ३ स्कं० अ० १२

३ भाग० ३ स्कं० अ० २१।२४

४ भाग० ३ स्कं० अ० ११।२४

५ भाग० स्कं० अ० २१।१४

स्वायंभूमनुची दुसरी कन्या देवहूती ही कर्दमप्रजापतीस दिली हे वर सांगितलें. पहिली आकूती रुचिऋषीस विवाहविधीनें दिली होती[१] व तिसरी प्रसूती दक्षप्रजापतीस विवाहविधीनें दिली होती.

तसेंच स्वयंभूमनूचा प्रथम पुत्र प्रियव्रत यास विश्वकर्म्याची कन्या बर्हिष्मती ही स्त्री होती, व[३] दुसरा पुत्र उत्तानपाद यास सुनृता अथवा सुनीती आणि सुरुचि अशा दोन स्त्रिया होत्या[४].

याप्रमाणें महर्षि व प्रजापति यांची उत्पत्ति व त्यांचे विवाहसंबंध सांगितलें आहेत. पुढें त्यांच्यापासून पुढील प्रजा निर्माण झाल्या असें ह्मटलें आहे. अर्थात महर्षि व प्रजापति हे ब्रह्मदेवाचे मानसपुत्र असून त्यांच्यापासून पुढील प्रजा झाली असल्यानें प्रजेशीं ब्रह्मदेवाचें नातें पितामहाचें लागतें कारितां ब्रह्मदेवास पितामह ह्मणण्याची रूढी पडली आहे[५]. वरील विवेचनावरून ब्रह्मदेवापासून महर्षि उत्पन्न झाले ते या ब्रह्मक्षेत्रांत (ब्रह्मावर्त देशात) झाले आहेत असें मानावें लागतें. शिवाय महाभारतांतील शल्यपर्वांतील स्पष्ट आधार वर लिहिलाच आहे.

स्वायंभूमनु हा राजा होता. ब्रह्मावर्त देशावर त्याचें राज्य होतें असें वर्णन भागवतांत आहे. ब्रह्मदेवाचा ज्येष्ठ पुत्र या नात्यानें त्या राज्यावर त्याचें राज्य असणें स्वाभाविक आहे. याच्या पुढील

१ भाग० स्कं० अ० ११

२ भाग० ८ स्कं० अ० १३ मत्स्य० अ० ९

३ भाग० ५ स्कं० अ० ·० देवी भा० ८ स्कं० अ० १२

४ भाग० ४ स्कं० अ० ९

५ महाभा० आदि० अ० ६ व शांतिपर्व अ० ३३६

सहा मनु ह्मणजे स्वारोचिष, उत्तम, तामस, रैवत, चाक्षुष व वैवस्वत हे स्वायंभूमनूचे वंशज होत असें मनुस्मृतींत सांगितलें आहे. (मनु० अ० १ श्लोक ६१।६२) स्वायंभूमनूची राजधानी बर्हिष्मति नगरी होती. येथें स्वायंभूमनू राहात असे. (भाग० तृती० अ० २२) येथें स्वायंभूमनूनें व अन्य ऋषींनीं अनेक यज्ञ केले, असेंहि वर्णन तेथें आहे.

अलिकडील विद्वान् ग्रंथकारही हा प्रदेश ब्राह्मण-क्षत्रियांची मूळ भूमि आहे, ही गोष्ट कबूल करितात. रा. ब. चिंतामणराव वैद्य यांनीं मध्ययुगीन भारत भाग ३ यांत " पंजाब आणि सरस्वतीचा प्रदेश तसेंच पांचाल देश हा ब्राह्मण-क्षत्रियांची मूळ भूमि आहे. हिंदुस्थानच्या दक्षिण व पूर्व भागांत असलेले सर्व ब्राह्मण व क्षत्रिय येथूनच गेलेले आहेत. " असें ह्मटलें आहे. (पृष्ठें ५६५।५६६) तसेंच पृष्ठ १८५ वरील टिप्पणीमध्येंहि "पंजाब प्रारंभापासून वैदिक आर्यांचा देश आहे, यांत विवाद नाहीं. येथेंच वेदांचे मंत्र बहुतेक सर्व तयार होऊन गाइले गेले. येथेंच उत्तरकालीन वैदिक संस्कृति परिणत झाली, " असें लिहिलें आहे. सरस्वती नदीच्या प्रदेशांत पंजाबचा कांहीं व संयुक्तप्रांताचा कांहीं भाग येतो असें वाटतें. असो-

ब्राह्मणांच्या गोत्राख्या नांवाचे ऋषि हे त्या ब्राह्मणांचे पूर्वज आहेत असें मानण्यांत येतें. संध्या करितांना गोत्र, प्रवर यांचा उच्चार करावा लागतो. याप्रमाणें वंशपरंपरा गोत्रें व प्रवर यांची माहिती प्रत्येक ब्राह्मण कुटुंबांत प्रचलित आहे. कोणत्याही ब्राह्मणाचें गोत्र समजून घेऊन त्यावरून पूर्वजांचा शोध करीत गेल्यास

वर लिहिलेल्या महर्षींपैकीं एका महर्षींशीं त्याचा संबंध पोहोंचतो. उदाहरणार्थ, भारद्वाज गोत्र घेतल्यास अंगिरा महर्षींच्या कुलांत अंगिरासुद्धां मंत्रद्रष्टे तेहतीस ऋषि झाले होते. त्यांत तिसरा भारद्वाज हा होता. त्याची भरद्वाजांगिरस नांवाची वंशमालिका आहे. तिचे चार भेद असून त्यांतील एक भेदाचा भरद्वाज हा ऋषि आहे व याच्या गोत्राचे प्रवर अंगिरस, बार्हस्पत्य, भारद्वाज असे आहेत. ही गोत्र, प्रवरांची माहिती मत्स्यपुराणांत लिहिलेली आहे. ब्राह्मणांचीं गोत्रें वंशपरंपरेचीं द्योतक असतात असें याज्ञवल्क्य स्मृती अ. ३ श्लोक ५३ वरील मिताक्षरा टीकेंत लिहिलें आहे. न्यायाधिकारी हायकोर्टानींहि हा नियम मान्य केला आहे. ३४ पंजाब लॉ. रि. २०७ या निवाड्यांत हें तत्त्व मान्य केलें आहे.

या विवेचनावरून या भारतवर्षांतील सर्व ब्राह्मण वर लिहिलेल्या महर्षींचे वंशज आहेत, हें वाचकांच्या ध्यानीं येईल. आतां ब्रह्मदेवापासून महर्षि व प्रजापति यांची उत्पत्ति झाली ही गोष्ट तार्किक पद्धतीनें विचार करणारांस पटणार नाहीं, हें खरें आहे; परंतु या प्रचंड विश्वांत मानवी कल्पनाशक्तीस न उलगडणारीं अशीं अनेक गूढ रहस्यें आहेत हें ध्यानांत ठेविलें पाहिजे. सृष्टीच्या उत्पत्तीच्या अगदीं आरंभीं, प्राणीकोटीपैकीं प्रथम नर उत्पन्न झाला कीं मादी उत्पन्न झाली, वनस्पतीकोटीपैकीं प्रथम बीज उत्पन्न झालें कीं, वृक्ष उत्पन्न झाला. या गोष्टींचा तार्किक पद्धतीनें विचार केल्यास निर्णयात्मक सिद्धांत सांपडतो काय ? नराशिवाय मादीची उत्पत्ति होणें शक्य नाहीं व मादीशिवाय नराची उत्पत्ति होणें शक्य नाहीं.

तसेंच बीजावांचून वृक्षाची उत्पत्ति अशक्य आहे व वृक्षावांचून बीज उत्पन्न होणें अशक्य आहे. विश्वांतील पंचमहातत्त्वें, अंतरिक्षांतील अनंत गोल, विश्वांत नित्य वसणारी नैसर्गिक शक्ति या सर्वांची उत्पत्ति प्रथम कशी झाली हें आह्मां अल्पमति मनुष्यांच्या विचारशक्तीस अगम्य आहे हें कोणीहि कबूल करील. अर्थात शेवटीं सर्वशक्तिमान् असा जगाचा उत्पादक कोणी असला पाहिजे व त्यापासून प्रथम सर्व उत्पत्ति झाली असावी ही भावना अंतःकरणांत उत्पन्न होते. याच कारणामुळें बहुतेक धर्मशास्त्रांत परमेश्वरानें प्रथम एक अथवा अनेक मनुष्यें उत्पन्न केलीं असें मानिलें आहे. ख्रिस्तशास्त्रांत मनुष्यांच्या उद्धारासाठीं देवानें एका कुमारीच्या पोटीं पुत्र उत्पन्न केला, असें मानिलें आहे. मुसलमानी शास्त्रांतही आरंभीं देवानें जग निर्माण केलें, त्यांत मनुष्यें उत्पन्न केलीं असें मानिलें आहे. बहुतेक धर्मशास्त्रांत हा प्रकार दिसून येतो.

आतां या भारतवर्षांत आर्यांची वस्ती प्रथम कशी झाली, यासंबंधाचीं चार मतें प्रसिद्ध आहेत. एक मत असें आहे कीं, आर्यलोक प्रथम हिंदुकुश पर्वताच्या सुमारास कोठें तरी प्रथम रहात होते. तेथून कांहीं पश्चिमेकडे युरोपखंडांत गेले. कांहीं (पारसीक) इराणांत राहिले व कांहीं हिंदुस्थानांत आले असें युरोपियन कांहीं विद्वानांचें मत आहे'. दुसरें मत असें आहे कीं, आर्यलोकांची मूलभूमिच हिंदुस्थान देश आहे. उत्तरहिंदुस्थानांत सरस्वती नदीच्या कांठीं आर्यांची उत्पत्ति झाली. या मताचेंच आधारावर या प्रकरणांत

Muirs Sanskrit Texts v. 11 P, 322; भारत व भूवर्णन पृ. ३७

लिहिलें आहे. या मताचे पुरस्कर्ते बंगाली विद्वान् श्री. अविनाशचंद्र दास[1] व महाराष्ट्रांतील श्री. नानासाहेब पावगी व श्री. विष्णु वामन बापट शास्त्री हे होत[2]. तिसरें मत असें आहे कीं, सुमेरिआ ही आर्यांची मूलभूमि असून तेथून आर्यांची एक शाखा हिंदुस्थानांत आली[3]. ह्या मताचे पुरस्कर्ते मुख्यतः मि. वॅडेल हे आहेत[4]. चवथें मत असें आहे कीं, आर्यांचें मूल स्थान तिसराच एक प्रदेश असून तेथून एक शाखा सुमेरिआ देशीं गेली व एक शाखा हिंदुस्थानांत आली. या मताचा पुरस्कार प्रो० मॅकेंझी यांनीं केला; परंतु तो तिसरा प्रदेश कोणता याचा निर्णय त्यांना करितां आला नाहीं. तो निर्णय लो० टिळक यांनीं सन १९०३ सालीं केला[5].

याप्रमाणें चार मतें प्रचलित आहेत. त्यांपैकीं कोणतें मत निश्चयात्मक खरें आहे हें ठरविणें माझ्या अल्प बुद्धीच्या पल्यांबाहेरचें आहे व या लहानशा पुस्तकांत तें विवेचन करणें अप्रासंगिकहि आहे. करितां त्यासंबंधाचें विवेचन न करितां त्या मतांचा एकंदरींत निष्कर्ष इतकाच कीं, उपलब्ध असलेल्या प्राचीन इतिहासावरून या भारतवर्षांतील आर्यांची मूलभूमि ब्रह्मावर्त, कुरुक्षेत्र इत्यादि देश आहेत. इतकें गृहित धरून चालण्यास हरकत नाहीं. इतकें सांगून मुख्य विषयासंबंधाची आणखी कांहीं माहिती हल्लीं मिळालेली याखालीं देतों—

१ ह्यांनीं लिहिलेलें बुक Rig-vedic India

२ ह्यांनीं लिहिलेलें बुक.

३ ह्यांनीं मनुस्मृतीचें भाषांतर हें बुक लिहिलें आहे, त्यांत आर्यावर्त म्हणजे जेथें आर्य पुनः पुनः उत्पन्न होतात, तो देश अशी व्याख्या केली आहे.

४ हिंदी-सुमेरी संस्कृति पृष्ठ ११०।१११

५ 'आर्टिक होम इन्दि वेदाज' बुक.

आर्यलोकांच्या या मूल देशांत व त्याच्या आसपासच्या प्रदेशांत प्राचीन आर्यसंस्कृतीचे अवशेष अलिकडे सांपडले आहेत म्हणजे पंजाबांतील ' हरप्पा ' या गांवीं व सिंधप्रांतांतील ' माहेंजो--दारो ' या गांवीं सन १९२५ सालीं भूगर्भांत प्राचीन शहरें, इमारती व मौल्यवान् वस्तू सांपडल्या आहेत. त्यासंबंधाचा उल्लेख 'लंडनटाइम्स' वर्तमानपत्राच्या फेब्रुवारी सन १९२६ सालांतील अंकावरून त्याचा उतारा ' हिंदी--सुमेरी संस्कृति ' या बुकाचीं पृष्ठें १३।१४ १५।१६ यांवर दिला आहे. व त्या बुकाचीं पृष्ठें २१।२२ यांवर मि. वॅडेल या युरोपियन विद्वान गृहस्थाच्या लेखांचा उतारा घेतला आहे. त्यांतील जरूरीपुर्तो भाग येथें घेतों:—

" पंजाबांतील ' हराप्पा ' याठिकाणीं श्रीयुत साहनी यांनीं व सिंधमधील ' माहेंजो--दारो ' येथें श्रीयुत के. एन. दीक्षित यांनीं केलेल्या प्राथमिक स्वरूपाच्या उत्खननांवरून हिंदुस्थानच्या प्राचीन इतिहासावर अत्यंत महत्वाचा प्रकाश पडण्यासारखा आहे ".........

माहेंजो-दारो येथें "सपाट मैदानावर सरासरी एक चौरसमैलाच्या आकाराचा व सपाटीपासून सुमारें चाळीस फूट इंचीचा एक मातीचा ढीग येथें होता. या ढिगाच्या चारी बाजूंनीं चर खणले असतां त्यांखालीं एक उत्तम सुंदर बांधणीचें शहर सांपडलें, त्याचा काल ख्रि. पू. ३००० वर्षें हा होय. त्याच्याहि खालीं खणतांना त्यांहून प्राचीनकालचे अवशेष सांपडले आहेत. त्यांत सांपडलेल्या इमारतींचे

साधारणतः दोन वर्ग करितां येतात; एक मंदिरें अथवा देवालयें व दुसरा खासगी राहण्याचीं घरें..............................

......राहत्या घरांत सामानसुमान फारसें आढळून येत नाहीं परंतु त्यांची बांधणी अप्रतिम असून फार सोयीची केलेली होती. त्यांतील विहिरी, स्नानगृहें, पाणी जाण्याच्या पक्क्या मोऱ्या, विटांची फरशी या सर्वांवरून तेथील लोक संपन्न असून सुखवस्तु असल्याचें सिद्ध होतें. रोजच्या उपयोगासाठीं दगडी सुऱ्या असत, परंतु सधन कुटुंबांतून, तांबें, रुपें, सोनें व शिसें या धातूंचीं भांडीं व उपकरणेंहि आढळतात. रत्नांना पैलू पाडून त्यांना वेजें पाडणें, सोन्याचा उत्तम मुलामा करणें, विटांना पॉलिश देणें व धातूंचे शिक्के कोरणें, वगैरे सर्व कला त्यांना येत असत. या सर्व वस्तू दरेक घरांत सांपडल्या आहेत. विशेषतः पिंपळाचें झाड दाखविलें आहे. अर्थात् या अश्वत्थ-वृक्षाचें पावित्र्य फार प्राचीन आहे. त्याचप्रमाणें इतर चित्रांत, वाघ, हत्ती, गेंडे व इतर प्राणी दाखविले आहेत. फक्त त्यांत घोडा हा प्राणी दिसत नाहीं. इतर वस्तू ह्मणजे, रत्नें, भांडीं, सोन्याचांदीचे दागिनें, माळा वगैरे होत."

"हराप्पा येथें सांपडलेल्या वस्तूहि साधारणतः माहेंजो–दारो येथील वस्तूंप्रमाणेंच आहेत. पण तेथें एक प्रचंड इमारत आढळली आहे, ती मात्र माहेंजो-दारो येथील इमारतींहून अगदीं भिन्न स्वरूपाची आहे.".................

आतां माहेंजो–दारो व हरप्पा येथें सांपडलेल्या शिक्क्यांचें व त्यांवरील लिखाणाचें थोडें विवेचन करूं. हे शिक्के सपाट पृष्ठ-

भागाचे चौरस अथवा तशा सारखे असून त्यांवर चित्रें व अक्षरें कोरलेली आहेत. यांत शाई भरून उठविण्यासाठीं ते तयार केलेले होते. ”..........................

(येथें शिक्क्यांचे आकार दाखविले आहेत.)

“ याप्रमाणें नमुन्यादाखल पांच शिक्के व त्यांचे खुलासे दिले आहेत. यांपैकीं पहिल्यांतील ए दिन हें नांव सिंधुनदाच्या प्रदेशांतील भागास दिलेलें होतें ”....................

“ दुसऱ्यांत ब्राह्मण (वर्णाचा) स्पष्ट उल्लेख आहे. ”.......

“ सगर राजाचा उल्लेख पांचव्या शिक्क्यांत आहे, हा राजा स्वर्गांतील भागीरथी नदी भूलोकावर आणण्याबद्दल पुराणांत उल्लेखिलेला आहे. ”

“ या एकंदर विवेचनाचा निष्कर्ष सामान्यतः असा निघतो कीं ख्रिस्तपूर्व सहा सात हजार वर्षांपासून हिंदुस्थानांत एक प्रकारच्या सुसंस्कृत लोकांची वस्ति होती. ”............

हा उतारा अगदीं थोडक्यांत दिला आहे. मि वॅडेल या गृहस्थांनीं वरील बहुतेक अवशेषांची पूर्ण चिकित्सा करून त्यांतील लिपि उकलून तिचा अर्थ लावण्याचें कार्य केलें आहे व त्यांनीं आपला त्यासंबंधाचा ग्रंथ ‘Indo Sumerian Seals deciphered’ या नांवाचा प्रसिद्ध केला आहे. त्यांत हिंदी-सुमेरीचा प्रत्यक्ष संबंध दाखविला आहे व हिंदीसंस्कृति ही सुमेरियन संस्कृतीची एक शाखा आहे असें प्रतिपादन केलें आहे; परंतु त्यांतील सर्व अनुमानें निर्णायक आहेतच असें मानितां येणार नाहीं. फक्त तें एक त्यांचें

मत आहे इतकेंच. दुसरे एक युरोपियन विद्वान गृहस्थ सर जॉन मार्शल यांचें मत वॅडेल साहेबांच्या मताशीं विरोधी आहे. त्यांचें ह्मणणें " या दोन्ही संस्कृतींत तादात्म्य नसून फक्त व्यापारादि संबंधामुळें अत्यंत साम्य प्रतीत होतें इतकेंच.[1]" याप्रमाणें परस्पर विरुद्ध मतें आहेत. त्यांतील कोणतें मत निर्णायक आहे याचें विवेचन करणें हा या पुस्तकाचा विषय नव्हे. करितां त्यासंबंधाचा विचार येथें करणें अप्रासंगिक आहे. मात्र हल्लीं सांपडलेल्या या प्राचीन अवशेषांवरून आमच्या प्राचीन ग्रंथांतील ऐतिहासिक गोष्टींची सत्यता युरोपियन विद्वानांसहि पटत चालली आहे ही आनंदाची गोष्ट आहे. मि. वॅडेलसाहेब यांचा या संबंधाचा लेख आहे तो[2]:—

The discoveries herein recorded should therefore appeal to the hearts and stir the religious and patriotic feeling of all educated Hindus who desire to know the first found scientific proofs for the veracity of their Vedas and Ancient Epics (the puranas) and to learn that their ancestral Vedic Kings and sages were famous historical emperors, Kings and priest Kings with multitudinous movements still existing to the present day. It must also be gratifying to the modern Hindus to find that the Vedic and Epic tradition which their ancestors preserved and transmitted down through the centuries, and in

१ ता. ४ जानेवारीच्या 'टाइम्स'मधील मार्शलसाहेबांच्या लेखाचा उतारा "हिंदी-सुमेरीसंस्कृति" पृष्ठें २३।२४.

१ सदर बुक पृष्ठें ११।२२

which they have steadfastly believed, is now subst antially proved true, and has become a chief means of identifying the Aryan and summerion Civilizations.

" ह्मणजे—या नवीन लागलेल्या शोधांनीं हिंदुलोकांचीं अंतःकरणें उचंबळून यावीं व त्यांची धार्मिक भावना व देशभक्ति जागृत व्हावी, असें त्यांचें महत्व आहे. कारण त्यांच्या वेदांबद्दल व पुराणांबद्दल प्रत्यक्ष व प्रथम ऐतिहासिक पुरावे त्या शोधामुळें मिळाले आहेत. त्यांचे वैदिक पूर्वज, सुप्रसिद्ध राजे, महाराजे, पुरोहित व ऋषि हे सर्व ऐतिहासिक पुरुष होते व त्यांनीं बांधलेल्या इमारती आजमितीसहि उपलब्ध आहेत, हें ज्ञान त्या शोधांमुळें झालें आहे. त्याचप्रमाणें त्यांच्या वेदांतून व पुराणांतून जी राजवंशाची व ऋषिकुलांची परंपरा वर्णिली आहे व जिच्यावर त्यांची पूर्ण श्रद्धा आहे, ती वस्तुतः सत्य आहे. व तिच्यामुळेंच सुमेरियांत व हिंदुस्थानांत प्रचलित असलेल्या संस्कृतीचें ऐक्य निश्चित करण्यास महत्वाची मदत झाली आहे[1]. "

या उल्लेखावरून हरप्पा व माहेंजो—दारो येथें सांपडलेले अवशेष आर्यसंस्कृतीचे आहेत असें बळकट अनुमान होतें. या संस्कृतीचा संबंध ब्रह्मावर्त, कुरुक्षेत्र इत्यादि देशांशीं कसा पोहोचतो याबद्दल थोडेंसें विवेचन येथें देतोः—

१ हिंदी-सुमेरी संस्कृती पृष्ठ २१.

'हरप्पा' हें ठिकाण सतलज नदीसमीप असल्याचा उल्लेख हिंदी–सुमेरीसंस्कृति या बुकांत दिला आहे[1]. मराठी भाषेंत या शहरचें नांव "हरप" असें आहे व त्या शहराचें वर्णन कै० शंकरराव दीक्षित यांनीं भारत भूवर्णन पृष्ठ १४४ वर लिहिलें आहे. "अलेक्झांडर कोटकमालिया घेत असतां त्यानें आपला एक सरदार पुढें पाठविला. त्यानें एक शहर घेतलें तें हेंच असावें. हें राजा हरप यानें बांधिलें व शारकोट, कोटकमालिया हीं ज्यानें मोडिलीं त्यानेंच हें मोडलें असें ह्मणतात..........शारकोटप्रमाणेंच येथें नाणीं सांपडतात." असें येथें वर्णन आहे. व त्या बुकाचें पृष्ठ १४१ वर शारकोट प्रांतांतील प्राचीन शहरें सांगितलीं आहेत. त्यांत 'बारीदुआबा'त 'हरप' हें शहर सांगितलें आहे. 'बारीदुआब' हें नांव सतलज व रावी या दोन नद्यांमधील प्रदेशास दिलेलें आहे, व रावी ही नदी सतलज नदीच्या पश्चिम दिशेस आहे. इत्यादि माहिती भूगोलावरून सर्व लोकांस विदीत आहेच. सतलज या नदीचें प्राचीन ग्रंथांतील नांव 'शतद्रू' असें आहे.[2] हें पहिल्या प्रकरणांत दर्शविलेंच आहे. या शतद्रू नदीच्या पूर्वेस कांहीं अंतरावर सरस्वती नदी आहे. प्राचीन ग्रंथांत कित्येक नद्यांच्या आसपासच्या प्रदेशास त्या नदीच्या नांवावरून संबोधिलेलें आहे, ही गोष्ट पहिल्या प्रकरणांत दाखविली आहे त्या प्रमाणें शतद्रू नदीच्या आसपासच्या प्रदेशास 'शतद्रूज' असें नांव दिलेलें आढळतें[3]. अर्थात् शतद्रूज प्रांतांत व

१ हिंदी–सुमेरी संस्कृती पृष्ठ १५ वरील नकाशा.

२ भा० भू० वर्णन पृष्ठ २६.

३ मार्कंडेय पुराण अ० ५४ श्लोक ३७.

सरस्वती नदीच्या आसपासचा प्रांत (सारस्वत देश) हे एकमेकांस लागून असावे, निदान जवळ जवळ होते असें दृढ अनुमान होतें. या शतद्रूज प्रांताचें नांव पुढें दीर्घकालपर्यंत चालूं होतें असें अर्वाचीन इतिहासावरून दिसून येतें. चिनी प्रवासी ह्युएनसंग यानें उत्तरहिंदुस्थानांतील जीं राज्यें त्याच्या प्रवासवर्णनांत सांगितलीं आहेत त्यांत ' शतद्रू ' प्रांत सांगितला आहे व त्याची राजधानी सरहिंद हें शहर सांगितलें आहे[1]. तसेंच शतद्रू प्रांताची पूर्वेकडील सरहद्द पूर्वेस अंबाल्यापासून सिमल्यापर्यंत व दक्षिणेस तिहारापासून अंबालापर्यंत अशी सांगितली आहे.[2] सरहिंद, अंबाला, पत्याळ इत्यादि शहरें सरस्वती नदीच्या प्रदेशांतील आहेत हें नकाशावरून दिसून येतें. आणखी एक महत्वाची माहिती मुलतान प्रांताच्या वर्णनांत आढळली तीहि याखालीं देतों—

मुलतान प्रांताची भौगोलिक माहिती ह्युएनसंगच्या लेखावरून सदर बुकाचें पृष्ठ १४६ पासून पृष्ठ १५५ पर्यंत दिली आहे. त्यांतील ' उच्च " या शहराच्या वर्णनांतील जरूरीपुरता उतारा:—

" जोहिया रजपूत लोक अजुधानपासून उच्चपर्यंत ' सतलज नदीवर प्राचीनकालापासून आहेत. यांच्या तीन जाती आहेत........ जोहिया किंवा जोधिया (संस्कृत यौधेय) यांचीं नाणीं इसवी सनाच्या पहिल्या शतकापासून सांपडतात. त्यांतहि तीन प्रकार आहेत. एकावर " जय यौधेय गणस्य " असे शब्द असतात. दुसऱ्यावर द्वितीय आणि तिसऱ्यावर तृतीय एवढीं अक्षरें जास्त

१ भा० पू० वर्णन पृष्ठें १३१।१३२.
२ भा० भू० वर्णन पृष्ठ १३२.

असतात.............................हीं नाणीं सतलजच्या पश्चिमेस देलापूर, सतगड, अयुधान, काहरूर आणि मुलतान येथें व पूर्वेस भाटनेर, अभोर, सिरसा, हनसी, सोनपत-पानपत येथेंहि सांपडतात यावरून तीं सतलजवर जोधेय लोक हल्लीं आहेत व शिरसा येथें अकबराच्या वेळेपर्यंत होते त्यांचीं असावीं. समुद्रगुप्ताच्या अलाहाबाद येथील कोरींव लेखांत व रुद्रदाम याच्या जुनागड येथील कोरींव लेखांत यौधेय यांचा उल्लेख आहे. पाणिनिनेंहि यौधेय यांचा उल्लेख (४।१।१७८) केला आहे.[1] "

यांतील भाटनेर, सिरसा, सोनपत-पानपत इत्यादि शहरें सरस्वती नदीच्या प्रदेशांतील आहेत. यावरून सुमारें दोन हजार वर्षांपूर्वी सतलज व सरस्वती या दोन नद्यांच्या प्रदेशावर एकत्र असें राज्य होतें हें सिद्ध होतें.

प्राचीन ग्रंथांतील वर्णनें पाहतां वायव्येकडे गांधार देशांत (हल्लींच्या कंदाहार प्रांतांत) व कोफिनी (हल्लींच्या काबूल प्रांतांत[2]) आर्यांची वस्ति होती असें दिसतें. कोफिस नदी ही ऋग्वेदांतील कुभा नदी होय[3]. तिलाच हल्लीं काबूल नदी ह्मणतात. सिंधू नदीचा उल्लेख ऋग्वेदांत आहे[4]. शतद्रू (सतलज) नदीचा उल्लेख ऋग्वेदांत आहे[5]. शतद्रू नदीच्या संबंधाची एक विशेष गोष्ट

---

१ भा० भूवर्णन पृष्ठ १५४।१५५.

२ " " ९२.

३ " " ९३.

ऋग्वेदमंडल १० सूक्त ७५.

" " ७५.

प्राचीन ग्रंथांत आहे. ह्मणजे त्या नदीस प्रथम 'हैमवती' असें नांव होतें. महर्षि वसिष्ठ यानें पुत्रशोकामुळें आपण बुडून मरावें ह्या हेतूनें आपलें शरीर बद्ध करून प्रथम विपाशानदींत उडी टाकिली परंतु नदीनें पाशमुक्त करून त्यास बाहेर टाकिलें ह्मणून त्या नदीस 'विपाशा' हें नांव पडलें व पुनः त्यानें हैमवती नदींत उडी टाकिली; परंतु तिनेंहि शतप्रवाहरूप होऊन त्यास बुडविलें नाहीं ह्मणून त्या नदीस शतद्रू हें नांव पडलें[२].

वसिष्ठ हे दशमहर्षिंपैकीं एक महर्षि होते व त्यांची उत्पत्ति ब्रह्मावर्त देशांत झाली होती हें वर दर्शविलेंच आहे. त्यावरून शतद्रू नदीपर्यंत त्यांची वस्ति झाली होती असें दिसतें. गांधार देशाची राजधानी 'पुष्कलावती' ही भरत पुत्र पुष्कर यानें स्थापिली असें विष्णुपुराणांत सांगितलें आहे[३] व वाल्मीकि-रामायणांतही सांगितलें आहे. शिकंदराच्यावेळींहि गांधारदेशाची हीच राजधानी होती[४]. तसेंच सिंधु नदाच्या पश्चिमेकडील प्रदेशांत ह्मणजे हल्लींच्या बलुचिस्तान प्रांतांत शिबीराजाचें राज्य होतें असें महाभारतांत वर्णन आहे[५]. हल्लींही शिबी नांवाचें शहर सिंधुनदाच्या पश्चिमेस बऱ्याच अंतरावर क्वेटा शहराच्या आग्नेयेस कांहीं अंतरावर आहे.

१ महाभा० वनपर्व अ० १३०

२ महाभा० आदिपर्व अ० १७६

३ वाल्मिकीरामायण उत्तरकांड सर्ग १०१

४ भा० भूवर्णन पृष्ठ ९६

५ महाभारत द्रोणपर्व अ० ५८ व वनपर्व अ० १९४ व सभापर्व

या एकंदर विवेचनावरून प्राचीनकालीं आर्यांची वस्ति सिंधुनदाच्या पश्चिमेस बलुचिस्थान व कंदाहार या प्रांतांतही होत गेली होती असें मानावें लागतें. अर्थात हराप्पा व मोहेंजो-दारो येथें सांपडलेले अवशेष आर्यसंस्कृतीचे असावेत असें अनुमान होतें. श्री. दाजी नागेश आपटे यांच्यामतें ते अवशेष द्रविडी लोकांच्या संस्कृतीचे असावेत[1]; परंतु त्यांत सांपडलेल्या वस्तु व उघडकीस आलेले लेख, नांवें इत्यादि गोष्टींवरून ते अवशेष आर्य संस्कृतीचे असावे, या अनुमानास जास्त बळकटी येते. असो, हल्लीं सांपडलेले अवशेष एकंदर आर्यसंस्कृतीच्यामानानें अत्यन्त अल्प आहेत. ' बहुरत्ना वसुंधरा ' अशी संस्कृतांतील ह्मण श्री. आपटे यांनीं आपल्या बुकाच्या आरंभीं दिली आहे. त्याप्रमाणें भावी कालांत आणखी किती गोष्टी उघडकीस येतील हें सांगणें अशक्य आहे. करितां निर्णायक मत आजच लिहिणें योग्य होत नाहीं.

या बुकांतील उपसंहारांत लिहिलेल्या एका विधानाबद्दल दोन शब्द लिहून हें प्रकरण पुरें करितों. तें विधान ह्मणजे " वस्तुतः आज पंजाबांत सरस्वती ह्मणून कोणतीच नांव घेण्याजोगी नदी नाहीं. शिवाय वेदांतील सरस्वती नदीचा गमनमार्ग पाहिला असतां ती हल्लींच्या राजपुतान्यांत आली पाहिजे. " हें त्यांचें विधान वस्तुस्थितीस सुटून दिसतें, तसेंच त्यांनीं सदर बुकांतील पृष्ठ १५ वर उत्तरहिंदुस्थानचा नकाशा दिला आहे त्यांत सतलज नदी दाखविली आहे व पूर्वेकडे यमुना नदी दाखविली आहे; परंतु त्या दोन नद्यांच्या मधील प्रदेशांत सरस्वती नदी दाखविली नाहीं. हिंदुस्थानच्या मराठी

---

१ हिंदी-सुमेरी संस्कृति पृष्ठ १६

शास्त्र्यांच्या नकाशांत तेथें ती नदी दाखविली आहे व तिचा प्रवाह राजपुतान्यांतील वाळवंटांत नेला असून पुढें तो प्रवाह बंद झाला असल्यानें त्या नदीच्या पात्राची खूण बारीक टिंबांनी दाखविली आहे. त्या नदीचा जो प्रवाह चालू आहे तो स्थानेश्वर, पत्याळ, अंबाला, नाभा, सरसा इत्यादि शहरें ज्या देशांत आहेत त्या देशांतून आहे व तो देश पंजाबइलाख्यांतील आहे. पत्याळ व नाभा हीं संस्थानें पंजाबइलाख्यांतीलच आहेत व पुढें राजपुतान्यांतील वाळवंटांत तो प्रवाह बंद झाला आहे. हिंदुस्थानचा भूगोल व नकाशा पाहतांच ह्या गोष्टी दिसून येतात. वेदकालीं ती नदी समुद्रास कोठें मिळाली होती, या संबंधाचें वर्णन पहिल्या प्रकरणांत दिलेंच आहे. या एकंदर वर्णनावरून त्यांचें वरील विधान चुकीचें आहे हें दिसून येईल. असो.

आर्यलोक प्रथम परप्रांतांतून या देशांत आले कीं त्यांची उत्पत्तीच या देशांत झाली. हा वादग्रस्त प्रश्न बाजूस ठेविला तरी हिंदुस्थानांत त्या लोकांची वस्ति प्रथम या सारस्वत देशांत झाली इतकें स्पष्ट अनुमान होतें.

पुढील प्रकरणांत सारस्वत देशांतून पूर्वेकडील देशांत ब्राह्मणांची वस्ति कसकसी होत गेली या संबंधाची माहिती एकत्रित करितों.

प्रकरण तिसरें.

कुरुक्षेत्रदेशाच्या पूर्वेकडील देशांत आर्यांची वस्ति

मागील प्रकरणांत ब्रह्मावर्त देशांत आर्यांची उत्पत्ति झाली अशा बद्दलचे प्राचीनग्रंथांतील उल्लेख लिहिले आहेत. त्या उत्पत्ती नंतर आर्यलोक कुरुक्षेत्र, मत्स्य, पंचाल व शूरसेन या देशांत पसरले असें दिसतें. कारण मनुस्मृति अ० २ यांतील श्लोक १७।१९ यांतील वर्णन पाहिल्या प्रकरणांत दिलें आहे. यावरून कुरुक्षेत्र, मत्स्य, पंचाल व शूरसेन हे देश ब्रह्मर्षि देश असून ते ब्रह्मावर्तानंतरचे आहेत असें सिद्ध होतें. यांतील कुरुक्षेत्र देश हा दृशद्वतीच्या दक्षिणेकडे शूरसेन (मथुरेच्या आसपास) च्या प्रदेशापर्यंत होता हें मागील प्रकरणांत आपण पाहिलेंच आहे. मत्स्यदेश हाहि कुरु देशाच्या दक्षिणेस अगदीं जवळ होता.[1] पंचाल देश हा कुरु देशास लागून पूर्वेस होता.[2] व शूरसेन हा देश कुरुदेशाच्या दक्षिणेस होता.[3] मत्स्य (विराट देश) ह्मणजे हल्लींच्या वैराट शहरा सभोंवती असलेला देश. पंचाल ह्मणजे हल्लींच्या कनोज शहराच्या आसपास असलेला देश व शूरसेन ह्मणजे हल्लींच्या मथुरा शहराच्या आसपासचा देश. हे चारहि देश ब्रह्मर्षि देश असें वर्णन आहे, अर्थात या देशांत ब्रह्मर्षि यांची नंतर वस्ति झाली असें अनुमान होतें. यांपैकीं पंचाल देशाचा उल्लेख शतपथ ब्राह्मण, बृहदारण्यकोप-

---

१ भारतवर्षीय भू० व० पृष्ठ १८५।८६ खालील टीप.

२ महाभा० व० अ० ८७

३ ” स० अ० ३१

निषद् व छांदोग्यउपनिषद् यांत आला आहे[1]. तसेंच मत्स्य देशाचें नांव कौषीतकि उपनिषदांत आलें आहे. अर्थात ब्राह्मण व उपनिषद् कालीं या देशांचींहि नांवें प्रचारांत होतीं, असें मानावें लागतें; परंतु गौडब्राह्मणांच्या पोटभेदांचीं जीं नांवें आहेत, त्यांतील ' सारस्वत ' या शाखेनंतर ' कान्यकुब्ज ' या शाखेचा उल्लेख करण्यांत येतो. त्या पोटभेदाचा देश कान्यकुब्ज हा आहे. ' कान्यकुब्ज ' हा देश पंचाल देशापैकींच होता[2]. अर्थात त्या देशांत ब्राह्मणांची वस्ति झाल्यानंतर त्या ब्राह्मणांना ' कान्यकुब्ज ' या नांवानें संबोधिलें असावें हें उघड आहे. ह्मणजे ब्राह्मणांची पूर्वेकडील देशांत वस्ति होत गेली. ते पूर्वेकडे वसाहत करीत गेले. त्यामुळें गौड, मैथिल, उत्कल या पूर्वेकडील देशांचीं नांवें त्यांना प्राप्त झालीं असें दिसतें. कै० दीक्षित यांनींहि आर्यांची वस्ति पश्चिमेकडून पूर्वेकडे होत गेली असें मानिलें आहे. त्यांचें यासंबंधाचें विधान याखालीं देतों—

" ऋग्वेद रचनेच्या वेळीं आर्य बहुधा पंजाबांत रहात होते. दहाव्या मंडळाच्या वेळीं ते गंगेपर्यंत आले, असें कांहीं पंडित ह्मणतात; परंतु या ह्मणण्यांत फारसा अर्थ नाहीं.............. ....तथापि मागील एकंदर लेखावरून व पुढील लेखावरूनहि आर्यांची वस्ति पश्चिमेकडून पूर्वेकडे होत गेली असें अनुमान होतें " (भारतवर्षीय भूवर्णन भाग पहिला पृष्ठ ३७।३८)

शतपथब्राह्मणांतील विदेघमाथव व त्याचा पुरोहित गोतम-राहूगण यांच्या गोष्टीवरून आर्य पश्चिमेकडून पूर्वेकडे वसति करीत

१ भा० भूवर्णन पृष्ठ ७१
२ " " पृष्ठ २०१

गेले, असें अनुमान वरील ग्रंथांत कै० दीक्षित यांनीं काढिलें आहे. त्याबद्दलचा त्यांचा लेख पृष्ठें ४२।४३।४४ यांवर आहे. त्यांत प्रथम शतपथ ब्राह्मणांतील मूळ संस्कृत श्लोकांचा उतारा असून त्याखालीं त्याचें मराठी भाषांतर आहे. त्यांतील मराठी भाग तेवढा याखालीं देतों:....

" आतां शतपथ ब्राह्मणांतला एक मनोरंजक आणि महत्त्वाचा उतारा देतों—शतपथ ब्राह्मण १-४-१-१ "

(येथें मूळ संस्कृत श्लोक दिले आहेत.)

" विदेघमाथव हा वैश्वानरअग्नीस आपल्या मुखांत घालून नेता झाला, त्याचा गोतमराहूगणनामक ऋषि पुरोहित होता. त्यानें विचारिलें तरी त्यास (विदेघ) उत्तर देईना. कारण कदाचित् अग्नि आपल्या मुखांतून बाहेर पडेल. (असें त्यास वाटलें) तेव्हां " वीति होत्रं " या ऋग्मंत्रानें (तो पुरोहित) अग्नीचें आव्हान करूं लागला. (मग ह्मणाला) हे विदेघा, तरी त्यानें उत्तर दिलें नाहीं. तेव्हां पुनः " उदग्नेशुचयः " (हा मंत्र ह्मणून पुनः ह्मणाला) हे विदेघा, तरीहि त्यानें उत्तर दिलें नाहीं. तेव्हां " तंत्वा घृतस्नवीमहे " (हे घृतस्नु तुला आह्मी बोलावितों) इतकेंच ह्मटलें. त्यानें घृताचा उच्चार केल्याबरोबर अग्नि वैश्वानरमुखांतून बाहेर पडून प्रज्वलित झाला. (विदेघ) त्यास धरूं शकला नाहीं. तो त्याच्या मुखांतून बाहेर पडला; आणि खालीं पृथ्वीवर प्राप्त झाला. तेव्हां विदेघमाथव सरस्वतीवर होता. अग्नि तेथून पूर्वेकडे दहन करीत पृथ्वीवर फिरला, तो जाळीत चालला. त्यामागून गोतमराहूगण

आणि विदेघमाथव हे गेले. तो अग्नि ह्या सर्व नद्यांवरून दहन करीत गेला. सदानीरा ही नदी उत्तर पर्वतापासून निघते. तिच्या पलीकडे तो दहन करीत गेला नाहीं. अग्नि वैश्वानर तिजवरून जाळीत गेला नाहीं, ह्मणून पूर्वी ब्राह्मण ती उतरून जात नसत; परंतु सांप्रत पुष्कळ ब्राह्मण तिच्या पूर्वेस आहेत. अग्नीनें भुक्त नसल्यामुळें तो प्रदेश पाणथळ आणि वसती करण्यासारखा (क्षेत्रतर) नव्हता. सांप्रत तें चांगलें क्षेत्र आहे. कारण ब्राह्मणांनीं यज्ञांनी तें अग्नीकडून उपभुक्त करविलें. वैश्वानर अग्नीनें अती दग्ध नव्हती तोंपर्यंत शीतच असल्यामुळें ती नदी उष्ण कालाच्या अंतीं क्षुब्ध होत असे. विदेघमाथव बोलला, मी कोठें असावें ? एथून पूर्वेकडे तुझें स्थान असें (अग्नि) बोलला. ती नदी आतांही कोशल आणि विदेह यांची मर्यादा आहे. कारण तेहि माथव आहेत.

विदेह आणि कोशल ह्यांच्या सीमेवर सांप्रत गंडकी नदी आहे. हीच सदानीरा असावी.

यांत आर्य पश्चिमेकडून पूर्वेकडे कसे वसति करीत गेले हें अलंकारिकरीतीनें वर्णिलें आहे असें दिसतें. "

वरील कथेंतील विदेह देश ह्मणजे जनकराजाचा देश होय. त्याच देशास मैथील हें नांव आहे. (भा. व. प्रा. ऐ. कोश पृष्ठ १९७) व कोशल देश याचे दक्षिण कोशल व उत्तर कोशल असे दोन भाग आहेत. दक्षिण कोशलची राजधानी अयोध्या होती व उत्तर कोशलची राजधानी श्रावस्ती होती. कोशल देशास कित्येक ग्रंथांत कोसल असेंहि ह्मटलें आहे. उत्तरकोसल याचा उल्लेख महा-

भारत सभापर्व अ. ३० यांत आला आहे व दक्षिण कोसल याचा उल्लेख त्याच अध्यायांत असून वा. रामायण अ. स. ६८ यांतही आला आहे. उत्तर कोसलांतील एका भागास गौड देश असें पुराणें व इतर प्राचीनग्रंथांत ह्मटलें आहे. त्याबद्दलचें विवेचन पुढें त्या देशाच्या वर्णनांत येईल. एकंदरींत सारस्वतीच्या प्रदेशापासून पूर्वेकडे आर्यांची वस्ती शतपथ ब्राह्मणकालापूर्वींच झाली होती असें यावरून होतें.

आतां सारस्वत (कुरुक्षेत्र) याच्या पूर्वेकडील देश कोणते यासंबंधीं कांहीं माहिती लिहितों. कुरुदेशास पूर्वेकडे लागून असलेला देश पांचाळ हा आहे. (भार. सभा. अ. २९) पांडवांच्यावेळीं या देशाचा राजा द्रुपद हा होता. त्याची कन्या द्रौपदी ही पांडवांची स्त्री होती व तिला पांचाली ह्मणत होते हें प्रसिद्ध आहे. मनुस्मृतींत ब्रह्मर्षि देश सांगितले आहेत, त्यांतील हा देश आहे. हें वर सांगितलेंच आहे. ह्या देशाच्या पूर्वेस कान्यकुब्ज देश आहे, त्या देशाची कांहीं माहिती याखालीं देतों—

कान्यकुब्ज देश.

या देशास हल्लीं कनोज प्रांत ह्मणतात. पंचगौडांच्या पोटभेदांतील ' कान्यकुब्ज ' ब्राह्मणांचा मूळ प्रदेश हा आहे. याचा प्राचीन इतिहास असा आढळतो कीं, विजयकुलोत्पन्न कुश अथवा कुशिक राज्याच्या चार पुत्रांतील चौथा पुत्र कुशनाभ याच्या शंभर कन्या उद्यानांत क्रीडा करण्यास गेल्या असतां वायूच्या कोपानें कुबड्या (कुब्जा) झाल्या. पुढें कांपिली पुरीच्या ब्रम्हदत्तराजास त्या दिल्यावर

सरळ झाल्या; परंतु जेथें त्या कन्या कुब्जा झाल्या, त्या नगरास कान्यकुब्ज नांव पडलें. (वाल्मिकी रामायण बालकांड सर्ग ३४) व तेंच पुढें देशासहि पडलें (भार० भूवर्णन पान १९९)

महाभारत वनपर्व अ० ८७ यांत धौम्यऋषीनें पूर्वेकडील पवित्र स्थलें सांगितलीं आहेत, त्यांत कान्यकुब्ज देशांत विश्वामित्रासह इंद्रानें सोमपान केलें असें वर्णन आहे. (श्लोक १७) वर सांगितलेल्या विजय कुळाचा प्राचीन इतिहास असा आहे कीं, अत्रि-ऋषीचा पुत्र सोम. हा सोमवंशाचा मूळ पुरुष आहे. त्याचा पुत्र बुध, बुधाचा पुत्र पुरुरवा, त्याची राजधानी पूर्वी प्रयागाजवळ प्रतिष्ठानपूर होती. ही (देवी भागवत १ स्कं० अ० १३) या पुरुरव्याचा पुत्र विजय असा इतिहास सांपडतो. कान्यकुब्ज हें नांव प्रचारांतून कधीं कमी झालें व कनोज हें नांव प्रचारांत कधीं आलें याबद्दल निश्चया-त्मक प्रमाण कांहीं सांपडत नाहीं. तथापि चिनी प्रवासी ह्युएनसंग याच्या लेखावरून इ० स० च्या सातव्या शतकांत या देशास कनोज ह्मणत होते, असें दिसून येतें. ह्युएनसंग हा इ. स० ६२९ पासून ६४५ पर्यंत हिंदुस्थानामध्यें फिरला. त्यावेळीं हिंदुस्थानांत (८०) राज्यें होतीं, असें त्यानें लिहिलें आहे. प्रत्येक राज्याचें नांव, घेर, मुख्य शहराचें नांव व वर्णन इत्यादि, आणि तो ज्या ज्या स्थळीं गेला, त्या सर्व स्थळांमधील अंतरें व दुसरीहि पुष्कळ माहिती त्यानें दिली आहे. त्या माहितीवरून पाहतां सातव्या शतकांत या प्रांतास कनोज प्रांत ह्मणत असत असें दिसून येतें. ह्युएनसंगाच्या वेळीं या देशावर हर्षवर्धन राजा राज्य करीत होता.

त्याची राजधानी कनोज हें शहर होतें. या संबंधाचा के० दीक्षित यांचा लेख असा आहे:—

" हुएन यानें लिहिलेला हर्षवर्धन हा सुमारें इ. स. ६०७ पासून ६५० पर्यंत राज्य करीत होता, असें त्याच्या लेखावरून दिसतें. यावरून कनोज प्रांतांत हर्षनामक राजानें इ० स० ६०७ मध्यें एक शक सुरू केला, तो हर्षराजा हर्षवर्धनच होय." भार० भू० पृष्ठें १९९।२००

या कनोज शहरावर गझनीच्या महंमुदानें दोन स्वाऱ्या केल्या. एक इ० स० १०१८ सालीं व दुसरी इ. स. १०१९ सालीं. ह्या दोन्हीं स्वाऱ्यांचीं वर्णनें मध्ययुगीन भारत भाग ३ यांत श्री० चिंतामणराव वैद्य यांनीं लिहिलीं आहेत. तीं वाचनीय व मनोरंजक आहेत; परंतु आमच्या या निबंधांत तीं अप्रस्तुत होतात, करितां विस्तारानें त्यांचा समावेश येथें करणें अनवश्यक होय. मात्र महंमुदाच्या स्वाऱ्या झाल्यावेळीं कनोज हें शहर भरभराटींत होतें व हर्षवर्धनच्या कालापासून सुमारें चारशें वर्षें या शहरचा उत्कर्ष होत गेला होता इतकी माहिती त्यावरून मिळते. त्या चारशें वर्षांच्या मुदतींत या शहराचें नांव कनोज असेंच वाखाणिलेलें आढळून येतें. असो. या देशांतील ब्राह्मणांस कान्यकुब्ज ब्राह्मण ह्मणण्याची रूढी, ज्यावेळीं या देशास कान्यकुब्ज ह्मणत होते त्यावेळीं म्हणजे बऱ्याच प्राचीनकालीं सुरू झाली असावी असें मानणें भाग आहे. आतां पंचगौडांतील तिसरा पोटभेद गौड या नांवाचा देश कोणता या संबंधाची माहिती याखालीं देतों:—

गौड देश.

उत्तरकोसल देश ह्मणजे ज्या देशाची राजधानी श्रावस्ती होती तो देश होय. हें वर लिहिलें आहे. या देशासंबंधाची माहिती भारतवर्षीय भूवर्णन या बुकांत कै० दीक्षित यांनीं दिली आहे. त्यावरून या देशाची बरीच माहिती मिळते. करितां त्या लेखाचाच उतारा याखालीं देतों:—

" श्रावस्ती—प्राचीन अयोध्या प्रांताचे शरयू नदीनें मोठे दोन भाग झाले होते. उत्तरेकडच्यास उत्तरकोशल हें नांव होतें. प्रत्येकाचे दोन दोन पोट भाग असत. दक्षिणच्याचे पूर्वराष्ट्र आणि पश्चिमराष्ट्र असे विभाग होते, व उत्तरकोसलाचे दोन होते. रापती नदी, जिला सर्व अयोध्या प्रांतांत रावती ह्मणतात, तिच्या दक्षिणच्या भागास गौड आणि उत्तरच्यास कोसल नांव होतें. गौड हें नांव अद्यापि गोंड यारूपानें आहे. यांपैकीं कांहीं नांवें पुराणांत आढळतात. वायु पुराणांत सांगितलें आहे कीं, लवानें उत्तरकोसल देशांत श्रावस्ती येथें राज्य केलें (लवानें श्रावस्ती येथें राज्य केलें असें वाल्मिकीरामायणांतहि आहे;) परंतु मत्स्य, लिंग आणि कूर्म या पुराणांत सांगितलें आहे कीं, श्रावस्ती गौड देशांत होती. यांत प्रथम विसंगतता दिसते; परंतु गौड हा उत्तर-कोसलाचाच एक भाग होता, असें समजल्यावर विसंगतता नाहीं. कनिंगह्यॅम ह्मणतो कीं, गौडब्राह्मण हे मूळचे या प्रांतांतले असावेत बंगालप्रांतांतील गौड या शहरचे नव्हत. गौडब्राह्मण अद्यापिहि घाग्रा नदीच्या उजव्या अंगास अयोध्या आणि जहांगिराबाद एथें व

डाव्या तीरावरील गौडप्रांतांत व शेजारच्या गोरखपूर प्रांताच्या बहुतेक भागांत पुष्कळ आहेत " (पृष्ठें २११।२१२)

" श्रावस्थीचें स्थान कोणतें याविषयीं विद्वानांस पुष्कळ दिवस शंका आहे. ह्युएनसंगचा लेख व सिलोनमधील बौद्धग्रंथ यांवरून ती अयोध्येच्या उत्तरेस ह्मणजे गौड किंवा उत्तरकोसल यांत होती व या गोष्टीस ४ पुराणांचा आधार आहे. " (सदरचें भूवर्णन पृष्ठें २१५।२१६.)

[बृहत्संहिता या ग्रंथांत या देशास गौडक असें ह्मटलें आहे. त्या ग्रंथांतील श्लोकांत कित्येक देशांच्या नांवापुढें " क " हें अक्षर जोडलेलें दिसून येतें. कोशल या देशाच्या नांवापुढें " क " हें अक्षर जोडून कोशलक असें नांव लिहिलेलें आढळतें. त्या संहितेंतील श्लोकरचनेच्या काळीं त्या देशांतील प्रचलित भाषेमुळें तसें नामाभिधान लिहिलें गेलें असावें. माथुरक हाहि देश अशाचप्रकारें लिहिलेला आहे.]

या देशास मध्ययुगीनकालींहि गौड देश ह्मणत होते, असें त्याकाळच्या इतिहासावरून व दानलेखावरून दिसून येतें. कनोजच्या गाहडवाल राजांपैकीं पराक्रमी राजा गोविंदचंद्र यानें इ. स. १११४ पासून इ. स. ११५५ पर्यंत राज्य केलें. (मध्ययुगीन भारत भाग ३ पृष्ठ ३२६) हा गोविंदचंद्र युवराज असतां त्यानें दिलेल्या एका दानलेखांत गोविंदचंद्राचें वर्णन संस्कृत श्लोकांत दिलें आहे. त्याचा अर्थ असा आहे—" गौडराजाच्या दुर्वार हत्तींचीं गंडस्थलें फोडण्यानें भयंकर दिसणारा आणि आपल्या असम युद्धानें हम्मीरास

वैर बंद करण्यास भाग पाडणारा गोविंदचंद्र आपल्या सतत फिर-णाऱ्या अश्वदलांच्या टापांचीं चिन्हें ह्मणजे राज्याच्या मोहरेचीं चिन्हेंच उमटलीं असलेल्या पृथ्वीचें राज्य संपादन करिता झाला." हा दानलेख इंडि० अँटिके० १८ पृष्ठ १५ यावर प्रसिद्ध झाला आहे व सदरचे मध्य० भा० भाग ३ पृष्ठ ६९८ वर छापिलेला आहे. या गोविंदचंद्र राजाचें वर्णन सदर ग्रंथाचें पृष्ठ ३२३ पासून ३२८ पर्यंत आलेलें आहे. त्यांत पूर्वेस गौड राजाशीं गोविंदचंद्रास युद्ध करावें लागलें त्याप्रमाणें पश्चिमेकडे लाहोरच्या मुसलमानाशींही गोविंदचंद्रास युद्ध करावें लागलें असलेंच पाहिजे, असा उल्लेख पृष्ठ ३२४ वर आहे. या वर्णनावरून त्यावेळीं या देशाचें गौडदेश हें नांव प्रचारांत होतें व त्या देशाचें स्वतंत्र राज्य होतें असें निष्पन्न होतें. या देशाचें गौडदेश हें नांव प्रथम कधींपासून व कसें प्रचारांत आलें याबद्दल इतिहास उपलब्ध नाहीं. यांतील श्रावस्ति ह्या शहराचा मात्र इतिहास असा आढळतो कीं, सूर्यवंशीय राजा 'इक्ष्वाकु' याचा पौत्र 'श्रावस्त' यानें ही नगरी स्थापिली. यामुळें या शह-रास श्रावस्ति हें नांव पडलेलें आहे. (वा. रामा. उत्तर. स. १०७) श्रावस्ति गौडदेशांत होती, असा चार पुराणांत उल्लेख असल्याचा मजकूर वर लिहिला आहे. त्यावरून श्रावस्ति हें शहर वसण्याच्या पूर्वींपासून या देशास उत्तरकोसल किंवा गौडदेश ह्मणत होते असें वाटतें. शतपथ ब्राह्मणांतील विदेघमाथव व गोतमराहूगण यांची गोष्ट वर लिहिली आहे, तीवरून शतपथब्राह्मणकालापूर्वींच या देशांत ब्राह्मण-क्षत्रियांची वस्ति झाली होती, असें अनुमान करितां येईल. आतां याच्या पूर्वेकडील देश मैथिल, यासंबंधाची माहिती लिहितों-

मैथिल देश.

पंचगौडब्राह्मणांतील मैथिल शाखेच्या ब्राह्मणांचा मूल प्रदेश हा आहे. या देशाचें पूर्वीचें नांव विदेह असें आहे. कोसल देश व विदेह देश यांच्या सीमेवर सांप्रत गंडकी नदी आहे. तीच शतपथ ब्राह्मणांतील सदानीरानदी असावी असा उल्लेख वर आलाच आहे. विदेह हा जनकराजाचा देश होता. शतपथ ब्राह्मण ११-६-२-१ यांत या देशाचा व राजाचा उल्लेख आहे. "जनको हवै वैदेहो" इ० या देशाच्या प्रत्येक राजाचें नांव सामान्यरीतीनें जनक असें वर्णिलेलें आहे. वैवस्वत मनूचा ज्येष्ठ पुत्र इक्ष्वाकु, यास शंभर पुत्र होते. त्यांतील द्वितीय पुत्र निमि, नामक राजा. ह्यास वसिष्ठऋषीचा शाप होऊन त्याचा देहपात झाला. पुढें ब्राह्मणांनीं त्याचा देह तसाच रक्षण करून राज्यास अधिकारी पाहिजे ह्मणून त्याच्या देहाचें मंथन केलें, त्यापासून जो पुत्र निर्माण झाला, तोच मिथि या नांवानें प्रसिद्ध राजा झाला. त्याची राजधानी वैजयंत नगर होतें. त्यास मिथिला असें नांव त्या राजाच्या नांवावरून पडलें. मिथिराजा मातेच्या संबंधावांचून, केवळ जनकोत्पन्नच ह्मणून व विदेहाचा वंशज ह्मणून जनक आणि वैदेह असें नांव पावला, तें त्याच्या सर्व वंशजांस पुढें चालू झालें. (वा० रामा० उत्तर० स० ५५-५७) जनकराजाची कन्या सीता हिचा विवाह दाशरथी रामाशीं झाला. तो विवाह मिथिलानगरींत झाला असें रामायणांत वर्णन आहे, त्यावरून व रामायणांत इतर बऱ्याच स्थळीं या नगरीचें व देशाचें वर्णन आलेलें आहे, त्यावरून हा देश वाचकांच्या माहितींतील

आहे. सांप्रत मिथारी प्रांतांतील जनकपूर शहर हेंच जनकाचें नगर आहे, असें त्या प्रांतांतील लोकांचें मत आहे. मिथिलानगरीप्रमाणेंच विशाला नांवाच्या एका नगरीचें वर्णन रामायणांत आलेलें आहे. विशालनामक राजानें ती नगरी वसविली, ह्मणून त्या नगरीस विशाला असें नांव पडलें आहे. हल्लीं गंडकी नदीच्या पूर्वेस वेसार ह्मणून एक खेडें आहे. तेंच विशाला (वैशाली) नगर असावें असें ह्मणतात.

चिनी प्रवासी ह्युएनसंग ह्याच्यावेळीं गंगानदी व हिमालयपर्वत यांच्यामध्यें या प्रदेशांत वैशाली व व्रज अशीं दोन राज्यें होतीं असें वर्णन आहे; परंतु बुद्धाच्यावेळीं विशाला ही नगरी व्रजांच्या राज्यांत होती, असें बुद्धाच्या एका संवादांत आलेलें आहे. त्यावरून त्यावेळीं एकच राज्य असावें. बुद्धाच्यावेळीं वैशालीच्या लोकांस 'लिछवी' असें ह्मणत असत. वैशाली, तिरभुक्ति, विदेह अशीं नांवें त्यावेळीं प्रचलित होतीं. तिरभुक्ति हा सांप्रतचा तिरहूत प्रांत आहे. या शहराची व राज्याची जास्त माहिती या स्थलीं देणें अप्रासंगीक होईल. करितां व्रजांच्या राज्यांतीलच हे देश होते, इतकें सांगून मुख्य विषयाकडे वळतों. हल्लीं या प्रांतांतील मोठें शहर मोंगीर, या शहरापासून उत्तरेस हिमालयपर्वतापर्यंतच्या देशास प्राचीनकालीं मैथिल किंवा विदेह देश ह्मणत होते असें दिसतें. या देशांत ब्राह्मणांची वस्ति ब्राह्मणकालापूर्वींच झाली होती. जनकराजानें याज्ञवल्क्यापासून ब्रह्मविद्या संपादन केली. जनकराजाच्या दरबारीं अनेक ब्राह्मण होते, वंदीनामक वरुणाचा पुत्र जनक-

राजाच्या दरबारीं होता. त्याचा व अष्टावक्र ऋषीचा ब्रह्मविद्येसंबंधानें वाद झाला, इत्यादि गोष्टी महाभारतांत आहेत. त्यावरून या देशांत आर्यांची वस्ति फार प्राचीनकालीं झाली आहे व मैथिल हें त्या देशाचें नांव त्यावेळेपासून चालू झालें आहे, असें मानणें भाग आहे. आतां उत्कलदेशाची माहिती लिहितों—

उत्कल देश.

उत्कल देश ह्मणजे हल्लीं ज्यास ओढिया प्रांत ह्मणतात तो होय. सांप्रत पुरी येथें जगन्नाथाचें देवालय आहे. तें या प्रांतांतीलच आहे. महाभारतांत या प्रांताचा उल्लेख आहे. भीष्मपर्व अ० ९ यांत उत्कल व ओड्र असे दोन देश लिहिले आहेत. सहदेव दिग्विजयाच्या वर्णनांत उड्र देश सांगितला आहे. परंतु उत्कल सांगितलेला नाहीं. बृत्संहितेंत उत्कल व ओड्र हे निरनिराळे देश सांगितले आहेत. कालिदासानें रघुदिग्विजयांत वंग आणि कलिंग या देशांच्या मध्यें उत्कल देश असल्याचें लिहिलें आहे. त्रिकांड शेष–कोशांत उत्कल आणि ओड्र हीं एकाचींच नांवें आहेत. (ओड्रा उत्कल नामानः ॥११॥ भूमि वर्ग). मध्ययुगीनकालीं ह्मणजे इ० स० १००० ते १२०० च्या दरम्यानच्या कालांत राजशेखर नामक ग्रंथकारानें काव्यमिमांसा हा ग्रंथ लिहिला आहे. त्यांत या प्रदेशास उत्कल असेंच ह्मटलें आहे. याप्रमाणें कित्येक वेळां दोन देश व कित्येक वेळां एक देश असें वर्णन असण्याचें कारण कधीं कधीं एका राजाच्या ताब्यांत दोन्ही देश आल्यामुळें दोन्हीं एकाचींच नांवें समजत असावे, असें वाटतें. प्रथम या देशास उत्कल हें नांव कसें

पडलें व केव्हांपासून हें समजण्याजोगें ऐतिहासिक साधन सांपडत नाहीं. या देशाच्या दक्षिणेकडे समुद्रकिनाऱ्या लगत जो देश आहे, त्यास कलिंग हें नांव आहे. कलिंग हा देश उड्र व उत्कल या देशांहून भिन्न असल्याचा महाभारतांत उल्लेख आहे. पांडव तीर्थयात्रा करीत गंगा–सागर संगमी येऊन तेथून समुद्रतीरानें कलिंग देशास आले असें वनपर्व अ० ११४ यांत वर्णन आहे. गंगा-सागर संगम व कलिंग देश या दोहोंच्या मध्यें उड्र व उत्कल हे देश आहेत. मध्ययुगीन कालीं (इ. स. १०००–१२००) या कालांत त्रिक-लिंगाचें प्राच्य गंग या नांवाचें एक राजघराणें उदयास आलें. त्या घराण्याचा त्या कालांतील इतिहास मध्ययुगीन भारत भाग ३ यांतील पृष्ठें ३९६ ते ४०६ या पृष्ठांवर लिहिला गेला आहे. त्यांत हे त्रिकलिंग देश ह्मणजे (१) मुख्य कलिंग देश (हल्लींचे गंजाम, विजगापट्टण आणि गोदावरी हे जिल्हे) (२) आंध्र ह्मणजे पूर्वघाटाच्या वरचा मुलूख आणि (३) ओड्र अथवा ओरिसा, महा-नदीच्या उत्तरेकडे हे तीन देश असावे असें ह्मटलें आहे, तें योग्य दिसतें. या कालापासून या देशास ओरिसा ह्मणूं लागले ही गोष्ट उघड होत आहे.

महाभारतकालीं ज्या प्रदेशास उत्कल ह्मणत होते, तेवढ्या प्रांतांत ब्राह्मणांची वस्ति प्रथम कोणत्या कालांत झाली याबद्दलचें प्रमाण प्राचीनग्रंथात सांपडत नाहीं. सदरचें मध्ययुगीन भारत भाग ३ यांत पृष्ठ ४०४ यावर ओरिसा प्रांताचा थोडा इतिहास लिहिला आहे, त्यांत ओड्र आणि पौंड्र हे अति प्राचीनकालीं द्रविड म्हणजे अनार्यवंशी होते. अद्यापि हें शबरांचें स्थान आहे. तसेंच खोंड, भूंय, आणि हमग आदि द्रविड जाति येथें आहेत. ह्यांलाच उत्कल

आणि मेकल ह्मणतात. (कटक गॅझेटियर पा. १७) आर्यांची येथें लौकरच वस्ति झाली, परंतु बौद्ध-कालांत येथील ब्राह्मण, क्षत्रिय लोक धर्महीन झाले व केसरी राजांच्या वेळीं नवीन ब्राह्मण क्षत्रिय येथें आले व त्यांनीं तेथें शिवपूजा प्रस्थापित केली असें वर्णन आहे, परंतु त्यांतहि प्रथम आर्यलोकांची वस्ति तेथें कधीं झाली, यासंबंधीं उल्लेख नाहीं. तथापि या देशांत ब्राह्मणांची वस्ति झाल्यानंतरच त्या ब्राह्मणांस उत्कल-ब्राह्मण या नांवानें वाखाण-ण्यांत आलें असलें पाहिजे हें स्पष्ट आहे.

याप्रमाणें ब्राह्मणांच्या मूल प्रदेशांतून पूर्वेकडील देशांत ह्मणजे कान्यकुब्ज, गौड, मैथिल आणि उत्कल या देशांत जसजशी त्यांची वस्ति होत गेली, तसतशीं त्या देशांचीं नांवें त्यांतील ब्राह्मणांस देण्यांत आलीं आहेत असें दिसून येतें. मूल प्रदेशांतून कांहीं ब्राह्म-णांनीं कान्यकुब्ज देशांत वस्ति केल्यानन्तर त्यांना व त्यांच्या वंशजाला कान्यकुब्ज ब्राह्मण असें ह्मणण्याची रूढी पडली. असें होत होत उपरिनिर्दिष्ट पांच भेद उत्पन्न झाले आहेत असें ह्मणावें लागतें. सरस्वती नदीच्या प्रदेशांतील ब्राह्मणांस याप्रमाणेंच सारस्वत-ब्राह्मण असें भेदवाचक नांव महाभारतकालापूर्वींच प्राप्त झालें होतें, असें महाभारतांतील वर्णनांवरून दिसून येतें कारण वनपर्वांत सार-स्वत-ब्राह्मण असे उल्लेख कित्येकवेळां आले आहेत. करितां पुढील प्रकरण " सारस्वत-ब्राह्मणासंबंधाचे महाभारतांतील उल्लेख " या नांवाचें लिहून त्यांत ते उल्लेख व इतर महत्त्वाची माहिती, स्थलादि वर्णनें यांचा संग्रह करितों.

प्रकरण चवथें.

सारस्वत देशांतील ब्राम्हणांविषयीं प्राचीन उल्लेख.

(महाभारतावरून)

सरस्वती नदीच्या प्रदेशांतून पूर्वेकडे उत्कलदेशापर्यंत ब्राह्मणांची वस्ति कसकशी होत गेली याविषयींची जी माहिती आढळली ती प्रकरण ३ यांत दिली आहे. या प्रकरणांत सरस्वती नदीच्या प्रदेशांतील (सारस्वत-देशांतील) ब्राह्मणाविषयीं जे उल्लेख महाभारतांत आढळतात, त्यांपैकीं महत्त्वाचे असे कांहीं उतारे देण्याचें योजिलें आहे. ब्राह्मणांतील देशपरत्वें भेद महाभारतकालापासून प्रचारांत आले असावे असें त्यावरून वाटतें. कदाचित् हें अनुमान चुकीचें ठरलें तरी ब्राह्मणजातीचा प्राचीन इतिहास लिहिणाऱ्या कोणाही लेखकास त्यांचा उपयोग होण्याजोगा असल्यानें त्याचा या प्रकरणांत संग्रह केला आहे.

पांडव वनवासास गेले, त्या वनवासांतील बराच काल त्यांनीं ' द्वैतवन ' व ' काम्यकवन ' या दोन्हीहि वनांमध्यें घालविला. त्या संबंधाचें वर्णन महाभारतांतील वनपर्वांत बऱ्याच विस्तारानें वर्णिलेलें आहे हीं दोन्हीहि वनें सरस्वती नदी-तीरीं होतीं. पांडव काम्यकवनांतून द्वैतवनांत व द्वैतवनांतून काम्यकवनांत असे दोन तीन वेळां आले गेले. द्वैतवन सरस्वतीच्या तीरीं मरुधन्व प्रदेशाच्या समीप होतें. (वनपर्व अ० १७७ व अध्याय २४) काम्यकवनही सरस्वतीतीरीं मरुधन्व देशाजवळ होतें. त्या प्रदेशास ' कुरुजांगल '

असेंहि ह्मणत असत. (वनपर्व अ० ५ व अ० १०) तीर्थयात्रेहून पांडव आले ते उत्तरेकडून आले. त्यांना प्रथम ' द्वैतवन ' लागलें, नंतर काम्यकवन लागलें असें वर्णन आहे. सरस्वती नदी ईशान्येकडून नैऋत्येकडे वहाते, त्यावरून द्वैतवनाच्या नैऋत्येकडे काम्यकवन होतें असें वाटतें. भारताचार्य रावब. चिंतामणराव वैद्य यांनीं महाभारताचा उपसंहार लिहिला आहे. त्या बरोबर प्राचीन भारतवर्षाचा नकाशा दिला आहे, त्यांत सरस्वती नदी दाखविली आहे. तिच्याकांठीं वरील दोन्हींहि वनें होतीं, तीं ठिकाणें दर्शविलीं आहेत, त्यांचा क्रम असाच दर्शविला आहे.

या दोन्हींहि वनामध्यें पांडवांचें वास्तव्य असतां प्रसंगानुसार तेथील ब्राह्मणांचीं वर्णनें दिलेलीं आहेत. त्यांतील कांहीं याखालीं देतों—

वनपर्व अ० २६ श्लोक ५।६।७।८ यांत बकदाल्भ्यऋषि धर्मराजास ह्मणतात— " हे धर्मराजा, ही होमवेळा पहा ! या द्वैतवनांतील तपस्वी ब्राह्मणांनीं यावेळीं अग्नि प्रज्वलित केला आहे. तूं संरक्षण केल्यामुळें भृगु, अंगिरा, वसिष्ठ, कश्यप, अगस्ति व अत्रि या महाभाग्यशाली सहा ऋषींच्या श्रेष्ठ कुलांतील हे तीव्र व्रत धारण करणारे तापस या पवित्र वनांत राहून धर्माचरण करीत आहेत. तुला या जगांतील श्रेष्ठ ब्राह्मणांचा सहवास घडत आहे. "

या सहा ऋषींपैकीं भृगु, अंगिरा, वासिष्ठ, अत्रि हे महर्षि ब्रह्मदेवाच्या मानसपुत्रांतील चौघे आहेत, हें प्रकरण दोन यांत सांगितलेंच आहे. कश्यप हा ब्रह्ममानसपुत्र मरिचिऋषि याचा पुत्र व्हावा.

अगस्ति हा ब्रह्ममानस पुत्र जो पुलस्त्यऋषि याचा पुत्र अगस्त्य याच्या कुलांतील एक ऋषि आहे, असें श्रीमद्भागवत व मत्स्यपुराण वगैरे ग्रंथांत सांगितलें आहे.

वनपर्व अ० २४ यांतील श्लोक १३।१४।१५।१६ यांत वैशंपायन, जनमेजय राजास सांगतात—" राजा असें बोलून ते धर्माचरण करणारे पांडव अनेक ब्राह्मणांसह त्या पवित्र 'द्वैतवन' सरोवराकडे गेले. तेथेंही अग्निहोत्र करणारे, निरग्नी, वेदाध्ययन करणारे व भिक्षेवर निर्वाह करणारे अशा अनेक वनवासी ब्राह्मणांचा समुदाय युधिष्ठिराच्या भोंवतीं जमला. त्यांत तपस्वी, सिद्ध व तीव्र व्रतें धारण करणारे पुष्कळ महात्मेहि होते. त्या असंख्य ब्राह्मणांसह श्रेष्ठ राजपुत्रांनीं त्या रम्य द्वैतवनांत प्रवेश केला."

त्याच अध्यायांतील श्लोक २०।२१।२२।२३ यांत वैशंपायन यांचें भाषण चालूं आहे तें—" तेथील मनोरम सरस्वती-नदीच्या तीरावर जटाधारी महात्म्यांचीं निवासस्थानें होतीं. त्या वनामध्यें धर्मात्म्या पांडवांना अनेक सिद्ध व ऋषि यांचें दर्शन झालें. धर्मराजानें आपले भ्राते व इतर परिवार यांसह रथांतून उतरून इंद्र जसा स्वर्गांत प्रवेश करितो तसा त्या वनांत प्रवेश केला. त्यावेळीं सिद्ध, चारण आणि वनवासी जन त्या सत्यप्रतिज्ञ धर्मराजाला पहाण्याच्या इच्छेनें तेथें जमले व त्या नरेंद्रसिंहाच्या सभोंवार उभे राहिले. तेव्हा धर्माचरण करणारांतील श्रेष्ठ युधिष्ठिरानें त्या सर्व सिद्धगणाला वंदन केलें, उलट त्या सर्वांनींहि त्याचा राजा आणि देव, याप्रमाणें सत्कार केला."

पुढें धौम्यऋषींनी धर्मराजास उत्तरेंतील तीर्थें सांगितलीं आहेत. तें वर्णन अ० ९० यांत आहे. त्यांतील श्लोक ३।४ यांत 'प्लक्षावतरण ' नामक तीर्थाचें वर्णन आहे तें—" सरस्वती नदी अति पवित्र असून तिच्या तीरावर तीर्थांची मालिकाच लागली आहे; ती नदी मोठ्या वेगानें समुद्राकडे वहाते व यमुनाहि तिला येऊन मिळते. तेथेंच " प्लक्षावतरण " या नांवाचें शुभ व अति पवित्र तीर्थ आहे. तिच्या तीरावर याग करून सरस्वतीच्या जलानें अवभृतस्नान केलेले द्विज स्वर्गलोकीं जातात. "

धौम्यऋषींनीं तीर्थादिकांची माहिती सांगितल्यानंतर पांडव तीर्थयात्रेस गेले. तीर्थयात्रा करीत करीत ते लोमेश ऋषींसह या "प्लक्षावतरण " तीर्थावर आले. त्या प्रसंगाचें वर्णन अ० १२९ यांत आहे. लोमेशऋषींचें भाषण त्या अध्यायांत आहे. त्यांतील श्लोक ११।१२।१३।१४ यांचा अर्थ—" हे कौंतेया, हें कुरुक्षेत्राचें द्वार आहे. नहुष पुत्र ययातीनें येथेंच अनेक रत्नौघांचा व्यय करून विविध क्रतु केले व त्यामुळें इंद्राला परम संतोष झाला. हें ' प्लक्षावतरण " नामक उत्तम यमुनातीर्थ आहे. हें स्वर्गाचें द्वार आहे, असें विद्वान् लोक सांगतात. येथें ' सारस्वत 'ऋत्विजांकडून देवांची पूजा करणारे ' युपोलूखलिक ' परम ऋषि अवभृतस्नान करितात."

त्याच अध्यायांत शेवटीं लोमेशऋषींचें आणखी भाषण आहे. ते श्लोक २०।२१।२२ हे आहेत. त्यांचा अर्थ—" राजा, हें पवित्र सरस्वती तीर्थ आहे. केवळ पुण्याचरण करणारेच येथें रहातात. हे नरश्रेष्ठा, या सरस्वतीतीर्थांत स्नान करून तूं निष्पाप होशील. तेथें

देवर्षि, महर्षि व राजर्षि यांनीं 'सारस्वत 'ब्राह्मणांकडून मोठमोठे याग करविले आहेत. ही प्रजापतीची समंततः पांच योजनें विस्तीर्ण असलेली वेदी आहे. हें महात्म्या कुरूचें क्षेत्र आहे."

या "प्लक्षावतरण" तीर्थवर्णनांत 'सारस्वत 'ऋत्विज व 'सारस्वत 'ब्राह्मण असा देशपरत्वें भेद दर्शविणारा उल्लेख आला आहे. ते दोनहि श्लोक याखालीं देतों—

अत्र सारस्वतैर्यज्ञैरीजानाः परमर्षयः।
यूपोलूखलिकास्तात गच्छन्त्यवभृथप्लवम् ॥१४॥
इहसारस्वतैर्यज्ञैरिष्टवन्तः सुरर्षयः।
ऋषयश्चैव कौन्तेय तथा राजर्षयोऽपिच ॥२१॥

महाभारतावरील टीकाकार श्रीमन्नीलकंठ पंडित यांनीं वरील श्लोक ११।१२।१३।१४ यांवर टीका लिहिली आहे ती अशीः—

"अत्रैव कुरुक्षेत्रद्वारे ॥१२॥ सारस्वतैर्ब्राह्मणैः ऋत्विग्भिर्यज्ञैरीजानाः यूपोलूखलिकाः यूपान् उलूखलानि च यज्ञसाधनान्याददते यूपोरलूखलिकाः। पशुभिः पुरोडाशैश्च इष्टवन्त इत्यर्थः ॥ १४ ॥

या अध्यायांत सारस्वत ब्राह्मण असा देशावरून नांव प्राप्त झालेला उल्लेख आढळतो. त्यावरून पांडवांच्या तीर्थयात्रेच्या कालापूर्वी देशपरत्वें ब्राह्मणांस भिन्न नांवें प्राप्त झालीं होतीं असें वाटतें.

काम्यकवनांतहि ब्राह्मणांची बरीच वस्ति होती. पांडव तीर्थयात्रेस निघाले त्यावेळीं काम्यकवनांतील सर्व ब्राह्मण त्यांजपाशीं येऊन ह्मणतातः— "हे धर्मराजा, तूं भ्राते व महात्मा लोमेश—ऋषि

यांसह पुण्यप्रद तीर्थांना जात आहेस, तेथें आह्मांलाहि घेऊन जा. हे महाराजा, आम्हांला तीर्थयात्रा घडणें शक्य नाहीं. तुझ्या साह्यावांचून आह्मांला तीं सर्व तीर्थें अगम्य आहेत." (वनपर्व अ० ९३ श्लोक १।२।३)

तीर्थयात्रा संपल्यावर पांडव प्रथम द्वैतवनात आले व तेथें कांहीं काल राहून कार्तिकी पौर्णिमेनंतर पुनः काम्यकवनांत आले त्यावि- षयींचें वर्णन वनपर्व अ० १८३ यांत आहे. त्यांतील श्लोक १ ते ६ यांत वैशंपायन सांगतातः—

"हे राजेंद्रा, युधिष्ठिरादि सर्व पांडव काम्यकवनांत जाऊन पोहों- चले असतां त्या वनांतील मुनिगण कृष्णेसह त्यांचा सत्कार करून त्यांच्या समीप बसले. नंतर कांहीं काल विसावा घेऊन ते द्विजांनीं परिवेष्टित असलेले पंडुनंदन तेथें सुखानें राहूं लागले. तेव्हां अर्जु- नाचा प्रियसखा असलेला कोणी एक ब्राह्मण त्यांस ह्मणालाः—" हे कुरुश्रेष्ठ हो, तुम्हीं येथें आल्याचें वृत्त महाबाहु जितेंद्रिय कृष्णाला कळलें आहे. तो उदार अंतःकरणाचा हरि इतक्यांत येथें येईल. तो वासुदेव तुमच्या दर्शनाची आकांक्षा करणारा व श्रेय चिंतणारा आहे. त्याचप्रमाणें दीर्घायु, स्वाध्याय व तप यांनीं युक्त असलेला महातपस्वी मार्कंडेयहि लौकरच तुह्मास येऊन भेटेल."

राजा, "तो विप्र जों असें बोलत आहे, तोंच शैब्य व सुग्रीव या दोन अश्वांनीं युक्त असलेल्या रथांतून शचीसह येणाऱ्या इंद्राप्र- माणें सत्यभामेसह येत असलेला रथिश्रेष्ठ केशव त्यांच्या दृष्टीस पडला." पुढें त्याच अध्यायांतील श्लोक४१।४२।४३।४४ यांत मार्कंडेयऋषि

त्या स्थलीं आला. त्याचें वर्णन आहे तें:—" सहस्रवर्षें आयुष्य असलेला तपोवृद्ध धर्मात्मा मार्कंडेय ऋषि त्यांच्या दृष्टीस पडला. तो अजर, अमर आणि रूप–औदार्यादि गुणांनीं युक्त असलेला अतिवृद्ध तपस्वी जणुंकाय पंचवीस वर्षांच्या युवकाप्रमाणें दिसत होता. त्याला पहातांच सर्व ब्राह्मण, पांडव आणि कृष्ण यांनीं त्यांचें पूजन केलें.

हे मार्कंडेयऋषि, अंगिरा महर्षींच्या कुलांतील होत (मत्स्य पु० अ० १९६) यांनीं त्याप्रसंगीं युधिष्ठिरास पुष्कळ इतिहास सांगितले. त्यासंबंधींच्या कथा वनपर्व अ० १८३ ते १९० यांत वर्णिलेल्या आहेत. या अंगिरा महर्षिंचा उल्लेख अध्याय ८३ यांतील श्लोक ८७ यांत प्रसंगानुसार आला आहे, तेथें 'अंगिरा सारस्वत' असा विशेष भेद दर्शविला असल्यानें तो श्लोक अर्थासह या खालीं देतो:—

तीर्थं पुण्यतमं राजन्पावनं लोकविश्रुतम् ।
यत्र सारस्वतो यातः सोंगिरास्तपसोनिधिः ॥८७॥

(महात्म्या दधीचीच्या तीर्थासंबंधानें हें वर्णन आहे.)

अर्थ:—हें " तीर्थ पुण्यतम व लोकप्रसिद्ध आहे. तेथें तपोनिधि अंगिरा ' सारस्वत ' गेला होता. "

तसेंच अध्याय ८३ यांतील श्लोक ८३।८४।८५ यांत ' आदित्या 'च्या आश्रमाचें वर्णन आहे तें:—"तेथून महात्म्या तेजोराशि आदित्याच्या आश्रमास जावें. तें त्रैलोक्यप्रसिद्ध तीर्थ आहे. त्या तीर्थांत स्नान करून आदित्याची पूजा करणारा पुरुष

आदित्यलोकीं जाऊन कुळाचा उद्धार करितो. " या आदित्यतीर्थाचें स्थान कै० शंकर बाळकृष्ण दीक्षित यांनीं आपल्या " भारतवर्षीय भूवर्णन " बुकाचें पृष्ठ १८४ यांत दाखविलें आहे. ' स्थानेस्वराच्या आग्नेयीस ५ मैलांवर " अमीन " नांवाचा उंचवटा आहे. हा अभिमन्यु ह्या नांवाचा संक्षेप आहे असें तेथील ब्राह्मण सांगतात. यास चक्रव्यूह असेंहि नांव आहे. येथें जयद्रथानें अभिमन्यूस मारिलें. येथें अदिति ही पुत्राकरितां तपश्चर्या करीत होती. तिला सूर्य हा पुत्र झाला. हा उंचवटा उत्तर-दक्षिण २००० फूट लांब, ८०० फूट रुंद आणि २५।३० फूट उंच आहे. त्याच्या शिखरावर अमीन नांवाचें खेडें आहे, तेथें गौडब्राम्हण रहातात. अदितीचें एक देवालय आहे. पूर्वभागीं सूर्यकुंड आहे व पश्चिमभागीं सूर्याचें एक देवालय आहे. सूर्यकुंडाच्या जागीं सूर्य जन्मला. ज्या स्त्रियांस पुत्र प्राप्तीची इच्छा असेल त्या रविवारीं अदितीचें दर्शन घेतात, आणि सूर्यकुंडांत स्नान करितात. " वर उल्लेख केलेलें महाभारतांतील आदित्य तीर्थ हेंच असावें. त्या ठिकाणीं गौडब्राह्मणांची वस्ति आहे हें लक्षांत ठेवण्याजोगें आहे.

आतां शल्यपर्वांतील मुख्य मुख्य गोष्टींचा संग्रह याखालीं करून हें प्रकरण संपवितों. सरस्वती नदीच्यासंबंधानें शल्यपर्वांत एक स्वतंत्र आख्यान आहे. कौरव-पांडवांचें युद्ध सुरू होण्याच्या वेळीं दुर्योधनाचा नाश होणार तो आपल्याच्यानें पहावणार नाहीं ह्मणून बलराम तीर्थयात्रेस निघून गेला (भारत उद्योग० १५७) तो प्रभासतीर्थाहून सरस्वती नदीच्या व समुद्राच्या संगमाकडून तिच्या

उगमाकडे गेला. प्रभास हें तीर्थ द्वारकेच्या दक्षिणेस समुद्रकिनाऱ्यावर आहे. सरस्वती नदी अतिप्राचीनकाळीं समुद्रास मिळत होती, असें वर्णन ऋग्वेदांत आहे. ती कच्छच्या रणाजवळ पश्चिमसमुद्रास मिळत होती असावी. तें संगमस्थान एक महत्त्वाचें तीर्थस्थान आहे. (वनपर्व अ० ८२ श्लोक ६०) तेथून सरस्वतीची तीर्थयात्रा करीत करीत बलराम उत्तरेकडे चालला. त्यास ' चमसोद्भेद ' तीर्थ लागलें, तेथून तो उदपान तीर्थावर गेला. याच तीर्थास त्रितकूप असेंहि नांव आहे. गैातमऋषींचा पुत्र त्रित यास देवांपासून वरप्राप्ति होऊन त्याच्या विनंतीप्रमाणें या तीर्थास हें नांव प्राप्त झालें. (शल्यपर्व अ० ३६) या अध्यायांत त्रितऋषींचें वर्णन आहे. तेथून बलराम विनशन तीर्थावर गेला. राजपुतान्याच्या वायव्येचें जें मोठें वाळवंट आहे, त्यांत ज्या ठिकाणीं सरस्वती नदी गुप्त झाली, त्या ठिकाणास ' विनशन ' हें नांव आहे. हें एक चांगलें तीर्थ आहे. तेथून उत्तरेकडे सरस्वती नदीवरील अनेक तीर्थें पहात पहात तो द्वैतवनांत गेला. त्या वनांतून पुढें हिमालयांत उगमाकडे जात असतां हिमालयांतून ७ नद्या निघाल्या व त्या सर्व मिळून सरस्वती ही एकच नदी झाल्याचें त्यास आढळून आलें. या सात नद्यांमधील प्रदेशास " सप्तसारस्वत " असें नांव प्राचीन ग्रंथांत दिलेलें आहे. (शल्यपर्व अ० ३७) या ठिकाणीं ' मंकणक ' नांवाच्या ऋषीचा आश्रम होता. (अध्याय सदर) " सप्तसारस्वत " हें एक पवित्र तीर्थ आहे. त्याचें व मंकणक ऋषीचें वर्णन महाभारत वनपर्व अ० ८३ यांत श्लोक ११५।११६।१३३।१३४ यांत

आहे. सप्तसारस्वतापासून पुढें सरस्वतीच्या उगमापर्यंत बळरामानें यात्रा केली. या बळरामाच्या तीर्थयात्रावर्णनांत एक प्राचीन इतिहास असा आढळतो कीं—या सरस्वती नदीच्या कांठीं अनेक ब्राह्मण प्राचीन कालापासून रहात असून एकेकाळीं द्वादशवार्षिक अवर्षण पडून चारी वेदांचें वेदाध्ययन करणारे ब्राह्मण प्रायः नष्ट झाले; परंतु त्यांत ' सारस्वत ' ऋषीनें सरस्वती नदीच्या कांठीं राहून मत्स्यांच्या अहारानें आपलें प्राणरक्षण केलें व वेदांचेंही रक्षण केलें. पुढें सुभिक्ष झाल्यावर साठसहस्र ब्राह्मण वेदाध्ययनार्थ याजपाशीं शरण आले. त्यांस यथापद्धतीनें शिष्य करून त्यानें चारीहि वेद पढविले. (भा० श० पर्व अ० ५१) हा सारस्वतऋषि दधीच-ऋषीचा पुत्र होता. याचें रक्षण ऋष्याज्ञेनें सरस्वतीनदीच्या मूर्तीमान् देवतेनें केलें ह्मणून यास असें नांव पडलें होतें. चालू मन्वंतराच्या नवव्या पर्ययांतील हाच व्यास असावा; कारण त्या पर्ययांत वेदाचार्यत्व यानें केल्याचें दिसून येतें. (कै० रघुनाथ भास्कर गोडबोले कृत भारतवर्षीय प्राचीन ऐतिहासिक कोश. आवृत्ति पहिली पृष्ठें ६३२।६३३.)

या सारस्वत महर्षीचें चरित्र " सारस्वतरत्नमाला भा० १ " या ग्रंथांत त्या ग्रंथकर्त्यांनीं आरंभीं दिलेलें आहे. त्यांत " सारस्वत ब्राह्मणां "चें मूल उगमस्थान या सारस्वतमहर्षिपाशीं पोहोंचतें असें ह्मटलें आहे; परंतु तें ह्मणणें यथार्थ वाटत नाहीं, कारण या ब्राह्मणांस ' सारस्वत ' असें पोटभेददर्शक नामाभिधान " सारस्वत " देशावरून प्राप्त झालें आहे, असें वरील उल्लेखांवरून दिसून येतें.

शिवाय या ' सारस्वत ' महर्षिंचा पिता दधीच ब्रह्मर्षि हा भृगु-कुलोत्पन्न होता. भृगु हा ब्रह्ममानसपुत्र आहे, हें दुसऱ्या प्रकरणांत दाखविलेंच आहे. अर्थांत सारस्वत महर्षिंचें उगमस्थान भृगुमहर्षि होत. मरीच्यादि सर्व ब्रह्ममानसपुत्रच सारस्वत ब्राह्मणांचे मूल उगम-स्थान आहेत, असें प्रकरण २ रें व ४ थें यांवरून स्पष्ट होतें.

वर निर्दिष्ट केलेल्या वर्णनांशिवाय अध्याय २५८ यांतील काम्यकवनांत रहाणारे " तापसी " व अध्याय २६० यांतील इंद्रियनिग्रही व धर्मात्मा ब्राह्मण " मुद्गल " व महात्मा स्थाणु. (अ० ८३) इत्यादि या देशांतील अनेक ब्राह्मणांचीं चरित्रें महा-भारतांत प्रसंगानुसार आलेलीं आहेत. तीं सर्व याठिकाणीं देणें अशक्य आहे. जिज्ञासु वाचकांनीं तीं मूळग्रंथांत पाहून आपली मनीषा तृप्त करून घ्यावी अशी त्यांना विनंति करून हें प्रकरण संपवितों.

पुढील प्रकरणांत " सारस्वत ब्राह्मणांचें दक्षिणेकडील देशांत आगमन " या सदराखालीं त्यासंबंधाचा मिळालेला इतिहास देण्याचें योजिलें आहे.

प्रकरण पांचवें.

सारस्वत ब्राम्हणांची दक्षिणहिंदुस्थानांतील वस्ति.

मागील तिसऱ्या प्रकरणांत सरस्वतीनदीच्या प्रदेशांतून पूर्वेकडील कान्यकुब्जादि देशांत ब्राह्मणांची वस्ति होत गेल्यामुळें त्या त्या देशांचीं नांवें त्या त्या ब्राह्मणांस प्राप्त झालीं आहेत अशा बद्दलचे उल्लेख एकत्र केले आहेत. या प्रकरणांत सारस्वत-ब्राह्मणांची वस्ति दाक्षिणहिंदुस्थानांत प्रथम कधीं व कशी झाली यासंबंधाचीं जीं वर्णनें प्राचीन ग्रंथांत आढतात तीं एकत्र करीत आहे. तसें करण्यापूर्वी दाक्षिणहिंदुस्थानाची मर्यादा प्राचीनग्रंथांत कोठपर्यंत लिहिली आहे, याचा निर्देश करणें अवश्य आहे, करितां त्यासंबंधीं विवेचन प्रथम करून नंतर मुख्य विषयासंबंधानें जें लिहावयाचें तें लिहीत आहे.

प्राचीनग्रंथांत भूगोलविषयक स्वतंत्र असा ग्रंथ आढळत नाहीं. तथापि रामायण, महाभारत, पुराणें व संस्कृत नाटकें वगैरे ग्रंथांत भूगोलविषयक माहिती प्रसंगानुसार आलेली आहे. रामायणांत श्रीरामचंद्राच्या वनवासप्रकरणांत, महाभारतांत भीष्मपर्व अ० ९ यांत, सभापर्वांत व वनपर्वांत वगैरे बऱ्याच ठिकाणीं देश, नद्या, पर्वत ह्यांची माहिती लिहिली आहे. तसेंच बृहत्संहिता, काव्य-मीमांसा, रघुवंश, राजतरंगिणी इत्यादि ग्रंथांतहि भारतवर्षाचे विभाग व त्या विभागांतील देश यांची माहिती आहे. त्यांत नर्मदानदीच्या दक्षिणेकडील भारतवर्षाचा (हिंदुस्थानाचा) भाग आहे त्यास

दक्षिणभाग ह्मटलें आहे. नर्मदेच्या कांठीं 'माहिष्मती' नांवांची प्राचीन राजधानी होती. त्या नगरीच्या दक्षिणेकडील विभागास दक्षिणदेश असें ह्मटलेलें आहे. हल्लीं नर्मदेच्या कांठीं 'मंडळा' नांवाचें शहर आहे, त्यास पूर्वीं 'माहिष्मती' ह्मणत असत. (भारतवर्षीय भूवर्णन पृष्ठ २४८)

यावरून नर्मदेच्या दक्षिणेकडील सर्व प्रदेश (सिंहलद्वीपासुद्धां) व पूर्वेकडे बंगालचा उपसागर आणि पश्चिमेस अरबी समुद्र यांच्या मधील जो प्रदेश तो दक्षिणदेश असें प्राचीन ग्रंथांत ह्मटलें आहे. या प्रदेशांत ब्राह्मणांची वस्ति अति प्राचीन कालींच झाली होती, असें रामायण, महाभारत वगैरे ग्रंथांवरून दिसून येतें. श्रीरामचंद्र चित्रकूटपर्वतावरून दक्षिणेकडे अरण्यवासाकरितां आले ते विंध्यादि ओलांडून दक्षिणेकडे येतांच त्यांस दंडकारण्य लागलें. त्यांत अत्रि-ऋषीचा आश्रम लागला. तेथून दक्षिणेकडे येतां येतां शरभंग, गौतम, सुतीक्ष्ण, मंदकर्ण वगैरे अनेक ऋषींचे आश्रम त्यांनीं पाहिले व अनेक ब्राह्मण त्यांना भेटले व अनेक ब्राह्मणांचा संहारही राक्षसांनीं केला होता, असें आढळून आलें, असें वर्णन रामायणांत आहे. त्यावरून या दक्षिणदेशांत ब्राह्मणांची वस्ति रामायणकालापूर्वींच झाली होती, हें स्पष्ट आहे; परंतु या प्रकरणांत सारस्वत ब्राह्मणांची वस्ति दक्षिणेत कधीं झाली, याबद्दलचा इतिहास प्राचीन ग्रंथांत व अलीकडील ग्रंथांत जो सांपडतो तो देण्याचें योजिलें आहे, करितां त्या संबंधाची माहिती याखालीं देत आहे.

दक्षिणेंत सारस्वत-ब्राह्मणांची वस्ति श्री परशुराम अवतारकाळीं झाली आहे असें मानावें लागतें. परशुराम हा सारस्वत-ब्राह्मण असून दक्षिणेंतील सारस्वत ब्राह्मणांत प्रथम आलेला आहे असें कै० गुंजीकर यांनीं लिहिलें आहे. (सरस्वती मंडल आवृत्ति १ पृष्ठ ९) तें त्यांचें ह्मणणें योग्य दिसतें. परशुराम हा जमदग्निऋषीस रेणुकेच्या पोटीं झालेला पुत्र होय. यास जमदग्नीचा पुत्र ह्मणून जामदग्न्य आणि हातांत परशु नांवाचें आयुध धारण केल्यामुळें परशुराम अशीं नांवें असत (भारत द्रोण० अ० ७०) याचा इतिहास असा आहे कीं, महर्षि भृगू ज्यास वारुणीभृगू असें प्रसिद्ध नांव होतें तद्वंशीय ऋचीक ऋषींचा पुत्र जमदग्नि. त्या जमदग्नीचा पुत्र परशुराम. हा उन्मत्त क्षत्रियांच्या वधार्थ विष्णुतेजानें उत्पन्न झाला होता. कार्तवीर्य (सहस्रार्जुन) नांवाचा क्षत्रियराजा श्रीदत्तात्रेयाच्या वरामुळें प्रबल होऊन उन्मत्तपणानें देव, यक्ष, ऋषि यांचा संहार करूं लागला. तो व त्याचे अनुयायी क्षत्रियजन लोकांस फार त्रास देऊं लागले, भूभार फार झाला. तेव्हां देव व ऋषि यांच्या प्रार्थनेवरून श्रीविष्णूनें परशुराम अवतार धारण करून कार्तवीर्याचा व क्षत्रियांचा संहार केला. कार्तवीर्य याचें व परशुरामाचें युद्ध होण्याचें कारण असें झालें कीं, परशुराम आश्रमांत नसतां कार्तवीर्य राजा जमदग्नीच्या आश्रमांत आला. जमदग्नीनें कामधेनूच्या आश्रयानें त्याचा उत्कृष्ट सत्कार केला. त्यावेळीं कार्तवीर्यानें संतोषानें स्वनगरीस जाण्याचें सोडून ती कामधेनू बलात्कारानें हरण केली व आपल्या गांवीं गेला. नंतर परशुराम आश्रमांत आला, त्यास सर्व वर्तमान समजलें. तेव्हां

परशुरामानें कार्तवीर्याच्या नगरीस जाऊन कामधेनु मागितली, ती त्यानें न दिल्यामुळें दोघांचें मोठें युद्ध होऊन परशुराम यानें त्याचे सहस्र हात तोडून त्यास ठार मारिलें व धेनु घेऊन आश्रमीं परत आला. या गोष्टीस बरेच दिवस लोटले. कार्तवीर्याचे पुत्र संधी पाहतच होते. एकदां परशुराम आश्रमी नाहीं असें पाहून ते एकाएकीं आले व जमदग्नीचा वध करून पळून गेले. परशुराम आश्रमांत आल्यावर त्यास तें वर्तमान समजून पराकाष्टेचा कोप आला व त्यानें प्रतिज्ञा केली कीं, ' पृथ्वीवरील संपूर्ण क्षत्रिय मारून ऋचीकादि पितरांस तृप्त करीन. ' इतकें बोलून तो कार्तवीर्याच्या नगरास आला व त्यानें त्याच्या पुत्रांबरोबर युद्ध करून त्या सर्व पुत्रांस ठार मारिलें.

नंतर परशुराम हा एकवीसवेळां संपूर्ण भारतवर्षांत फिरला व त्यानें बहुतेक क्षत्रियाचा संहार केला. मात्र कित्येक क्षत्रियांचीं मुलें त्यांच्या त्यांच्या मातांनीं ऋषींच्या आश्रमांत नेऊन सोडिलीं त्यामुळें तीं वांचलीं. सूर्यवंशीय ' मुलक ' नांवाचा राजा तर स्त्रियांत लपून राहिल्यामुळें वांचला. (तोच पुढें नारीकवच नांवानें प्रसिद्ध झाला.) तसेंच विदेही जनकराजा ब्रह्मनिष्ठ ह्मणून वांचला. इतकें परशुरामानें करून क्षत्रियांच्या रक्तानें पांच डोह भरिले. ते रामव्हद अशा नांवानें प्रसिद्ध झाले. हे पांच डोह परशुरामाच्या प्रार्थनेवरून त्याच्या पितरांच्या आशिर्वादानें तीर्थभूत झाले आहेत व ते कुरुक्षेत्रांत आहेत. त्यांचें वर्णन महाभारत वनपर्व अध्याय ८३ कुरुक्षेत्रमहात्म्य या अध्यायांत आहे. सांप्रत हे पांच डोह तीर्थोदकानें भरलेले असून तीर्थस्थानें ह्मणून त्यांची प्रसिद्धी आहे. त्या तीर्थांत स्नान करून

परशुरामाची पूजा करणारांस महत्पुण्य लाभेल असें वरील अध्यायांत सांगितलें आहे व कुरुक्षेत्राचें एक द्वार (यक्षिणी नांवाचें एक तीर्थ) परशुरामानें तेथें निर्माण केलें असून त्या तीर्थांत स्नान करून देव व पितरं यांचें पूजन करणारा पुरुष कृतकृत्य होतो असेंही त्यांत वर्णन आहे. असो, याप्रमाणें संपूर्ण भारतवर्षीय भूमि त्यानें हस्तगत करून ती कश्यप ऋषीस दान केली. तथापि पुनःतींत क्षत्रिय आढळला कीं मारावा, असें तो करूं लागला. त्यावरून कश्यपानें त्यास सांगितलें कीं, तूं मला दिलेल्या भूमीत असें आतां करणें योग्य नसून, तींत तुला राहणेंहि अनुचित आहे. तेव्हां परशुराम समुद्रतीरीं गेला व त्यानें समुद्रापासून स्थल मागून घेतलें. समुद्रानें एकाएकीं स्थल निर्मून दिलें. त्यांत परशुराम येऊन राहिला. समुद्रानें जो देश निर्माण करून दिला, त्यास ' शूर्पारक ' हें नांव पडलें. (महाभारत शांति० अ० ४९ श्लोक ६७.)

ततः शूर्पारकं देशं सागरस्तस्य निर्ममे ॥
सहसा जामदग्न्यस्य सोपरांतमहीतलं ॥ ६७ ॥

हा शूर्पारक देश ह्मणजे कोंकण होय. (भा. प्रा ऐ. कोश पृष्ठ ६०२.)

शूर्पारक (कोंकण) हा प्रांत समुद्रापासून परशुरामानें मिळविला, असें जें वर्णन वरील ग्रंथांत आहे, तें अलंकारिक असावें. भूकंपादि उत्पात होऊन समुद्राचें पाणी दूरच्या प्रदेशीं खेंचलें गेल्यामुळें इकडील प्रदेश मोकळा झाला असावा व त्यांत परशुरामानें वास्तव्य केलें इतकाच त्या कथेचा सारांश दिसतो. अस्तु शूर्पारक

देशांत परशुराम यानें वास्तव्य केल्यामुळें त्या देशास परशुराम याची वेदि असेहि ह्मटलेलें प्राचीन ग्रंथांत आढळतें. महाभारत वनपर्व अ० ८८ व ११८ यांत शूर्पारक देशांत परशुराम याची वेदि आहे, असें वर्णन आहे कै० शंकर बाळकृष्ण दीक्षित यांनीं आपल्या " भारतवर्षीय भूवर्णन " या बुकांत " शूर्पारक "देशाबद्दल माहिती दिली आहे ती—" कोंकण हें नांव भारतांत भीष्मपर्व अ० ९ यांत आहे. वराहमिहिरानेंहि कोंकण याचा उल्लेख केला आहे. सह्याद्रीच्या पश्चिमेकडील प्रदेश समुद्रापासून परशुरामास मिळाला. त्यास शूर्पारक नांव होतें. (शांतिपर्व अ० ४९) वनपर्वांतहि शूर्पारक आणि परशुरामाची वेदि यांचा उल्लेख आहे. सहदेवाच्या दक्षिण दिग्विजयांतहि हें नांव आहे. " पृष्ठ २८८

\+ \+ \+

" शूर्पारकाविषयीं वर लिहिलेंच आहे. वसईजवळ सोपारें ह्मणून गांव आहे. हें प्राचीन आहे असें लोकांचें ह्मणणें आहे. व जमिनींत गडप झालेला एक स्तूप नुकताच येथें सांपडला आहे. त्यांत पुष्कळ अमोलिक वस्तु फार जपून ठेविलेल्या सांपडल्या आहेत. वगैरे गोष्टी प्रसिद्ध झाल्याच आहेत. यावरून हें निःसंशय प्राचीन स्थान आहे. सोपारें हा शूर्पार याचा अपभ्रंश आहे असें मला वाटतें. " पृष्ठ २९०.

याप्रमाणे शूर्पारकदेशाविषयीं कै० दीक्षित यांनीं उल्लेख केला आहे. महाभारतांत दक्षिणेकडील केरलप्रांतापर्यंतच्या सर्व समुद्रकिनाऱ्यावरील देशास शूर्पारकप्रांत असें नांव दिलेलें आढळतें.

वराहमिहिरानें "शूरपाद्रि" व "कौंकण" असे दोन विभाग लिहिले आहेत (बृहत्संहिता)

याप्रमाणें परशुराम यानें शूर्पारक देशांत (कोंकणांत) वस्ति केल्यानंतर कांहीं कालानें त्यानें दिग्विजययज्ञ मांडिला. त्या यज्ञा-करितां त्यानें सर्व साहित्य जमविलें. त्यावेळीं यज्ञाकरितां सारस्वत ब्राह्मण पाहिजेत म्हणून गौडदेशांतील 'त्रिहोत्रपूर' नांवाच्या शहरां-तून सारस्वत दशगोत्री ब्राह्मण आणवून यज्ञाचें कार्य पुरें केलें. हा यज्ञ मौजे हरमल तर्फ पेडणें या गांवीं केला. त्या गांवीं त्या यज्ञाची खूण भस्माचा डोंगर अद्यापि आहे.

याप्रसंगीं परशुराम यानें जे दशगोत्री सारस्वत ब्राम्हण कोंकण-प्रांतीं आणविले त्यांना गोमांतक प्रांतांत अग्रहारें देऊन त्यांची स्थापना केली. त्यापासून दक्षिणेत सारस्वतब्राह्मणांचा प्रवेश झाला. ह्या गोष्टींचा उल्लेख स्कंदपुराणांतर्गत सह्याद्रिखंडांत आहे. त्यांतील श्लोक याखालीं देतों:—

"पश्चात् परशुरामेण ह्यानीता मुनयोदश ।
त्रिहोत्रवासिनश्चैव पंचगौडांतरे स्थिताः ॥
गोमांचले स्थापितास्ते पंचक्रोश्यां कुशस्थले ।
भरद्वाजः कौशिकश्च वत्सकौंडिण्यकश्यपाः ॥
वासिष्ठो जमदग्निश्च विश्वामित्रश्च गौतमः ।
अत्रिर्दशर्षयश्चैते स्थापितास्तत्रचैवहि ॥
श्राद्धार्थंचैव यज्ञार्थं भोजनार्थं च कारणात् । (३०)

सह्याद्रिखंड उत्तरार्ध अ० १ (सरस्वतीमंडळ पृष्ठ ९)

याप्रमाणें सारस्वत ब्राह्मणांची वस्ति दक्षिणेत प्रथमतः झाली आहे. परशुरामाच्या अवतारकालीं महाभारतकालापूर्वी एका विशिष्ट-कालीं सारस्वत ब्राह्मणांकडून यज्ञयागादि कर्मे करविणें विशेष प्रशस्त होय असें देवर्षि, ब्रह्मर्षि व राजर्षि हे मानीत असत, असें महाभारत वनपर्व अध्याय १२९ यांतील श्लोक १४।२१ वरून दिसतें. ते श्लोक प्रकरण ४ यांत दिले आहेत. त्यावरून वाचकांच्या लक्षांतही ती गोष्ट आली असावी व दिग्विजय यज्ञ यथासांग होण्या-करितां त्या समजुतीनेंच परशुराम यानें वर लिहिलेले सारस्वत ब्राह्मण यज्ञाच्यावेळीं आणिले असें त्यावरून अनुमान होण्याजोगें आहे.

सह्याद्रिखंडाच्या कालासंबंधानें व त्यांतील ऐतिहासिक गोष्टी संबंधानें कित्येक लोक कांहीं आक्षेप घेतात. त्या आक्षेपांच्या निरस-नार्थ श्रीमन्महाराज छत्रपति सातारा यांच्या दरबारीं शके १६७१ शुक्लनाम संवत्सरीं एक निवाडा झाला आहे. तो निवाडा पेशव्यांच्या जुन्या रिकार्डांत सांपडला असून तो " भारत–इतिहास–संशोधक–मंडळ" पुणें " अहवाल शके १८३४ (चैत्र भाद्रपद) या बुकांत प्रसिद्ध झाला आहे. त्याची साग्र नक्कल या बुकाच्या शेवटीं देत आहे. तथापि त्या निवाड्याचा प्रसंग व चालू विषयासंबंधाचे त्यांतील उल्लेख याठिकाणीं नमूद करून ठेवणें इष्ट वाटल्यावरून तेवढ्यापुरता निर्देश येथें करितों.

या निवाड्याची हकिकत अशी आहे कीं, राजश्री यशवंतराव महादेव प्रभु व गोविंद खंडेराव चिटणीस व समस्तगोत्रप्रभु यांनीं सातारा मुक्कामीं श्रीमन्महाराज छत्रपती स्वामी यांच्याकडे शके

१६७१ शुक्ल नामसंवत्सर आषाढ शु॥ ५ दिवशीं विनंती केली कीं, प्रभूज्ञातीच्या मंडळीस व्रतबंध गायत्रीउपदेश करून ब्रह्मकर्माचा अधिकार असावा अशी विनंति केल्यावरून अष्टप्रधान व दरबारी मुत्सद्दी, नगरांतील ब्राह्मण शिष्टमंडळी व शृंगेरी मठाहून आलेले वेदशास्त्रसंपन्न पंडीत पांच व वाराणसी क्षेत्राहून आलेले वेदशास्त्रसंपन्न पंडीत पांच व कराडकर, वाईकर ब्राह्मण व आणखी बरेच दशग्रंथी ब्राह्मण मिळून वरील प्रश्नाचा विचार झाला. त्या सभेंत दहा हजार लोकसमुदाय जमत असे. त्यांत ओघानें असा प्रश्न उपस्थित झाला कीं, शेणवी यांस षट्कर्मांचा अधिकार आहे व प्रभु यांस नाहीं याचें कारण काय असा प्रश्न निघाल्यावरून शृंगेरी व वाराणसी दोन्हीं स्थळांहून दशविध ब्राह्मणांच्या वंशपरंपरा आद्यंत माहिती समजून घेण्याकरितां सह्याद्रिखंडाच्या प्रती आणवून विचार झाला व निवाडा करण्यांत आला. तो निवाडा सदर बुकाचें पृष्ठ ९३।९४। ९५।९६।९७ यांवर छापण्यांत आला आहे. त्यांतील या विषया-पुर्ता भाग—

(सह्याद्रिखंडाची प्रत) " श्रींगेरीमठाहून आणविली ती त्यांत सविस्तर ब्राह्मणाचा आचार व देश तपसील—

पंचगौड ते कोण	पंचद्रवीड ते कोण
१ मुख्यगौड	१ मुख्यद्रवीड
१ कानकुब्ज	१ महाराष्ट्र
१ मयथील	१ तैलंग
१ सरस्वत्य	१ कर्नाटक
१ उतकील	१ गुर्जर
५	५

१०

येणेप्रमाणें दशविध ब्राह्मणांचा कुळियामधें जेष्ठ घर गौड यास निमित्येन वेदशास्त्रसंपन्न पुराणोत्पन्न श्रीवाराणसी पूर्व देशीं विद्या. जन्म येत्र येत्र स्थलीं याजकारितां वडिलपणाचा अधिकार त्यांजवळ व दुसरे द्राविडांकडे जे श्रीक्षेत्राहून विद्याभ्यासी प्राप्त याप्रमाणें ह्मणून कनिष्ट व पंचगौडांमध्यें विचार व द्राविडांमध्यें आचार हे दोन्ही मार्ग पुरातनपासोन चालत आहे असें असतां त्रेतायुगीं श्रीपरशरामअवतार क्षेत्रीयेकुळीं सहस्त्रार्जुन महाबाहूचे होऊन व्येभिचारधर्में वर्तणूक सर्वहि क्षेत्रीं करूं लागले. तेव्हां परशुरामानें एकवीस वेळां निक्षेत्री पृथ्वी करून सुमंत पंचक्षेत्रीं रुधीयच नधीमधें तिळोदक मंत्रयेज्ञास्थ व ब्राह्मण येज्ञ केला."

"संपूर्ण पृथ्वीचें राज्य ब्राह्मणांस दान दिलें. आपणांस रहावयास स्थल पाहिजे ह्मणोन समुद्रापासून जागा चौदा कोश रुंदी व चौऱ्याहत्तर गांव लांबी घेऊन तेथें ब्राह्मणस्थापना केली ता॥ "

\+ \+ \+

"येणेंप्रमाणें पुढें मसूरेचे नदीपासून आंकलेश्वरचे नदीपासून माहाल कुडाळचे नदीपर्यंत आपणास रहावयास स्थान ठेविलें हरमल तर्फ पेडणे येथें राहिले येज्ञास प्रारंभ आश्विन मासांमध्यें करून दोषाचा नाश करावा येदर्थी सर्व साहित्य करून येज्ञास प्रारंभ केला तो येज्ञसमुदाय गौडब्राह्मण पाहिजे तेव्हां गौडदेशाहून सारस्वत्य ब्राह्मण त्रिहोत्रपूर नामक क्षेत्र आहे तेथून दशगोत्री आश्वलायन शाखा ऋग्वेदी आणून स्थापना केली. मसूरेचे नदीपासून

आंकलेश्वरचे नदीपर्यंत हा देश शाश्वत ब्राह्मणांस दिला. सारस्वत्य ब्राह्मणांमध्यें मुख्य शिवशर्मा व देवशर्मा आत्री गोत्री व विष्णुशर्मा वछगोत्री व कंवडण्यगोत्री व कंवशीकगोत्री हे तीन गोत्री मुख्य याचसंबंधी भारद्वाज सत्य येकून दशगोत्री यांस शाश्वत स्थापून यांस मोकासा कसबे मजकूरपे॥ निम्मे स्थळ देऊन केळोशी कुशस्थली साष्टीनजीक गोमांतक त्रिवर्गासी देऊन मसुरेपासून आंकलेसिंव्हेश्वरपर्यंत बारदेस यास दिला. तेव्हां दोन प्रस्था पडली जे शेणवाई ह्मणावयास कारण काय तर ब्राह्मण तमाम कारकून रोजगार करून कालक्षेप केल्यास त्यास पंत अथवा शेणवाई ह्मणावें हे पुरातन शैयाद्रीखंडी कथा आहे असें सांगतांच सर्वांसी समज पडला "

\+ \+ \+

" परशराम अवतार भृगुवंशी धरून भूमीभार उतरून अश्वमेध केला त्याची साक्ष अद्यापि आहे. नवे विभूतीचा टिळा दिसतो, याची साक्ष पहावयास मौजे हरमल येथें हुजरे व ब्राह्मण आपले पाठविले. ते पाहून आले आणि महाराजांस विदित केलें. "

याप्रमाणें वरील निवाड्यांत उल्लेख आहे. त्यावरून सह्याद्रिखंडाबद्दल आक्षेप घेण्याचें कारण रहात नाहीं. वरील निवाड्याची भाषा जुनी असून कांहीं ठिकाणीं अशुद्ध आहे व त्रिहोत्रपुराहून जे दशगोत्री सारस्वत ब्राह्मण आणविले त्यांपैकीं शिवशर्मा व देवशर्मा व विष्णुशर्मा या तिघांचींच नावें त्यांत आलीं आहेत व त्या

तिघांचीं नांवें ज्या वाक्यांत आलीं आहेत त्या वाक्याचा संदर्भ मागें पुढें बरोबर लागत नाहीं. मूळ लेखांतील तें वाक्य छापवितांना कांहीं चुकी झाली असावी. असो. निवाड्यांतील भाषा व वाक्यें जशीं सदरच्या बुकांत आहेत, तशीं वर उतरून घेतलीं आहेत. त्या निवाड्यावरून कांहीं गोष्टींचा खुलासा होतो त्या गोष्टींचा तपशील:-

१ दक्षिणेंतील सारस्वत ब्राह्मण हे पंचगौडांपैकीं सारस्वत पोटभेदाचे असून ते उत्तरहिंदुस्थानांतून दक्षिणेंत आले आहेत.

२ श्रीपरशुराम हा भृगुमहर्षींच्या कुलांतील जमदग्नीचा पुत्र ह्मणजे (सारस्वत-ब्राह्मण) होता.

३ दक्षिणेंतील सारस्वत ब्राह्मणलोक कारकूनी धंदा करूं लागल्यामुळें त्यांना " पंत " अथवा " शेणवी " ह्मणण्याचा प्रघात पडला.

४ हे ब्राह्मण त्रिहोत्रपुराहून (गौड देशांतून) आले असल्यामुळें त्यांना " गौड-सारस्वत " ह्मणण्याचा प्रघात पडला.

५ गौड व द्राविड या दोन ब्राह्मणांच्या मुख्य भेदांत गौडांचें घराणें ज्येष्ठ होय.

इतक्या गोष्टींचा खुलासा कळून येतो. असो.

श्रीपरशुराम यांनीं जे दशगोत्री सारस्वत ब्राह्मण कोंकणांत आणून त्यांची स्थापना केली, त्या ब्राह्मणांनीं आपापलीं कुलदैवतेंही बरोबर आणिलीं. त्यासंबंधाचा उल्लेख सह्याद्रीखंडांत आहे तो—

" आनीता भार्गवेणैव गोमांताख्येच पर्व ते ॥
मांगिरीशो महादेवो महालक्ष्मीश्च ह्मालसा ॥ ५२ ॥
शांतादुर्गाच नागेशः सप्तकोटीश्वरः शुभः ॥
तथा च बहुला देवा भार्गवेणतु आनीताः ॥ ५३ ॥
स्थापिता भक्तकार्यार्थं तत्रैवच शुभस्थळे ॥ ५४ ॥ "

(संह्याद्रीखंड उ० अ० १)

ह्या दशगोत्री ब्राह्मणांचीं सहासष्ट कुळें होतीं असें तेथें ह्मटलें आहेः—" ब्राह्मणा दशगोत्राश्च कुलंषट्षाष्टिकं स्मृतं ॥ ४ ॥
कुशस्थल्यां च कर्दल्यां त्रिगोत्रं स्थापितं खलु ॥ ५ ॥ "

(संह्याद्रि खंड उ. अ. ४)

या सर्व ब्राह्मणांना गोमांचळ पर्वताच्या आसपास परशुराम यानें अग्रहारें देऊन त्यांची स्थापना केली. त्यांतून ज्याला जो गांव मिळाला तेथें त्यानें आपल्या कुळदेवतेची स्थापना केली. वत्स व कौंडिण्य गोत्रांच्या ब्राह्मणांस कुशस्थळी (कुडथाळ) हा गांव अग्रहार देऊन तेथें त्यांचा कुळदेव श्रीमांगिरीस (श्रीमंगेश) या देवाची स्थापना केली. या देवासंबंधानें सह्याद्रिखंडांत उल्लेख आहे तोः—

मांगिरीशपर्वतो नाम पूर्वदेशे त्रिहोत्रके ॥ १ ॥
ब्राह्मणा स्थापितं लिंगं पूर्वं तत्र द्विजोत्तम ॥
मांगीशनाम वै तस्य विख्यातं भुवनत्रये ॥ २ ॥

(सं. खं. उ. अ. ३)

याप्रमाणेंच इतर ब्राह्मणांच्या कुळदैवतांची स्थापना झाली आहे. प्रत्येक देवस्थानाच्या देवळानजीक संस्थापक ब्राह्मणाच्या मूर्तीचे

स्थान आहे व त्या मूर्तींचीहि नित्य पूजाअर्चा होत असते. या मूर्तींचीं प्राचीन नांवें शिवशर्मा आदिकरून परंपरेनें प्रचारांत चालूं आहेत व त्यांना ग्रामपुरुष ह्मणण्याची रूढी पडली आहे.

वरील सर्व हकीकतीवरून परशुराम अवतारकालीं सारस्वत ब्राह्मणांची प्रथम दक्षिणेंत वस्ति झाली आहे हें दिसून येईल. पुढें पुष्कळ काल लोटल्यावर इ० सनाच्या ११ व्या शतकांत महमुद गझनी यानें पंजाब व मध्यप्रांत यांतील कित्येक महत्वाच्या ठिकाणावर व हिंदूंच्या देवस्थानांवर स्वाऱ्या करून देवांच्या मूर्ति फोडिल्या व संपत्ति लुटून नेली. हिंदूंचा छल केला, त्यावेळीं प्राणरक्षणाकरितां कित्येक ब्राह्मण कुटुंबें आपला देश सोडून दक्षिणेंत येऊन राहिलीं असावीं असें वाटतें; परंतु त्याबद्दल विश्वसनीय पुरावा आढळत नाहीं व तसा पुरावा पहाण्याचेंहि कारण नाहीं. प्रथम कांहीं मंडळीची एका ठिकाणीं स्थायिक वस्ति झाल्यावर त्यांच्या आप्तइष्टमंडळीचें तेथें दळणवळण सुरूं होऊन वस्ति वाढत जाणें स्वाभाविकच आहे. त्यास अनुसरून दक्षिणेंतील सारस्वत ब्राह्मणांची संख्या वाढत आली आहे. हल्लीं दक्षिणेंतील सारस्वत ब्राह्मणांचीं जीं गोत्रें प्रसिद्ध आहेत तीं व त्यांचे प्रवर खालीं लिहिल्याप्रमाणें आहेत—

गोत्र.	प्रवर.
१ वत्स.	भार्गव, च्यावन, आप्नवान, और्व, जामदग्न्य
२ कौंडिन्य.	वासिष्ठ, मैत्रावरुण, कौंडिन्य,
३ कौशिक.	वैश्वामित्र, अघमर्षण, कौशिक.

४ भारद्वाज.	आंगिरस, बार्हस्पत्य, भारद्वाज.
५ वासिष्ठ.	वासिष्ठ, इंद्रप्रमद, आभरस्वत्.
६ जामदग्न्य.	भार्गव, च्यावन, आप्नवान्, और्व, जामदग्न्य.
७ मुद्गल.	अंगिरस, भार्म्यांश्व, मौद्गल.
८ अत्रि.	आत्रेय, आर्चनानस, श्यावाश्व.
९ कुत्स, शंख, पिंग.	आंगिरस, आंबरीष, यौवनाश्व.
१० गौतम.	आंगिरस, अयास्य, गौतम.
११ आंगिरस.	आंगिरस.
१२ नैध्रुव.	काश्यप, अवत्सार, नैध्रुव.
१३ काश्यप.	काश्यप, अवत्सार, नैध्रुव.
१४ विश्वामित्र.	विश्वामित्र, देवरात, औदल.
१५ शांडिल्य.	शांडिल, असित, देवल.
१६ धनंजय.	वैश्वामित्र, माधुच्छंदस, धनंजय.
१७ सांख्यायन.	गोम, वसु, सांख्यायन.
१८ गार्ग्य.	अंगिरस, बार्हस्पत्य, भारद्वाज, गार्ग्य.

याप्रमाणें गोत्रें प्रसिद्ध आहेत. याशिवाय कांहीं गोत्रें आहेत असें ह्मणतात, परंतु त्यांची खात्रीलायख माहिती मिळत नाहीं.

वर जीं अठरा गोत्रांचीं नांवें लिहिलीं आहेत, त्या नांवाचे ऋषि पूर्वीं होऊन गेले आहेत व त्यांचे पूर्वज कोण, यासंबंधाची माहिती घेत गेल्यास त्यांचे मूळ पुरुष मरीचि, अत्रिआदि दश ब्रह्ममानसपुत्र या बुकाच्या दुसऱ्या प्रकरणांत जे लिहिले आहेत, त्यांपैकीं आहेत असें दिसून येतें. उदाहरणार्थ, वरील गोत्रांतील पहिला ऋषि 'वत्स'

आहे, त्याच्या पूर्वजांबद्दल शोध केल्यास ' भृगु ' महर्षींच्या कुलांत ' केवल भृगु ' आणि ' जामदग्न्य भृगु ' अशा दोन वंशमालिका आहेत, त्यांपैकीं जामदग्न्य भृगुवंशमालिकेंतील हा ब्रह्मर्षि आहे. अशी माहिती मिळते. तसेंच दुसरा ऋषि ' कौंडिण्य ' याविषयीं माहिती घेतल्यास तो वसिष्ठ महर्षींच्या कुलांतील वंशमालिकेंपैकीं कुंडिणकुलोत्पन्न ब्रह्मर्षि होता, असें दिसून येतें. याप्रमाणें वरील सर्व ऋषींची माहिती मिळवितां येते. ही माहिती मत्स्यपुराणांत साग्र लिहिली आहे व त्याचा अनुवाद कै० रघुनाथ भास्कर गोडबोले यांनीं ' भारतवर्षीय प्राचीन ऐतिहासिक कोश ' या ग्रंथांत त्या त्या ऋषींच्या नांवापुढें केला आहे. जिज्ञासूंनी जरूर तर ती माहिती तेथें पहावी.



प्रकरण सहावें.

पोटजाती.

भारतवर्षांत (हिंदुस्थानांत) आरंभीं ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र असे चार वर्ण (जाति) उत्पन्न झाल्या असें उपनिषदादि ग्रंथांत वर्णन आहे. हल्लीं या प्रत्येक जातींतील इतके पोटविभाग आढळतात कीं, त्या सर्व पोटजातींची माहिती मिळवून संग्रहित करणें अशक्य आहे. वरील चार विभागांतील पोटजातींची माहिती या बुकांत लिहिण्याचें कारणही नाहीं. त्यांपैकीं ब्राह्मणजातींतील व तिच्या अंगभूत सारस्वत-ब्राह्मणासंबंधाची शक्य तितकी माहिती या प्रकरणांत देण्याचें योजिलें आहे. पोटजाति अस्तित्वांत येण्याचीं बरींच कारणें आढळतात (१) एका प्रांतांतील मनुष्यें दुसऱ्या प्रांतांत जाऊन तेथें वस्ति करून राहिलीं असतां त्या मनुष्यांचे आचारविचार व तेथें असलेल्या मुळच्या मनुष्यांचे आचारविचार भिन्न भिन्न असल्यामुळें त्यांच्या मनांत परस्परांविषयीं संशयित वृत्ति स्वाभाविकपणें उत्पन्न होते. (२) एकमेकांतील उच्चनीचत्वाच्या संकुचित कल्पना त्यांच्या मनांत उत्पन्न होतात. (३) भाषाभिन्नतेमुळें परस्परांविषयीं अनुदारवृत्ती उत्पन्न होते. (४) स्वतःच्या धंद्यासंबंधाच्या उच्चनीचत्वाच्या संकुचित कल्पना मनांत उत्पन्न होतात. (५) कित्येकांच्यामतें खाद्यपेय पदार्थांच्या सेवनामुळें उच्चनीचत्वाच्या कल्पना उत्पन्न होतात. (६) नवीन नवीन पंथ स्थापन झाल्यामुळें प्रत्येक पंथाच्या लोकांत स्वतःच्या पंथाची

पवित्रता व उच्चता विशेषप्रकारची आहे अशी भावना उत्पन्न होते. या प्रकारच्या अनेक कारणामुळें प्राचीन काळापासून या पोटजाती उत्पन्न होत आल्या आहेत. हल्लीं उपलब्ध असलेलीं दळणवळणाचीं साधनें, रेल्वे, मोटारी, विमानें वगैरे पूर्वीं या देशांत अस्तित्वांत नव्हतीं व हिंदुस्थान हा देश अफाट विस्तीर्ण असून त्यांत अनेक लहान लहान प्रदेश व राज्यें पूर्वींपासून स्वतंत्रपणें नांदत होतीं. या कारणानें कूपमंडूकवृत्तीमुळेंही पोटजातींची एकसारखी वाढ झालेली आहे.

ब्राह्मणांतील मुख्य दोन भेद पंचगौड व पंचद्रावीड हे आहेत. पंचगौडांचें स्थान आर्यावर्त (विंध्याद्रीच्या उत्तरेकडील) प्रदेश आहे व पंचद्रावीडांचें स्थान विंध्याद्रीच्या दक्षिणेकडील प्रदेश आहे. प्राचीन कालीं सर्व ब्राह्मणांची एकच मुख्य जात होती हें या बुकांतील वर्णनावरून वाचकांस कळून आलेंच आहे. पुढें गौड व द्रावीड हा भेद सह्याद्रिखंडांत आढळून येतो. या बुकांतील प्रकरण ५ यांत सातारचे श्रीशाहुछत्रपती यांच्या कारकीर्दींतील एका निवाड्याचा सारांश दिला आहे. त्यांत पंचगौड कोणते व पंचद्रावीड कोणते याचा उल्लेख आहे व तो उल्लेख सह्याद्रिखंडाच्या आधारें लिहिला आहे असें त्यांतील मजकुरावरून ठरतें. सह्याद्रिखंड हें स्कंदपुराणां-तर्गत आहे. स्कंदपुराण हें नवव्या शतकांतील आहे, असें श्री. चिंतामणराव वैद्य यांचें ह्मणणें आहे. परंतु गौड व द्रवीड हा भेद इ० स० १२०० नंतर उत्पन्न झाला असावा असेंहि त्याचें ह्मणणें आहे. यासंबंधाचा त्यांचा लेख खालीं लिहिल्याप्रमाणें आहे.

" ब्राह्मणांचे हल्लींचे मुख्य दोन भेद पंचगौड आणि पंचद्राविड. यांचा उल्लेख कोरींव लेखांत अजूनही १२०० पर्यंत नाहीं. स्कंद-पुराणांतही हा उल्लेख नाहीं, याचें आश्चर्य नको. कारण स्कंदपुराण नवव्या शतकांतलें आहे, हें आह्मी मध्ययुगीन भारत भाग २ यांत दाखविलें आहे. हा भेद मध्ययुगीन कालानंतर ह्मणजे इ० स० १२०० नंतर उत्पन्न झाला असावा असें दिसतें. या भेदाची कल्पना गौड मांसाहारी आहेत आणि द्राविड शाकाहारी आहेत, यावर बसविली असावी. हे भेद नसले तरी ब्राह्मणांचे अनेक पोटभेद रहाण्याच्या देशावरून किंवा शहरावरून इ० स० १२०० च्या पूर्वींच झाले होते हें निर्विवाद आहे. या भेदाचीं कारणें, निर-निराळ्या चालीरीति व तसेंच जातीच्या शुद्धतेची कल्पनाही झाली असावी. " (मध्ययुगीन भारत भाग ३ रा. पृष्ठें ५५२।५५३) स्कंदपुराण नवव्या शतकांतील आहे कीं काय ? हा वादग्रस्त प्रश्न आहे. तथापि तें नवव्या शतकांतील आहे असें मानिलें तरी इ० स० १२०० च्या पूर्वीं हा भेद उत्पन्न झाला होता, असें त्यावरून होतें. करितां ' हा भेद इ० स० १२०० नंतर उत्पन्न झाला असावा ' हें त्यांचें विधान चुकीचें दिसतें. तसेंच वरील लेखांतील त्यांचें दुसरें विधान " या भेदाची कल्पना गौड मांसाहारी आहेत आणि द्राविड शाकाहारी आहेत यावर बसविली असावी. " हें विधान निराधार आहे असें प्रसंगानुसार येथें लिहिणें योग्य वाटतें. कारण गौड व द्राविड हीं देशपरत्वें प्राप्त झालेलीं नांवें आहेत व या भेदांच्या पोटविभागांचीं जीं नांवें आहेत तींहि देशपरत्वें प्राप्त

झालेलीं स्पष्ट दिसतात. त्या नांवाशीं आहाराचा संबंध कोणत्याही प्रकारें जोडतां येईलसें दिसत नाहीं. सारस्वत, गौड वगैरे नांवें उत्तर हिंदुस्थानांतील देशांचीं आहेत व द्राविड, महाराष्ट्र वगैरे नांवें दाक्षिणेंतील देशांचीं आहेत. अर्थात उत्तरेंतील ब्राह्मण व दाक्षिणी ब्राह्मण हा भेद दर्शविणारा अर्थ ध्वनित होण्याकरितां गौड व द्राविड अशा संज्ञा या भेदांस देण्यांत आल्या असाव्या. अशी कल्पना येण्याजोगी आहे. असो.

इ. स. १२०० पूर्वींच्या कोरींव लेखांत गौड व द्राविड हा भेद आढळत नाहीं. हें म्हणणें मात्र पुष्कळअंशीं योग्य वाटतें कारण त्यापूर्वींच्या शिलालेखांत व ताम्रपटांत ब्राह्मणांचीं नांवें व त्यांचीं गोत्रें इतकाच उल्लेख लिहिलेला आढळतो. गौड अगर द्राविड असा भेद दाखविणारा उल्लेख त्यांत नाहीं. त्या कालावधींत सर्व ब्राह्मणसमाजांत गौड व द्राविड असा विकल्प मनांत वागविला जात नव्हता, असें दिसतें. यासंबंधानें कांहीं उदाहरणेंही देतां येतील. मासल्याकरितां एक दोन उदाहरणें याखालीं देतों:—

१ आद्य जगद्गुरु श्रीमच्छंकराचार्य यांनीं ज्या मंडणमिश्र पंडिताबरोबर ज्ञानमार्ग व कर्ममार्ग याबद्दल वादविवाद केला, ते मंडणमिश्र पंडित पंचगौडांपैकीं कान्यकुब्ज शाखेचे होते व त्यांना वादांत जिंकल्यावर आचार्यांनीं त्यांस संन्यास दिला व त्यांचें नांव 'सुरेश्वराचार्य असें ठेऊन त्यांची श्रृंगेरी मठाध्यक्षाच्या गादीवर स्थापना केली. श्रृंगेरी मठाचे पहिले धर्माध्यक्ष तेच होत असा इतिहास सांपडतो, 'केरळकोकिल' मासिकपुस्तकाचे एडिटर कै०

कृ० ना० आठल्ये यांनीं श्रीशंकराचार्यांचें विस्तृत चरित्र लिहिलें आहे त्यांतील यासंबंधाची माहिती याखालीं देतों:—

" ९ मंडणमिश्राचा अवतार–माहिष्मती नगरी जिला सांप्रत चोळीमहेश्वर असें ह्मणतात, तेथें पंचगौडापैकीं कान्यकुब्ज जातीच्या ब्राह्मणाचें एक घराणें राहत होतें. त्या घराण्यांत एक ब्राह्मणाचा पुत्र फारच बुद्धिमान निपजला. त्याचें नांव विश्वरूप असें होतें व तोच पुढें मंडणमिश्र या नांवानें प्रसिद्धीस आला. ह्याच्या विद्वत्तेची कीर्ति, लहानपणापासून दिगंत पसरली होती " (पृष्ठ २०)

" ४५ श्रृंगेरी मठाची स्थापना—आद्य श्रीमच्छंकराचार्य, यांस श्रीक्षेत्रश्रृंगेरी हें स्थान फार पसंत पडलें, यास्तव त्यांनीं विभांडकऋषीपासून जागा मागून घेऊन विक्रमसंवत् २२ मध्यें तेथें तुंगातीरीं आपला आद्यमठ स्थापन केला आणि त्यांत सुंदर पाषाणाचें देवालय बांधून त्यांत स्वहस्तें श्रीशारदापीठाची स्थापना केली. नंतर आपल्या पश्चात वादांत हरून मुंडन करून पट्टशिष्य बनलेले मंडणमिश्र पंडित ज्यांस आचार्यांनीं प्रसन्न होऊन सुरेश्वराचार्य असें नामाभिधान दिलें होतें, त्यांस त्या मठाचें आधिपत्य दिलें. श्रीसुरेश्वराचार्य हे महान योगाभ्यासी असत. " (पृष्ठ ८५)

२ दुसरें उदाहरण, कुमारिलभट्ट यांचें. यांच्यासंबंधाचा लेख सदरच्या बुकांत आहे तो:—

" ३० भट्टपादाचें दर्शन–नंतर कुमारिलभट्ट ज्यांस भट्टपाद असें दुसरें नांव होतें त्यांची कीर्ति आचार्यांच्या कानावर आली. ह्मणून त्यांस भेटण्यासाठीं ते सर्व शिष्यांसहवर्तमान निघून प्रयागक्षेत्रीं

आले. " (पृष्ठ ५६) मंडणमिश्रपंडित हे भट्टपाद (कुमारिलभट्ट) यांचे मेहुणे व शिष्य होते. (पृष्ठ ५७) अर्थात तेहि कान्यकुब्ज-शाखेचे होते असें मानणें भाग आहे—

३ तिसरें उदाहरण श्रीगौडपादाचार्य यांचें. गौडपादाचार्य हे उत्तर हिंदुस्थानांतील मोठे धर्मसंस्थापक होऊन गेले. गोविंदयति हे त्यांचे शिष्य होते व आद्यशंकराचार्य हे गोविंदयति यांचे शिष्य होते. ही परंपरा गुरुचरित्रांत सांगितली आहे. व इतर कित्येक ग्रंथांत हा उल्लेख आहे. गौडपादाचार्य हे गौडब्राह्मणांतील सारस्वत-शाखेंतील होते अशी आख्यायिका आहे. या गौडपादाचार्यांचें दर्शन व त्यांच्याकडून आशिर्वादप्राप्ति आद्यशंकराचार्य यांना गंगेच्या वाळवंटांत झाली असें वर लिहिलेल्या चरित्रांत वर्णन आहे. (पृष्ठ १५८)

आद्य शंकराचार्यांचा काल कोणता असा येथें प्रश्न उपस्थित होतो. वर सांगितलेल्या आचार्यांच्या चरित्रांत त्यांच्या कालाविषयीं बराच विचार केला आहे. त्यांत अनेक ग्रंथकारांचीं मतें घेतलीं आहेत. कोणी ह्मणतात आचार्यांना होऊन सातसें किंवा आठशें वर्षें झालीं, कोणी ह्मणतात कीं सहाव्या शतकाच्या शेवटीं व सात-व्याच्या आरंभीं आचार्य असावेत. कोणी ह्मणतात त्यांचा अवतार होऊन २८०० वर वर्षें झालीं. या सर्वांचा विचार करून व सर्व ग्रंथांतील आधारावरून त्यांचा अवतार होऊन २००० वर्षें झालीं आहेत असें त्यांनीं सिद्ध केलें आहे. (सदरच्या पुस्तकांतील पृष्ठ १७७) यावरून वर आम्ही लिहिलेल्या विधानाची सत्यता वाचकांस पटेल

या प्रकारचीं आणखीहि कांहीं उदाहरणें सांपडतील परंतु विस्तार-भयास्तव तीं येथें देतां येत नाहींत व तीं देण्याचें यास्थळीं विशेष प्रयोजनहि नाहीं. आतां मुख्य विषयाकडे वळूं.

ब्राह्मणसमाजाचे गौड व द्राविड असे भेद होऊन प्रत्येक भेदाचे पांच पांच प्रकार झाल्यानंतर कालपरत्वें समाजाच्या संकुचित वृत्तीमुळें त्या प्रत्येक प्रकारापोटीं अनेक पोटजाति उत्पन्न झाल्या. त्या पोटजातींची माहिती राव ब. चिंतामणराव वैद्य यांनीं परिश्रमपूर्वक मिळवून ती वर लिहिलेल्या मध्ययु. भा. भा. ३ यांत प्रसिद्ध केली आहे. त्यांत मुख्य पोटजाति (२९) सांगितल्या आहेत व त्या जातीसंबंधानें कांहीं मनोरंजक माहिती लिहिली आहे. तिचा तात्पुरता उतारा येथें घेतों. मुख्य पोट जातिः—

१ काश्मिरी, २ नागर, कोटिया (नागरकोट ह्मणजे कांगडा मधील कटोच राजाची राजधानी) ३ मुहियाळ, (पंजाबांत ही पोटजात आहे) ४ सारस्वत, ५ गौड, (गुड ह्मणजे बंगाल नव्हे तर ठाणेश्वराभोंवतालचा प्रदेश), ६ नारनोळ (पतयाळा), ७ कनोजिया (कनोज देशांत राहणारे), ८ सरजुपारिया (शरयु पलिकडील), ९ जझोति, (जझोति ह्मणजे बुंदेलखंडांत राहणारे) १० तिवारी (त्रिपुर हैहयांच्या राजधानीमध्यें राहणारे), ११ सिंधी, १२ नागर (नागर ह्मणजे वडनगरमध्यें राहणारे) १३ श्रीमाळी (श्रीमाळ राजपुतान्यांत आहे), १४ पुष्करणा (पुष्कर येथें राहणारे), १५ दसोरे (दशपूर ऊर्फ मंदसोर), १६ माळवी, १७ मोढ (मोढ अथवा धर्मारण्य येथें राहणारे), १८ गुजराथी,

१९ बंगाली, २० मैथिल, २१ ऊरिया, २२ देशस्थ, २३ चित्पावन (चित्तपोळण ह्मणजे चिपळून भोंवतीं राहणारे), २४ कऱ्हाडे (कऱ्हाडच्या शिलाहारांच्या देशांत राहणारे), २५ गौडसारस्वत, २६कर्नाटक,२७आंध्र किंवा तेलगु,२८तामिळ २९मल्याळी,(नंबुद्री). या व अशा ब्राह्मणाच्या मुख्य पोटजाति त्यांच्या राहण्याच्या देशावरून नांवें पावलेल्या आपल्या दृष्टीस पडतात. यांतहि आणखी पोटविभाग आहेतच. दशाविशा वगैरे इतर पोटभेद कित्येक कारणांवरून पडलेले उत्तरेस दिसतात आणि दक्षिणेंत ऐय्यर, ऐयंगार, आचार्य वगैरे दिसतात. तत्वज्ञानाच्या भेदांवरूनसुद्धां असे भेद पडले आहेत. आय्यर हे स्मार्त आहेत; ह्मणजे शिव आणि विष्णु यांस ते सारखेच समजतात पण अयंगार हे नारायणाला सर्वांत श्रेष्ठ देव मानतात, आणि रामानुजाच्या तत्वज्ञानाचे ते अनुयायी आहेत. यानंतर मध्वाचार्यांचे अनुयायी द्वैततत्वज्ञानी यांचाहि एक निराळा पोटविभाग झालेला दिसतो, आणि त्यांस आचार्य ह्मणतात. या सर्व पोटविभागांत विवाहसंबंध बंद झाले, पण कांहीं कांहींत अन्नव्यवहारहि बंद झाला." (पृष्ठें ५५३।५५४)

वरील पोटजातींपैकीं नंबर ५ " गौड " या शब्दापुढें (गुड) ह्मणजे बंगाल नव्हे तर ठाणेश्वराभोंवतालचा प्रदेश असें एक विधान रावब० वैद्य यांनीं केलें आहे व त्याचें जास्त स्पष्टीकरण पुढें पृष्ठ ५५५।५५६ यांवर त्यांनीं केलें आहे तें असें—" पंजाब आणि यू. पी. मधून कित्येक ब्राह्मण मुसलमानांच्या स्वाऱ्यांमुळें व त्यांच्या जुलुमामुळें दक्षिणेकडे निघून आले. गोंव्याकडील गौड-सारस्वत

ब्राह्मण याप्रमाणें सरस्वतीच्या प्रदेशांतून यावेळीं इकडे आले असावे. त्यांची अशी कल्पना आहे कीं, ते बंगाल्यांतून आले; पण ही कल्पना अनैतिहासिक वाटते. गुड हें नांव ठाणेश्वराभोंवतालच्या प्रदेशास वराहमिहिरानें दिलेलें आढळतें, आणि या ब्राह्मणांचा मुख्य ह्मणजे विशेष जो मत्स्याहार तो महाभारतांतही एका दीर्घ दुष्काळांत सरस्वतीच्या तीरावरील ब्राह्मणांनीं मत्स्याहार करून वेद रक्षण केले, या कथेंत वर्णिलेला आहे. बंगाली ब्राह्मणही याच मूळ सरस्वती देशांतून पूर्वेकडे गेले आणि ह्मणून त्यांच्या देशास गौड हें नांव पडलें." या त्यांच्या लेखांत ठाणेश्वराभोंवतालच्या प्रदेशास वराहमिहिरानें गुड हें नांव दिलें आहे त्यावरून "गौड" हें नांव पडलें असें जें विधान आहे तें चुकीचें दिसतें, कारण "गौड" हा स्वतंत्र देश आहे. श्रावस्ती शहराच्या आसपासच्या प्रदेशास "गौड देश" ह्मणत होते व गौडब्राह्मणांची तेथें वस्तीहि आहे, अशाबद्दल साधार माहिती या बुकांतील प्रकरण ३ रें यांत दिली आहे, ती वाचकांच्या ध्यानांत असेलच. बंगालदेशास वंगदेश असें प्राचीन ग्रंथांत ह्मटलें आहे व ठाणेश्वराभोंवतालच्या देशास "कुरुक्षेत्रा"चा भाग अगर 'ब्रह्मावर्त' ह्मटलें आहे, हें या बुकांत पूर्वीं लिहिलेंच आहे. तसेंच वराहमिहिर यानें सरस्वतीच्या प्रदेशास 'सारस्वत' ह्मटलें आहे. फक्त 'गुड' असा एक देश सांगितला नसून 'पांडुगुड' असा एक देश सांगितला आहे. तो श्लोक असा —

माथुरकोपज्योतिषधर्मारण्यानि शूरसेनाश्च ॥
गौरग्रीवोद्देहिक पांडुगुडाश्वत्थ पांचालाः ॥३॥
(बृहत्संहिता अ० १४ कूर्मविभागः ॥)

अर्थात त्यावरून ' गौड ' असा शब्दप्रयोग होण्याचा संभव नाहीं. महाभारतांत शल्यपर्वांत विनशनतीर्थापासून सरस्वती नदीच्या तीरावरील उगमापर्यंतच्या सर्व प्रदेशास ' सारस्वत ' व ' सप्तसारस्वत ' या नांवानें संबोधिलें आहे. (अध्याय ३७।३८।३९।४०।४२) त्यांतील पृथुदक, संनिहिती वगैरे तीर्थें ठाणेश्वराभोंवतालच्या प्रदेशांतील असल्याचें त्यांतील वर्णनावरून व वनपर्व अध्याय ८३ तील वर्णनावरून होतें. अर्थांत वरील श्री. वैद्य यांचें विधान साधार दिसत नाहीं. तसेंच मत्स्याहाराबद्दल जो उल्लेख त्यांनीं केला आहे त्याबद्दल उत्तर वर लिहिलेंच आहे. असो. दशविध ब्राह्मणांच्या मुख्य पोटजाति याप्रमाणें (२९) झाल्या. त्या देशपरत्वें झाल्या आहेत हें त्यांच्या नांवावरूनच दिसून येतें. तोच प्रकार दक्षिणेंतील सारस्वत-ब्राह्मणांतही झाला असून त्यामुळें त्यांच्यांत अनेक पोटजाती निर्माण झाल्या आहेत. गौडसारस्वत ब्राह्मणांची दक्षिणेंत वस्ति झाल्यानंतर अनेक कारणासंबंधानें दक्षिणेंतील निरनिराळ्या लहान लहान प्रदेशांत त्यांची वस्ति वाढत गेली व त्या त्या देशांचीं अगर गांवांचीं नांवें तेथील रहिवाशी गौडसारस्वत समाजास लावण्यांत आलीं. कोंकण, गोमांतक, कानडाजिल्हा, मलबारप्रांत, म्हैसूरसंस्थान, मद्रासइलाखा, महाराष्ट्रदेश वगैरे प्रांतांत गौडसारस्वत ब्राह्मणांची बरीच वस्ति झालेली आहे व याप्रमाणें कायम वस्ति होऊन अनेक शतकें झालीं असल्यामुळें त्यांच्यांत अनेक पोटजाती झाल्या आहेत. कोंकणांतील अगदीं लहान प्रदेशाचींसुद्धां नांवें त्या देशांतील गौडसारस्वतांना लावण्यांत आलेलीं दिसतात. पेडणेकर,

बारदेशकर, भालावलीकर, वालावलीकर, कुडाळदेशकर, लोटलीकर, साष्टीकर, नरवणें वगैरे समाजाच्या नांवावरून ही गोष्ट ध्यानांत येण्याजोगी आहे. कानडा जिल्हा, म्हैसूरप्रांत, मलबार, मद्रास-इलाखा या प्रांतांतील गौडसारस्वत ब्राह्मणसमाजास वेगवेगळीं नांवें लावण्याची प्रथा पडत चालली आहे. उदाहरणार्थ, कॅनरासारस्वत, मंगळूरसारस्वत वगैरे.


याप्रमाणें अनेक पोटभेद झाले असले तरी विचारांतीं वस्तुतः ते एकच आहेत असें दिसून येण्याजोगें आहे. वेगवेगळ्या प्रदेशांतील परिस्थितीस अनुसरून तेथील रहिवाशांचें आहारविहार, रीतिरिवाज, पेहराव वगैरे बदलत असतात. तसेंच वेगवेगळे पंथ स्वीकारले गेल्या-मुळेंहि त्या त्या पंथांतील नियम व रीतिरिवाज अंगीं खिळून जातात. यामुळें वेगवेगळ्या समाजाची मंडळी एकत्र जमली असतां त्यांच्या बाह्यस्वरूपांत भिन्नता दिसूं लागते. याप्रमाणें होत होत वरील (२९) पोटजातींचे पोटभेद हल्लीं असंख्य झालेले दिसून येतात. फक्त उत्तर-हिंदुस्थानांतील ब्राह्मणसमाजांत किती पोटभेद सन १९११ च्या सुमारास होते याबद्दल एका सुप्रसिद्ध विद्वान् गृहस्थांच्या भाषणांत आलेल्या उल्लेखाची याप्रसंगीं आठवण होते. सन १९११ इसवीतील दिजंबर महिन्यांत सावंतवाडी येथें भरलेल्या संयुक्त गौडसारस्वत ब्राह्मणपरिषदेचे अध्यक्ष दिवाणबहादूर के. नारायणराव बी. ए. बी. एल्. मद्रासहायकोर्टाचे वकील यांचें त्यावेळीं झालेलें भाषण हें होय. त्या भाषणांत ते ह्मणाले " उत्तरहिंदुस्थानांतील एक कोटी सहा लक्ष ब्राह्मणांची (१८८६) पोटभेदांनीं विभागणी झालेली असावी

त्याचप्रमाणें पंजाबांतील सारस्वतांत (४६९) भेद असावे, याहून महदाश्चर्य तें कोणतें ? " एकमेवाद्वितीयं ब्रह्म " हें ज्या राष्ट्राचें अध्यात्मिक ब्रीदवाक्य आहे. त्याच राष्ट्रांत हा पृथ्वीच्या पाठीवर कोठेंही न दिसणारा अद्भूत, अनुकंपनीय देखावा दृष्टीस पडावा हा कालाचा अतर्क्य महिमाच ह्मणावयाचा ! " या त्यांच्या भाषणांत उत्तरहिंदुस्थानांतील ब्राह्मणसमाज व त्यांतीलच एक सारस्वत समाज यांतील पोटभेदांची संख्या दर्शविली आहे. तीच परिस्थिति हिंदुस्थानांतील इतर भागांतहि आहे. याप्रमाणें सर्व हिंदुस्थानांत ब्राह्मणांच्या पोटजाति किती आहेत व त्या कोणकोणत्या ? या संबंधाची माहिती मिळवून ती एकत्र करणें झाल्यास बराच कालावधि लागूनहि स्वतंत्र ग्रंथ लिहिणें भाग पडेल. करितां या ठिकाणीं त्या मार्गाचा अवलंब न करितां प्रस्तुत विषयासंबंधानें चार शब्द लिहून हें प्रकरण पुरें करितों.

याप्रमाणें प्राचीनकालापासून ब्राह्मणजातींतील पोटभेद एकसारखे वाढत जाऊन सांप्रत असंख्य पोटभेद अस्तित्वांत आले आहेत. कूप-मंडूकवृत्ति परस्परांविषयीं अनुदार भावना, व स्वतःच्या वर्गाविषयीं उच्चतेच्या वेडगळ कल्पना इत्यादि मनोविकारांचें प्राबल्य होत गेल्यामुळें एका पोटभेदाचा दुसऱ्या पोटभेदाशीं अन्नव्यवहार व विवाहसंबंध एकदां जो बंद झाला तो कायमचा बंद झाला. असंख्य पोटजातीमुळें समाजाचे लहानलहान असे अनेक तुकडे पडले असून त्यांतहि परस्परांविषयीं सहानुभूति व संघटितपणा नाहीं यामुळें सर्व समाजाची व पर्यायानें देशाची अधोगती झाली आहे.

गेल्या ४०।५० वर्षांच्या अवधींत मात्र कित्येक सद्गृहस्थांच्या अंतःकरणांत या अनिष्ट प्रकाराच्या प्रतिकाराची कल्पना उत्पन्न होऊन त्यांनीं व्यक्तिशः व कित्येक संस्थांच्या द्वारें तसे प्रयत्न चालविले आहेत. परंतु त्या प्रयत्नांस यावें तसें यश आलेलें दिसत नाहीं. दक्षिणेंतील गौडसारस्वत ब्राह्मणांच्या पोटभेदांचें एकीकरण करण्याच्या उद्देशानें सन १९०९।१०।११ सालीं संयुक्त गौडपरिषदेचीं अधिवेशनें बेळगांव, ह्मापसें, सावंतवाडी या ठिकाणीं भरलीं व तसें एकीकरण करण्याचे ठराव पास झाले. पुढें त्या दिशेनें प्रयत्नहि करण्यांत आले; परंतु कालगतीच्या प्रबळ ओघापुढें ते प्रयत्न सिद्धीस गेले नाहींत. तथापि त्या प्रयत्नांमुळें अन्नव्यवहार मात्र बऱ्याच प्रमाणांत एकत्र चालू झाला आहे ही त्यांतल्यात्यांत कांहीं समाधानाची गोष्ट होय.

एकंदरींत विचार करितां नवव्या शतकाच्या सुमारास सर्व ब्राह्मणसमाजांत जो समतोलपणा व परस्परांविषयीं जी सहानुभूती वसत होती ती उत्तरोत्तर कमी कमी होत जाऊन सांप्रतची निकृष्ठावस्था प्राप्त झाली आहे. हा कालमहिमाच आहे. ही कालगती बदलून पूर्वस्थिति प्राप्त करून देण्याविषयीं परमेश्वरचरणीं प्रार्थना करून हें प्रकरण पुरें करितों.



प्रकरण सातवें.

गौडसारस्वत समाजांतील प्रख्यात् पुरुष.

गौडसारस्वत समाजांत प्राचीनकालापासून पुष्कळ प्रख्यात् पुरुष होऊन गेले आहेत. त्या सर्वांची माहिती उपलब्ध नाहीं. ज्या पुरुषांची माहिती देण्याजोगी आहे, त्यांची त्रोटक माहिती याखालीं देण्याचें योजिलें आहे.

१ **महर्षि सारस्वत**—सारस्वत जातींतील प्रसिद्ध पुरुषांची माहिती देतांना या ऋषीपासून परंपरा दाखविण्यांत येते. याच्या चरित्राचा थोडक्यांत इतिहास या पुस्तकांतील प्रकरण ४ यांत दिला आहे; परंतु यानें वेदाचार्यत्व केलें तो काल चालू मन्वंतरांतील नवव्या पर्ययांपैकीं होता. (पर्यय ह्मणजे कृत, त्रेता, द्वापार व कलि या चार युगांची जी चौकडी होते ती होय. प्रत्येक मन्वंतरांत एकाहत्तर चौकड्या व वर कांहीं काल असतो. भा. प्रा. ऐ. कोश पृ. ४२२) याचें रक्षण ऋष्यशृंगनें सरस्वती नदीच्या मूर्तिमान देवतेनें केलें ह्मणून यास असें नांव पडलें होतें. चालू मन्वंतरांतील नवव्या पर्ययांतील हाच व्यास असावा (सदर कोश पृष्ठ ६३२) या कालावरून पाहतां याच्या आचार्यत्वाच्या वेळीं गौड व द्राविड असा भेद उत्पन्न झाला होता असें दिसत नाहीं. फक्त तो सारस्वत देशांतील असून दधीच ऋषीचा पुत्र होता यावरून त्यास सारस्वत ह्मणतां येईल.

२ **श्रीपरशुराम**— श्रीविष्णूच्या दश अवतारांपैकीं हा ६ वा अवतार होऊन गेला. याचा इतिहास या बुकांतील प्रकरण ५ वें यांत थोडक्यांत दिला आहे. याचा जन्म चालू मन्वंतरांतील एकोणिसाव्या पर्ययांतील त्रेतायुगांत झाला होता. (देवी भागवत० ४ स्कं० अ० १६) (मत्स्य० अ० ४७) महर्षिभृगू याच्या वंशांतील प्रख्यात ऋचीक ऋषीचा पुत्र जमदग्नि याचा हा पुत्र होय. यानें क्षत्रियांचा संहार करून त्यांच्या रक्ताचे डोह भरले ते त्याच्या पूर्वजांच्या आशिर्वादानें तीर्थरूप झाले. ते रामऱ्हद नांवानें कुरुक्षेत्रदेशांत प्रसिद्ध आहेत. इत्यादि वर्णनावरून याचा मूलप्रदेश सारस्वत आहे. कश्यप-ऋषीच्या सूचनेवरून हा दक्षिणेंत आला व शूर्पारक प्रांतांत यानें कायमची वस्ति केली. याच्यावेळीं गौड व द्राविड हा भेद अस्तित्वांत आला होता. यज्ञाकरितां गौडब्राह्मण पाहिजेत ह्मणून यानें सारस्वतब्राह्मण उत्तरदेशांतून आणविले वगैरे इतिहास सह्याद्रिखंडांत आहे. त्यावरून हा अवतार सारस्वत ब्राह्मणांत झाला होता असें दिसून येतें. दक्षिणेंत प्रथम आलेला सारस्वतब्राह्मण परशुराम हाच होय असें कै. गुंजीकर यांचेंहि मत आहे. (सरस्वती मंडल पृ. ९) परशुराम याचें चरित्र प्रसिद्ध आहे करितां त्यासंबंधानें जास्त लिहिण्याचें कारण नाहीं. उत्तरहिंदुस्थानांत हरद्वारच्या सारस्वत-ब्राह्मणसभेमध्यें भगवदवतार श्रीपरशुरामजी यांचा जयंत्युत्सव साजरा होत असतो. (ऑल इंडिया सारस्वत जुलै १९३२ चा अंक पृष्ठ ८ व्हा १४ अंक २.)

३ **कालिदास**—हा जगद्विख्यात कवि उत्तरहिंदुस्थानांत होऊन

गेला. याचा जन्मकाल अगर मरणकाल कोणता याबद्दल निश्चित प्रमाण अद्याप मिळालेलें नाहीं. संस्कृत भाषेवरील याचें प्रभुत्व व प्रतिभासंपन्न कवित्व यासंबंधानें याची कीर्ति सर्वत्र पसरलेली आहे. हा उत्तरहिंदुस्थानांतील सारस्वत होता, असें त्याच्या रहाण्याच्या देशावरून दिसतें. कै० गुंजीकर यांचेंहि मत असेंच आहे. (सरस्वतीमंडल परिशिष्ठ ४ पृष्ठ ४७)

काबूलचा राजा जयपाल इ० स० ९६० ते १००१ या अवधींत काबूल येथील ब्राह्मणीराजा जयपाल यानें काबूल व पंजाबप्रांत यावर राज्य केलें व त्याच्या मागून त्याचा पुत्र आनंदपाल यानें इ० स० १००१ ते १८०९ पर्यंत राज्य केलें. तें ब्राह्मणीराज्य जयपाल यांच्या घराण्यांत इ० स० १०२६ पर्यंत होतें. सबुक्तगीन व महमुद गजनी यांनीं जयपाल व आनंदपाल वगैरे या राजघराण्यावर स्वाऱ्या करून शेवटीं हें राज्य नाहींसें केलें. जयपाल व आनंदपाल हे पंजाबांतील सारस्वत ब्राह्मणांची ' मोह्याल ' ह्मणून जी पोटशाखा आहे त्या शाखेचे होते. (मध्ययुगीन भारत भाग ३ पृष्ठ ३३) जयपाल व आनंदपाल यांच्याशीं सबुक्तगीन व महमुद गजनी यांच्या लढाया झाल्यासंबंधाची हकीकत सदरच्या बुकांत प्रसिद्ध झाली आहे, जिज्ञासूंनी तेथें पहावी. मागील प्रकरणांत ब्राह्मणांच्या मुख्य पोटजाति २९ सांगितल्या आहेत. त्यांतील अनुक्रम नंबर ३ यांत सांगितलेली ' मुहियाळ ' ही पोटशाखा तीच होय.

४ अनंत पै प्रभू—शालि० शके ११०९ या वर्षींच्या एका ताम्रपट लेखांत सर्व कोंकणदेशचा चक्रवर्ती राजा अपरादित्यदेव

याचा मुख्य प्रधान हा होता.[1] हा शिवभक्त व राजकारणांत निष्णात होता, असें याचें वर्णन आहे. (बाँबे रायल एशियाटिक सोसाइटिचें वृत्त, पुस्तक १२, अंक ३४, पृष्ठ ३३४)

५ **भट्टोजी दीक्षित**—हा प्रख्यात् संस्कृत व्याकरणाचा पुरस्कर्ता सुमारें ३५० वर्षांपूर्वी होऊन गेला. हा महाराष्ट्रांतील रहिवासी असून नंतर काशीक्षेत्रीं जाऊन राहिला होता. यानें 'सिद्धांत कौमुदी' हा संस्कृत व्याकरणशास्त्रावरील ग्रंथ लिहिला आहे; तो सर्वमान्य झाला आहे. संस्कृत भाषेचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांस हा ग्रंथ फार उपयोगी झाला आहे. शिवाय 'व्याकरणभूषण' 'शब्दकौस्तुभ' इत्यादि सर्वमान्य ग्रंथ यानें लिहिले आहेत. याचें चरित्र 'सारस्वतरत्नमाला भाग १'ला या बुकांत मनोरंजक रीतीनें लिहिलें आहे. 'अर्वाचीन ऐतिहासिक कोश' व 'सरस्वतीमंडल' या बुकांमध्येंहि याची त्रोटक माहिती दिलेली आहे.

६ **साबाजी अनंत चतुर ऊर्फ चतुर साबाजी**—हा निजामशाहीमध्यें दौलताबादेस आणि अहमदनगरास मोठा कीर्तिमान् चतुर पुरुष होऊन गेला. बादशहा अल्पवयस्क, सर्वत्र अंदाधुंदी आणि तें राज्य मोडण्याविषयीं दिल्लीपतीचा महान् प्रयत्न अशा वेळेस यानें व्यवस्था उत्तम ठेऊन मोंगलांचें कांहीं चालूं दिलें नाहीं. यानेंच शिवाजीमहाराजांचे वडील शहाजीराजे यांस मुद्दाम तिकडे नेऊन बादशहाची वजीरी देवविली.[2] याच्या बुद्धिमत्तेबद्दल हिंदुस्थानांत

१ मल्हाररावकृत शिवाजीराजाची बखर.

२ सरस्वतीमंडल पृष्ठ ३६

सर्वत्र ठिकाणीं चांगली प्रसिद्धी होती. भारत इतिहाससंशोधक मंडळ (पुणें) या बुकांत या प्रख्यात् पुरुषासंबंधाची माहिती व त्याच्या चतुरपणासंबंधानें कांहीं गोष्टी लिहिलेली एक बखर प्रसिद्ध झाली आहे, ती मनोरंजक आहे. याचा जन्मकाल कोणता अगर मृत्युकाळ कोणता यासंबंधाची माहिती सांपडत नाहीं. तथापि इ० स० १५०० च्या शेवटीं व १६०० च्या आरंभीं हा कारभार पहात होता. असें इतिहासावरून दिसतें.

७ **रामचंद्र मल्हार सुखठणकर ऊर्फ रामचंद्रबाबा**—हे बाजीराव बल्लाळ पेशवे आणि नानासाहेब पेशवे यांच्या कारकीर्दींत मोठे राजकार्यधुरंधर व प्रमुख मुत्सद्दी होते. यांस नानासाहेब हे 'बाबा' ह्मणत; आणि सर्वप्रकारें पित्याप्रमाणें त्यांची मान्यता ठेवीत. सर्व राज्याची मांडणी आणि व्यवस्था, जमाबंदीकडील धारे वगैरेचा उत्तम बंदोबस्त हें सर्व रामचन्द्रबाबांनी करून पुढील कारभाऱ्यांना उत्तम पाया घालून दिला. नानासाहेब आणि त्यांचे चुलत बंधु सदाशिवराव भाऊसाहेब यांना राजनीतीमध्यें रामचंद्रबाबानींच उत्तम शिक्षण दिलें होतें. शिंदेशाही उभी करण्यास मूळ कारण रामचंद्रबाबा. त्यांनीं पुष्कळ संपत्ति मिळविली होती; पण आपल्या अंतकाळीं आपला पुत्र आणि पेशवे यांस सारखी वांटून दिली. रामचंद्रबाबांच्या मरणानंतर नानासाहेबांनीं दहा दिवस सुतक धरिलें होतें, अशी गोष्ट जुने लोक सांगतात[२].

१ मराठ्यांचा इतिहास. सरस्वतीमंडल पृष्ठ ३६

२ सरस्वतीमंडल पृष्ठ ३७

रामचंद्रबाबा मोठे दानशूर होते. त्यांनीं आपल्या संपत्तीचा सत्कार्यीं विनियोग करून दानशूरांच्या कोटींत आपलें नांव चिर-स्थायी करून ठेविलें. काशी, गया, प्रयाग, पुष्कर इत्यादि क्षेत्रीं त्यांनीं मोठमोठ्या धर्मशाळा बांधिल्या आहेत. उज्जयनी येथील महांकाळेश्वराचें देवालय, तेथील क्षिप्रानदीवरील मोठा घाट व त्यावरील देवालयें, तसेंच त्या पंचक्रोशींतील ११० देवालयें त्यांनीं बांधाविलीं आहेत. गोकर्णमहाबळेश्वरास प्रति महाशिवरात्रीच्या पूजेस बाबांची गंगोत्री कावड येत असते व प्रत्यहीं रामेश्वरास गंगोत्रीची कावड व रामेश्वरची काशीम, अशी त्यांनीं व्यवस्था करून ठेविली असून तीं अद्याप चालत आहे.[1]

रामचंद्रबाबा यांचें कुलदैवत श्रीशांतादुर्गादेवी श्रीक्षेत्र कवळें प्रांत गोवें हें आहे. त्या देवतेच्या व्यवस्थेकरितां त्यांनीं फिरंगी सरकारामध्यें मोठी रक्कम भरून तें सर्व क्षेत्र सोडवून घेतलें आणि देवीस बारारों रुपयांचें उत्पन्न करून दिलें तें अद्याप चालू आहे.[2]

मौजे कवळें हा गांव श्रीमंत बाजीराव पेशवे यांनीं देवीस दिलेला सौंदेकरांच्या अमलांत अमानत झाला होता, तो यांनीं सोडवून दिला. व त्याबद्दल श्रीशाहुछत्रपतींची व पेशव्यांची सनद पुनः संपादन करून दिली आहे. श्रीमंगेश देवास एक वाडा व दरसाल नक्त रक्कम अडीचशें रुपये मिळत जाण्याची सनद देवाविली आहे; व मौजे प्रियोळ येथील श्रीम्हाळसादेवीस एक वाडा देवविला आहे.

१ विविधज्ञानविस्तार मा० पु० ११ पृ० ७१; सारस्वतरत्नमाला पृष्ठ १९५.

२ सारस्वतरत्नमाला पृष्ठ १९५.

त्या त्या देणगीच्या सनदा ज्या त्या देवस्थानच्या रिकार्डांत आहेत. रामचंद्रबाबांचा निधनकाल कोणता याबद्दल साधार माहिती कोठें आढळत नाहीं. तथापि इ. स. १७६७ नंतर कांहीं दिवसांनीं हे थोर पुरुष दिवंगत झाले आहेत असें दिसतें. कोंकणांत आरवली ह्मणून जो गांव आहे त्या गांवीं यांचें जनन झालें होतें. इ. स. १६९२ अगर त्या सुमारास यांचा जन्म झाला होता.[1]

उज्जनी येथील महांकाळेश्वराचें देवालय रामचंद्रबाबांनीं बांधिलें असल्याचा राव ब० चिंतामणराव वैद्य यांनीं म. भा. भाग ३ यांत उल्लेख केला आहे परंतु तो लेख वाचतेवेळीं त्यांच्या संबंधानें लिहि-लेलें दुसरें एक विधान तेथें आढळलें त्याचा येथें उल्लेख केल्यास अप्रासंगिक होणार नाहीं असें वाटल्यावरून तें येथें देतों:—म. भा. भाग ३ पृष्ठ ५२६ वर " महांकाळाचें हल्लींचें उंच शिखराचें देऊळ राणोजी शिंद्याचे शेणवी दिवाण रामचंद्रबाबा यांनीं बांधलें असून हा निपुत्रिक असल्यानें त्यानें आपली सर्व संपत्ति हें देऊळ बांधण्याकडे लाविली (१७४५ इसवी) "

या लेखांत ते निपुत्रिक होते ह्मटलें आहे. परंतु वर कै० गुंजी-करांचा सरस्वतीमंडळांतील लेख दिला आहे त्यांत त्यांच्या पुत्राचा उल्लेख आहे तसेंच सारस्वतरत्नमाला बुकाचें पृष्ठ १९७ वर "त्यांचा पुत्र सदाशिवरामचंद्र, तोहि पेशव्यांकडे महत्वाच्या कामगिरीवर होता. त्यासंबंधाच्या गोष्टी इतिहासांत प्रसिद्ध आहेत." असें लिहिलें आहे. श्रीशांतादुर्गा देवस्थानच्या दप्तरांतील एका जुन्या लेखांत मौजे

---

१ सा. र. पृष्ठ १८९.

कवळें हा गांव छत्रपति शाहुराजे यांनीं श्रीदेवीस दिला, पुढें सोंधेकर यांनीं प्रांत घेतला तेव्हां कांहीं दिवस गांव अमानत राहिला तो रामचंद्रबाबा यांनीं सोडविला. पुनः प्रांत मराठे यांच्याकडे आला. त्या मुदतींत रामचंद्रबाबा यांचे पुत्र सदाशिव रामचंद्र श्रीचे दर्शनास आले इत्यादि मजकूर आहे.[१] यावरून रामचंद्रबाबा यांना पुत्र होता असें दिसून येतें. रा० ब० वैद्य यांच्या सदरील लेखांतील दोनीहि विधानें पूर्ण माहिती न मिळाल्यामुळें लिहिलीं गेलीं असावीं.

८ **नारोराम मंत्री**—हे प्रख्यात राजकार्यधुरंधर मुत्सद्दी श्रीशाहुमहाराजांचे मंत्री होते. यांनी मौजे कवळें हा गांव श्री.बाजी-राव पेशवे यांजकडून श्रीशांतादुर्गादेवीस इनाम मिळवून दिला. व त्या देवीचें सांप्रतचें भव्य देवालय बांधून दिलें. हे त्या देवीचे महा-जन होत. इ० स० १७३९ सालीं तो गांव देवीस मिळाला आहे. यांसही चिमणाजीआपा वगैरे पेशवे मंडळी वडिलांप्रमाणें मान देऊन त्यांना 'नारोबाबा' असें ह्मणत असत.

९ **जिवाजी बल्लाळ—ऊर्फ जिवबादादा केरकर**—(बक्षी-बहाद्दर मुजाफरद्दौल—जन्म इ० स० १७४०, अंतकाल इ० स० १७९६) हे शिंदे सरकारचे मुख्यसेनापति होते. गोंवें इलाख्यांत पेडणें महालांतील मोरजगांवीं याचे पूर्वज होते. त्या घराण्यांतील एक पुरुष हरमल गांवाजवळ केरी ह्मणून गांव आहे तेथें येऊन राहिला. पुढें त्या घराण्यांत यांचा जन्म झाला. हे वयांत आल्यावर त्यांनीं पुण्यास येऊन श्रीमंत पेशवे यांच्या लष्करीखात्यांत बर्वे यांच्या पथकांत नोकरी पत्करून आपल्या धन्याची मर्जी संपादन

१ श्रीशांतादुर्गा संस्थानचा इतिहास पा२० नंबर १ पत्र नंबर १८.

केली. व स्वपराक्रमानें वाढत वाढत त्या खात्यांत मोठ्या योग्यतेस चढले. पुढें नानासाहेबांनीं महादाजी शिंदे यांस गादीवर बसवून त्यांच्या मदतीस जिवबादादा यांस दिलें. त्यानंतर शिंदे यांच्या लष्कराचें आधिपत्य यांच्याकडे आलें. हे मोठे शूर असून मुत्सद्दीही होते. सन १७६१ पासून १७९६ पर्यंत यांनीं उत्तरहिंदुस्थानांत व दक्षिणहिंदुस्थानांत दोनतीनशें लढाया मारिल्या व सर्वांत जय मिळवून मराठ्यांचें राज्य राखिलें. त्यांच्या हाताखालीं फार मोठें लष्कर व तोफखाना होता. हिंदुस्थानभर त्यांचा मोठा दरारा असे. त्यांनीं मोठी जहागिरी मिळविली व कनेक धर्मकृत्यें केलीं.[1] त्यांचें साद्यंत मोठें चरित्र प्रसिद्ध झालें आहे व इतर लहानलहान चरित्रेंही प्रसिद्ध झालीं आहेत. त्यांचें चरित्र समजून घेणें झाल्यास मोठें चरित्र वाचणें अवश्य आहे. त्रोटक चरित्रांत साग्र माहिती देणें अशक्य आहे. जिज्ञासूंनीं त्यांचें विस्तृत चरित्र वाचावें. **जिवबादादा, लखबादादा, बाळोबातात्या, सदाशिवमल्हार** हे चार पुरुष महादजी शिंदे यांच्या पदरीं होते. महादजी शिंदे (पाटीलबाबा) हे त्यांना चार रत्नें ह्मणत असत. दादांच्या मुत्सद्देगिरीचीं बरींच उदाहरणें त्यांच्या चरित्रग्रंथांत प्रसिद्ध झालीं आहेत.

१० **आपाजी राम**—हा कर्नाटकांत हैदरअल्लीचा कारभारी होता. तो असेपर्यंत हैदराचें राज्य उत्कर्ष पावलें; परंतु हैदरचा मुलगा टिपुसुलतान यानें त्याला दूर करून आपला मामा कारभारी केला. त्या नव्या कारभाऱ्यानें फितूर करून लौकरच राज्य घालविलें.[2]

---

१ सारस्वतरत्नमाला पृष्ठ १९७ ते २२१,

२ स॰ द तीसंडल पृष्ठ ३८.

यांचा जन्मकाल, निधनकाल, रहाण्याचें मूलस्थान, आडनांव इत्यादि जास्त माहिती सांपडत नाहीं. तथापि हैदरअल्लीच्या कारकीर्दींत हा कारभारी होता, असा त्रोटक इतिहास सांपडतो.

११ विनायकराव ह्माले ऊर्फ गणेश ह्माले प्रधान व त्यांचे नातू रामचन्द्र ह्माले दिवाण—ह्मैसूरजवळ शिमोग्यापासून ५० मैल अंतरावर ' नगर ' ह्मणून गांव आहे. तेथें एक संस्थान पूर्वीं होतें. विजयनगरच्या राज्यापैकीं ' बिदरूर ' नांवानें प्रसिद्ध असलेलें संस्थान तें हेंच होय. विनायकराव ह्माले अगदीं गरीब स्थितींतील गृहस्थ होते. त्यांनीं नगर या गांवीं जाऊन कायमची वस्ति करून आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर तेथील दिवाणगिरी मिळविली. पुढें त्यांचे नातू रामचन्द्र ह्माले यांनींहि स्वतःच्या हुशारीनें ती जागा मिळविली. उभयतांनीं उत्तमप्रकारें कारभार केला व अनेक धार्मिक कृत्यें केलीं. कर्नाटक प्रांतांत अनेक ठिकाणीं यांनीं देवालयें बांधलेलीं असून नेमणूक ही करून दिल्या आहेत. विनायकराव ह्माले यांचें मूळ गांव कारवार जिल्ह्यांपैकीं कुमठा हें आहे. त्यांच्या जन्माचें वर्ष अगर निधन वर्ष कोणतें हें समजत नाहीं. रामचंद्र ह्माले यांचा जन्म मात्र शालिवाहन शके १५४५ अगर त्या सुमारास असावा. त्यांच्या निधनाची तारीखही समजत नाहीं. ह्या दोघांच्या चरित्रांची माहिती सारस्वतरत्नमाला भाग १ यांत प्रसिद्ध झाली आहे[1].

१२ रामाजी कामत—हा सुमारें पावणेदोनशें वर्षांमागें मुंबईंत इंग्रजसरकारच्या लष्करीखात्यांत मोठा अधिकारी होता[2]. याचें

१ सारस्वतरत्नमाला पृष्ठ १७६ ते १८३.

२ मुंबईचें वर्णन पृष्ठ ४८. सरस्वतीमंडल ३८.

त्रोटक चरित्र हल्लीं 'महाराष्ट्रसारस्वत' द्वैमासिकांत[१] तसेंच 'आल-इंडियासारस्वत' द्वैमासिकांत[२] प्रसिद्ध झालें आहे. त्यावरून १७व्या शतकाच्या शेवटीं व अठराव्या शतकाच्या आरंभीं सुमारें अर्धशतक पर्यंत हे गृहस्थ मुंबई शहरांत प्रख्यात होते. त्या अवधींत त्यांनीं ईस्टइंडिया कंपनीचा सराफ, दलाल, मक्तेदार, रेव्हिन्यु ओव्हरसियर, मस्टरमास्टर, जनरल, टंकसाळी, न्यायाधीश, राजकारणी मुत्सद्दी, लष्करीअंमलदार वगैरे बरींच हुद्यांचीं कामें करून नांवलौकिक मिळविला व बरीच संपत्तीहि मिळविली. मुंबईतील श्रीवाळुकेश्वराचें देवालय त्यांनीं बांधिलें. (इ० स० १७१५) व दुसरींहि कित्येक देवालयें बांधिलीं. (इ० स० १७१८।१९) इ० स० १७२५।२६ च्या सुमारास त्यांचा अंत झाला.

१३ **सखारामबापू दाटेकर**—हा श्रीमंत गणपतरावसाहेब गायकवाड यांच्या कारकीर्दींत मोठा शूर पुरुष होता. द्वारकेमध्यें भिल्लांचें मोठें बंड झालें असतां, सखारामबापूंनीं मोठ्या शूरपणानें तें सहज मोडून टाकिलें.[३] यांचें मूळ गांव बेळगाव जिल्ह्यापैकीं चंदगड महालांतील 'दाटें' या नांवाचें खेडें आहे तें होय. त्यांचा वाडा त्यागांवीं आहे. त्यांचे वंशज त्यागांवीं व सातारा जिल्ह्यांतील इसलामपूर गांवीं राहतात.

१४ **गोविंद नारायण माडगांवकर**—जन्म इ. स. १८१५, मृत्यु इ. स. १८६५, गोवें इलाख्यापैकीं मडगांव या गांवीं यांचा

१ मे. जून १९३४ चा अंक (वर्ष १३ अंक ३)
२ आक्टोबर १९३४ चा अंक (वर्ष १६ अंक ३)
३ सरस्वतीमंडल पृष्ठ ३८

जन्म झाला. यांचे वडील नाराणराव यांची घरची स्थिति फार गरीबीची होती. ते इ. स. १८२४ सालीं कुटुंब घेऊन मुंबईस आले. गोविंदरावजींच्या अभ्यासाच्या कालांत त्यांच्या वडिलांचा अंत झाला त्यामुळें व त्यांच्या प्रकृतीच्या अशक्ततेमुळें त्यांचा विद्याभ्यास पुरा झाला नाहीं. तथापि झालेल्या तेवढ्याच विद्येवर त्यांनीं ख्रिस्ती-धर्मोपदेशक डॉ. विलसन यांच्या शाळेंत शिक्षकाचें काम पत्करिलें, व बरेचदिवस ती नोकरी केली. ते कांहीं विद्यार्थ्यांस घरींहि शिक-वीत. प्रसिद्ध विद्वान डॉ० भाऊदाजी व डॉ. नारायण वासुदेव दाभोलकर हे त्यांचे शिष्य होते. गोविंद नारायण हे फार सात्विक व सज्जन पुरुष होते[1]. ख्रिस्तिधर्मोपदेशकाच्या शाळेंत जरी त्यांनी शिक्षकाचें काम केलें तरी ते हिंदुधर्मानें वागणारे होते. व त्यांनीं परोपकाराचीं अनेक कृत्यें केलीं. परोपकारार्थ अविश्रांत श्रम ते घेत असत त्यामुळें मुंबई शहरांत ते लोकप्रिय झाले होते. त्यांचा लेखन-व्यवसायहि मोठा होता. त्यांनी मराठी भाषेंत लहानमोठीं पंधरा पुस्तकें लिहिलीं आहेत. त्यांपैकीं चार वर्णनात्मक असून मोठीं आहेत व अकरा नैतिक विषयांचीं व औद्योगिक दिशा दर्शविणारीं आहेत[2] 'साधी राहणी व उच्च विचारसरणी' या तत्वाचें व्यवहारांत महत्व किती आहे हें त्यांच्या कृतीवरून व चारित्रावरून चांगलें मनांत बिंबण्याजोगें आहे.

---

१ सरस्वतीमंडल पृष्ठ ३९.

२ सारस्वतमाला पृष्ठ ११३ ते ११०.

१५ डॉक्टर रामकृष्ण विठ्ठल ऊर्फ भाऊदाजी लाड–जी. जी. एम्. सी. एम्. आर. ए. एस्—जन्म इ. स. १८२२, मृत्यु इ. स. १८७४ हे मोठे विद्वान् डॉक्टर म्हणजे वैद्यराज, चतुर, परोपकारी वजनदार गृहस्थ होते अशी यांची कीर्ति आहे. ह्यांचा जन्म गोमांतकप्रांताच्या हद्दीवर मांजरें गांवीं झाला. पुढें त्यांचे वडील मंडळीसह मुंबईस येऊन राहिले. तेथें त्यांनीं अभ्यासक्रम पुरा करून जी. जी. एम्. सी. ची परिक्षा उत्तीर्ण होऊन प्रथम एका इस्पितळांत सर्जनची नोकरी स्विकारिली. परन्तु त्यांची बुद्धिमत्ता विशेष प्रकारची असल्यानें नोकरींत त्यांना समाधान वाटलें नाहीं ह्मणून त्यांनी नोकरीस राजिनामा देऊन स्वतंत्र दवाखाना ठेवून धंदा सुरू केला. औषधयोजना व शस्त्रक्रिया या दोनीहि शाखांत त्यांनीं आपल्या बुद्धीचा प्रभाव दाखवून ते नामांकित डॉक्टर झाले. त्यांनीं लोकहितार्थ धर्मार्थ दवाखानाहि उघडला होता. त्यामुळें लाखों लोकांनी त्यांच्या वैद्यकीयज्ञानाचा फायदा करून घेतला. त्यांनीं महारोगावर एक दिव्य औषध शोधून काढिलें होतें व त्या औषधापासून बऱ्याच लोकांस गूण आला. एका महारोग्यास त्यांनीं आपल्या येथें सतत तीन वर्षे ठेऊन घेऊन स्वतःच्या खर्चानें त्याचा रोग बरा केला. त्यांची कीर्ति ऐकून अमेरिका, आस्ट्रिया, फ्रान्स वगैरे देशांतून अनेक रोगी औषधोपचाराकरितां त्यांजकडे येत असत. महारोग हा सांसर्गिक रोग असतां त्या रोगाचें निर्मूलन करण्याच्या उद्देशानें त्यांनीं अनेक महारोग्यांस स्वतः औषधोपचार करून व वारंवार त्यांच्या प्रकृतींतील फेरफारांचें सूक्ष्म अवलोकन करून

त्यांच्या तसबिरीही काढिल्या. असें करतांना त्यांनीं स्वतःच्या जिवाचीहि काळजी बाळगिली नाहीं व शेवटीं त्या रोगावरील औषध शोधून काढिलें. तसेंच अनेक सार्वजनिक संस्थांना द्रव्यद्वारां व शारिरिकश्रमद्वारां मदत केली. गोरगरीब लोकांविषयीं त्यांची कळकळ अवर्णनीय होती. त्यांनीं संस्कृत भाषेचाहि चांगला अभ्यास केला होता. हिंदुस्थानांतील जुने ताम्रपट व शिलालेख शोधून ते प्रसिद्ध करण्याचें कार्यहि त्यांनीं मोठ्या प्रमाणावर केलें आहे. ते ताम्रपट व शिलालेख त्यांनीं 'रॉयलएशियाटिक सोसायटी' मासिकपुस्तकांतून प्रसिद्ध केले आहेत. त्यांनीं बरीच संपत्ति मिळविली व तिचा विनियोग गोरगरीबांच्या हिताकडे व अनेक संस्थांना देणग्या देण्यांत केला. असा हा थोर महात्मा आपल्या वयाच्या केवळ ५२ व्या वर्षी आपला नश्वर देह या भूतलावर ठेऊन स्वर्गवासी झाला. मुंबई इलाख्याचे त्यावेळचे गव्हर्नर व इतर मोठमोठे युरोपियन अंमलदार व इतर थोर थोर गृहस्थ यांनीं मुक्तकंठानें त्यांची प्रशंसा केली आहे. यांचें लहानसें चरित्र 'सारस्वत रत्नमाला' या ग्रंथांत प्रसिद्ध झालें आहे. शिवाय हल्लीं त्यांचें मोठें चरित्र विद्वद्वर्य श्री. श्री. ना. कर्नाटकी यांनीं प्रसिद्ध केलें आहे. तीं चरित्रें वाचलीं असतां यांच्या थोरवीचें यथार्थ ज्ञान प्राप्त होईल. डॉक्टरसाहेबांचा जडदेह जरी आमच्या समाजांतून नाहींसा झाला असला तरी ते आपल्या उज्ज्वल कीर्तिरूपानें सर्वत्र भरून राहिले आहेत त्यामुळें त्यांची स्मृति आमच्या अंतःकरणांतून कधीं होणें शक्य नाहीं.

१ पृष्ठ १३१ ते १४५.

१६ ऑनरेबल नारायण वासुदेव दाभोलकर जे. पी.— जन्म इ० स० १८३३, मृत्यु इ० स० १८७४. यांचें मूळ घर वेंगुर्ल्याजवळ उभादांडा ह्मणून वाडी आहे तेथें होतें. यांचे वडील वासुदेवराव हे इ० स० १८३६ सालीं मुंबईस आले. त्यांची मूळची स्थिति गरीबीची होती. नारायणराव यांचा विद्याभ्यास मुंबईंत झाला. परंतु मराठी व कांहीं इंग्रजी अभ्यास होतांच प्रापंचिक अडचणीमुळें त्यांना अभ्यासक्रम सोडून एक १५ रुपयांची नोकरी धरावी लागली. तथापि त्यांनीं इंग्रजी वाचनाचा क्रम चालूं ठेविला होता. त्यामुळें इंग्रजी भाषेचें ज्ञान त्यांना उत्तम झालें होतें. इंग्रजी भाषेंतील त्यांच्या वक्तृत्वाबद्दल युरोपियन विद्वान् गृहस्थ त्यांची तारीफ करीत. त्यांनीं नोकरी सोडून व्यापारांत प्रवेश केला व आपल्या असामान्य बुद्धिमत्तेनें त्या धंद्यांत फार मोठी संपत्ति व नांवलौकिक मिळविला. पी. अँड ओ. कंपनीचे ते वाकनीस (दुभाषी) झाले. पुढें म्युनिसिपालिटी व टाऊन कौन्सिलचे सभासद व लेजिस्लेटिव्ह कौन्सिलचे सभासद होऊन यांनीं सरकाराकडूनहि चांगला मान मिळविला. सरकारांतून यांस जस्टिस ऑफ धि पीस ही पदवी मिळाली होती. मुंबईंतील वाळुकेश्वरी त्यांनीं एक मोठा बंगला घेऊन त्यांत ते रहात असत; परंतु शेवटीं तोच बंगला त्यांच्या अंगावर पडून त्यांचा अंत झाला. सरकारांत त्यांची मोठी मान्यता होती. ना. गव्हरनरसाहेब व इतर मोठमोठे अंमलदार त्यांची फार प्रशंसा करीत असत. त्यांनीं सार्वजनिक कामें उत्साहपूर्वक कळकळीनें केलीं आहेत. त्यांचें चरित्र " सारस्वतरत्नमाला " या ग्रंथांत

प्रसिद्ध झालें आहे[१]. त्यांच्या नांवें एक स्कॉलरशिप युनिव्हर्सिटी-मार्फत ठेवण्यांत आली आहे.

१७ रावबहादूर शंकर पांडुरंग पंडित एम्. ए—जन्म इ० स० १८४०, मृत्यु इ० स० १८९४. सावंतवाडीसंस्थानपैकीं कुडाळ पेठ्यांतील बांबुळी गांवीं यांचा जन्म झाला. त्या गांवच्या कुलकर्णी घराण्यांतील हे गृहस्थ होते. यांची मूळस्थिति गरीबीची होती. त्यांनीं आपल्या वयाच्या १८ व्या वर्षी बेळगांव येथें इंग्रजी शाळेंत इंग्रजी शिण्यास सुरुवात केली व तीन वर्षांत तेथील अभ्यासक्रम पुरा करून स्कॉलरशिप मिळविली व तेथून मुंबई एल्फिन्स्टन कॉलेजांत जाऊन तेथें इ० स० १८६५ मध्यें एम्. ए च्या परिक्षेंत पास झाले. नंतर ते त्या कॉलेजचे फेलो झाले. पुढें पुणा डेक्कन कॉलेजचे असि. प्रोफेसर, खानदेश येथें डेप्युटी कलेक्टर, मुंबईस लायसेन्स टॅक्स कलेक्टर, ओरिएंटल ट्रान्सलेटर, हायकोर्टाचे रजिस्ट्रार, पोरबंदरचे दिवाण इत्यादि अनेक मोठमोठीं हुद्यांचीं कामें त्यांनीं केलीं. त्यांनीं संस्कृत भाषेचाही चांगला अभ्यास केला होता. रघुवंश व मालविकाग्निमित्र, हे ग्रंथ त्यांनीं शुद्ध करून टीपा देऊन तयार केले. 'वेदार्थयत्न' हें मासिकपुस्तक त्यांनीं चालविलें होतें, त्यांत ऋग्वेदसंहितेचे चार अष्टक ह्मणजे अर्धी संहिता समाप्त झाली आहे. शिवाय अथर्ववेदाचें भाष्य मूळग्रंथासह छापविण्याचें काम त्यांनीं चालविलें होतें. ते प्रार्थनासमाजिस्ट होते. स्त्रीशिक्षणाकडे त्यांचा ओढा होता. त्यांनीं कित्येक संस्थांस देणग्याही दिल्या

---

१ पृष्ठें २५६ त २६२.

होत्या. त्यांचें चरित्र सारस्वतरत्नमाला ग्रंथांत प्रसिद्ध झालें आहे[1].

१८ रामचंद्र भिकाजी गुंजीकर—जन्म इ. स. १८४३, मृत्यु इ. स. १९०१. बेळगांव जिल्ह्यांतील खानापूर नजीक जांबोटी या गांवीं यांचा जन्म झाला. सन १८५८ सालीं ते बेळगांवास गेले व त्यांनीं इंग्रजी शिकण्यास आरंभ केला. सन १८६४ सालीं ते म्याट्रिक्युलेशन परिक्षेंत उत्तीर्ण झाले. पुढें घरगुती नडीमुळें कॉलेजचा शिक्षणक्रम सोडून त्यांनीं असिस्टंट मास्तरची जागा पत्करिली. पुढें बेळगांव जिल्ह्याचे असिस्टंट डेप्युटी इन्सपेक्टर झाले व सन १८९८ मध्यें पेनशन घेऊन ते मुंबईस राहूं लागले. ते उत्तम संस्कृतज्ञ होते. सिद्धांत कौमुदीचा त्यांनीं चांगला अभ्यास केला होता. त्या विषयावर त्यांनीं " कौमुदी महोत्सव " हा ग्रंथ लिहिला आहे. ते उत्तम ग्रंथकार होते. मोचनगड, सौभाग्यरत्नमाला, महाराष्ट्र भाषेची लेखनशुद्धि, सुबोध व्याकरण, बाघरी लिपी, कन्नडपरिज्ञान, वगैरे अनेक लहानमोठे ग्रंथ त्यांनीं लिहिले आहेत. मुंबई येथील " विविधज्ञानविस्तार " मासिकाचे हेच उत्पादक होते. तें मासिकपुस्तक किती प्रसिद्ध व भारदस्त, जुनें आहे हें वाचकांस सांगण्याचें कारण नाहीं. यांच्यावर अनेक दुःखाचे प्रसंग आले तेव्हां त्यांनीं मनाच्या समाधानी करितां श्रीमद्भगवद्गीतेचें पारायण चालविलें. त्यामुळें त्यांस आपल्या दुःखाचा वेग बराच हलका करितां आला;

---

१ सारस्वत रत्नमाला पृष्ठ २६३ ते २७६.

२ सारस्वत रत्नमाला पृष्ठ ३०९.

नंतर त्यांनीं श्रीमद्भगवद्गीतेवर "सुबोधचंद्रिका" नांवाची महाराष्ट्र भाषेंत टीका लिहिली आहे. ती टीका खरोखरच सुबोध होण्याजोगी व मनोरंजक असून तींत अर्थगांभीर्यहि उत्तम साधलेलें आहे. त्या टीकेसह भगवद्गीतेचें पुस्तक "निर्णयसागर" प्रेसमध्यें मिळतें. सर्व प्रकारें त्याची उत्तम पुस्तकांत गणना झाली आहे. सारस्वतब्राह्मण-ज्ञातीच्या इतिहासासंबंधानें त्यांनीं बरेंच संशोधन करून "सरस्वती-मंडल" नांवाचें पुस्तक लिहिलें. तें पुस्तक बऱ्याच परिश्रमानें व साधार असें लिहिलें आहे. त्यांत इतर ब्राह्मणवर्गासंबंधाचाहि इतिहास त्यांनीं लिहिला आहे असें असतां कै० राजाराम शास्त्री भागवत यांनीं त्या बुकावर "जशासतसें" हें पुस्तक लिहून कडक टीका केली. या टीकेस प्रत्युत्तर ह्मणून त्यांनीं "भ्रमनिरास" हें पुस्तक लिहून टीकेंतील विधानांचें खंडन केलें. यांचीं हीं दोनीं बुकें वाचनीय आहेत. यांची मराठी भाषा सरळ, गोड, शुद्ध व भारदस्त असल्याबद्दल अनेक लेखकांनीं व विद्वानांनीं त्यांची स्तुति केली आहे. यांचें चरित्र "सारस्वत रत्नमाला" या पुस्तकांत प्रसिद्ध झालें आहे.[1]

१९ गुरुवर्य डॉ० सर रामकृष्ण गोपाळ भांडारकर—जन्म इ० स० १८३७, अंतकाल इ० स० १९२५. इ. या विद्वन्मुकुटमणि व अत्यंत पूज्य अशा विभूतीचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यापैकीं मालवण येथें झाला. यांचे वडील गोपाळ लाडको भांडारकर हे त्यावेळीं मालवण येथील मामलेदार कचेरींत कारकून होते. पुढें

१ पृष्ठें २७८ ते २८५.

त्यांच्या वडिलांना बढत्या मिळून ते मामलेदारीच्या हुद्यावर गेले व त्यांच्या नेमणुका राजापूर, रत्नागिरी वगैरे गांवीं झाल्यामुळें रामकृष्णपंत यांचें प्राथमिक शिक्षण माल्वण, राजापूर, रत्नागिरी या ठिकाणीं झालें व नंतर ते मुंबईच्या एलफिन्स्टन हायस्कुलांत गेले, तेथें सन १८५४ सालीं ते म्याट्रिक्युलेशन परिक्षा पास होऊन त्या परिक्षेंत पहिले आले. नंतर ते कॉलेजांत शिकूं लागले. तेथें त्यांना स्कॉलरशिपा मिळूं लागल्या. पुढें सन १८५८ सालीं त्यांचा कॉलेजांतील अभ्यासक्रम पुरा झाला. नंतर एलफिन्स्टन इन्स्टिटयूटमध्यें त्यांना शिक्षकाच्या जागीं नेमलें; परंतु पुढें परिक्षेच्या नियमांत फेरफार झाल्यामुळें त्यांना पुनः परिक्षेस बसावें लागलें. त्याप्रमाणें ते सन १८५९ मध्यें मॅट्रिक, सन १८६१ मध्यें एफ्. ए. व सन १८६२ सालीं बी. ए. परीक्षेस बसून पास झाले. बी. ए. च्या परीक्षेंत ते पहिल्या क्लासमध्यें (ऑनर्स) पास झाले व सन १८६३ सालीं एम्. ए. झाले; परंतु त्यांनीं ती पदवी सन १८६६ सालीं घेतली. एम्. ए. च्या परीक्षेस त्यांनीं दुसरी भाषा संस्कृत घेतली होती. सन १८५९ च्या जानेवारीपासून त्यांना एक फेलोशिप मिळाली होती. फेलो या नात्यानें त्यांनीं कांहीं दिवस पुणें येथें व कांहीं दिवस मुंबईंत मिळून ५॥ वर्षें तें काम केलें. तेवढ्या अवधींत त्यांनीं संस्कृत भाषेचा अत्यन्त परिश्रमपूर्वक जुन्या पद्धतीनें अभ्यास केला व पुढें थोड्याच दिवसांनीं ते उत्तम संस्कृतज्ञ पंडित ह्मणून प्रसिद्धीस आले. हेडमास्तर नात्यानें त्यांनीं सिंध, हैदराबाद, रत्नागिरी या हायस्कुलांतही काम केलें. त्यांच्या अंगीं विषयांची

उत्तम तयारी, शिकविण्याची उत्कृष्ट पद्धत, शिस्त राखण्याबद्दलची दक्षता, हाताखालील मास्तर असोत किंवा विद्यार्थी असोत त्यांच्याबद्दल समत्वबुद्धि, हुषार व बुद्धिमान् विद्यार्थ्यांचें कौतुक करून त्यांना उत्तेजन देणें इत्यादि अनेक सद्गुण वसत असल्यामुळें ते सर्वांस पूज्य वाटत असत. ते ज्या ज्या हायस्कुलांत हेड्मास्तरच्या जागीं गेले त्या त्या हायस्कुलाची उत्तम सुधारणा होऊन त्यांतील विद्यार्थी युनिव्हर्सिटीच्या परिक्षेंत पहिल्या क्लासांत येऊं लागले व त्यांना स्कॉलरशिपा मिळूं लागल्या. त्यामुळें उत्तम गुरुजी ह्मणून त्यांची प्रसिद्धी झाली. पुढें त्यांनीं असिस्टंट प्रोफेसर, संस्कृतचे प्रोफेसर, युनिव्हर्सिटींतील सिंडिक, व्हाइसचान्सेलर इत्यादि अनेक मोठमोठीं हुद्यांचीं कामें करून पेनशन घेतलें.

इतकीं नोकरीचीं कामें केलीं तरी तीं संभाळून त्यांचा विद्याव्यासंग एकसारखा चालूच होता. तसेंच ग्रंथलेखन, निबंधलेखन वगैरे कामेंही नेहमी ते करीत असत. महत्वाच्या सभांमध्यें त्यांचीं उत्तमोत्तम व्याख्यानेंहि होत असत. इंग्रजी व संस्कृत भाषेंतील उत्तम प्रकारच्या त्यांच्या नैपुण्याबद्दल सर्व जगभर त्यांची प्रसिद्धी झाली होती. त्यांनीं निरनिराळ्या विषयांवर विद्वत्ताप्रचुर अशीं अनेक पुस्तकें लिहिलीं आहेत. इंग्रजी शिक्षणाबरोबर संस्कृत भाषा शिकणाऱ्या विद्यार्थ्यांस संस्कृत शिकणें सुलभ व्हावें या हेतूनें त्यांनीं संस्कृत-इंग्रजी दोन क्रमिक बुकें लिहिलीं आहेत. तीं बुकें सर्वमान्य झालीं आहेत व त्या बुकांचा विद्यार्थीवर्गास फार उपयोग होत आहे. त्यांच्या शिक्षणांतून हजारों विद्यार्थी उत्तम विद्वान होऊन मोठमोठ्या हुद्यांवर कामें करीत आहेत व ते हिंदुस्थानभर

जिकडेतिकडे पसरलेले आहेत. ते सर्व या थोर गृहस्थांना 'गुरुवर्य' या शब्दानें संबोधित असतात व या गृहस्थांचें स्मरण होतांच सद्गदीत अंतःकरणानें उपकृत होतात. तसेंच यांच्या विद्वत्तेसंबंधाची कीर्ति सर्व जगभर पसरलेली असून सुधारलेल्या पाश्चात्य राष्ट्रांतील मोठमोठे विद्वान लोक त्यांच्या संबंधानें पूज्यभाव व्यक्त करीत असत व त्या राष्ट्रांतील कांहीं विद्वत्परिषदेस येण्याबद्दल त्यांना आदरपूर्वक विनंत्याहि येत असत.

आमच्या प्राचीन ग्रंथांचें संशोधन व शिलालेख, ताम्रपट यांचें संशोधन या विषयांबद्दलही त्यांनीं बरेच परिश्रम घेतले होते. प्राचीन वाङ्मयाबद्दल त्यांची कळकळ अवर्णनीय होती. तसेंच प्राचीन इतिहासाचेंहि त्यांनीं चांगलें परिशीलन केलें होतें. " डेक्कनचा इतिहास " या नांवाचा ग्रंथ त्यांनीं प्रसिद्ध केला आहे, त्यावरून या कामांतील त्यांची शोधकबुद्धि व कळकळ चांगली व्यक्त होते. वेद, उपनिषदें, पतंजलभाष्य, ब्रह्मसूत्रें इत्यादि ग्रंथांचें मार्मिकपद्धतीनें त्यांनीं वाचन करून त्या विषयावर त्यांनीं अनेक निबंध लिहिले. आमच्या प्राचीन ग्रंथांचा काल ठरवितांना कित्येक युरोपियन गृहस्थांनीं त्या ग्रंथांस अर्वाचिनत्व आणण्याचा प्रयत्न केला होता. त्यांस साधार उत्तरें देऊन त्यांनीं त्या मतांचें खंडन केलें आहे[१].

प्रार्थनासमाजाचे ते अध्वर्यु होते त्यामुळें लोकांत त्यांच्याविषयीं कांहींसा गैरसमज उत्पन्न झाला होता; परंतु आक्षेपकांची ती समजूत चुकीची होती. ईश्वरविषयक त्यांची पूर्ण निष्ठा होती[२]. मात्र मूर्ति-

---

१ श्री. कर्नाटकी कृत डॉ. भांडारकराचे चरित्र पृ. १३७-१३८.

२ श्री. कर्नाटकी कृत डॉ. भांडारकरांचें चरित्र प्रकरण २२ वें.

पूजेविषयीं त्यांचें मत विरुद्ध होतें त्यामुळें व सामाजिक कांहीं प्रश्नांसंबंधाचीं त्यांचीं मतें प्रागतिक स्वरूपाचीं असल्यानें कांहीं लोकांचा गैरसमज होऊन त्यांनीं यांच्या विरुद्ध टीकात्मक लेख लिहिले. परंतु पुढें कित्येक टीकाकारांची खऱ्या प्रकाराबद्दल समजूत पटल्यामुळें आपली पहिली समज चुकीची होती हें त्यांना कबूल करावें लागलें. परमेश्वराच्या उपासनेचे दोन प्रकार आहेत. एक व्यक्त-स्वरूपाची व दुसरी अव्यक्त स्वरूपाची. या दोन प्रकारांपैकीं अव्यक्त स्वरूपाच्या उपासनेवर त्यांची पूर्ण श्रद्धा होती. एकांतांत त्यांनीं परमेश्वराची प्रेमळपणानें प्रार्थना करावी व सद्गदित व्हावें असा त्यांचा क्रम होता व तशा प्रकारच्या प्रार्थनेचीं बरींच वाक्यें त्यांनीं आपल्या रोजनिशींत लिहून ठेविलीं आहेत[1]. भक्तिमार्गविषयक एक महत्वाचा ग्रंथहि त्यांनीं सन १९१३ सालीं प्रसिद्ध केला आहे.

स्वदेशाच्या उन्नतिसंबंधाची कळकळ त्यांच्या अंतःकरणांत पूर्ण-पणें भरली होती व त्या दिशेनेंहि त्यांनीं बरेच परिश्रम घेतले आहेत. तसेंच आपल्या मातापितरांशीं ते अत्यंत प्रेमानें व आज्ञाधारकपणानें वागत असत. आपल्या स्नेही मंडळींत व इतर लोकांत त्यांची वागणूक सभ्यतेची व प्रेमळपणाची होती यामुळें ते फार लोकप्रिय झाले होते. त्याचें यथार्थ वर्णन येथें देणें शक्य नाहीं. त्यांचें मोठें चरित्र प्रसिद्ध झालें आहे. तें प्रत्येकानें वाचणें अवश्य आहे[2].

---

१ श्री. कर्नाटकी कृत डॉ. भांडारकरांचें चरित्र पृष्ठें १८२-८३-८४.

२ श्री. कर्नाटकी कृत डॉ. भांडारकरांचें चरित्र [illegible] १६४ ठाकुरद्वार मुंबई नंबर २

२१ नामदार न्यायमूर्ति काशिनाथ त्रिंबक तेलंग—जन्म सन १८५० इ. मृत्यु सन १८९३. या पूज्य व थोर विभूतीसंबंधानें वर्णन करणें हें मोठें बिकट काम आहे. यांचें चरित्र सर्व बाजूंनीं पूर्ण असून कितीही उत्तमप्रकार लिहिलें तरी तें व्हावें तितकें यथार्थ होत नाहीं. गेल्या शंभरवर्षांच्या अवधींत दाक्षिणेंतील सारस्वत ब्राह्मणांत अनेक प्रख्यात गृहस्थ होऊन गेले. त्यांच्या व यांच्या चारित्रांची तुलना करून पाहतां यांच्या चारित्राची बरोबरी इतर कोणत्याहि व्यक्तींच्या चारित्रानें होऊं शकत नाहीं. कविवर्य मोरोपंतांनी एका आर्येत म्हटलें आहे कीं:—"**झाले बहु, होतिल बहु, आहेतहि बहु परंतु यासम हा**" हें सुभाषित खरोखर आमच्या या न्यायमूर्तींना तंतोतंत लागूं पडतें. अशा या थोर गृहस्थांचें वर्णन माझ्यासारख्या यःकश्चित माणसानें करणें म्हणजे मोठें धाष्टर्य करणें होय. परंतु या बुकांत आमच्या समाजांतील प्रख्यात् पुरुषांचीं त्रोटक चरित्रें लिहितांना यांचें चरित्र थोडक्यांत लिहिणें क्रमप्राप्त झालें असल्यानें थोडें लिहित आहे. आपल्या वयाच्या पांचव्या वर्षीं ते मराठी शाळेंत गेले. तेथील अभ्यासक्रम चार वर्षांत पुरा करून सन १८५९ सालीं इंग्रजी शिक्षण घेण्याकरितां हायस्कुलांत गेले. वयाच्या चवदावे वर्षीं ते म्यार्ट्रिक्युलेशनची परिक्षा पास झाले. सतराव्या वर्षीं ते बी. ए. झाले. लगेच एक वर्षांत त्यांना एलफिन्स्टन हायस्कुलांत संस्कृत अध्यापक नेमिलें. पुढें कांहीं दिवसांनीं एलफिस्टन कॉलेजांत ज्यूनियर दक्षिणाफेलो नेमिलें. तीं दगदगीचीं कामें संभाळून त्याचवर्षीं ते एम्. ए. च्या परिक्षेस बसले व त्या परिक्षेंत उत्तम

यशस्वी झाले. सन १८६९ सालीं त्यांस भगवानदास पुरुषोत्तमदास यांची संस्कृत स्कॉलरशिप मिळाली. त्याच वर्षाच्या दिंजबर महिन्यांत ते एल्. एल्. बी. ची परिक्षा पास झाले. पुढें त्यांना एल्फिस्टनकॉलेजांत सन १८७० मध्यें सीनियर दक्षिणाफेलो नेमिलें. सन १८६७ पासून १८७२ पर्यंत त्यांनीं फेलोशिप संभाळून आपली ॲडव्होकेट परिक्षेस बसण्याची मुदत भरली व सन १८७२ सालीं त्यांची ॲडव्होकेटची परिक्षा पास झाली. नंतर त्यांनीं ॲडव्होकेटच्या धंद्याची सुरवात केली. तेव्हांपासून त्यांचें उत्तम वक्तृत्व व कायद्याचें पूर्ण ज्ञान व अलौकिक बुद्धिमत्ता या गुणांमुळें त्यांची चांगली भरभराट होत चालली. हायकोर्टांत त्यांच्या विद्वत्तेबद्दल व वक्तृत्वाबद्दल वाखाणणी होऊं लागली. चीफ जस्टिस सर मायकेल वेस्ट्राप हे भर कोर्टांतही त्यांच्या बुद्धिमत्तेची व न्यायनिपुणतेची तारीफ करीत असत. पुढें सन १८७७ मध्यें ते मुंबई विश्वविद्यालयाचे फेलो झाले व १८८१ मध्यें ते सिंडिक झाले. त्यापूर्वीं ते ' जस्टिस ऑफ धि पीस ' ही झाले होते. सन १८८३ मध्यें त्यांना सरकारांतून सी. आय. ई. ही बहुमानाची पदवी मिळाली व सन १८८९ मध्यें ते हायकोर्ट जज्ज झाले. त्यांना इंग्लिश, संस्कृत, मराठी, गुजराथी या भाषा उत्तम येत होत्या. शिवाय ल्याटिन, फ्रेंच व जर्मन या भाषांचाहि त्यांनीं अभ्यास केला होता. कित्येक लोकांच्या आंगीं वक्तृत्व हा गुण प्रमुख असतो तर कित्येकांच्या आंगीं लेखनकौशल्य विशेष असतें परंतु तेलंगसाहेबांच्या आंगीं हे दोनहि गुण उत्तम-

प्रकारें वसत होते. इंग्लिश भाषेवर त्यांचें इतकें प्रभुत्व होतें कीं, मोठमोठे युरोपियन अधिकारी, ग्रंथकर्ते व वर्तमानपत्रकार त्यांच्या इंग्लिशभाषेबद्दल मुक्तकंठानें प्रशंसा करीत असत. कॉलेजचे प्रिन्सि- पाळ चाटफिल्ड साहेब, प्रो. म्याक्समुल्लर साहेब, हायकोर्टाचे चीफ जस्टिस वेस्ट्राप व सार्जंटसाहेब, बॉंबे ग्याझेटचे संपादक म्याक्लीन साहेब व टाइम्स ऑफ इंडियाचे संपादक व ब्यारिस्टर फेरोजशहा मेहता, इत्यादि मोठमोठ्या मंडळींनीं त्यांच्या विद्वत्तेबद्दल, लेखनशै- लीबद्दल, वक्तृत्वाबद्दल व बुद्धिमत्तेबद्दल तारीफ केली आहे. त्यांचें आचरण अत्यंत शुद्ध होतें. त्यांची नीतिमत्ता मोठी होती. कोणत्याहि प्रकारचें व्यसन त्यांना नव्हतें. त्यांचें औदार्यहि मोठें होतें. दरमहा दोन अडीचशें विद्यार्थ्यांस ते बुकें, फी वगैरेसाठीं द्रव्यद्वारां मदत करीत असत. सार्वजनिक कामेंहि त्यांनीं बऱ्याच कळकळीनें व झीज सोसून केलीं आहेत. अनेक संस्थांचे ते उत्पादक व सहाय्यक होते. राष्ट्रीयसभेसंबंधानेंहि त्यांनीं फार परिश्रम करून तिची वाढ केली. साहित्यसेवाही त्यांनीं बरीच केली आहे. शंकराचार्यांचा काल, न्यायकुसुमांजळीचा काल, मांडुक्यउपनिषद यांवरील त्यांचे निबंध सर्वमान्य झाले. 'इंडियन अँटिक्वेरी,' 'थिऑसफीस्ट,' 'इंदुप्रकाश,' 'नेटिवओपिनियन्' वगैरे पत्रांतून त्यांचे मार्मिक लेख प्रसिद्ध होत असत. भर्तृहरीच्या 'नीति व वैराग्य' या दोन शतकांवर इंग्रजी टीपा देऊन तें पुस्तक भिन्न पाठांसह त्यांनीं प्रसिद्ध केलें. श्रीमद्भगवद्गीतेचें त्यांनीं इंग्रजी कविताबद्ध भाषांतर कॉलेजांत अभ्यास करीत असतां विद्यार्थीदशेंत केलें ! ही केवढी आश्चर्याची

व कौतुकास्पद गोष्ट आहे बरें ! सन १८८२ मध्यें त्यांनीं गीतेचें एक गद्यरूपी भाषांतर केलें. तें प्रोफेसर म्यॅक्समुल्लर यांनीं आपल्या प्राच्य धर्मग्रंथमालिकेंत समाविष्ट केलें आहे. शिवाय 'काव्येतिहासपरीक्षण,' आनंदगिरीच्या शंकरविजयावरील टीका, मुद्राराक्षस नाटक, शहाणा नेथन, स्थानिक स्वराज्य वगैरे त्यांचीं बुकें व निबंध प्रसिद्ध आहेत. आणखी बरेच निबंध व टीका त्यांनीं लिहिल्या आहेत. त्या सर्वांचा या अति संक्षिप्त चरित्रांत उल्लेख करणें अशक्य आहे. त्यांच्या अंगच्या अनेक गुणांसंबंधानें वरील थोडेंसें वर्णन लिहिलें तथापि वरील सद्गुणांच्या कोंदणांत बसलेले त्याहून उच्चतम असे कांहीं सद्गुणहिरे आहेत. त्यांचा येथें उल्लेख केल्यावांचून राहवत नाहीं. इतकी विद्वत्ता, इतका अधिकार, इतकी संपत्ति प्राप्त झाली असतांहि ते आपल्या मातापितरांच्या आज्ञेंत वागत असत, त्यांच्या इच्छेविरुद्ध त्यांनीं आपलें वर्तन आमरण घडूं दिलें नाहीं, तसेंच हिंदुधर्मावर त्यांची चांगली श्रद्धा होती. 'ते विद्वान होऊन पैसे मिळविल्यावर त्यांनीं मुंबईंत एक मोठा वाडा विकत घेतला; त्या घराच्या वास्तुप्रवेशाच्या दिवशीं ते मोठ्या समारंभानें आप्तमंडळी व मित्रमंडळी बरोबर घेऊन आपल्या जुन्या राहत्या घरांतून निघाले. रस्ता सुमारें अर्ध मैल लांब होता. तरी आपल्या जुन्या घरांतून ते सोंवळ्यानें (म्हणजे पीतांबर नेसून, शाल पांघरून, आणि डोक्यास शालनामा बांधून) हातांत घरचे देव घेऊन नव्या घरापर्यंत अनवाणी चालत गेले ही गोष्ट सर्वांस विदित आहेच. सारांश, आपल्या विद्वत्तेचा किंवा आपल्या अधिकाराचा त्यांस

यत्किंचितहि गर्व नव्हता. आधुनिक कांहीं सुशिक्षित लोकांप्रमाणें त्यांना आपल्या धर्माचरणाची लाज वाटली नाहीं किंवा त्याबद्दल युरोपियन लोक आपल्यास हंसतील अशा भीतीनें त्यांना पछाडिलें नाहीं. हें वर्णन वाचून त्यांच्याविषयींच्या आदरयुक्त प्रेमभावानें अंतःकरण उचंबळूं लागतें व प्रेमाश्रु वाहूं लागतात. प्रोफेसर वेबर नामक एका युरोपियन पंडितानें रामायण हें होमरच्या ‘ इलियड ’ काव्याच्या आधारानें रचिलें गेलें असावें, अशी कल्पना काढिली होती, तसेंच ‘ श्रीमद्भगवद्गीता ’ ग्रंथावर डॉ. लॉरिंजरप्रभृती कांहीं परदेशीय गृहस्थांनीं असा आरोप केला होता कीं, ख्रिस्तीलोकांच्या बायबलग्रंथांतून सर्व कल्पना चोरून घेऊन श्रीमद्भगवद्गीता रचिली असावी. या दोनीहि मतांचें तेलंगसाहेबांनीं योग्य पुराव्यानें खंडन केलें. त्यापासून तीं मतें प्रचारांत राहिलीं नाहींत.[1][2] यावरून आर्यसंस्कृतीविषयीं त्यांच्या अंतःकरणांत किती आदर व स्वाभिमान वसत होता हें दिसून येण्याजोगें आहे. तसेंच परमेश्वराच्या आस्तित्वाबद्दल हिंदुधर्मशास्त्रांतील वचनांवर त्यांचा दृढ भरंवसा होता. असा हा सर्व बाजूंनीं तेजःपुंज मोहरा आपल्या वयाच्या ४४ व्या वर्षीं (ऐन तारुण्यांत) कालवश झाला हें आमच्या समाजाचें व देशाचें दुर्दैव होय ! यांचीं लहान लहान चरित्रें वर्तमानपत्रांतून व मासिकपुस्तकांतून प्रसिद्ध झालीं आहेत. सारस्वतरत्नमालेंतूनहि तें प्रसिद्ध झालें आहे.

---

१ सारस्वतरत्नमाला पृष्ठें ३०९-३१०.

२ सदरबुक पृष्ठें ३०७-३०८.

अलिकडे यांचें एक विस्तृत चरित्र सुप्रसिद्ध लेखक श्री. श्रीनिवास नारायण कर्नाटकी यांनीं लिहिलें असून तें रा. रा. मंगेश नारायण कुलकर्णी यांनीं कर्नाटक प्रिंटिंग प्रेस, ठाकुरद्वार मुंबई येथें प्रसिद्ध केलें आहे. तें बरेंच मोठें (५५० पृष्ठांचें) आहे. तें मनोरंजक असून तरुण मंडळीस आदर्शभूत आहे. तथापी या पूज्य व्यक्तींचें चरित्रच असें आहे कीं, तितक्या विस्तृत बुकावरूनहि त्याबद्दलची जिज्ञासा तृप्त होत नाहीं.

२२, महाशय ए. सुबराव उपेंद्र पै बी. ए. बी. एल्. हायकोर्ट वकील मद्रास व मंगळूर—जन्म इ. स. १८५२. हे सुप्रसिद्ध गृहस्थ दक्षिण कर्नाटकांत मंगळूर येथें होऊन गेले. हे मोठे कर्मवीर व सर्व लोकांच्या कल्याणाकरितां तनुमनधनें करून अविश्रांत झटणारे असे सत्पुरुष होते. ते इ. स. १८७२ सालीं बी. ए. च्या परिक्षेंत उत्तम रीतीनें पास झाले व इ. स. १८७६ सालीं बी. एल. (एल. एल. बी.) परिक्षेंत पास झाले. पुढें त्यांनीं मद्रास हायकोर्टांत वकिलीचा धंदा सुरू केला. परंतु तेथील हवा त्यांच्या प्रकृतीस मानवेनाशी झाल्यामुळें ते परत मंगळुरास आले व तेथें त्यांनीं वकीलीचा धंदा सुरू केला. त्या धंद्यांत त्यांनीं बराच नांवलौकीक मिळविला. तो धंदा सुरू असतां सार्वजनिक हिताचीं कामेंहि त्यांनीं बरींच केलीं. " कॅनराहायस्कूल " नांवाची शिक्षणसंस्था स्थापन केली. प्राचीन वेदशास्त्रविद्येकडेहि त्यांचें लक्ष्य होतें. त्यांनीं तेथें एक वैदिक पाठशाळा

१ सारस्वत रत्नमाला पृष्ठें २८६ ते ३१३.

„ „ „ ३१४ ते ३१२

ठेविली आहे. तसेंच " दि कॅनरा हिंदु परमनंट फंड " नांवाची बँक, ' स्टुडंस् ब्रदरहुड् ' नांवाची संस्था, ठिकठिकाणीं ग्रामपंचाइती व जिल्हापंचाइती अशा अनेक संस्थाहि त्यांनीं स्थापिल्या आहेत. स्त्रीशिक्षणाची आवश्यकता जाणून मंगळूर येथें एक मुलींची शाळा स्थापन करून एक इमारतहि त्यांनी बांधविली आहे. तसेंच गौडसारस्वत ब्रह्मवृंदांची ठिकठिकाणीं जी वस्ती आहे तीचें संघटण व्हावें या हेतूनें तिची परिषद भरवावी अशी कल्पना प्रथम त्यांच्याच मनांत उद्भवली व त्याप्रमाणें त्यांनीं सन् १९०७-१९०८ या दोनसालीं दोन सभा चांगल्यारीतीनें पार पाडल्या. ते चांगले दानशूरहि होते. अनेक सार्वजनीक कामांत त्यांनीं सढळ हातानें पैशांचा व्यय केला. त्यांचा स्वभाव प्रेमळ व विनयसंपन्न होता त्यामुळें ते सर्वत्रांस अत्यंत प्रिय झाले होते. याप्रमाणें अनेक सत्कार्यें करून व आपल्या नश्वर देहाचा त्याग करून ते ईश्वरस्वरुपांत मिळून गेले. तथापि आपल्या उज्वल कीर्तिरूपानें या भूतलावर चिरस्थायि आहेत असें ह्मटल्यावांचून राहवत नाहीं.

२३ श्री. मंगेश जिवाजी उर्फ आप्पासाहेब तेलंग--यांचा जन्म इ. स. १८७२, अंतकाल इ. स. १९०९. बेळगांव जिल्ह्यांतील खानापूर या गांवचे हे प्रसिद्ध गृहस्थ होते. यांचे वडील चंदगड व हुक्केरी या महालात महालकरी होते. मंगेशराव यांचें मराठी शिक्षण झाल्यावर त्यांनीं सन १८८४ सालीं बेळगांव येथील सरदार हायस्कूलांत इंग्लिश शिक्षण घेऊन सन १८८८ सालीं ते म्याट्रिक परीक्षा पास झाले. पुढें मुंबईत वुइलसन कॉलेजांत गेले. तेथें सन

१८८९ सालीं प्रिव्हियस परीक्षा पास होऊन ते संस्कृतांत पहिले आले, व सन १८९२ मध्यें बी. ए. झाले. विद्यार्थीदशेंत असल्या-पासूनच सामाजिक व राष्ट्रीय सुधारणा करण्याबद्दल त्यांचे प्रयत्न सुरू होते. ते उद्योग सांभाळून त्यांनीं कायद्यांचा अभ्यास केला व सन १८९७ सालीं ते एल्. एल्. बी. झाले. पुढें बेळगांव येथें वकीली करूं लागले. ते चांगले लेखक व वक्ते होते. त्यांनी खाना-पूर येथें 'भारतीभवन' नामक वाचनालय स्थापन केलें व 'सहकारिणी सभा' या नावाची सभा स्थापन केली. बेळगांव येथील 'चिकित्सक' वर्तमानपत्राचा जीर्णोद्धार केला. त्यांतील त्यांचे लेख मार्मिक व प्रगमनशील उदारमताचे असल्यामुळें तें पत्र बरेंच लोकप्रिय झालें होतें. तसेंच 'धुरीण' हें पत्रही त्यांनीं चांगल्याप्रकारें चालविलें होतें. मुंबईंत निघणाऱ्या 'विविधज्ञानविस्तार' या मासिक पुस्त-कांतूनहि त्यांनीं प्रामुख्यानें बरेच लेख लिहिले आहेत. ते प्रौढ-विचारांचे असून सुधारणेच्या बाबतींत मार्गदर्शक आहेत. हिंदु-समाजाची सामाजिक, सांपत्तिक व राजकीय या सर्व बाजूंनीं उन्नत्ति व्हावी या हेतूनें कळकळीनें त्यांनीं बरेच श्रम घेतले. हा हेतू साध्य करून घेण्याचें त्यांचें मुख्य ध्येय होतें त्यामुळें वकीलीच्या धंद्या-कडेच पूर्ण लक्ष्य त्यांनीं दिलें नाहीं व द्रव्य संपादनाची कोती स्वार्थदृष्टीहि स्विकारिली नाहीं, अशाप्रकारें समाजाच्या हितार्थ झट-णारे हे सद्गृहस्थ ऐन तारुण्यांत वयाच्या ३७ वे वर्षी परलोकवासी झाले, हें समाजाचें दुर्दैव होय.

आतां उत्तरेंतील अलिकडील फार प्रसिद्ध अशा दोन सारस्वत पिता–पुत्र गृहस्थांचा येथें उल्लेख करणें अवश्य आहे असें वाटल्या-मुळें त्या दोन थोर व्यक्तींचें अलसें वर्णन येथें देतों:—

२४ त्यागमूर्ति पंडित मोतिलाल नेहरु ॲडव्होकेट अलाहाबाद जन्म इ. स. १८६१, अंतकाल इ. स. १९३१. हे थोर पुरुष काश्मिरच्या सारस्वत कुलांतील होते. यांचा जन्म दिल्ली येथें झाला, वयाच्या बारा वर्षांपर्यंत त्यांनीं फार्शी व अरबी भाषांचें ज्ञान संपादन केलें. पुढें कानपूरच्या हायस्कुलांत इंग्रजी शिक्षणास सुरवात केली. तेथें प्रवेश परिक्षेपर्यंत शिक्षण घेऊन ते प्रवेश परिक्षेस बसले व पहिल्या वर्गांत उत्तीर्ण झाले. या हायस्कुलांत असतां त्यांनीं आपल्या बुद्धिमत्तेनें शिक्षकवर्गास दिपवून टाकिलें होतें व इंग्रजी भाषेवरील नैपुण्यानें त्यांनीं सर्वांवर आपली छाप बसाविली होती. प्रवेश परिक्षेनंतर त्यांनीं हायकोर्ट वकीलीच्या परिक्षेचा अभ्यास करून ते त्या परिक्षेस बसले. आश्चर्याची गोष्ट असी कीं, त्या परिक्षेचा अभ्यास त्यांनीं अवघ्या तीन महिन्यांत करून त्या परिक्षेंत ते पास होऊन पहिले आले. पुढें त्यांनीं वकिलीचा धंदा सुरू केला. त्यां धंद्यांत त्यांनीं आपली अलौकिक बुद्धिमत्ता लोकांच्या व हायकोर्टाच्या प्रत्ययास आणून दिली. त्यामुळें हायकोर्टानें त्यांना ॲडव्होकेट हा किताब दिला. त्यावेळीं ॲडव्होकेटची योग्यता ब्यारिस्टराच्या दर्जाशीं समानतेची होती. या धंद्यांत त्यांनी संपत्तिहि विपुल मिळविली. व पांच सहा वर्षांतच ते उत्कृष्ट कायदेपंडित ह्मणून त्यांची प्रसिद्धी झाली. त्यांनी ३७ वर्षें वकिली करून लाखों रुपये किंमतीची इस्टेट संपादन केली. त्यांनीं ' आनंदभुवन ' हा राजवाडा १९०० सालीं बांधविला. त्या वाड्यांत ऐषआरामांत दंग अशा नबाबशाही थाटांत ते राहू

लागले. पुढें सन १९२० सालीं महात्मा गांधीं यांनीं असहकारिता पुकारिली तेव्हां त्यांनीं वकिली सोडली व त्या चळवळींत त्यांनीं पाऊल टाकिलें. अलाहाबाद येथें निघत असलेल्या 'लीडर' वर्तमानपत्राचे कांहीं दिवस ते डायरेक्टर होते. पुढें त्यांनीं आपल्या मालकीचें Independent वर्तमानपत्र सुरू केलें. सन १९१७ पासून राजकीय चळवळींत त्यांचें अंग होतेंच. पुढें दीन व चोहोंकडून हतबल झालेल्या हिंदी प्रजेवर नोकरशाहीकडून होत असलेली दडपशाही पाहून त्यांचें अंतःकरण कळवळलें व त्यांनीं स्वतःच्या ऐषआरामाचा एकदम त्याग केला. वकिलीच्या स्वतःच्या दरमहा सुमारें वीस हजारांपर्यंतच्या प्राप्तीवर लाथ मारिली. व स्वतःचा आनंदभवन राजवाडा स्वराज्याच्या चळवळीकडे देऊन टाकिला. हा राजवाडा व्हाइसरायांच्या राजवाड्यासहि लाजविणारा होता. याप्रमाणें स्वार्थत्याग करून स्वदेशीचें व्रत त्यांनीं स्वीकारिलें. व त्या चळवळीला उत्तेजन दिलें. तसेंच असहकारिता, सविनय कायदेभंग, शाळा, कॉलेजें व कौन्सिलें यांवरील बहिष्कार इत्यादि म० गांधींच्या सर्व चळवळींस पाठिंबा देऊन त्यांचा सर्वत्र प्रसार केला. रात्रंदिवस हिंदी प्रजेस स्वातंत्र्य कसें मिळेल या विचारांत निमग्न राहून त्या दृष्टीनें त्यांनीं अत्यंत परिश्रम घेतले. या चळवळींत पडल्यामुळें त्यांच्यावर दोन वेळां क्रिमिनल केसिसा होऊन त्यांना शिक्षा झाल्या. त्या त्यांनीं आनंदानें भोगिल्या. व राष्ट्रहिताचा प्रयत्न पुनः जोरानें चालू ठेविला. नबाबजाद्याप्रमाणें ऐषआरामांत व ऐश्वर्यांत दंग असलेल्या राजबिंड्या पुरुषानें गरीब प्रजेच्या हिता-

कारितां जाडीं-भरडीं वस्त्रें वापरून तुरुंगवासाचे क्लेश स्वखुषीनें पत्क-रिले व साधनसंपत्तीचा त्याग केला. यावरून त्यांची थोरवी किती उच्चदर्जाची होती हें दिसून येतें. अशा पुरुषाचें योग्य स्वागत जनते-कडून होणें स्वाभाविकच आहे. कांग्रेसच्या अध्यक्षपदाचा मान त्यांना दोनवेळां मिळाला. अमृतसर येथें सन १९१९ सालीं व कलकत्ता येथें सन १९२८ सालीं. कलकत्ता कांग्रेसच्यावेळीं त्यांनीं कलकत्त्यांत पाऊल ठेविल्याबरोबर ३६ घोड्यांच्या गाडींतून बाद-शाही थाटानें त्यांची मिरवणूक काढण्यांत आली होती. असो. या-प्रमाणें हिंदीप्रजेच्या स्वातंत्र्याची घोषणा कांग्रेसमध्यें चालू असतां भारतमंत्री लॉर्ड बर्कनहेड यांनीं तुमच्याजवळ एकमुखी राज्यघटना आहे कुठें ? असा प्रश्न लोकपक्षास विचारिला. लगेच पंडितजींच्या अध्यक्षतेखालीं एक कमिटी नेमण्यांत आली व त्या कमिटीनें एक-मुखी स्वराज्यघटना तयार करून हिंदुस्थानची ही किमान मागणी ह्मणून सरकारच्यापुढें मांडिली. या स्वराज्य घटनेंत पंडितजींनीं बरेच श्रम घेतले. ही स्वराज्यघटना ' नेहरूरिपोर्ट ' या नांवानें प्रसिद्ध आहे. हिंदी राष्ट्रानें एकमुखानें ती मान्य केली होती. लॉर्ड बर्कन-हेड यांच्या या आव्हानावरून आमच्या प्राचीन पुराणांतील एक दोन वीरांच्या वर्णनांची आठवण होते. एखाद्या राजकन्येच्या विवाहप्रसंगीं तिच्या पित्यानें एक बिकट पण लावावा व तो पण जिंकण्याकरितां विवाहमंडपांतून कोणी उठत नाहीं असें पाहून " निर्वीरऊर्वितलं " असें प्रसिद्ध करितों ह्मणून त्यानें अवहान करावें, नंतर एका वीर पुरुषानें तो पण जिंकावा अशीं वर्णनें श्री

रामचंद्र, पार्थ, इत्यादि वीरांच्या चरित्रांत आहेत. तसाच हा प्रकार झाला असें ह्मणतां येईल.

असो. देशाच्या खडतर दुर्दैवानें या नरश्रेष्ठास काळानें आमच्यांतून ओढून नेलें. त्यांच्या निधनानिमित्त हायकोर्टासहि सुटी देण्यांत आली. दुखवट्याच्या ठरावाच्या वेळीं हायकोर्टाचे युरोपियन नामदार चीफ जस्टिस यांनीं पंडितजी इतका बुद्धिमान वकील सर्व जगांत सांपडणें अशक्य आहे असे उद्गार काढिले; देशांत सर्वत्र भीषण उदासीनता पसरून सर्व राष्ट्र दुःखसमुद्रांत लोटलें गेलें; असो. पंडितजीनीं या आर्य-भूच्या पोटीं जन्म घेऊन आपलें नैसर्गिक आर्य-तेज जगाच्या प्रत्ययास आणून दिलें.× कालचक्राच्या वक्रगतीमुळें हीनावस्थेंत रुतलेल्या या आर्यभूच्या उदरीं अशीं नररत्नें अद्यापही उत्पन्न होतात हीं उदाहरणें दृष्टीपुढें असतां आर्यभूमीची नैसर्गिक महती यत्किंचित तरी कमी झाली आहे असें ह्मणण्याची कोणाची छाती आहे काय ?

२५ जवाहरलाल नेहरु—हे त्यागमूर्ति मोतिलाल नेहरूचे पुत्र होत. जन्म वर्ष (१८८९) यांचें बाळपण अत्यंत श्रीमंतीत राज-पुत्राप्रमाणें गेलें. एका युरोपियन गृहस्थाच्या देखरेखीखालीं हिंदु-स्थानांत शिक्षण झालें. पुढें इंग्लंडांत हॅरो कॉलेजांत त्यांचें पुढील शिक्षण झालें. एम. ए. होऊन ते सन १९१२ सालीं बॅरिष्टर झाले.

+ " आणि अजूनहि पंजाब मुख्यतः भारतीय आर्य आहे ही गोष्ट सर एच् रिस्ले यांनीं इ. स. १९०१ च्या सेन्सस वेळीं घेतलेल्या शीर्षमापनावरून सिद्ध झाली आहे." (मध्य यु० भारत भाग ३ पृष्ठ १८६)

२० सालापर्यंत ते वकिली करीत होते. असहकारितेच्या चळवळी-पासून ते समाजसत्तावादी झाले. सन १९२९ सालीं ते काँग्रेसचे अध्यक्ष झाले. अध्यक्ष नात्यानें त्यांची मिरवणूक मोठ्या थाटाची व अपूर्व अशी निघाली होती. त्यांच्या अंगीं असामान्य बुद्धिमत्ता, पराकाष्ठेचा स्वार्थत्याग, धाडशी वृत्ति, पिळदार स्वभाव इत्यादि सद्गुण वसत असल्यामुळें ते भावी पिढीचे आधारस्तंभ झाले आहेत. प्रजेच्या हिताकरिता ते अविश्रांत झटत आहेत. त्या कार्यांत त्यांना आजपर्यंत ९ वेळां कारागृहवास भोगावा लागला तथापि तितके शारीरिक त्रास सहन करूनहि त्यांनीं आपला उत्साह खर्चू दिला नाहीं. ते हिंदी राष्ट्राचे केवळ प्राण आहेत. तरुण पिढींत यांच्या तोलाचा दुसरा पुढारी अद्याप मिळाला नाहीं. सन १९३६ च्या एप्रिल महिन्यांत लखनौ येथें भरलेल्या राष्ट्रीय सभेचें अध्यक्षस्थान यांनाच देण्यांत आलें. या अधिवेशनाच्या वेळीं काँग्रेसच्या पुढाऱ्यांत कांहीं पक्षभेद उत्पन्न झाले होते त्यामुळें हें अधिवेशन सुरळीतपणें कसें पार पडतें अशी काळजी उत्पन्न झाली होती; परंतु एखादा कुशल कर्णधार समुद्रांत उत्पन्न झालेल्या तुफानांतून चातुर्यानें जशी नौका तीरास नेतो, त्याप्रमाणें यांनीं काँग्रेसनौका सरळीत पार केली. हल्लीं (डिसेंबर सन १९३६) हेच अध्यक्ष निवडून आले आहेत. कांग्रेसच्या अध्यक्षपदाचा मान यांना बरेच वेळां लाभला यावरून यांची लोकप्रियता व यांच्या अंगीं असलेली कर्तबगारी चांगली व्यक्त झाली आहे.

२६ ज्ञानदेवशास्त्री एकसंबेकर—बेळगांव जिल्ह्यांतील संकेश्वर या गांवचे रहिवासी. हे सद्गृहस्थ होते, यांची जन्मतारीख नक्की मिळाली नाहीं. मात्र अंतकालीं यांचें वय ७३ वर्षांचें होतें. हे ता. २१।५।३२ रोजीं स्वर्गवासी झाले. हे गौडसारस्वत ब्राह्मण होते. यांच्या आध्यात्मज्ञानाची गुरुपरंपरा श्रीज्ञानेश्वर महाराजांपासूनची होती. ते वेदांत व व्याकरण शास्त्रांत निष्णात होते. त्यांच्या वेदांत ज्ञानाबद्दल व प्रासादीक प्रवचनांबद्दल श्रीशंकराचार्य जगद्गुरू मठ करवीर व संकेश्वर, श्रीमत् गौडपादाचार्य संस्थान पीठ कैवल्यपूर, श्रीमत् इंदिराकांततीर्थ संस्थान पीठ पर्वत कानन, बडोदराधीश श्रीमन्महाराज सयाजीराजे, कै० डॉ० भांडारकर, न्यायमूर्ति तेलंग, माजी शिक्षणमंत्री ना. भास्करराव जाधव व रावबहादूर रुद्रगौडा अर्ताळ इत्यादि थोर व्यक्तिंनीं प्रशंसा केली आहे. हे भागवत संप्रदायांतील अग्रणी होते. वेदांतशास्त्रांतील प्राविण्याबद्दल करवीर पीठस्थ श्री. शंकराचार्यांकडून यांना " वेदांत विशारद " ही पदवी मिळाली होती. त्या पदवीबद्दल श्रीकडून जें प्रशस्तिपत्र मिळालें आहे त्यांत " वेदशास्त्र विद् प्रवराणां " " प्रस्थानत्रय क्षीराब्धिमथन मन्दराय- मणमति विभवानां " अशीं विशेषणें त्यांना लावण्यांत आलीं होतीं. सन १९०२ सालीं बडोद्यास श्रीमन्महाराज सयाजीराव यांच्या अध्यक्षतेखालीं वेदांतविषयावर त्यांचीं व्याख्यानें झालीं तीं त्या वेळच्या वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झालीं आहेत व त्यांत त्यांचा गौरवपूर्ण उल्लेख करण्यांत आला आहे. संकेश्वरासारख्या खेड्यांत राहूनहि यांनीं सार्वजनिक कामें कळकळीनें अव्याहत केलीं होतीं. सॅनिटरी

बोर्ड, लोकलबोर्ड यांतील मेंबरशिप्स, हुक्केरी तालुक्याचे कान्सिलि-एटर इत्यादि कामें सुमारें २० वर्षें चांगल्या रीतीनें केल्यामुळें त्यांना मुंबई सरकाराकडून व स्थानिक अधिकाऱ्यांकडून गौरवपूर्ण अशीं प्रशस्तिपत्रें मिळालीं होतीं. त्यांच्या एकंदर निरपेक्ष लोकसेवे-मुळें ते सर्वत्रांस प्रिय झाले होते. वेदोपनिषदांतील ज्ञानाचा ठेवा कोणत्याहि समाजांतील योग्य मनुष्यास देण्यास ते मागें पुढें पाहत नसत. सर्व समाजाविषयीं त्यांची आत्मीयवृत्ति असे. त्यांचें आचरण निरिक्षण करणाऱ्यांना " पंडिताः समदर्शिनः " ही भगवदुक्ति सार्थ वाटत असे. त्यांच्याठिकाणीं इतकी विद्वत्ता असून त्यांची इतकी मानमान्यता झाली तरी त्यांच्या आंगीं गर्विष्ठपणाचा लेशहि नव्हता. साधा, शांत, प्रेमळस्वभाव व साधी राहणी या सद्‌गुणामुळें त्यांच्या चारित्र्यास सोज्ज्वळपणाचें तेज लाभलें होतें एकंदरींत त्यांचें चरित्र आबालवृद्धांस आदर्शभूत झालें आहे.

२७ **श्री. दत्तात्रय गोविंद सडेकर**—संपादक ' लोकमित्र ' मासिक पुस्तक खानापूर जि. बेळगांव-हे साहित्यभक्त, मासिक पुस्तकाच्याद्वारें दीर्घकाल सतत समाजसेवा करणारे व मराठी वाङ्मयांतील ग्रंथसंपत्ति वृद्धिंगत करणारे कर्मवीर विद्यमान आहेत. यांचा जन्म सन् १८६८ इ. च्या फेब्रुवारी महिन्यांत खानापूर तालुक्यांतील कणकुंबी नाजिक मजरे सडा येथें झाला. ह्मणजे आजमितीस यांचें वय ६८ वर्षांचें आहे. यांचें फक्त मराठी भाषेंतील चौथी इयत्ता पर्यंतचें प्राथमिक शिक्षण झालें आहे. ही विशेश लक्षांत ठेवण्याजोगी गोष्ट होय. मराठी भाषेंतील उच्च शिक्षण व इंग्रजी भाषेचें प्राथमिक व

वरिष्ट शिक्षण संपादन करण्याची यांची इच्छा होती. परंतु घरच्या अत्यंत गरीबीच्या परिस्थितीमुळें त्यांना तशा प्रकारचें ज्ञान संपादन कारितां आलें नाहीं. यांनीं प्रथम १-२ रुपये भांडवलावर लहान-सहान किरकोळ स्तोत्रांची वगैरे पुस्तकें विकून त्यांत यश मिळविलें व त्यांतूनच आपल्या आतांच्या एवढ्या अफाट धंद्याचा पाया घातला. त्यांनीं सन १८९१ सालीं 'लोकमित्र' मासिक पुस्तक काढण्यास सुरुवात केली. व त्या मासिकाचें कार्य अत्यंत कळकळीनें व मेह-नतीनें नियमितपणें चालविलें. प्रथम कांहीं वर्षें तें मासिक त्यांनीं बेळगांव-समाचार छापखान्यांत छापवून प्रसिद्ध केलें. पुढें सन १८९६ सालीं स्वतःच्या मालकीचा एक हँडप्रेस खरेदी केला व त्याचें धनंजय प्रेस असें नांव ठेऊन त्या प्रेसमधून सदरचें मासिक व ग्रंथ-प्रकाशनाचें काम चालविलें. पुढें त्यांनीं वेळोवेळीं आपल्या कर्तब-गारीनें त्या छापखान्याची, मासिकाची व ग्रंथ भांडाराची वाढ केली. छापखान्यास सिलेंडर मशीन, कटिंग मशीन, टर्चिंग मशीन वगैरेंची जोड दिली. आज त्यांच्या प्रेसमध्यें बरीच मंडळीं काम करीत आहेत ही गोष्ट त्यांच्या दीर्घ प्रयत्नाची साक्ष देत नाहीं काय ? मासि-काचा आकारहि दिवसेंदिवस वाढवीत वाढवीत हल्लीं तें बहुतेक पूर्णावस्थेस नेलें आहे. तरी पण अद्याप आधुनिक सुधारणेप्रमाणें आपल्याही मासिकांत सुधारणा करावी असा त्यांचा विचार असून त्याकरितां ते दीर्घ प्रयत्न करिताहेत. तसेंच धार्मिक, नैतिक, औद्योगिक, सामाजिक व मनोरंजक असे लहानमोठे सुमारें १५० वर ग्रंथ प्रकाशित केले आहेत. त्यांत 'सर्वसंग्रह भाग १-२' व

' कलावैभव, ' ' श्रीमद्भगवद्गीता, ' ' कथासारामृत, ' ' देवीकुमुदिनी, ' ' हळदीघाटचें युद्ध, ' ' वार्षिकव्रतपूजाविधि, ' ' पंजाबचा लढवय्या शीख, ' आफ्रिकेचें जंगल ' इत्यादि अनेक लहानमोठ्या ग्रंथांच्या दोन दोन तीन तीन हजार प्रति प्रसिद्ध केल्या. त्यांतील कित्येक ग्रंथ इतके लोकप्रिय झाले कीं, त्यांच्या चार चार पांच पांच आवृत्त्या निघाल्या व त्या सर्व खपून अद्याप जनतेकडून बऱ्याच मागण्या येत आहेत परंतु प्रति शिल्लक नाहींत. औद्योगिक बाबतींतील निरनिराळ्या प्रकारचे सुमारें तीस चाळीस लहानमोठे ग्रंथ प्रसिद्ध केले आहेत. त्यांतील माहितीचा उपयोग करून शेकडों लोक उद्योगधंद्यास लागले आहेत. त्या लोकांची व यांची कोठेंहि गांठ पडल्यास ते यांना गुरुस्थानीं मानून आदरभाव व्यक्त करितात.

मासिक पुस्तक आज सतत ४६ वर्षें जनसेवेचें कार्य करीत आहे. वर्षास सुमारें ७००–८०० पृष्ठें धरलीं तरी आजवर ३८–४० हजार पृष्ठें होतील. त्यांत धार्मीक, नैतिक, औद्योगिक, ज्योतिष, सामाजिक वगैरे भारदस्त भाषेत लिहिलेले लेख येऊन गेले आहेत. कायद्यांचीहि थोडथोडी माहिती येत असते. शिवाय कविता, समस्यापूर्ति इत्यादि मनोरंजक पद्यलेखहि बरेंच मुद्रित केलेले असतात.

वृद्धापकाळींहि अशाप्रकारें वाङ्मयसेवा अव्याहत करणारे पुरुष क्वचितच आढळतात. अशाप्रकारची यांची तत्परता दृष्टोपत्तीस आल्यामुळें केसरी–पुणें, भारत–गोवें, प्रबोध– धुळें, वागीश्वरी– नागपूर, चित्रमय–जगत्–पुणें, यशवंत–पुणें, विविधज्ञानविस्तार– मुंबई, निजामविजय- हेद्राबाद, हिंदू–मडगांव इत्यादि शेंकडों प्रसिद्ध

नियतकालिकांनीं त्यांची प्रशंसा केली आहे. तसेंच श्रीमत् पूर्णानंद-सरस्वती स्वामी (कैवल्यमठ) श्रीमत् इंदिराकांततीर्थ स्वामी (पर्वतकालीमठ) श्री. बाळासाहेब पंतप्रतिनिधी सं. औंध, श्री. कुरुंदवाडकर, श्री. दाभोळकर–मुंबई, श्री. श्रीधर व्यंकटेश केतकर, इत्यादि थोर व विद्वान लोकांनीं त्यांच्या दीर्घकालीन लोकसेवेबद्दल व कर्तव्यतत्परतेंबद्दल वाखाणणी केली आहे. त्यांची ईश्वरविषयक व धर्मविषयक निष्ठा अढळ आहे. विनयशील व प्रेमळ स्वभाव, लोकसेवा करण्याविषयींची कळकळ, आत्मविश्वास, दीर्घप्रयत्न, निर्व्यसनता इत्यादि त्यांच्या सात्विक गुणांमुळें ते महाराष्ट्रांत व गोंव्यासुद्धां सर्व कोंकणप्रांतांत खरोखरच ' लोकमित्र ' झाले आहेत. जवळ जवळ सत्तर वर्षांचें वयमान प्राप्त झालें असतां जवान तरुणा-प्रमाणें उत्साहानें त्यांनीं चालू सालीं आपल्या मासीक पुस्तकाचा आकार वाढवून पहिल्याच अल्प किंमतींत तें वर्गणीदारांस मिळावें अशी तजवीज केली आहे. बऱ्याच वर्षांपासून प्रत्येक सालीं तित-क्याच वर्गणींत एक एक बक्षिस पुस्तक वर्गणीदारांस देण्याचा त्यांनीं क्रम ठेविला असून चालू सालींहि तो क्रम सोडला नाहीं. नियतकालिकें चालविणें व ग्रंथप्रकाशन चालू ठेवणें, हे धंदे मोठ्या भांडवलाशिवाय व दीर्घ परिश्रमाशिवाय साध्य होत नाहींत हें मह-शूर आहे. श्री. सडेकर यांच्या आजपर्यंतच्या परिश्रमाच्या मानानें पाहिलें असतां ते आजामितीस निदान लक्षाधीश तरी असणें अवश्य होतें, परंतु लक्ष्मी आणि सरस्वती यांचा एकत्र सहवास अगदीं क्वचित दिसतो. या सामान्य नियमाचा अंमल व त्यांच्या निष्कपटी

व प्रेमळ स्वभावाचा फायदा ? त्यांच्यावर झालाच आहे. तथापि त्यांच्या आराध्यदेवतेच्या (वाग्देवीच्या) एकनिष्ठसेवेमुळें त्यांना तिच्या कृपेनें वेळोवेळीं जरूर तितकी आर्थिक मदत मिळून त्यांच्या नडी अडचणी दूर झाल्या आहेत. लोकमित्राच्या या ४६ वर्षांच्या कालावधींत कितीतरी मासिकें व वृत्तपत्रें उदयास येऊन अस्त पावलीं आहेत. ही गोष्ट ध्यानांत आणली असतां डॉ. केतकर यांनीं ह्मटल्याप्रमाणें हें मासीक नवीन नवीन मासिकांच्या व वृत्तपत्रांच्या आजोबाच्या स्थानीं शोभत आहे, हें ह्मणणें सार्थ आहे असें दिसून येतें. अलीकडे हिंदू समाजांतील स्त्रीपुरुषांची वयोमर्यादा ५०।५५ वर्षांवर आली आहे हें सर्वश्रुत आहे. अशा स्थितींत श्री. सडेकरांप्रमाणें ७०।७० वर्षांच्या वयोमानानें समाजसेवा करणारे पुरुष यापुढें दुर्मिळ होणार हें उघड आहे. करितां लोकमित्राच्या वाचकवर्गांनें व त्यांच्या इतर अनुयायी व स्नेही मंडळींनीं त्यांची सुवर्ण-जुबिली करणें योग्य आहे असें मला वाटतें. तसा जुबिली—समारंभ लौकरच घडवून आणण्याबद्दल परमेश्वरापाशीं प्रार्थना करून हें चरित्र येथें पुरें करितों. त्यांचें चरित्र विस्तृत व स्वतंत्र प्रसिद्ध होणें जरूर आहे. जास्त विस्तृत लिहिण्याचें हें स्थळ नव्हें, करितां येथें थांबणें भाग आहे.

याप्रमाणें विद्वान व थोर पुरुषांचीं जीं चरित्रें माझ्या अल्प वाचनांत आलीं किंवा मिळालेल्या माहितीवरून लिहितां आलीं तीं यथामति येथें सारांशरूपानें सादर केलीं आहेत. यांशिवाय ज्या पूज्य व्यक्तींचीं चरित्रें या इतिहासांत लिहिलीं पाहिजे होतीं अशा कितीतरी व्यक्ति दिवंगत झाल्या आहेत व कितीतरी विद्यमान

आहेत. परंतु त्यांच्या चरित्रांची माहिती मिळवून ती लिहिण्याची खटपट माझ्या शारिरीक दौर्बल्यामुळें व इतर अपरिहार्य अशा कांहीं अडचणीमुळें यावेळीं तरी माझ्या हातून झाली नाहीं याबद्दल वाईट वाटतें. सर्व भारतवर्षांत अशा प्रकारचे पूज्य पुरुष शेकड्यांनीं आढळतील. मुंबई इलाख्यांतील इकडील भागांतील कित्येक पूज्य व्यक्तींच्या नांवांचा तरी येथें निर्देश केल्यावांचून राहवत नाहीं ह्मणून त्यांतील कांहीं नांवें येथें लिहून ठेवीत आहे:—

हायकोर्टाचे जज्य—प० वा० डॉ० सर नारायण गणेश चंदावरकर, नामदार सर गोविंद दिनानाथ माडगांवकर, नामदार साजबा शंकर ऊर्फ काकासाहेब रांगणेकर, नामदार सिताराम सुंदरराव पाटकर. युनिव्हर्सिटीचे **व्हाइसचान्सलर**—श्री. विठ्ठ नारायण चंदावरकर, डि० जज्य श्री. पुरुषोत्तम मंगेश लाड, कौन्सिलर नामदार बाळकृष्ण सिताराम कामत.

दानशूर श्रीमंत—प. वा. रावब. सखाराम विश्वनाथ राजाध्यक्ष, श्री. अनंत शिवाजी देसाई, श्री. विष्णु जनार्दन शिरोळकर, श्री. एस्. के. पंजीकर, श्री. गणपतराव सखाराम राजाध्यक्ष डे. सेक्रेटरी टु दि गव्हर्नमेंट, खेळाच्या सामानाचे व्यापारी मेसर्स वागळे बंधू. रावराजे वा. आ. प्रभु पेडणेकर व्हायकाउंट.

शास्त्री व हरिभक्तिपरायण—कै. भवानी शंकर सुखठणकर, कै. रामचंद्र शंकर टाकी महाराज, प. वा. घनश्याम मिश्र शर्मा शास्त्री.

ग्रंथकार, साहित्यभक्त वगैरे—श्री. वसंत नारायण नाईक, श्री. वामन मंगेश दुभाषी, श्री. नागेश वासुदेव गुणाजी, श्री. श्रीपाद महादेव वर्दे, श्री. रामचंद्र वामन नायक करंडे, श्री. रघुनाथ श्रीपाद देशपांडे, श्री. महाराष्ट्र भा. भू. जगन्नाथ रघुनाथ आजगांवकर, कै. काशीनाथ रघुनाथ मित्र, कै. अनंतराव मोरमकर, कै. गोविंद मल्लिनाथ ठेंगे, कै. दिनकरराव वर्दे, कै. वामनराव केरकर, श्री. त्र्यं. वि. वैद्य, प्रो. बा. वा. सावर्डेकर, प्रो. लक्ष्मणराव सरदेसाई.

लोकसेवेंतील कर्मवीर—श्री. गो. पुं. हेगडे देसाई, श्री. विष्णु विठ्ठल मंत्री संपादक 'ज्ञानसागर' कोल्हापूर, कै. हरी भिकाजी सामंत माजी संपादक 'बेळगांव समाचार' श्री. आर के. तटणीस 'विविधज्ञानविस्तार' मासिक व 'विविधवृत्त' पत्राचे संपादक वगैरे पुष्कळ लोकांचीं त्रोटक चरित्रें देण्याजोगीं आहेत. असो.

याप्रकारचे समाजाचे आधारस्तंभ गृहस्थ समाजांत दिवसेंदिवस जास्त जास्त उत्पन्न होवोत अशी ईश्वरापाशीं प्रार्थना करून हें प्रकरण पुरें करितों.



प्रकरण आठवें.

दक्षिणेंतील या समाजाचीं कुलदैवतें व धर्माध्यक्ष.

श्री परशुराम यांनीं दशगोत्री सारस्वत-ब्राह्मण त्रिहोत्रपुराहून कोंकणांत आणिले. त्या ब्राह्मणांनीं आपआपलीं कुलदैवतें बरोबर आणिलीं याबद्दल सह्याद्रिखंडांतील उल्लेख या पुस्तकांतील प्रकरण ५ यांत लिहिला आहे. त्या उल्लेखाचे जे श्लोक आहेत, त्यांत **श्रीमांगिरीश** (मंगेश), **महालक्ष्मी, म्हालसा, शांतादुर्गा, नागेश, सप्तकोटेश्वर** या सहा दैवतांचीं मात्र नांवें आलीं आहेत. परंतु यांशिवाय **रामनाथ, हाटकेश्वर, नरसिंह, गजानन, व्यंकटेश** ऊर्फ व्यंकटरमण इत्यादि आणखीं बरींच दैवतें कोंकण, महाराष्ट्र, मलबार, कर्नाटक इत्यादि प्रांतांत आहेत. त्यांतील कांहींची स्थापना प्राचीनकाळीं झाली आहे. कांहींची अलिकडे झालेली आहे. सह्याद्रिखंडांतील सहा दैवतांचीं स्थानें व त्यांची उपलब्ध असलेली माहिती प्रथम देतों:—

१. **श्रीमांगिरीश** ऊर्फ **मंगेश**—हें देवस्थान गोवेंप्रांतांत मंगेशी येथें आहे. गोमांतकांतील देवस्थानांत हें प्रमुख देवस्थान आहे. मंगेश देव ह्मणजे महादेवाचें स्थापित लिंग आहे. त्रिहोत्रपुराजवळ मांगिरीश नांवाचा पर्वत आहे. तेथील शिवलिंगाची प्रतिमा परशुराम अवताकालीं, गोमांतकांत आणून स्थापिली आहे. या दैवतास मंगेश हें नांव कसें प्राप्त झालें याबद्दल अनेक आख्यायिका प्रचलित आहेत. त्या सर्वांत 'मांगिरीश' पर्वतावरील शिवलिंगाच्या नांवा-

वरून मांगिरीश हें नाम प्राप्त होऊन, पुढें त्याचा अपभ्रंश 'मंगेश' असा झाला असावा, हें सयुक्तिक दिसतें. या देवस्थानाचे महाजन सर्वांत जास्त आहेत. देवस्थानाचें उत्पन्नहि मोठें आहे. या देवाचें महात्म्य सह्याद्रिखंडांत वर्णिलेलें आहे. मंगेशी येथील या देवस्थानाचा संक्षिप्त इतिहास श्री. श्रीपाद व्यंकटेश वागळे यांनीं प्रसिद्ध केला आहे. शिवाय अनेक लहानमोठीं पुस्तकें गद्य-पद्य-रूपानें प्रसिद्ध झालीं आहेत. महादेव हा कैलासाधिपती व अति प्राचीन कालापासून मुख्य देव आहे, हें प्रसिद्ध आहेच. हें देवस्थान पूर्वी कुठ्ठाळ येथें होतें तें देवालय फिरंग्यानीं नाश केल्यामुळें ती प्रतिमा मंगेशी येथें स्थापन केली.

२. **श्री महालक्ष्मीदेवी**-हें देवस्थान गोमांतक प्रांतांत बांदिवडें या गांवीं आहे. महालक्ष्मी ही विष्णुपत्नि देवी आहे हें प्रसिद्धच आहे. श्रीमहामाया जगदंबा हिचे अनेक अवतार सप्तशती, मार्कंडेयपुराण, देवीभागवत इत्यादि ग्रंथांत वर्णिलेले आहेत. त्यांतीलच हा एक अवतार आहे. या देवीचे महाजन पुष्कळ आहेत. कोल्हापूर येथील श्रीमहालक्ष्मी देवीची माहितीहि पुष्कळांस आहे. ती व बांदिवडें येथील महालक्ष्मी ह्या दोनही देवता एकच असाव्या. बांदिवडें येथील महालक्ष्मी देवतेचें चरित्र प्रसिद्ध झालेलें पाहण्यांत आलें नाहीं. त्या देवीचीं पदें, आरत्या, स्तोत्रें वगैरे प्रसिद्ध आहेत.

३. **श्रीम्हालसादेवी**-या देवीचें स्थान गोमांतकांतील म्हार्दोळ हा गांव आहे. येथेंच श्रीम्हाळसेच्या डाव्या बाजूस श्रीशांतादुर्गादेवीचें एक देऊळ आहे. व त्या देवीचे कुळावेही बरेच आहेत. देवासमोर ४५

हात उंच दीपस्तंभ व जवळच मोठा नगारखाना आहे. श्रीम्हालसा-देवीची पालखी प्रत्येक रविवारीं निघत असून श्रीशांतादुर्गेची प्रत्येक पंचमीस असते. श्रीशांतादुर्गेचीं पेणी ३ व श्रीम्हाळसादेवीचीं १० होत असतात. श्रीम्हाळसादेवीस प्रत्येक एकादशीस श्रीपांडुरंगासारखी, अनंतचतुर्दशी रोजीं शेषशाई सारखी पूजा बांधतात व देवकृत्यांचे यादींत ठरल्याप्रमाणें खर्च दिला असतां ती ती पूजा बांधतात. गोवा इलाख्यांतील फोंडा हा एक महालाचा गांव आहे. तेथून पण-जीस जाणाऱ्या रस्त्यावरच महाडदळ हा गांव आहे. ह्या गांवांतील बाजारपेठेंतून तो रस्ता गेला आहे व रस्त्याजवळच हें देवालय आहे. श्रीम्हालसादेवीचा अवतार ह्मणजे समुद्रमंथनकालीं श्री विष्णूनें अमृ-ताची वांटणी करण्यासाठीं मोहिनीरूप धारण करून दैत्यांचा नाश केला, त्यावेळचा अवतार आहे. या देवीचे महाजन पुष्कळ आहेत. देवीचीं, स्तोत्रें. आरत्या, पदें वगैरे प्रसिद्ध आहेत. इ० सनाच्या १६ व्या शतकांत गोंवेंप्रांतांतील हिंदूंचीं देवाळयें वरिष्ठांच्या हुकुमा-वरून रायतुरचा किल्लेदार, "बहादर" दियोग रुद्रिगिश यानें पाडून टाकिलीं त्यांत या देवीचें पूर्वीचें देऊळ वर्णें येथें होतें, तें प्रथम पाडलें. सुमारें २८० देवळांचा त्यानें विध्वंस केला.[2] ह्या डदोळ येथील देवालय त्या नंतर बांधिलें आहे. म्हालसेचा सभामंटप, शांतादुर्गेचा घुड, नागेशीची तळी आणि मंगेशीचा खांब (दीपमाळ) अशी एक सार्थ ह्मण आहे.

---

१ सर्वसंग्रह भाग १ ला.

२ गोमंतक परिचय पृ० ८०

४. **श्री नागेश**—नागेशी येथें सोंधेकरांच्या वाड्याजवळ या देवाचें देवालय आहे. देवालय लहान असलें तरी पुढील तलाव नयनमनोहर आहे. भारतवर्षांतील द्वादश ज्योतिर्लिंगांतील एक ज्योतिर्लिंग "नागेशं दारुकावनें" असें वर्णिलेलें आहे ,त्या देवाची प्रतिमा हें दैवत असावें असें वाटतें, याचें मूळस्थान बांदिवडें येथें होतें ह्मणतात.

५. **श्रीशांतादुर्गा**—ह्या देवीचें देवालय हल्लीं कैवल्यपूर (कवळें) या गांवीं आहे. पूर्वींचें देवालय केळोशी (कर्दळीवन) येथें होतें. फिरंग्यांच्या दंग्यांत त्या देवालयाचा विध्वंस झाल्यामुळें महाजन मंडळींनी पराकाष्ठेनें मूर्तीचा बचाव करून मूर्ती अंत्रुज प्रांतांत नेली व पुढें शांतता झाल्यावर हल्लींचें भव्य देवालय बांधण्यांत आलें आहे. या देवतेच्या अवताराबद्दल अनेक मतें व आख्यायिका आहेत. या देवस्थानाचा इतिहास श्री. विष्णु रंगाजी शेळडेकर यांनीं लिहिलेला आहे,त्यांत तीं मतें व आख्यायिका दिल्या आहेत परंतु शेवटीं निर्णय नाहीं. प्राचीन ग्रंथांवरून या अवताराबद्दल पूर्वपीठिका लक्षांत येते ती अशी कीं:— परमेश्वराची माया, जिला प्रकृति, आदिमाया, महामाया, इत्यादि नांवें आहेत व जी आपल्या इच्छामात्रेंकरून या प्रचंड विश्वांतील प्रत्येक वस्तु निर्माण करिते व तिची वाढ करून शेवटीं तिचा लय करिते, अशी जी सर्वत्र भरून राहिली आहे त्या अव्यक्त शक्तीची सगुण मूर्ती श्री दुर्गादेवी ही आहे. त्या देवीचें शांततामय स्वरूप तीच श्री शांता.

---

१ श्री शांतादुर्गा दे० चा इतिहास प्रकरण १ लें.

दुर्गा होय. तिच्या पासूनच सर्व चराचर वस्तु व प्राणी निर्माण होतात करितां सर्व वस्तू व प्राणी यांशीं तिचें जननीचें नातें लागतें; म्हणून तिला जगज्जननी म्हणतात. प्राण्यांची उत्पत्ति व वाढ या कामीं मातेपेक्षांही प्रेमळपणा तिच्या ठिकाणीं जास्त दिसून येतो. त्या जननीस माझे शतशः प्रणाम असोत. सप्तशती, मार्कंडेय-पुराण, देवीभागवत, इत्यादि ग्रंथांत तिचे अनेक अवतार वर्णिले आहेत. दुर्गादेवीचें वर्णन वेदांपासून सर्व प्राचीन ग्रंथांत आहे. दुर्गा-देवीचें दुसरें स्वरूप उग्ररूपा (दुष्टांचा संहार करणारी) हें आहे. युद्ध कालीं सत्पक्षीयांस मदत करून असत्पक्षीयांचा नाश करणारी, सर्व शक्तिमान् देवता तीच आहे. दानवाशीं युद्धें करितांना देवांनीं अनेक वेळां तिचें स्तवन करून तिच्या सहाय्यानें जय मिळविले आहेत. भारतीययुद्धाच्यावेळीं श्री कृष्णांनीं अर्जुनास भगवद्गीता सांगण्यापूर्वीं दुर्गादेवीचें स्तवन करण्याबद्दल सुचविलें. त्याप्रमाणें अर्जुनानें रथाखालीं उतरून श्री दुर्गेचें स्तवन केलें आहे,[१] तें उत्कृष्ठ स्तोत्रच आहे. श्री शांतादुर्गेचीं स्तोत्रें व सूक्तें मार्कंडेयपुराण, सप्त-शती इत्यादि ग्रंथांत आहेत. त्यांत श्री दुर्गापरमेश्वरी देवता "देवीं दुर्गाम्" अशा शब्दांनीं तिचें स्तवन केलें आहे. त्यावरून दुर्गादेवीची ही प्रतिमा आहे असें स्पष्ट दिसतें. दुर्गादेवीच्या प्राचीनतेबद्दल शोध करितां ती फार प्राचीन देवता आहे असें आढळतें. या पुस्तकाचें प्रक-रण २ यांत मोहेंजो-दारो व हरप्पा येथील उत्खननांत आर्य संस्कृतीचे प्राचीन अवशेष (प्राचीन शहरें) सांपडल्याचें वर्णन दिलें आहे. तेथें

१ महाभारत, भगवद्गीतापर्व अध्याय २३

सांपडलेल्या शिलालेखांत हिंदूंच्या देवता सूर्य, शिव व दुर्गा या देवतांचे उल्लेख आहेत व ते शिलालेख (वर्णनें) इ० सनाच्यापूर्वी पांच हजार वर्षांचीं तरी असावीं असें अलीकडे आढळून आलें आहे. या एकंदरीवरून ही देवता श्री दुर्गेची प्रतिमा आहे असें सिद्ध होतें. नामावलींत ' शांता ' हें नांवही दिलें आहे.

६. **श्री सप्तकोटेश्वर**—हें देवस्थान हल्लीं सांखळी महालांतील नार्वें या गांवीं आहे. पूर्वी जुनें गोवें या गांवीं या देवाचें भव्य देवालय होतें. फिरंग्यांच्या दंग्यांत या देवळाची मोडतोड झाली आहे व पोर्तुगाल सरकारांनीं ती इमारत आपल्या ताब्यांत घेतली आहे. जुन्याकाळीं हें दैवत ' कदंब ' राजांचें कुलदैवत होतें[२]. श्रीशंकराची प्रतिमा हें दैवत आहे. फिरंग्यांच्या दंग्याच्यावेळीं देवाचें लिंग फिरंग्यांनीं विहिरीवर आडवें घातलें होतें तें इ.स. १५४९ सालीं नारायण शेणवी सूर्यराव देसाई यांनी अचानक उचलून रातोरात लाटंबार्शें-गांवीं नेऊन ठेविलें व पुढें नार्वें येथें त्याची स्थापना केली आहे[३]. रावब० चिंतामणराव वैद्य यांनींही गोव्यांतील प्राचीन राजे ' कदंब ' हे सप्तकोटेश्वर देवाचे उपासक होते असें लिहिलें आहे[४]. व त्यांच्या घराण्याचा प्रथमकाल इ. स. १००७ च्या सुमाराचा

---

१ ता. १८ सप्टेंबर १९३६ चा ' केसरी ' प्रो. फादर हेरास यांचें पुणें येथील व्याख्यान.

२ गोमांतक परिचय पुस्तक पृष्ठ १०८

३ सदर

४ मध्ययुगीन भारत भाग ३ पृष्ठ ४३२

लिहिला आहे. अर्थात त्यापूर्वी हें देवस्थान गोवें प्रांतांत स्थापन झालें आहे असें दिसून येतें. याशिवाय सांखळी येथें श्री दत्तात्रय, रामनाथी येथें श्री रामनाथ, कुंडई नजीक मडकई येथें श्री नवदुर्गा व श्री बिंदुमाधव, वेलिंग येथें श्री नरसिंह, शिरोडें येथें श्रीदेवी कामाक्षा, पेडणें येथें श्री रवळनाथ, गोमांतक पर्वत येथें श्री चंद्रेश्वर, शिवोली येथें श्री लक्ष्मीनारायण, म्हापसें येथें श्री लक्ष्मीनारायण, मासेल येथें श्री देवकीकृष्ण, कोरगांव येथें श्री कमळेश्वर, जांबावली येथें श्री दामोदर, काणकोण येथें श्री मल्लिकार्जुन, इत्यादि अनेक प्रसिद्ध देवस्थानें गोमांतकांत आहेत. गोमांतकाच्या दक्षिणेस मलबार, कोची इत्यादि देशांतहि सारस्वतांचीं देवस्थानें आहेत. मात्र त्यांतील बहुतेक श्री विष्णूचीं असून वैष्णव सांप्रदायी सारस्वतांचीं आहेत. हीं सर्व देवळें विशाल, भव्य व सुंदर आहेत. त्यांचीं उत्पन्नेंही फार मोठीं आहेत. व उत्पन्नांचा व्ययहि पुष्कळ होत असतो. नित्यपूजा, अर्चा, उत्सव, नैवेद्य अभिषेक, लघुरुद्र, महारुद्र, बारमाही उत्साह, जत्रा इत्यादि होत असतात. श्रीमांगिरीशाच्या देवालयांत निरंतर ६० नंदादीप जळत असतात. वर्षाकांठीं महारुद्राभिषेक सुमारें शंभर, व लघुरुद्राभिषेक सुमारें एक सहस्र आणि खिरकोळ नैवेद्याभिषेक सुमारें सहा सहस्र होतात असें कै० गुंजीकर यांनीं लिहिलें आहे. तो लेख सन् १८८४ सालांतील आहे. त्यानंतर अलिकडे ती संख्या बरीच वाढली आहे. कोचीमध्यें श्रीव्यंकटरमणाचें मोठें देवस्थान आहे. त्या देवस्थानाचें वार्षिक

१ सरस्वती मंडल पृष्ठ ३०

उत्पन्न सुमारें एक लक्ष चौतीस हजार रुपयांचे आहे. उडपीच्या दक्षिणेस मंजेश्वर नामक क्षेत्रीं श्री नरसिंहाचें देवस्थान आहे. तेथेंहि हजारों रुपयांचें उत्पन्न आहे. या दोन्ही क्षेत्रीं सारस्वतांवांचून इतर कोणत्याहि लोकांचा प्रवेश होत नाहीं.

आणखी पुष्कळ देवस्थानांचीं वर्णनें लिहिण्याजोगीं आहेत. परंतु विस्तारभयास्तव तीं येथें दिलीं नाहींत.

सारस्वतांचे धर्माध्यक्ष (धर्मगुरु)—दक्षिणेंतील सारस्वत ब्राह्मणांत हल्लीं स्मार्त व वैष्णव असे दोन पंथ आहेत. स्मार्त सांप्रदायाच्या सारस्वतांच्या गुरूंचें मुख्य व प्राचीन संस्थान कैवल्यमठ (कवळें मठ) हें आहे. हा मठ गोमांतकामध्यें श्रीक्षेत्र कवळें येथें आहे. तेथील मठाधीश सांप्रत **श्रीमत्पूर्णानंद सरस्वती** स्वामी हे आहेत. हे मोठे कर्तबगार व बुद्धिमान असून यांनीं संस्थानाची सांपत्तिक स्थिति आपल्या आमदानींत फारच चांगली सुधारली आहे. या संस्थानचे मठ काशी, प्रयाग, ब्रह्मावर्त, नाशीक, मुंबई (वाळकेश्वर), रामेश्वर, गोकर्ण, खानापूर, सोनवडे, बेळगांव इत्यादि अनेक स्थळीं आहेत. आणि त्यांच्या व्यवस्थेकरितां, श्रीमंत गायकवाड, श्रीमंत शिंदे, श्रीमंत होळकर, श्रीमंत भोंसले वाडीकर, हेरेकर, श्री-शिवाजी महाराजांचे नातू श्रीमंत थोरले शाहूमहाराज छत्रपती, तसेंच श्रीमंत थोरले नानासाहेब पेशवे इत्यादिकांनीं गांव, जमिनी आणि रोखड नेमणुका दिल्या आहेत. कलकत्त्याचे पहिले गव्हर्नर जनरल

१ सरस्वती मंडल पृ० ३० व सारस्वत रत्नमाला पृ० ४३

२ ,, मंडल पृष्ठ सदर ३०

लॉर्ड वारन हेस्टिंग्ज् यांनीं यांच्या काशीमठाच्या खर्चासाठीं मैसोंडी, पतेरवा आणि विपर्जैपूर हे तीन गांव लाऊन दिले आहेत.

या मठाची पूर्वपीठिका अशी आढळते कीं, प्राचीनकाळीं उत्तर-हिंदुस्थानांत ' गौडपादाचार्य ' ह्मणून प्रसिद्ध यति होता. त्याचा शिष्य ' गोविंदभगत्पादपूज्य ' त्याचे शिष्य दोन. एक ' विवरणाचार्य ' व दुसरा ' शंकराचार्य ' विवरणाचार्यांनें गौडांमध्यें आपली शिष्य-परंपरा चालविली. शंकराचार्यांनीं द्रविडांमध्यें चालविली. गोमांतकां-तील मठ मठग्रामी खरा परंतु तेथील मठाध्यक्षाचें वास्तव्य प्रायः जवळच्या केळोशी कुशस्थलींतील शांतादुर्गेच्या संनिध असे. कारण-पडल्यास इकडील शिष्य तिकडे नेत आणि तिकडील इकडे आणीत. जेव्हां फिरंग्यांनीं गोमांतकांत अनर्थ मांडिला, तेव्हां तेथील मठाध्यक्ष त्रासून कांहीं दिवसांनीं काशीस निघून गेले. पुढें तेथें एकच परं-परा चालली. याप्रमाणें चार पिढ्या काशीमठांतून चालल्या. गोमांतकांत चांगली स्वस्थता झाल्यावर तेथील लोकांनीं काशींतील मठांतून श्रीमत्सच्चिदानंद सरस्वती नांवाचे शिष्य करून इकडे आणिले. आणि प्राचीनमठाचें आधिपत्य त्यांना दिलें. त्यांची समाधी वाडी संस्थानांतील कुडाळ पेठ्यांत सोनवडें येथें आहे. या धर्माध्यक्षांना " गौडपादाचार्य " हें उपपद लावण्यांत येतें.

वर शंकराचार्यांनीं द्रविडांमध्यें शिष्यपरंपरा चालविली असें लिहिलें आहे. ते शंकराचार्य, ज्यांना आद्य शंकराचार्य ह्मणतात तेच होत. त्यांचे गुरु गोविंदभगवत्पादपूज्य व गोविंदभगवत्पादाचे गुरु गौडपादाचार्य असी परंपरा आहे. गौडपादाचार्यांची उपलब्ध झालेली माहिती येथें देणें योग्य वाटतें करितां ती येथें देतो:-

श्रीगौडपादाचार्य हे मूळ गौडदेशांतील राहणारे होते. ते इसवी सनाच्या पूर्वी दोनशेंहे वर्षांतील पहिल्या विभागांत हयात होते. ते अद्वैतसिद्धांताचे मुख्य आचार्य होते. अद्वैतसिद्धांताची मूळ परंपरा अशी आहे कीं, मूळ संस्थापक श्रीनारायण, त्यांचे पुढील शिष्य श्री ब्रह्मा, वसिष्ठ, शक्ति, पराशर, व्यास आणि शुकदेव हे होत. शुकदेवांचे शिष्य हे गौडपादाचार्य होते. यांच्या पूर्वींचे गुरु श्री नारायणादि हे वैदिक व पौराणिक आहेत. करितां गौडपादाचार्य हे अद्वैत मताचे मुख्य आचार्य मानितात. हे मोठे विद्वान व ज्ञानी यति होते. यांनीं माण्डुक्योपनिषत्–कारिका, उत्तरगीताभाष्य इत्यादि ग्रंथ लिहिले आहेत. यांच्या मांण्डुक्योपनिषत् कारिकेवर आद्यशंकराचार्य यांनीं एक भाष्य लिहिलें आहे, त्यांत ती कारिका प्रमाणभूत मानिली आहे. त्या कारिकेंत यांनी ज्या मताचें प्रतिपादन केलें आहे त्यास अजातवाद ह्मणतांत.[1]

यांचे शिष्य श्रीगोविंदभगवत्पादाचार्य हे नर्मदातीरीं राहणारे होते. हे मोठे विद्वान् व अद्वैत सिद्धांताचे प्रमुख आचार्य व सिद्धयोगी होते. या कारणामुळें आद्य शंकराचार्यांनीं त्यांना गुरु केलें होतें. कित्येकांचें म्हणणें आहे कीं, गोविंदभगवत्पादाचार्य हेच पतंजलि होत. ही गोष्ट खरी असल्यास महाभाष्य त्यांनींच लिहिलें आहे असें होईल.[2]

---

१ कल्याण मासिकाचा ‘ वेदांत अंक ’ भाग ११ अंक १।२ पृ. ६३९।६४०
२ ” ” ” ६४०

श्रीगोविंदभगवत्पादांचे शिष्य श्री. आद्यशंकराचार्य व त्यांचे शिष्य श्री. सुरेश्वराचार्य, ही परंपरा श्री. आठल्ये माजी 'केरळकोकीळ' मासिकाचे एडिटर यांनीं आद्यशंकराचार्यांच्या चरित्रांत लिहिली आहे व आद्यशंकराचार्यांनां गंगेच्या वाळवंटांत श्री गौडपादाचार्यांचें दर्शन झालें व श्रीगौडपादाचार्यांनीं त्यांस आशिर्वाद दिल्याचेंहि त्यांत लिहिलें आहे.

चित्रापूर मठ—हा दुसरा स्मार्त मठ गोमांतकाच्या दक्षिणेस कारवार जिल्ह्यांत भटकळ पेठ्या नजीक शिराळी येथें आहे. येथील संस्थेचे मूळ उत्पादक श्रीमत् परिज्ञानाश्रम यतिवर्य हे होत. माजी मठाधीश पूज्यपाद श्री मत्पांडुरंगाश्रम हे मोठे अधिकारी स्वामी नुक्तेच होऊन गेले. यांचे शिष्य आनंदाश्रम हे सध्यां गादीवर आहेत. यांच्या मूळस्वामीची समाधी श्री क्षेत्र गोकर्ण येथें कोटीतीर्थांनजीक भंडिकेरी मठांत आहे. सध्यांचे स्वामी हे ९ वे आहेत.

श्री गोकर्णमठ— वैष्णवपंथी मठांचीं संस्थानें दोन आहेत. एक गोकर्ण मठ व दुसरें काशी मठ. गोकर्ण मठाचे विद्यमान धर्माध्यक्ष श्रीमत् इंदिराकांत स्वामी हे काणकोण नजीक ४ मैलांवर पर्वत-काली ऊर्फ पर्तगाळ येथें आपल्या मठांत असतात. यांचे प्रथम शिष्य श्रीमत् नरहरीतीर्थ हे समाधिस्त झाल्यामुळें दुसरे शिष्य कमलाकांत तीर्थ हे श्रीगुरुस्वामींच्या देखरेखीखालीं सर्व संस्थानची व्यवस्था पहात आहेत. श्रीमत् इंदिराकांत तीर्थ हे संस्कृतांत व वेदांतांत बरेच अधिकारी आहेत. यांनीं मराठी अर्थासह लिहिलेली श्रीमद्भगवद्गीता

१ आठलेकृत श्रीशंकराचार्य चरित्र पृ० १५८

आणि सार्थ सुनीति-भागवत अशीं विद्वमान्य दोन पुस्तकें श्री. द. गो. सडेकर प्रो. धनंजय प्रेस खानापूर यांनी छापून प्रसिद्ध केलीं आहेत.

श्रीइंदिराकान्ततीर्थांचे परमगुरु श्रीमत् **पूर्णप्रज्ञतीर्थ** हे जाडे विद्वान होऊन गेले. यांस सुधा पंडित असें ह्मणत. हे यात्रेनिमित्य उत्तर खंडांत गेले असतां काशी येथील पंडितांच्या आमंत्रणावरून आपल्या वैभवासहीत सभामंडपांत गेले असतां तेथें आपल्या पांडित्य-रूप चंद्रिकेचा प्रकाश पाडून सर्व सभासदांस चकित करिते झाले. त्यांनीं यांची पूजा करून विजयपत्रही दिलें. त्यानंतर पुणे येथें मोठमोठ्या विद्वान शास्त्र्यांनीं त्यांची सत्कारपूर्वक पाद्यपूजा केली व त्यांचें अनेक शास्त्रांतील अत्यंत कौशल्य पाहून व काशिस्थ पंडि-तांनीं दिलेलें बहुमानपत्रही पाहून त्यांस पुण्याच्या पंडितांनींही बहु-मानपत्र दिलें. पंडित कुमठा नारायणाचार्य यांचा श्रीगुरुपरम्परामृत ग्रंथ पाहिला असतां सर्व कळेल.

श्रीकाशीमठ—श्रीगोकर्णमठाधीश श्रीरघुचंद्रतीर्थांनीं उडुपींतील सांप्रदायाप्रमाणें आपणही पर्तगाळी येथें आठ मठ स्थापन करण्याच्या हेतूनें गोकर्ण येथें येऊन शिष्यांस आश्रम देण्याचा विचार केला. चार शिष्यांस उपदेश देऊन पुढची तजवीज करितात न करितात तोंच त्यांतील एक शिष्य पंचत्व पावला. असे पांच शिष्य गेल्यावर श्रीलक्ष्मीनारायणतीर्थ, व्यासतीर्थ व संयमींद्रतीर्थ असे तिघे शिष्य राहिले. त्यांपैकीं संयमींद्रतीर्थ हे काशीस गेले असतां तिकडे तेथील राजानें त्यांचा चांगला सत्कार केला व ते तिकडेच मठ करून

राहिले. त्या नंतर त्यांची परंपराही वाढली. कोचीलाही यांचा मोठा मठ असल्यामुळें कोणी कोणी कोचीमठ असेंही ह्मणतात. श्रीमत् भुवनेंद्र तीर्थ, श्रीमत् वरदेंद्रतीर्थ वगैरे जाडया वैभवशाली व कीर्तिमान् मूर्ती या मठांत होऊन गेल्या आहेत. श्रीमत् वरदेंद्रतीर्थांचें वृंदावन मुंबई येथें वाळकेश्वरीं बाणगंगेच्या नजीक त्यांच्याच मठांत आहे. हल्लींचे श्रीपाद श्रीमत्सुकृतींद्रतीर्थ हे असून त्यांचाही यशोदुंदुभी दूरवर गाजत आहे. श्रीगुरुपरम्परामृत ग्रंथ पृष्ठ ४४ श्लोक १०--११ पाहिले असतां सर्व कळेल.

दाभोलीमठ-कुडाळदेशकर गौडब्राह्मणांचा वेंगुर्लेनजीक दाभोली येथें एक मठ आहे. श्रीशान्ताश्रमाचे शिष्य श्रीमत् ' विमलानंद ' हे आहेत. या मठाची शिष्यशाखा गोमंतक व महाराष्ट्र वगैरे ठिकाणीं बरीच आहे.

सातर्डामठ—पेडणेकर गौडसारस्वतब्राह्मणांचा मठ सावंतवाडी संस्थानपैकीं पोष्ट आरवंदे नजीक सातर्डें येथें आहे.

या सर्व मठांचे अध्यक्ष राजसंन्याशी विद्वान आहेत. हे सर्व मठाधीश आपआपल्या समाजावर गुरुत्व चालवितात. दक्षिणेंतील द्रविड शंकराचार्य, किंवा द्रविड मध्वाचार्य यांचा सारस्वत ब्राह्मणांवर अधिकार चालत नाहीं. याचें कारण यांतील बहुतेक संस्थानें अति प्राचीन मठांच्या शाखा आहेत. त्यामुळें असें होणें स्वाभाविक आहे. यांतील बहुतेक मठांत वेदाध्ययनाच्या पाठशाळा पूर्वी होत्या व अद्यापिही कित्येक मठांत या पाठशाळा असून वेदाध्ययन करणारे विद्यार्थी तेथें आढळतात. परंतु एकंदरींत अनेक कारणां-

मुळे वेदाध्ययन करणाऱ्यांची संख्या सर्वच ठिकाणीं घटत चालली आहे. त्यामानानें प्रत्येक मठांतही ती संख्या कमी होत चालली आहे. ईश्वरकृपेनें ती संख्या पूर्ववत वाढत जावो, अशी परमेश्वराकडे व त्या त्या संस्थानदेवतेकडे प्रार्थना करून हें प्रकरण पुरें करितों.

प्रकरण नववें.

सारस्वत ब्राम्हणासंबंधाची इतर त्रोटक माहिती.

सारस्वत ब्राह्मणांच्या इतिहासाचें संशोधन चालूं असतां, या पुस्तकाच्या मागील आठ प्रकरणांत न आलेली अशी कांहीं कांहीं त्रोटक माहिती आढळली. ती या पुस्तकांत देणें भाग आहे. कारण इतिहास-स्वरूपाची ती माहिती आहे. परंतु त्यांतील प्रत्येक वर्णनासंबंधाची आमूलाग्र हाकिकत लिहिण्या इतकी साधन-सामुग्री प्रस्तुत लेखकापाशीं नाहीं. व त्यांतील बरींच वर्णनें संस्कृत, इंग्रजी, हिंदी इत्यादि इतर भाषेंत मोठमोठ्या ग्रंथांत नामांकीत विद्वानांनीं लिहिलेलीं आहेत. त्यांचा अनुवाद यथायोग्यरीतीनें लिहिण्याइतकी योग्यताहि प्रस्तुत लेखकाची नाहीं. तसेंच या लहा-नशा पुस्तकांत ती माहिती साग्र देणेंही अशक्य आहे. करितां त्यांतील त्रोटक त्रोटक माहिती येथें देण्याचें योजिलें आहे. साग्र इतिहास लिहिणारा, भावी लेखक सुदैवानें पुढें आल्यास त्यास (अल्प अंशानें कां होईना) कांहीं मदत होईल या आशेनें ती माहिती येथें संग्रहित करितों:—

१ भारतवर्षांतील आर्यांचें वसतिस्थान-वेदकाळीं आर्यांची वस्ति उत्तर हिंदुस्थानांतील 'सप्त-सिंधु-देश' या प्रदेशांत होती. या प्रदेशाचा उल्लेख ऋग्वेदांत कांहीं कांहीं ठिकाणीं आला आहे. (अवासृजः सर्तवे सप्तसिंधून् ॥ ऋग्वेद १-३२-१२) हा सप्त-सिंधु देश ह्मणजे (१) गंगा, (२) यमुना, (३) सरस्वती, (४) शतद्रु (सतलज), (५) परुष्णी (रावी), (६) चंद्रभागा (चिनाब) आणि (७) सिंधु या नद्यांच्या आसपास असलेला व त्या नद्यांचे प्रवाह ज्या प्रदेशाचे पोषक आहेत, तो प्रदेश होय. आर्यावर्ताची व्याख्या पूर्वींच्या प्रकरणांत लिहिली आहेच. व प्रकरण २ यांत मोहेंजो-दारो व हरप्पा या ठिकाणीं सांपडलेल्या आर्यसंस्कृतीच्या अवशेषांची माहिती दिली आहे. तीं शहरें अनुक्रमें सिंधु व शतद्रु नदीच्याकांठीं आहेत हें वाचकांस कळून आलेंच आहे.

२ मानवीप्राण्यांचें उत्पत्तीस्थान—जगदुत्पत्तिकालीं मानवी प्रजा, दश महर्षि इत्यादिकांची उत्पत्ति ब्रह्मावर्त देशांत झाल्याबद्दल महाभारत, श्रीमद्भागवत इत्यादि ग्रंथांतील आधार या पुस्तकाचें प्रकरण २ यांत दिले आहेत परंतु महाभारत, भागवतादि ग्रंथांत ते उल्लेख मूळ कोणत्या ग्रंथधारें लिहिले असावे ? असा प्रश्न उत्पन्न होतो. त्याचें उत्तर ऋग्वेदांत आहे. ऋग्वेद मंडल १।२।३।४।६।७ यांत सरस्वती नदीचें महत्व वर्णिलेलें आहे. त्यांत मानवी प्राण्यांची प्रथम उत्पत्ति सरस्वती नदीच्या प्रदेशांत झाली असें वर्णन आहे. वर सप्तसिंधु-नद्या कोणत्या हें सांगितलें आहे, त्या सातही नद्यांमध्यें सरस्वती ही

१ आर्योंका मूलस्थान पृष्ठ १९

केंद्रस्थानी असून तिची योग्यता इतर सर्व नद्यांपेक्षां अधिक आहे असें दर्शविलें आहे. त्यांत (सरस्वती सप्तथी सिंधुमाता) (ऋ.वे. मंडल ७ –३६–६) ह्मणजे "सरस्वती इतर नद्यांची माता व त्यांतील सातवी आहे." (ते विश्वा सरस्वति श्रितायुंषि देव्याम्) (ऋ. वे. २–४१–१७) " हे सरस्वती! सर्व जीवन तुझ्या मध्यें आहे. तूं देवी आहेस " (उताक्षिति भ्योऽ वनीर विन्दः) (ऋ.वे ६–६१–३) हे सरस्वती " तूं मनुष्यप्राण्यांना भूमि उत्पन्न करून दिली आहेस." इतकेंच नव्हें तर " आमच्या आहाराकरितां दुधा प्रमाणें जल उत्पन्न केलें आहेस (ऋ. वे. ६–६१–३ व ६–६१–१४) (विषमेभ्यो अश्रवः) (पयसा मा न आधक्) इत्यादि उल्लेख आहेत. (२–४१–१६) यांत अंबितमा (श्रेष्ठ माता), नदितमा (श्रेष्ठ नदी), देवीतमा (श्रेष्ठदेवी), ह्मटलें आहे. तो उल्लेख या पुस्तकांतील प्रकरण १ यांत आलाच आहे. वर लिहिलेली ऋ. वे. तील ऋ. चा ६–६१–१४ ही बरीच महत्त्वाची वाटल्यावरून ती पूर्ण येथें उतरून घेतों.

" सरस्वत्यभि नो नेषि वस्यो मा पस्फरीः पयसा मा न आधक् ।
जषस्व नः सख्यावेश्या च मा त्वक्षेत्राण्यरणानि गन्मः ॥ "

अर्थः—" हे सरस्वती! तूं मला मोठे (संपत्ति–) कोश प्राप्त करून दे. तुझें दुग्ध (जल) पान करूं देण्यास इनकार करूं नको. आणि तुझ्या सांन्निध्यांतून मला अलग करूं नको. तसेंच तुझ्या प्रदेशापासून दूर देशास मला जाऊं देऊं नको. तुझ्या मातृवात्सल्याचें सौख्य चिरकाल प्राप्त करून दे. " ऋ० वे०

२-४१-१९ यांतही " हे, सरस्वती! सर्व जीवन तुझ्यामध्यें एकत्र आहे " असें म्हटलें आहे. या प्रमाणें थोडक्यांत या ऋचांचा येथें संग्रह केला आहे. वर जीं ऋग्वेदमंडलें लिहिलीं आहेत, त्यांतील सर्व ऋचांचें एकत्र वाचन व मनन केलें असतां भारतवर्षांत मानवी प्राण्यांची जीवनशक्ती प्रथम सरस्वतीनदीच्या प्रदेशांत प्रादुर्भूत झाली होती असें मानावें लागतें.

अर्वाचीन पाश्चिमात्य भूगर्भशास्त्राच्या कांहीं तत्ववेत्त्यांनीं त्या शास्त्रासंबंधानें जे शोध लाविले व त्यांच्या स्वतःच्या अनुभवावरून जीं तत्वें त्यांना आढळून आलीं; तीं त्यांनीं आपआपल्या ग्रंथांत नमूद करून ठेविलीं आहेत. त्या तत्वांवरूनही वरील विधानांची सत्यता पटून येते. श्री. नारायणराव भवानराव पावगी–पुणें यांनीं " दि आर्यावर्टिक होम ॲन्ड दि आर्यन क्रेडल इन दि सप्तसिंधूज् " या नांवाचें इंग्रजी पुस्तक लिहिलें आहे. त्या पुस्तकाचा ओझरता उल्लेख या पुस्तकाचें प्रकरण दुसरें यांत केला आहे. त्या पुस्तकांत त्या तत्ववेत्त्यांचीं मतें व त्यांच्या ग्रंथांतील आधार खुलासेवार दिले आहेत. त्यावरून या विषयाचा बराच खुलासा होतो. अमेरिकेचे प्रसिद्ध भूगर्भशास्त्रज्ञ मि. डॉन व युरोपियन भूगर्भशास्त्रज्ञ मेसर्स लैफवर्थ, मेडलीकट आणि ब्लैंफर्ड वगैरे विद्वान लोकांच्या ग्रंथांतील आधार श्री. पावगी यांनीं आपल्या बुकांत दिले आहेत. वरील तत्ववेत्त्यांपैकीं मेसर्स मेडलीकट व ब्लैंफर्ड यांना भारतवर्षांतील भूगर्भशास्त्राच्या शोधाच्या कामगिरीवर सरकारानें नेमिलें होतें. त्या सर्वांच्या लेखांवरून तृतीयकालाच्या युगांतील (शिवालीक) युगांतील भूमि-

गत द्रव्यें सरस्वती नदीच्या प्रदेशांत आढळून आलीं आहेत. शिवालीक युग म्हणजे वनस्पति व मनुष्यप्राणी यांच्या उत्पत्तीचें युग होय असें त्यांनीं लिहिलें आहे. त्यांतही मि. लेफवर्थ यांचा लेख असा आहे कीं " तृतीय कालीन युगाच्या द्वितीय भागाचीं (शिवालीक युगाचीं खनिज द्रव्यें भारत वर्षांत आहेत. त्यांची उत्पत्ति नद्यांपासून आहे. नद्यांनीं तीं द्रव्यें आपल्या प्रवाहांतून हिमालय पर्वतापाशीं जमा केलीं व त्या युगांत वनस्पति व मनुष्यप्राणी उत्पन्न झाले. मि० डॉन यांचें मत " प्राच्य देशांतील एक केंद्रस्थान प्राचीन कालीं उन्नतीच्या शिखरास पोहोंचलें होतें, त्याच स्थानीं मनुष्यांची प्रथम उत्पत्ति झाली आहे असें दिसतें. तें केंद्रस्थान आर्यावर्त होय " इत्यादि प्रमाणांवरूनही वरील विधान निश्चित होतें. श्री. पावगी यांच्या वरील बुकाचा अनुवाद श्री. देवीदत्त शुक्ल यांनीं आपल्या " आर्योंका--मूलस्थान " (लक्ष्मी--वेंकटेश्वर प्रेस--मुंबई) या हिंदी पुस्तकांत लिहिला आहे. श्री. पावगी यांनीं मराठी भाषेंतही " सप्त सिंधुप्रांत अथवा आर्यावर्तांतील आमची जन्मभूमि आणि उत्तरध्रुवाकडील आमच्या वसाहती " या नांवाचें पुस्तक लिहिलें आहे. या विषयाची साग्र माहिती करून घेण्याची असल्यास त्यांतील एखादें पुस्तक पाहावें. सरस्वती नदीचें उगमस्थान ' शिवालीक ' पहाडांत आहे असें या पुस्तकाचें प्रकरण १ यांत सांगितलेंच आहे. वरील वर्णनावरून पाहतां त्या पर्वतास ' शिवालीक ' पहाड हें नांव वरील कारणामुळें पाश्चात्य विद्वानांनीं दिलें असावें, असें वाटतें. ' हिंदी–

१ आर्योंका मूलस्थान अध्याय ३

सुमेरीसंस्कृति ' या बुकांत श्री. पावगी यांच्या वरील पुस्तकांतील मतावर कांहीं आक्षेप घेतले आहेत. परंतु भूगर्भशास्त्राचीं जीं प्रमाणें त्यांत दिलीं आहेत. तीं कशीं चुकीचीं आहेत हें दाखविलें नाहीं करितां ते आक्षेप सार्थ आहेत असें म्हणतां येत नाहीं-असो.

शिवालीक पहाड सिमल्याजवळ आहे. श्री. योगेंद्रनाथ भट्टाचार्यजी प्रेसिडेंट संस्कृत कॉलेज-नदिया यांनीं सारस्वत-ब्राम्हणांचें मूल-स्थान सिमल्यापासून ठाणेश्वरापर्यंतचा प्रदेश असें लिहिलें आहे. त्यांचा लेख :—

The Saraswat Brahmins derive their name from the sacred river Saraswati, which at very remote period of antiguity was a very noble river from its source near the sanitarium of Simla to Thaneshwar in the Kurukshatra. [H. C. S. page 55.)

यांत सिमल्यापासून ठाणेश्वरापर्यंत सारस्वत देशाची मर्यादा ध्वनित-केली आहे. परंतु पुढें ' विनशन ' या तीर्थस्थानापर्यंत ' सारस्वत ' देशाचें वर्णन महाभारतांत आहे हें या पुस्तकाचें प्रकरण १ यांत दाखविलेंच आहे.

४ दक्षिणेंतील सारस्वत ब्राम्हणांची वस्ती कै. गुंजीकर यांनीं इ. स. १८८४ सालीं " सरस्वती मंडल " हें पुस्तक लिहिलें, त्यावेळीं दक्षिणेंतील सारस्वत ब्राम्हणांची वस्ती मुंबई, वसई, रत्नागिरी, माल-वण, सावंतवाडी, वेंगुर्लें, पणजी, कुंभारजुवें, म्हापसें, सांखळी.

---

१ आर्योंका मूलस्थान अध्याय ३ पृष्ठे ११४—११५

डिचोली, कुडाळी, अंत्रूज, काणकोण, सुर्पे, हल्याळ, कारवार, सदाशिवगड, होनावर, गोकर्ण, मंगळूर कानानूर, त्रिचनापल्ली, अळपळ्ळी, कोची, मंजेश्वर, (महाराष्ट्रांत,) बेळगांव, शहापूर, खानापूर, नंदगड, जांबोटी, चंदगड, आजरें, कोल्हापूर, इसलामपूर, बागणी, भिलवडी, इत्यादि ठिकाणीं पुष्कळ आहे, असें त्यांनी लिहिलें आहे. त्यानंतर आजपर्यंत गेल्या ५२ वर्षांच्या कालावधींत सारस्वत ब्राम्हणांची संख्या वाढत जाऊन दक्षिणेतील सर्व प्रांतांत. त्यांची स्थायीक वस्ती कमिजास्त प्रमाणांत झालेली आहे. नोकरी व इतर धंदे या कारणांमुळें कित्येक पुरुष आपआपल्या मूळ गांवांतून दुसऱ्या शहरीं गेले, तेथें त्यांनीं स्वतःच्या मालकीचीं घरें व बंगले बांधिले, जमिनीं मिळविल्या, अशा प्रकारें बहुतेक हिंदुस्थानभर सर्व प्रांतांत त्यांची स्थायीक वस्ती झाली आहे. करितां आतां अमुक अमुक प्रांतांत त्यांची वस्ती आहे, असें लिहिण्याचें कारण राहिलें नाहीं. —

५ दक्षिणेंतील गौड सारस्वत ब्राह्मणांचीं उपनांवें

दक्षिणेंतील सारस्वत ब्राह्मणांचीं उपनांवें जीं माझ्या माहितींतील आहेत तीं व जीं माझ्या वाचनांत आढळलीं तीं येथें लिहिलीं आहेत. (गांवावरून जीं नांवें आहेत तीं घेतलीं नाहींत.)

राजाध्यक्ष, भेंडे, लाड, भांडारी, कैसरे, कावडी, ब्रह्मे, नायक, वागळे, तेलंग, भिसे, केंकरे, घमे, धुमे, दळवी, गडे, पै, वैद्य, रेगे, वर्दे, दणाईत, आंबे, डांगी, कोलबुले, महात्मे, गुळगुळे, गायतोंडे, रणशूर, कानविंदे, पिंगे, काणे, कर्णिक, अठवल, दाणी, कीर,

काकडे, कुडव, गोडांबे, घोडे, बरड, यार्दी, सुरण, सुरसुरे, ढोंक, सांकव, मोर, सिनारी, गिंडे, हेगडे, केणी, कापडी, कीर्तनी, रामायणी, महाले, भले, खोटे, सजगिरे, भिसे, बोणसे, पोतदार, वैद्य, निरांजन, डांगर, सोवनी, सोहनी, पिंगळ, पथकी, पंडित, शेणवई, भट, आचार्य, साखरदांडे, कोटनीस, मानगे, बिचू, बुडबुडे, चुबे, प्रभु (परब), कामत, दोंदे, काबाडी, आचमानी, जोशी, महाजन, गौड, सबनीस, फडनीस, चिटनीस, कुलकर्णी, देशपांडे, वेलंगी, नाबर, सांबारी, पैप्रभु, पैकामत, राव, ठाकूर, नाडकर्णी, दिवेकर, अमलाडी, इडगुंजी, उद्यावर, करंडे, कर्नाटकी, कामथ, कायकिणी, कौशिक, केशकामत, गंगोळी, गांवसकर, जुवळे, घोळबा, डुकले, डोंगरकेरी, ठेंगे, बक्षी, किनरे, दडकर, दलाल, घोंड, नाडिग, नायमपल्ली, पाखाडे, पाटील, फेणाणे, पोतनीस, बाळिगा, भद्री, शेटये, सगुण, सामंत, सोंडे, हेब्बळे, हेम्मडी, हत्यंगडी, मंत्री, भरणें, मुगवे, वर्टी, शिरूर, टेंभे, चुंबडे, कोठारी, घांटे, बाडी, तुडती, हरपती, हवालदार, स्थळे, थळी, सुखटणकर (सुंठणकर), धोंदे, झणकर, सिंसाणी, हेंदे, जाख, मित्र, सांबारे, भांगले, मुजुमदार, कोप्पीकर, विर्जिनकर, मोर्डेकर, लवंदे, देसाई, चंदावरकर, भुजले, मुर्डेश्वर, सिनकर, बेट्टाबेट, वायंगणकर, कालेलकर, भंकीकर, घारसे, गुळगुळे, भोबे, बैंदूर, माविनकुर्वे, खंबतकोन, शानभाग, मुकादम, नगरकट्टी, तोरणे, बिजूर, रामाणी, अग्नि, लिंग्रस, कौसंबी, महात्मे, घुर्ये, मोदी, इंगळे, पेठकर, मुडबिद्रि, उद्यावर, उभयकर, पडबिद्रि, इत्यादि इत्यादि.

६ दक्षिणेंतील गौड सारस्वत ब्राह्मणांची भाषा.

या समाजाची सामान्य भाषा मराठी आहे; परंतु महाराष्ट्र, कर्नाटक, ह्मैसूर, मलबार, गोंवें, कानडा जिल्हा व कोंकणांतील इतर प्रांत यांत या समाजाची स्थिर वस्ती होऊन बराच काल लोटला असल्यानें त्या त्या प्रांतांतील भाषांशीं त्यांची भाषा समरस होऊन गेली आहे. ह्या कारणानें त्यांच्या बोलण्यांतील भाषा वेग-वेगळ्या वाटतात. उदाहरणार्थ कोंकणांतील लोक मराठीहि बोलतात व आपआपसांत कोंकणी भाषाही बोलतात. कोंकणी भाषा पाहिली तरी गोंव्याकडील कोंकणी व सावंतवाडी, वेंगुर्ला या बाजूची कोंकणी यांत फरक दिसतो. तसेंच कानडा जिल्हा व ह्मैसूर संस्थान यांत कानडी भाषा व लिपी चालू आहे; परंतु त्या दोनींहि कानडी भाषांत बराच फरक वाटतो असें. होण्याचें कारण त्या त्या प्रांतांत त्यांची वस्ती झाल्या नंतर तेथील इतर रहिवाशांशीं व उद्योगधंद्यामुळें ज्या इतर लोकांशीं त्यांचें दळणवळण व व्यवहार होत गेले त्या इतर लोकांच्या भाषेंतील शब्द त्यांच्या भाषेंत मिश्र होत गेले व स्वाभाविकरीतीनें अपभ्रंशही झाले. तथापि त्यांची सामान्य भाषा मराठी आहे. आमचे प्राचीन ग्रंथ संस्कृत भाषेंत आहेत. उत्तरहिंदु-स्थानांत वेद, स्मृति, पुराणें इत्यादि ग्रंथ लिहिले गेले. त्या वेळीं तेथें प्राकृत भाषाहि विद्यमान होती असें दिसून येतें. कारण त्या ग्रंथांत संस्कृत भाषेशिवाय प्राकृत शब्दांचाहि उपयोग केलेला आढळतो. संस्कृत नाटकांतहि कित्येक पात्रांच्या तोंडीं प्राकृत भाषा घातलेली आढळते. श्रीमद्भगवद्गीतेंतहि कित्येक श्लोकांत प्राकृत शब्द आढळ-तात. उदाहरणार्थ—

सुख दुःखे समेकृत्वा लाभालाभौ जयाजयौ ॥ अ० २ ॥३८॥
संभावितस्य चाकीर्तिर्मरणादतिरिच्यते ॥ अ० २ ॥ ३४ ॥

यांतील सुखदुःख, लाभ, जय, संभावित, कीर्ति, (अकीर्ति या शब्दांतील) मरण इत्यादि शब्द प्राकृत आहेत हें उघड आहे. तसेंच संस्कृत ग्रंथरचना झाल्यावेळीं सर्व समाज संस्कृत बोलणारा व लिहिणारा होता असें मानणें अशक्य आहे. सामान्यजनता, स्त्रिया यांची भाषा प्राकृत असणें स्वाभाविक आहे. भगवद्गीतेंत असे शब्द बरेच आढळतात. भगवद्गीता सांगितली तो काल सुमारें पांच हजार वर्षांपूर्वींचा आहे, असें अलिकडील विद्वानांचें मत आहे व ती कुरुक्षेत्र भूमीवर सांगण्यांत आली. अर्थात त्या देशांत त्यावेळीं प्राकृत भाषा प्रचलित होती, असें मानावें लागतें. ती प्राकृत भाषा दक्षिणेंत हल्लीं कांहीं थोड्या फरकानें, ' मराठी ' या स्वरूपांत चालूं आहे. ह्यावरून उत्तरेकडील सारस्वत ब्राह्मणसमाजाबरोबर ती भाषा दक्षिणेंत आली असावी असें अनुमान होतें. कै० सर रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांनीं दक्षिण हिंदुस्थानाचा इतिहास लिहिला आहे. त्यांत देशी भाषेसंबंधानें उल्लेख आहे. त्यापुरता उतारा येथें देतों—

" १५ भारतवर्षीय— आर्यांनीं सर्व देशांच्या मागून महाराष्ट्र नांवाचा मुलूख जिंकून व्यापिला, तथापि उत्तरेकडील देशांसारखाच महाराष्ट्रदेशावरही त्यांनीं आपला अंमल पुरा बसविला होता. + + + + + आर्यांनीं महाराष्ट्र देशावर आपला अंमल पुरा बसविला ही गोष्ट ह्या देशांतील चालू भाषेवरून उन्नीत होते. "

" १६ जितक्या मानानें, उत्तरहिंदुस्थानांतील हल्लींच्या देशी

भाषा संस्कृत भाषालतेचीं प्रतानें किंवा ताणे आहेत, तितक्याच मानानें हल्लींची मराठी भाषाही त्याच लतेचें प्रतान आहे. ह्या सर्व देशी भाषांशीं संस्कृत भाषेचें प्रत्यक्ष जननीचें नातें नाहीं. त्या तिच्या नाती आहेत. मधल्या पिढींतील त्यांच्या माता ह्मटल्या ह्मणजे, महाराष्ट्री, शौरसेनी, मागधी व तशीच, त्या तिहींहून परम आद्य जी, पाली ती- ह्या भाषा होत. ह्या सर्व आद्यभाषांत संस्कृत शब्दांचे अपभ्रंश विपुल दृष्टीस पडतात परंतु ते अपभ्रंश झाले तरी अद्वातद्वा नाहींत. थोडया सामान्य नियमांनीं त्यांचें बंधारण करितां येतें. [१]"

या विवेचनावरून सारस्वत ब्राह्मणांनीं उत्तर हिंदुस्थानांतील प्राकृत भाषा महाराष्ट्रांत व कोंकण प्रांतांत आणिली असावी. या विधानास बळकटी येते. आतां वरील लेखांत हल्लीं महाराष्ट्रांत चालू असलेल्या मराठी भाषेची माता 'महाराष्ट्री' व तिची माता 'संस्कृत' भाषा आहे. असें मानिलें आहे तेथें महाराष्ट्री भाषेची माता उत्तरेंतील प्राकृतही आहे व तिची माता संस्कृत भाषा आहे असें पाहिजे असें वाटतें कारण उत्तरेंतील मंडळी दक्षिणेंत आल्यावर त्यांच्या 'प्राकृत' भाषेपासून 'महाराष्ट्री' भाषेची उत्पत्ती दिसते. महाराष्ट्र देशांस महाराष्ट्र हें नांव ख्रिस्ती सनाचीं आद्यशतकें आहेत त्यांत (इ. स. १००।२००) या शतकांत प्राप्त झालें होतें असें वरील पुस्तकांत प्रतिपादन केलें आहे. अर्थात त्यानंतर तेथील भाषेस 'महाराष्ट्री' हें नांव पडलें असावें. असो.

---

१ दख्खनचा (दक्षिणेचा) प्राचीन इतिहास पृष्ठ ८

२ " " " १८

७ शिक्षण प्रसार—सारस्वत ह्मणजे एका अर्थानें सरस्वतीदेवीचे पुत्र होत. अर्थांत त्या जननीच्या कृपेनें त्या समाजांत शिक्षणप्रसार मोठा असणें, हें स्वाभाविक आहे. अति प्राचीन कालापासून सरस्वतीदेवीचें मूलस्थान सारस्वत देश, हें या इतिहासावरून दिसून आलेंच आहे. (तो देश ब्रह्मदेवाचें वसतिस्थान आहे. सरस्वती ही ब्रह्म-कुमारी आहे. अर्थांत तो देश सरस्वतीचें माहेर-घर आहे.) यामुळें अति प्राचीन कालीं क्षत्रिय राजांचे गुरू व सल्लागार, सहाय्यकर्ते तसेंच बहुतेक गूढशास्त्रांचे संशोधक इत्यादि बुद्धिमत्तेचीं कामें या समाजांतील पुरुषांनीं केलीं आहेत. त्यानंतर मुसलमान बादशहांच्या कारकीर्दींतही प्रधान, मंत्री, मुत्सद्दी, सल्लागार, अम्मलदार, कारकून, प्रसंगीं तढवय्ये इत्यादि बुद्धिमत्तेचीं व शूरत्वाचीं कामें त्यांनीं केलीं असल्याची प्रसिद्धी आहेच. अलिकडे ब्रिटिश अंमल सुरू झाल्यानंतर जी शिक्षणपद्धति सुरू झाली, त्या शिक्षणपद्धतींतही त्यांनीं आपल्या बुद्धिमत्तेचा प्रभाव सर्व जनतेस पटवून दिला आहे. व दिवसेंदिवस जास्त जास्त प्रमाणांत तो पटवून देत आहेत. समाजांतील अनेक उदार, धनिक सद्गृहस्थांच्या मोठमोठ्या देणग्या, लहान मोठ्या संस्था, पुष्कळ थोर थोर गृहस्थांचे सतत प्रयत्न, इत्यादि कारणानें शिक्षणाचा फैलाव होत आहे. युनिव्हर्सिटीच्या व परदेशांतील उच्चशिक्षणाच्या परिक्षांचे रिझल्ट व मोठमोठ्या सरकारी हुद्यांवरील नेमणुका, तसेंच बॅरिस्टर, सॉलिसिटर, वकील, डॉक्टर इत्यादि धंदे करणारे लोक यांचें सूक्ष्म निरिक्षण केल्यास या समाजांतील लोकांची शिक्षणाच्या बाबतींत बरीच

प्रगति झाली असल्याचें दिसून येईल. " देशस्थ ऋग्वेदी-ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्था-पुणे शहर" या संस्थेच्या एका त्रैमासिक समाचारांत लिहिलेलें एक विधान येथें देतों:-" सारस्वतांमधील शिक्षण-प्रसार वरील आंकड्यांवरून कमी दिसतो. तो कसा कमी हें सांगतां येत नाहीं. वास्तविक त्या वर्गांत इंग्लिश शिक्षणाचें प्रमाण जास्त असावें असें दिसतें. या वर्गांत जेव्हढे (I. C. S.) व जजेस इत्यादि आहेत, तेव्हढे दुसऱ्या कोणत्याहि वर्गांत नाहींत. कदाचित कारवार, बेळगांव, सावंतवाडी, रत्नागिरी, इकडे असलेल्या संख्येंत हें प्रमाण कमी असेल [1] " सन १९३१ सालच्या खानेसुमारीच्या आंकड्यांवरून सदर त्रैमासिक समाचाराच्या संपादकांनीं वरील उल्लेख केला आहे. त्या आंकड्यांसंबंधानें त्यांना एक शंका उत्पन्न झाली ती त्यांनीं तेथें व्यक्त केली आहे.

संयुक्त गौड सारस्वत ब्राह्मणपरिषदेचें नववें अधिवेशन आक्टोबर १९३५ या महिन्यांत मुंबई येथें झाल्यावेळीं अध्यक्ष श्री. बा. सी. कामत बी ए. एम्. एल्. सी. याचें सुश्राव्य भाषण झालें, त्यांत सदर खानेसुमारीच्या आंकड्यांचा तुलनात्मकदृष्ट्या विचार केला आहे[2]. त्यांतहि साक्षरता दरहजारीं प्रमाण दिल्याठिकाणीं 'खानेसुमारी बिनचूक झाली असावी असें धरल्यास वरील क्रमांक विस्मय उत्पन्न करितात' असें ह्मटलें आहे. ह्मणजे साक्षरतेच्या संबंधानें त्यांतील आंकडे संशयास्पद आहेत. तथापि, उच्च शिक्ष-

---

१ सदर संस्थेचा त्रै० समाचार वर्ष ४ थें अंक २ रा पृष्ठ ७

२ महाराष्ट्र सारस्वत सप्टेंबर आक्टोबरचा अंक १९३५

णांतील पदवीधर व देशाच्या कारभारांत स्वतःच्या बुद्धिमत्तेनें व गुणांनीं उच्चस्थानी पोहोंचलेले सारस्वत यांची संख्या त्यांनी सांगितली आहे, तिचा उतारा या खालीं देतों. त्यावरून वाचकांस या विषयाची माहिती कळून येईल.

ज्ञातींतील		संख्या
I. C. S.	(आय्. सी. एस्.) २२ हल्लीं	२४
	(मंगलोर, मद्रासकडीलसुद्धां.)	
I. M. S....	(आय्. एम्. एस्.)	३
M. D.	(एम्. डी.)	११
F. R. C. S.	(एफ्. आर. सी. एस्.)	५
M. S.	(एम्. एस्.)	३
M. R. C. P.....	(एम्. आर. सी. पी)	३
D. P. H. D. T. M.	(डी.पी.एच्.डी.टी.एम्.)	५
D. Sc	(डी. एस्सी.)	४
Ph. D.	(पीएच्. डी.)	२०
Wranglers including 2 B-Star Wranglers		3

वगैरे देशाच्या कारभारांत उच्चस्थानीं असलेले:—मुंबईचे मेयर १, हायकोर्ट जज्ज (संस्थानांतील धरून) ९, युनि० व्हा० चान्सेलर १, कंट्रोल ऑफ करन्सी १, डायरेक्टर ऑफ प. हेल्थ १, मुंबई म्यु. हेल्थ ऑफिसर १, लीगलरिमेंब्रन्सर १, मुंबई स्मॉ० कॉ० को० जज्ज १, युनिव्हर्सिटी रजिष्टार १, असि० कमिशनर इनकमटॅक्स

१, डेप्युटी हाय कमिशनर फॉर इंडिया १, डेप्युटी ट्रेड कमिशनर लंडन १.

याप्रमाणें संख्या दाखविली आहे.

तसेंच शिक्षणप्रसाराचें दुसरें एक दालन ह्मणजे वर्तमानपत्रें, मासिक पुस्तकें वगैरे नियतकालिकें व गद्य-पद्यात्मक ग्रंथ इत्यादि हें होय. त्यांचीही दिवसेंदिवस एकसारखी वाढ होत आहे. सर्व नियतकालिकांची व गद्य-पद्यात्मक ग्रंथांची यादी व वर्णनें याठिकाणीं विस्तारभयास्तव दिलीं नाहींत.

एकंदरींत शिक्षणप्रसार किती मोठ्या प्रमाणांत झाला आहे व होत आहे, याची वरील वर्णनावरून वाचकांस कल्पना येईल. तथापि हें शिक्षण एकांगी ह्मणजे रुळलेल्या एका चाकोरींतून जाणारें असें झालें आहे. औद्योगिक, धार्मिक, संशोधनात्मक इत्यादि शिक्षणाचा त्यांत अभाव दिसतो. ही एक उणीव आहे. ईश्वरकृपें तरुण पिढीच्या विद्यार्थी वर्गांत ही जाणीव उत्पन्न होऊन त्या दिशेनेंहि समाजाची भरभराट होवो अशी ईश्वरापाशीं प्रार्थना करून हें प्रकरण पुरें करितों.



१ महाराष्ट्र सारस्वत सप्टेंबर-आक्टोबर १९३५

१६ ऑनरेबल नारायण वासुदेव दाभोलकर जे. पी.—जन्म इ० स० १८२३, मृत्यु इ० स० १८७४. यांचें मूळ घर वेंगुर्ल्यांजवळ उभादांडा ह्मणून वाडी आहे तेथें होतें. यांचे वडील वासुदेवराव हे इ० स० १८३६ सालीं मुंबईस आले. त्यांची मूळची स्थिति गरीबीची होती. नारायणराव यांचा विद्याभ्यास मुंबईंत झाला. परंतु मराठी व कांहीं इंग्रजी अभ्यास होतांच प्रापंचिक अडचणीमुळें त्यांना अभ्यासक्रम सोडून एक १५ रुपयांची नोकरी धरावी लागली. तथापि त्यांनीं इंग्रजी वाचनाचा क्रम चालूं ठेविला होता. त्यामुळें इंग्रजी भाषेचें ज्ञान त्यांना उत्तम झालें होतें. इंग्रजी भाषेंतील त्यांच्या वक्तृत्वाबद्दल युरोपियन विद्वान् गृहस्थ त्यांची तारीफ करीत. त्यांनीं नोकरी सोडून व्यापारांत प्रवेश केला व आपल्या असामान्य बुद्धिमत्तेनें त्या धंद्यांत फार मोठी संपत्ति व नांवलौकिक मिळविला. पी. अँड ओ. कंपनीचे ते वाकनीस (दुभाषी) झाले. पुढें म्युनिसिपालिटी व टाऊन कौन्सिलचे सभासद व लेजिस्लेटिव्ह कौन्सिलचे सभासद होऊन यांनीं सरकाराकडूनहि चांगला मान मिळविला. सरकारांतून यांस जस्टिस ऑफ धि पीस ही पदवी मिळाली होती. मुंबईंतील वाळुकेश्वरी त्यांनीं एक मोठा बंगला घेऊन त्यांत ते रहात असत; परंतु शेवटीं तोच बंगला त्यांच्या अंगावर पडून त्यांचा अंत झाला. सरकारांत त्यांची मोठी मान्यता होती. ना. गव्हरनरसाहेब व इतर मोठमोठे अंमलदार त्यांची फार प्रशंसा करीत असत. त्यांनीं सार्वजनिक कामें उत्साहपूर्वक कळकळीनें केलीं आहेत. त्यांचें चरित्र "सारस्वतरत्नमाला" या ग्रंथांत

आहे. व कुरुक्षेत्रादि देशांत उत्पन्न झालेल्या ब्राह्मणांपासून पृथ्वींतील सर्व मनुष्यांनीं आपआपला आचार शिकावा असें सांगितलें आहे. त्या स्मृतिकालीं ब्रह्मावर्त व कुरुक्षेत्रादि देशांत जे ब्राह्मण (आर्य) राहात होते, त्यांचेच वंशज आह्मी आहों. परंतु त्यांनीं इतर समाजावर जें गुरुत्व मिळविलें होतें व जी संस्कृति साध्य केली होती, तें गुरुत्व व ती संस्कृति आज आमच्यांत राहिली नाहीं. याचीं कारणें अनेक असतील परंतु धार्मिक, नैतिक, सामाजिक गोष्टींकडे होत आलेलें आमचें दुर्लक्ष हेंहि त्यांतील एक कारण असावें असें माझ्या अल्पबुद्धीस वाटतें. या बाबतींत श्री.वामनशास्त्री किंजवडेकर यांच्या एका लेखाचा उतारा मागील ' महाराष्ट्र सारस्वता ' च्या एका द्वैमासिक अंकांत आढळला तो येथें उतरून घेतों :—

" दशविध ब्राह्मणांपैकीं गोव्यांत द्रविड व गौड दोन्ही प्रकारचे ब्राह्मण राहातात. एके काळीं द्रविड ब्राह्मण सारस्वतांची छात्रवृत्ति पतकरून होते. संस्कृत वाङ्मयांत जें शास्त्रीय ज्ञानभांडार आहे, त्यांत गौडसारस्वतांचाच वांटा अधिक आहे. त्यांतल्यात्यांत न्यायशास्त्र हें तर गौडांचें धन असल्याबद्दल खुद्द द्रविडांनीच कबुली दिली आहे. न्यायशास्त्रांतील एक प्रमुख ग्रंथ जो ' व्युत्पत्तिवाद ' त्याचे टीकाकार कृष्णंभट हे ह्मणतात कीं, ' गौडानां धनमाहृतं ' गौडांतील कांहीं ग्रंथकर्त्यांचीं नांवें सांगावयाचीं तर ' पार्थसारथीमित्र ' गदाधर भट्ट , वाचस्पति मिश्र, जगदीश भट्टाचार्य, शिरोमणि मधुसूदन सरस्वति, इत्यादि सांगतां येतील द्रविड ब्राह्मण मत्स्याहार भ्रष्ट मानतात तरी गौडसारस्वतांनीं आपल्या विद्वत्तेच्या

प्रभावानें द्रविडांना खालीं पाहाण्यास लाविलें होतें. पण एककाळीं इतके उच्च दर्जाला पोहोंचलेले हे गौडसारस्वत आज कोणत्या स्थितीला पोहोंचले आहेत हें पाहून फार वाईट वाटतें ! गौडांची जर ही स्थिती तर द्रविडांसंबंधीं बोलणेंच नको (भद्दप्रभु पंचप्रकरण सभेचा अहवाल पृष्ठ ३२)''

या उताऱ्यावरून मी वर जें लिहिलें आहे तें यथार्थ आहे, असें दिसून येईल. प्राचीनकालांतील स्थितीचा आदर्श नजरेपुढें ठेवून शक्य तितका प्रयत्न आह्मी केला पाहिजे.

दुसरी गोष्ट, आमच्या समाजांत असावी तितकी संघटना नाहीं. हल्लीं आमच्या समाजाची वस्ति सर्व हिंदुस्थानभर आहे परंतु वस्तुस्थिति असी आहे कीं, मोठ्या शहरांत एका भागांत असलेल्या सारस्वत कुटुंबाची माहिती त्याच शहरांतील दुसऱ्या भागांत असलेल्या सारस्वत कुटुंबास असत नाहीं व तसी माहिती मिळविण्याचा प्रयत्नहि कोणी करीत नाहीं. जो तो मनुष्य आपआपल्या उद्योगांत गढून गेलेला असतो. समाजकर्तव्याकडे पाहाण्याची वृत्ति नाहीं व सवडही नाहीं. ही शहरांतील समाजाची स्थिति. खेड्यांत पाहिलें असतां तेथें आमच्या समाजाचीं दोन चार कुटुंबें असावयाचीं, त्यांत परस्परांविषयीं मत्सर व द्वेषभ व असावयाचा व त्यामुळें एकाचें तोंड एका दिशेकडे तर दुसऱ्याचें त्याच्या विरुद्ध दिशेकडे, असा प्रकार आढळतो. एकंदरींत संघटना नाहीं, असा निष्कर्ष निघतो. ही स्थिति ठिकठिकाणच्या सुशिक्षित पुढाऱ्यांच्या ध्यानांत आल्यामुळें

१ महाराष्ट्र-सारस्वत द्वैमासिक वर्ष ९ वें अंक ३ रा. पृष्ठ १८

त्यांनीं आपआपल्या स्थानिक क्षेत्रांत समाजसंस्थाहि स्थापन केल्या आहेत. व त्या संस्थांमार्फत संघटनेचे प्रयत्न चालविले आहेत. मुंबई-शहरांत सारस्वत-समाज, सारस्वत स्वयंसेवक संघ, न्यू सारस्वत-युनियन, गौड-सारस्वत मित्रमंडळ, ऑल इंडिया सारस्वत-मंडळ, सारस्वत विद्यार्थि सहाय्यक-मंडळी, सारस्वत-दीनवत्सल संघ, कॅनरा-सारस्वत-असोशिएशन, नॉर्थ कॅनरा गौड-सारस्वत ब्राह्मण संघ इत्यादि अनेक संस्था आहेत. त्यांतील सारस्वत विद्यार्थी सहाय्यक मंडळी व सारस्वत दीनवत्सल संघ या संस्थांचीं कार्ये निराळ्या प्रकारचीं आहेत व त्यांना यशप्राप्तिहि चांगली झाली आहे. तथापी परंपरेनें संघटनेचाही हेतु त्यांत आहे. यांशिवाय पुणें-सारस्वत सोशल युनियन, सातारा-सारस्वत ब्राह्मण-सभा, मद्रास-सारस्वत-समाज, मंगळूर-सारस्वत-समाज, मडगांव-सारस्वत-समाज, बेळगांव-शहापूर-सारस्वत-समाज, सोलापूर-सारस्वत-ब्राह्मण सोशल क्लब, सावंतवाडी-सारस्वत-ब्राह्मण समाज, गोवा-सारस्वत-समाज इत्यादि अनेक संस्थांकडून संघटनेचे प्रयत्न चालू आहेत तथापि अद्याप ह्मणण्यासारखें कार्य घडून आल्याचें दिसत नाहीं. हल्लीं गौड-सारस्वत डिरेक्टरी तयार करण्याकरितां मुंबईंत कमिटी नेमण्यांत आली आहे. ठिकठिकाणच्या सारस्वत ब्राह्मण समाजाकडून त्या त्या भागांतील आपल्या समाजासंबंधाची माहिती त्या त्या कमिटीकडे पाठविणें जरूर आहे. तसेंच ठिकठिकाणीं आपला समाज विखुरलेला आहे, त्यांतील व्यक्तींनी

१ महाराष्ट्र सारस्वत वर्ष १५ वें अंक १ ला.

परस्परांविषयीं आपलेपणाची भावना बाळगून एकमेकांशीं सहकार्य केलें पाहिजे. कलियुगांत संघशक्तीनें कार्यें केलीं पाहिजेत. हें तत्त्व सर्वत्रांस पटून कृतींत आलें पाहिजे, तरच संघटना होण्याची आशा आहे.

तिसरी गोष्ट, ' सुधारणा ' या गोंडस नांवाखालीं स्वैर वागणु‍कीचा बेगुमानपणें होत चाललेला प्रसार ही होय. परिस्थितीमुळें हिंदुस्थानांतील बहुतेक समजांत ही गोष्ट कमजास्त प्रमाणांत दिसून येत आहे. त्यांतच आमचा समाजहि समभागी असल्यानें आमच्या समाजासच त्याबद्दल दोष देणें योग्य होणार नाहीं. तथापि प्रत्येक समाजानें आपआपल्या समाजांत प्रसार पावत असलेल्या अनिष्ट गोष्टींचा प्रतिकार करण्याची शक्य ती खटपट केली पाहिजे असें मला वाटतें. पाश्चात्य सुधारणांच्या लखलखाटानें नव्या पिढीच्या आमच्या तरुणांची दृष्टि चाकित झाली असून प्रत्येक गोष्टींत पाश्चा‍त्यांचें अनुकरण करणें त्यांना इष्ट वाटत आहे. प्रत्येक गोष्टींत स्वातंत्र्य पाहिजे. व्यक्तिस्वातंत्र्य, मतस्वातंत्र्य, भाषणस्वातंत्र्य, लेखनस्वातंत्र्य, यांबरोबरच स्त्रीस्वातंत्र्य, विवाहस्वातंत्र्य, आचार‍स्वातंत्र्य, होतां होतां लैंगिकस्वातंत्र्य इतकी मजल तूर्त आली आहे. पुढें ही स्वातंत्र्याची सीमा कोठें स्थिर होणार आहे ईश्वर जाणें! स्वातंत्र्याच्या या वेडगळ कल्पनामुळें प्रीतिविवाह, सहज्ञातीतर‍विवाह, मिश्रविवाह इत्यादि कित्येक अनिष्ट गोष्टींस उत्तेजन मिळत आहे. पाश्चात्यांचें अनुकरण करण्याजोग्या चांगल्या गोष्टी अनेक आहेत, परंतु त्या गोष्टींचा आमच्या समाजांत प्रसार होत असलेला फारसा दिसत नाहीं. अनिष्ट गोष्टींचें मात्र अनुकरण होत आहे.

युरोपियन लोकांत स्त्रीस्वातंत्र्य आहे तसें आमच्यांतील पुरुषांनीं आपल्या स्त्रियांनां स्वातंत्र्य दिलें पाहिजे असें ह्मणणें पुढें येतें. परंतु युरोपियनांच्या स्त्रिया एकएकट्या फिरावयास गेल्या तरी त्यांना हत्यारें बाळगण्याची मोकळीक असल्यानें त्या पिस्तूल बाळ-गून स्वतःचा बचाव करूं शकतात. तसा बचाव आमच्या समाजां-तील स्त्रियांचा होणें शक्य आहे काय ? पंजाब, संयुक्त प्रांत, बंगाल इत्यादि प्रांतांत गुंड लोकांनीं हिंदुस्त्रियांनां जबरीनें पळवून नेल्याचे खटले वारंवार वृत्त पत्रांतून प्रसिद्ध होत आहेत हें महशूर आहेना ? मग युरोपियन लोकांच्या स्त्रियांच्या इतकें स्त्रीस्वातंत्र्य हिंदुस्त्रियांना देणें शक्य आहे काय ? शिवाय हिंदूंतील पुरुषवर्ग तरी स्वतंत्र आहे काय ? हत्यार ॲक्ट, प्रेस ॲक्ट, क्रि.अमेंडमेंट ॲक्ट, आर्डिनन्स इत्यादि अनेक कायद्यांतील निर्बंधांनीं जखडून गेलेल्या आमच्या (हिंदू) समाजांतील पुरुषांपाशीं स्वातंत्र्याचा ठेवाच राहिलेला नाहीं. करितां त्यांच्या स्त्रियांना स्वातंत्र्य देण्याच्या कल्पना कोत्या विचा-राच्या आहेत, हें उघड आहे.

तसेंच पेहराव, कृत्रिम सौंदर्य या बाबतींतील फॅशन्स स्त्रिया व पुरुष या दोनीहि वर्गांत वढात चालल्या आहेत. पुरुषांत मिशा काढणें, डोकीस केंस राखून भांग काढणें, चेहेऱ्यास पावडर लावून गौरवर्ण भासविणे इत्यादि प्रकार चालू आहेत. संध्यावंदन, देवपूजा, इत्यादि नित्यकर्मांचा कधींच लोप झाला आहे ! भालप्रदेशीं गंध लावणें हें वेडेपणाचें लक्षण मानण्यांत आलें आहे. याप्रकारच्या बाह्य चिन्हांमुळें अपरिचित मनुष्यास एखादा ब्राह्मण तरुण दृष्टीस पडला

तर, तो ब्राह्मण आहे कीं शूद्र आहे हें ओळखण्याची पंचाईत पडते. तसेंच तरुण स्त्रियांची फॅशन ह्मणजे त्यांच्या डोकीच्या केशकलापाची मजल अर्धे कान झांकण्यापर्यंत येते. तिरपे भांग, चेहेऱ्यास पावडर लावून आणिलेला दिखाऊ गौरपणा, दोनीही भिवयामध्यें हरभऱ्याच्या डाळीच्या आकाराचें कुंकू, कांखेपर्यंत जाकिट वजा पोलकें, कांखेपासून हात उघडे, स्वातंत्र्याच्या कल्पनेमुळें मर्यादेचा अभाव, इत्यादि बाह्य चिन्हामुळें अपरिचित मनुष्यास ही कोणी कुलीन सभ्य स्त्री आहे कीं विश्वयोषिता आहे, हें ओळखण्याची पंचाईत पडत्ये. बरें, या फॅशन्सचें ध्येय तरी काय असावें याचा विचार केल्यास त्या पासून कांहीं राजकीय हक्क मिळतात असें नाहीं. आर्थिक, ऐहिक, पारमार्थिक यांपैकीं एखादी उन्नति प्राप्त होते असेंहि नाहीं एक उद्देश मात्र दिसतो व तो श्रीमद्भागवतांत वर्णिलेला आढळतो. कलियुगांत चारहि वर्ण खालावत जातील व हीनदशा प्राप्त होईल, त्यावेळीं कशी परिस्थिति होईल हें तेथें सांगितलें आहे. त्यांतील जरुरीपुरता मजकूर येथें घेतोः—" दांपत्येऽभिरुचिर्हेतुः " ह्मणजे विवाहाला कुलगोत्र, जात-पात हें कारण न होतां केवळ अभिरुचि हेंच कारण होईल. ज्याला ज्या स्त्रीशीं संगत व्हावी असें वाटेल तो तिच्याशीं विवाह करील! रतिकौशल्य हेंच मुख्य होऊन बसेल, राजे म्लेंच्छप्राय होतील, ब्राम्हण केवळ जानवें घालणारे होतील, 'पांडित्ये चपलं वचः' म्हणजे अचावचा बोलणाऱ्यालाच विद्वान समजतील, स्नान केवळ शरीरशुद्धिसाठीं करतील. ' लावण्यं केशधारणं, म्हणजे केंस ठेऊन भांग वगैरे काढून नटणें हेंच

लावण्य समजलें जाईल. 'सत्यत्वें धाष्टर्यमेवही, धाष्टर्य ऊर्फ धटिंगण-पणा हेंच सत्य मानलें जाईल. उदरंभरण एवढाच स्वार्थ होऊन बसेल."

या वर्णनांत वरील फॅशनचा उद्देश काय हें सांगितलें आहे. ही परिस्थिति बदलण्याचा प्रयत्न समाजाकडून झाला पाहिजे असें मला वाटतें.

चौथी गोष्ट, लग्नकार्यांत हुंड्याच्या रकमेची जब्बर मागणी ही होय. लग्नांत वर पक्षाच्या मंडळीकडून वधूच्या आईबापांकडे निर्दयपणें हुंड्याची रक्कम मनमानेल तितकी मागण्यांत येते. जितकी जितकी हुंड्याची रक्कम जास्ती मिळेल, तितकी तितकी आपल्या घराण्याची श्रीमंती व इभ्रत लोकांत वाढती दिसेल,अशी वराच्या आईबापांची भावना रूढ झाली आहे. तसेंच मुलास इंग्रजी शिक्षण दिलें असतां हुंड्याची रक्कम जास्ती मागतां येते अशीहि एक कल्पना त्यांच्या मनांत उत्पन्न झाली असल्याचें प्रचारांत दिसत आहे. या दांभीक व खोट्या कल्पनांच्या पायीं अनेक अनर्थ घडून आले आहेत. कोणी ह्मणतो, माझा मुलगा मॅट्रिक झाला आहे, तितकें शिक्षण होण्यास दोन हजारांवर खर्च झाला आहे, त्यापेक्षां जास्ती हुंड्याची रक्कम दिली तर लग्न जमवूं. दुसरा ह्मणतो, माझा मुलगा बी. ए. झाला आहे, तितकें शिक्षण पुरें करविण्यास मला चार हजार रु. खर्च आला, त्यापेक्षां जास्ती हुंडा मिळाला पाहिजे. तिसरा ह्मणतो माझा मुलगा उच्च शिक्षणांकारितां विलायतेस जाऊन तिकडील उच्च दर्जाची परिक्षा पास होऊन आला आहे, त्या कामीं पंधरा हजार रुपये खर्च झाले. कारितां, निदान पंधरा हजार रुपये हुंडा

मिळाला पाहिजे. याप्रमाणें मागण्या चालू होतात. जणूं काय नवऱ्या मुलाची विक्री चालू आहे कीं काय ! असे गैर शिस्त प्रकार दृष्टो-पत्तीस येतात. मुलींच्या बापाची सांपत्तिक स्थिति गरीबीची असली म्हणजे (हल्लीं बेकारीमुळें बहुत करून अशीं घराणींच फार आढ-ळतात.) त्याच्या मुलीच्या विवाहाच्या खटपटींत त्याची कोण त्रेधा उडते व किती अपमान सहन करावा लागतो, हें त्याचें त्यासच माहीत. इतरांना त्याची यथार्थ कल्पना येणें कठीण आहे. अशा गरीब स्थितींतील कित्येक मुली उपवर झाल्यावर हुंडा दिल्याशिवाय आपलें लग्न होत नाहीं व हुंडा देण्यास आपल्या आईबापांस ताकद नाहीं अशी अडचण कळून आल्यामुळें त्यांनीं आईबापांस न कळत आत्म-हत्या केल्या. या प्रमाणें त्यांनीं या जगांतील आपलें दुःखमय जीवन नाहींसें केल्याच्या गोष्टी मागाहून त्यांच्या आईबापांत कळून आल्या. त्या प्रसंगीं त्या आईबापांच्या मनाची स्थिति कशी झाली असेल याबद्दलचें यथार्थ वर्णन कोणी लिहूं शकेल काय ? माझी तरी लेखणी या बाबतींत यापुढें अचल झाली आहे !

दुसरा अनिष्ट प्रकार म्हटला म्हणजे विवाहसंस्कार न झाल्यामुळें कित्येक मुली अविवाहित राहतात व त्यांना आजन्म कौमार्यावस्थेचें खडतर व्रत पाळावें लागतें. लग्नसंस्कार हा कुमारिकांचा अवश्य संस्कार असल्यामुळें योग्य वयांत लग्न न झाल्यास स्वाभाविकपणें त्यांचें अंत-रंग दुःखानें व्याप्त असतें. व त्या दुःखाचा त्यांच्या आरोग्यावर परिणाम होऊन त्या अकालीं खंगलेल्या दिसतात.

त्यांतच लोकापवादाचे प्रहार सोसावे लागतात व शेवटीं ' मी लग्नच करून घेत नाहीं ' अशी बतावणी करून त्यांना जन्मभर अविवाहित राहणें भाग पडतें.

तिसरा प्रकार मिश्रविवाहाचा घडून येतो. मिश्रविवाहाच्या कारणांपैकीं मनोविकाराच्या प्रबल माऱ्यामुळें व्यसनाधीन होणें, हेंहि एक कारण आहे, तथापि हुंड्याच्या दुष्ट चालीमुळें लग्न न झाल्यानेंहि त्या मार्गांत अविवाहित मुलींचें वांकडें पाऊल पडण्यास कारण होतें. या विवेचनावरून हुंड्याची जबर मागणी किती घातुक आहे हें वाचकांच्या ध्यानीं येईल.

याशिवाय कांहीं किरकोळ वैगुण्यें समाजापुढें मांडण्यासारखीं आहेत पण तीं येथें दिग्दर्शीत करीत नाहीं.

आमच्या समाजांत माझ्यापेक्षां विद्वत्तेनें, संपत्तीनें, अधिकारानें श्रेष्ठ असे लक्षावधि लोक आहेत. करितां समाजापुढें मार्गदर्शक गोष्टी मांडण्याइतकी माझी योग्यता नाहीं तथापि जीं वैगुण्यें वरवर दिसतात तीं कर्तव्य या दृष्टीनें पुढें ठेविलीं आहेत.

शेवटीं, वरील अनिष्ट प्रकार आमच्या समाजांतून नाहींसे होऊन समाज सर्व बाजूंनीं उन्नतदशेस प्राप्त होवो अशी ईशचरणीं प्रार्थना करून मी सर्वांची रजा घेतों.

प्रकरण अकरावें.

परिशिष्ट.

(ज्ञातिसंबंधीं निवाडे, ताम्रपट व ग्रामण्याबद्दल धर्माद्धक्षांचीं पत्रें वगैरे. प्रभुप्रकरणी निवाडा. यांतील भाषा जुनी आहे तरी ती अस्सलप्रमाणें ठेविली आहे.)

॥ श्री ॥

निवाडपत्र शके १६७१ शुक्लनाम संवछर आषाढ शु॥ ५ गुरु॥ ते दिवशीं राजश्री यशवंतराव महादेव प्रभु व गोविंद खंडेराव चिट॰ णीस व समस्त गोत्र प्रभु याणीं सातारेच्या मोकामी श्रीमन्महाराज छत्रपती स्वामी संनिध विनंती केली जे॰ व्रतबंध गायत्री उपदेश करून ब्रह्मकर्मास अधिकार व्हावा ऐसीयास स्वामीस उभयतांचे अगत्यच होतें त्याचे कार्य करून द्यावे हा मनोगत आणि यांसमई त्यांजवर सर्व कारकून व वेदशास्त्रसंपन्न राजश्री महादेवभट्ट उपनाम आठले कऱ्हाडे सूत्र आश्वलायन व गोविंदभट व रामभट्ट वगैरे ब्राह्मण समुदाय प्रभुपक्षी असतां या उभयतां प्रभूची चाल दरबारी कारभारसमंध बहुत त्याजमुळें राजश्री बाळाजी पंडित प्रधान व याचे कारभारी राजश्री महादाजी अंबाजी पुरंदरे यास व मुत्सद्दी मंडळी सरकारांतून अष्टप्रधान याविसीं विदित जाहाले. तपसील नांवनिसी:—

१ प्रतिनिधी	१ सुमंत
१ प्रधान	१ पंडितराव
१ सचीव	१ सेनापती
१ आमात्य	१ न्यायाधीश
४	४

हे मुख्य व दरबारी मुत्सद्दी व ब्राह्मण सिष्ट नगरांतील एकत्र होऊन विचार मनास आणितां अगोदर दोन चार वर्षें पर्यंत गांठ घालून आपले जागा प्रभु यांणीं परभारें वश केला असतां बहुतकरून द्रव्यद्वारा व कारभारामुळें जड भारी पडून गेली कोणाचा उपाव नाहीं तेव्हां राजश्री यमाजी शिवदेव व कारभारी निस्बत राजश्री जगजीवन पंडित प्रतिनिधी यांजकडील कारकून यांस बहुत श्रुत समयोचित जाबसाल सुचविणार यांणीं मनावर धरून आपले आंग न दाखवितां परभारें ब्राह्मणांस ताकीदपत्रें पाठवून आणविले ते तपशील

१ कऱ्हाडकर
१ पेणकर
१ माहुलीकर
१ कृष्णाविणीतीरचे
१ वाईकर
१ नाशिककर
१ माहूलीसंगमी
१ ———

यांस आणऊन मनास आणितां प्राचीन कर्म नसोन सांप्रत काळाचेठाईं नूतन ब्रह्मकर्म करावयास अधिकार करितात हें खोटें श्रीमंत महाराज छत्रपती स्वामी यांचे आग्रहामुळें कोणाच्याने जाब-साल संनिध होत नाहीं. ते समईं येमाजीपंत यांणीं वाराणसी क्षेत्रीं मंदाकिनी तीरीं श्रीशंकराचार्य वंशपरंपरानुग्रहित श्रीमत् गौडाचार्य सरस्वती षट्शास्त्र निष्पन्न स्वामी समर्थ श्रेष्ठमान श्रेष्ठ स्वामी वंद्य वगैरे श्रेष्ठ स्वामी अन्यस्थळीचे वर्तमानी वर्त निवेदन केलें त्याजवर स्वामीस विषाद दिसून आले जः—नूतन अधिकार द्यावयास नसोन ब्राह्मणकर्म होतात याजवरून अपूर्व दिसून आलें याचप्रकारें श्रीशृंगेरी मठाहून श्रीमत् परमहंस स्वामीस वर्तमान निवेदन केलें.

उभयतांस ही गोष्ट मान्य जाहली नाहीं, त्याणी उत्तर दिलें कीं, कलिधर्मावताररूप प्रघट जाहाला कीं यवनी एकमय जाहाली अंती होणार असें भविष्य आहे तो समय सांप्रतच दिसतो. परंतु दोनी क्षेत्रीं धर्मस्थान धर्माचरण न करितील त्यांस शिक्षा करावयास योग्य समर्थ येथनिमित्य दोहीं स्थलींहून वेदशास्त्रसंपन्न ब्रह्मवृंद रवाना करून दिले बितपसील

शृंगेरी मठाहून आले:-	श्रीवाराणसी क्षेत्राहून आले:-
१ गोपाळाचार्य	१ गुणाकर पंडित
१ व्यंकटेश पंडित	१ पुरुषोत्तम पंडित
१ वेणीराम पंडित	१ नारायणराव पंडित
१ श्रीनिवास पंडित	१ गोविंदाचार्य
१ माधवाचार्य	१ गोविंदनाथ देव
५	५

येणें प्रा॥ पंडीत व आणखी ब्राह्मण दशग्रंथी समुदायें।इ॥वर्तमान सातारेच्या मुक्कामी आले ते समई अन्य स्थलींच्या व करड वई. कर वगैरे एकत्र ब्राह्मण मिळून दाहा हजार पर्यंत दरबारीं प्रसंग केला जे प्रभुयास पुरातन पासून जें कर्म नसतां नवीन कर्माचा साक्षेप यदर्थीं कली मधें वर्ण दोन ब्राह्मग व शूद्र राहिले क्षत्री व वैश या दोनी वर्णाचा क्षय जाहला स (ह) देवासी येक पुत्र राहिला तो बद्रिकाश्रमी होता. तयाकरितां कलीधर्माचा नाश कलंकी अवतारीं करील मग क्षेत्री पुत्रास राज्यस्थानीं स्थापील तेव्हां प्रभु यांस तीन कर्मास अधिकार कोठून द्यावा मग भट आठलेकर

तत्पक्षी यांणीं उत्तर केलें जे शाणवई यांसी शटकर्मांचा अधिकार आहे आणि यांस नाहीं याचा अर्थ काये ह्मणतांच मग दोनी स्थळींहून दशविध ब्राह्मणांच्या वंशपरंपरा शैयाद्रीखंडी समूळ आद्यांत आहे ती श्रींगेरी मठाहून आणविली ती त्यांत सविस्तर ब्राह्मणांचा आच्यार व देश तपशील.:—

पंच गौड ते कोण.	पंच द्रवीड ते कोण.
१ मुख्यगौड	१ मुख्यद्रवीड
१ कानकुब्ज	१ महाराष्ट्र
१ मयथील	१ तेलंग
१ सारस्वत्य	१ कर्नाटक
१ उतकील	१ गुर्जर
५	५

येणें प्रा। दशविध ब्राह्मणाचा कुळियामध्यें ज्येष्ठ घर गौड यास निमित्येन वेदशास्त्रसंपन्न पुराणोत्पन्न श्री वाराणसी पूर्वदेशी विद्या जन्म येत्र येत्र स्थलीं याज करितां वडीलपणाचा अधिकार त्यांजवळ व दुसरें द्राविडांकडे जे श्री क्षेत्राहून विद्याभयासी प्राप्त या प्रमाणें ह्मणोन कानिष्ठ व पंच गौडामध्यें विचार व द्रविडामध्यें आच्यार हे दोनी मार्ग पुरातन पासोन चालत आहे. असें आसतां त्रेतायुगीं श्री परशराम अवतार क्षेत्रिये कुळीं सहस्त्रार्जुन माहाबाहुचे होऊन व्येभिचार धर्मे वर्तणूक सर्वहि क्षेत्री करूं लागले तेंव्हां परशरामाने एकवीस वेळां निक्षेत्री पृथवी करून सुमंत पंच क्षेत्रीं रुधीयच नदीमध्यें तिळोदक मंत्र येज्ञास्थत ब्राह्मण येज्ञ केला उपरांत क्षत्रीकुल

आपण सर्वंहार केला ब्राह्मण हत्या पातकें जाहलीं ह्मणोन पश्चाताप बहुत होऊन प्रथवीचें राज्य आपले घरास आलें आपणास राज्य काय करावें आपण ब्राह्मण तप करीत असावें भुमीभार उतरून स्वस्थ आसावें हा विचार चित्तांत आणून संपूर्ण प्रथवीचें राज्य ब्राह्मणांस दान दिल्हे. आपणास राहावयास स्थल पाहिजे ह्मणोन समुद्रापासून जागा चौदा कोश रुंदी व चौऱ्याहत्तर गांव लांबी घेऊन तेथें ब्राह्मण स्थापना केली ता॥

१ कल्याणचे नदीपासून राजापूरचे नदी पा॥ महाराष्ट्र देशीचे ब्राह्मण न्हेऊन स्थापना केली आणि चित्तपावन नामाभिधान ठेविले. कलम

१ राजापूरचे नदीपासून आचरेचे नदी पर्यंत जागा कराडे यास दिली हेहिंदेसीहून नेऊन स्थापना केली आश्वलायनशाखी दुसरी शाखा नाहीं हे विषमारक जाणावे कलम

१ रगवेदी आश्वलायन गोत्र.

१ आपस्तंब यजुशाखी.

४

येणे प्र॥ पुढें मसुरेचे नदीपासून आंकलेश्वरचे नदीपासून माहाल कुडाळचे नदीपर्यंत आपणास राहावयास स्थान ठेविलें हरमल तर्फ पेडणे येथें राहिले येज्ञास प्रारंभ आश्वीन मासामध्यें करून दोषाचा नाश करावा यदर्थीं सर्व साहित्य करून येज्ञास प्रारंभ केला, तो येज्ञसमुदाय गौडब्राह्मण पाहिजे तेव्हां गौडदेशाहून सारस्वत्य ब्राह्मण त्रिहोत्रपूरनामक क्षेत्र आहे तेथून दशगोत्री आश्वलायन शाखा रगवेदी आणून स्थापना केली. मसूरचे नदीपासून आंकलेश्वरचे नदीपर्यंत हा

देश शाश्वत ब्राह्मणांस दिला. सारस्वत्य ब्राह्मणांमध्यें मुख्य शिवशर्मा व देवशर्मा आत्रीगोत्री व विष्णुशर्मा वछ गोत्री व कवंडण्य गोत्री व कंवशीक गोत्री हे तीन गोत्री मुख्य याचसंमंधीं भारद्वाज सत्य येकूण दशगोत्री यांस शाश्वत स्थापून यांस मोकासा कसबे मजकूर पैकीं निमे स्थळ देऊन केळोशी कुशस्थली साष्टीनजीक गोमांतक त्रिवर्गासी देऊन मसुरेपासून आंकलेसिंव्हेश्वर पर्यंत बारदेस यास दिला. तेव्हां दोन प्रस्था पडली. जे सेणवाई ह्मणावयास कारण काय तर ब्राह्मण तमाम कारकून रोजगार करून कालक्षेप केल्यास त्यास पंत अथवा सेणवाई ह्मणावें हें पुरातन सैयाद्रिखंडीं कथा आहे असें सांगतांच सर्वांसी समज पडला. मग परभुची उत्पत्ति कोठून ह्मणून प्रच्छा केली तेव्हां दालभय ऋषि होते. त्याचे दासीपासून त्यांची उत्पत्ति त्यांसी अधिकार कोणतेच गोष्टीचा नाहीं केवळ शूद्रापासून उत्पन्न ह्मणून परभू हें नामाभिदान याप्रकारें वर्तमान असतां अन्यथा मार्ग पदवी जर यांसी दिली तर सिद्धीस जाणें कठीण पहिले वेद-शास्त्रसंपन्न कैलासवासी गागाभट्ट यांणीं क्षेत्री शर्मांस अधिकार राज्यास व्रतबंध करून गाईत्री उपदेश करून स्थापिलें ते कर्म सिद्धीस गेलें नाहीं दोनीहि वंशानें निर्मूळ जाहालें हें प्रत्यक्ष जाणून आमार्गानें वर्तल्यास साध्य श्री कृपा नाहीं आपापले मार्गी तत्पर असावें हें उचित असे व सर्व वृत्तांत श्रीमन्महाराज राजश्री शाहू छत्रपती स्वामीची निशा खात्री होऊन महाराजांनीं खोटपत्र लिहावयास आज्ञा केली दुसरें यमाजिपंत यांणीं पाटाच्या स्त्रिया प्रभुच्या घरीं पांच सात पाठविल्या त्या स्त्रिया कुडाळ खोरें वगैरे स्थळाहून आण-ऊन प्रत्यक्ष दाखविल्या तेव्हां महाराजांची न खुषी होऊन खोटपत्रें

भाद्रपद शु॥ १३ यो दशीची जाहली एवंच प्रभु यांचा अधिकार कोणत्याच मार्गाचाच नाहीं असें खोटें ठरवून ब्राह्मणांनीं सर्वत्र माहावैदिक दशग्रंथी व पंडित व शास्त्री या सर्वांनीं एक विचार करून माहादेवभट आठले आणखी तत्पक्षी ब्राह्मण द्रव्य भक्षून त्या सारिख्या गोष्टी सांगून व्यभिचारधर्म करावयास प्रारंभ केला. त्यास कांहीं शिक्षा करावी परंतु ब्राह्मण येदं-निमित्य वाळींत घालून पंक्ती वेगळे केले मग ब्राह्मणास संकट पडलें सर्व मंडळीस शरण आले आह्मी शरण आलों आह्मांस मुक्त करावे ह्मणाले तेव्हां सर्वांनीं आज्ञा केली जे श्री काशी क्षेत्री जाऊन श्रीगौडाचार्य स्वामी सारस्वत्य यांस शरण गेल्यास ते कृपा करितील आणि पांक्तिपावन करितील हा उपाय सांगून माहा यात्रेस ते भट सर्व आठले वगैरे श्री क्षेत्रास जाऊन केले कर्माचा उच्चार करून सर्व स्वामीपांसी विनंती करून घेतली नंतर स्वामी कृपाळु होऊन त्यांस पांक्तिपावन केलें नंतर श्री स्थळीं यात्रा करून भटजी मंडळीसहवर्तमान माघारे सातेऱ्यास आले ते मोकामी महाराज शाहु छत्रपती यांजपाशीं आले. परषराम अवतार भृगुवंशी धरून भूमीभार उतरून अष्वमेध केला त्याची साक्ष अद्यापि आहे. नवे विभूतीचा टिळा दिसतो, याची साक्ष पहावयास मौजे हरमल येथें हुजरे व ब्राह्मण आपले पाठविले ते पाहून आले आणि महाराजांस विदित केलें. सारस्वत्य ब्राह्मण रगवेदी आश्वलायन शाखी हे आपले स्वदेशास जाणेस आज्ञा घेऊन गेले. आणि भार्गवराम क्षेत्रीं आपण राहिले इतुके वर्तमान जाहाले येणे प्र॥ निवाडपत्र जाहाले आसे.

देवगिरी ताम्रपट्टांतून अंशतः उतारा.

(शा० श० १२१२ विरोधिसं० वैशाख शु० १५ भौमवार)

" श्रीरामानुज्ञया सकल कौंकणधरामंडळमनुशासता श्रीकृष्णदेवेन श्रीरामचंद्रदेवस्य आयुरारोग्यैश्वर्याभिवृद्ध्यर्थं चत्वारिंशत्संख्येभ्यः नानाशाखाध्यायिभ्यः नानागोत्रेभ्यो ब्राह्मणेभ्यः खाजणवराडीसंबंधः अणजोरग्रामः पल्लीसहितः ससीमापर्यंतः तृणकाष्ठोदकोपेतः सवृक्षमालाकुलः निधिनिक्षेपसहितः चतुराघाटोपेतः हिरण्योदकपूर्वकं प्रदत्तं पूर्वतो नदी दक्षिणतोऽपि नदी पश्चिमतोऽपि नदी उत्तरतः वेलिंग्रामः इमानि चतुराघाटकानि ते एते ब्राह्मणाः दामोदराग्निहोत्री महाळूभट्टस्यपुत्रः काश्यपगोत्री एकः १ अपरे एकोनचत्वारिंतसंख्याकाः अंतेचत्वारिंषद्ब्राह्मणाः तदेतेषां सान्वयबंधुभिः भुंजतां भुंजापयतां केनापि परिपंथा न कार्यः ॥ "

हा सर्व ताम्रपट्ट मोठा आहे. ह्मणून त्यांतील मुख्य भाग मात्र येथें घेतला आहे. सर्व पाहणें असल्यास " जर्नल रॉयल एश्याटिक सोसाइटि ग्रेटब्रिटन आणि ऐर्लंड पुस्तक ५ वाथेनचा लेख ९ पहावा. " देवगिरीचें राज्य जेव्हां गोमंतकापासून उत्तर कोंकणपर्यंत होतें, तेव्हां ठाण्याजवळील अणजोर हा गांव महाळूभट्टाचा पुत्र दामोदर अग्निहोत्री प्रमुख ४० ब्राह्मणांस राजानें दान दिला होता. ' महाळूभट्ट ' हें सारस्वत ब्राह्मणांतील प्रसिद्ध नांव आहे.

रा. रंगराव रामचंद्र भेंडे या गौड सारस्वत ब्राह्मण ज्ञातीच्या गृहस्थास द्रविड शंकराचार्यांकडून मिळालेल्या रायसाची नक्कल.

श्रीविद्याशंकर

(शिक्का)

श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्यत्वादि सकल बिदावली विराजमान श्रींगेरी श्रीविरुपाक्ष श्रीविद्याशंकर देवदिव्य श्रीपादपद्माराधक श्रीमदभिनवोदंड नृसिंहभारतीस्वामी करकमलसंजात श्रीमदभिनव विद्यारण्य भारतीस्वामीभिः

अस्मदत्यंत प्रिय शिष्य आशेष ब्रह्मवृंद जोईसी व धर्माधिकारी वैदिक मंडळी व गृहस्थ मंडळी वास्तव्य वैराग यांसी—आशिर्वचन पूर्वक नारायणस्मरणपत्रिका. शके १७८१ सिद्धार्थीनामसंवत्सर वैशाख शुद्ध १२ शुक्रवार पावेतों मुक्काम मजकूर येथें श्रीपूजातत्परत्वेंकडून आनंद निरजारीत असो. सांप्रत समस्त देश संचार करून या स्थळासीं दिग्विजय केला असे, तर रंगराव रामचंद्र भेंडे सारस्वत गौड ब्राह्मण प्रवृत्तिनाम शेणवई हे संस्थानास शरणागत होऊन विज्ञापना केली कीं, आपले घरांत हव्यकव्यादिक ब्राह्मण सांप्रदायानुरूप होत आहे. परंतु कोणी घरांतील मृत झालें असतां शव नेण्यास येथील ब्राह्मण तक्रार करितात, ह्मणोन विज्ञापना केले कारणावरून संस्थानाकडून आज्ञा होत आहे कीं, शेणवई यांस षट्कर्माधिकार आहे यांचें शव न्यावें त्यास कांहीं दोष नाहीं, कारण वेदाधिकारी आहेत, त्यांस ब्राह्मणांवाचून गती नाहीं. सदरी लिहिल्याप्रमाणें सर्व देशीं सांप्रदाय आहे. इतिनारायणः स्मरणं.

(याची मूळ प्रत वैराग येथें रा. गो. नृ. भेंडे यांचे घरीं आहे.)

श्रीमंत माधवराव पेशवे यांजकडून पत्र.

श्रीमत्परमहंसादि श्रीपूर्णानंद सरस्वती व श्री रामानंद सरस्वती मठ कवळे व मठ खानापूर स्वामीचे सेवेसी—

शिष्यांतर्गत माधवराव बल्लाळ प्रधान साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशळ स्वामीचे आशीर्वादें यथास्थित असे विशेष स्वामींचे भिक्षे निमित्त मौजे मळवाडी कर्यात काटगाळी तर्फ खानापूर हा गांव दरोबस्त पूर्वी सरकारांतून इनाम करार करून देऊन भोगवटी यांस पत्रें करून दिल्हीं. त्यांप्रमाणें गांव स्वामींकडे चालत आहे. त्यास अलिकडे गतवर्षी कित्तूरकरांच्या दंग्यामुळें मठ लुटला गेला ते समयीं पत्रें गळाटलीं. ऐशियास हल्लीं नवीन पत्रें करून दिल्हीं पाहिजेत ह्मणोन राजश्री विठ्ठल विश्राम यांणी हुजूर कसबे तडस प्रांत कर्नाटक येथील मुक्कामी येऊन विनंती केली त्यावरून मनास आणून कैलासवासी तीर्थरूप नानासाहेब यांणीं स्वामीचे भिक्षेस गांव इनाम दिला आहे तो परंपरागत चालल्यानें राज्यास श्रेयस्कर जाणोन मौजे मजकूर हा गांव स्वराज्य व मोगलाई एकून दुतर्फ खेरीज हकदार व इनामदार करून दरोबस्त कुलबाब कुलकानू जलतरु पाषाणनिधि निक्षेपसहित पेशजीप्रमाणें इनाम करार करून दिल्हा असे तरी मौजे मजकूर सुदामतप्रमाणे स्वामींनीं स्वाधीन करून घेऊन स्वामी व स्वामीचे शिष्यपरंपरा इनाम अनुभवून असावें, रवाना चंद्र २२

जमादिलावल सुरुसन खमस सितैन मैया व अलफ शके १६८६ तारणनाम संवत्सरे बहुत काय लिहिणें हे विनंती.

श्री
राजाराम नरपति
हर्षनिधान माधवराव
बल्लाळ मुख्य
प्रधान

बार

लेखन
सीमा

(याचा मूळ लेख खानापूर मठांत आहे.)

॥ श्री ॥

' सारस्वत गौड ' असा दप्तरी लेख.

राजश्रि याविराजित राजमान्य राजश्री रामचंद्र मल्हार उपनाम सुकठणकर गोत्र कौशिक सूत्र आश्वलायन सारस्वत गौड स्वामी गोसांवि यासी.

पोष्य बाळाजी बाजीराव प्रधान नमस्कार सु॥ मल्लास खमसैन मया व अलफ तुह्मी हिंदुस्थानांतून हुजूर येऊन उपयोगी फार पडलां व तिकडेही कामें दुरुस्त केलीं कुटुंबवत्सल आहां तुमचें चालविणें आवश्यक जाणून मौजे इसबावी ता॥ कासेगांव एथें इनाम जमीन बिघे ३० पाव चावर हालीपटी व पेस्तरपटी स्वराज्य व मोंगलाई दुतर्फा अमल देखील सरदेशमुखी साहोत्रा बाबती मोकासा जल तरु तृण काष्ट पाषाण निधिनिक्षेप इत्यादि उपसर्ग न लागे असी तुह्मांस करार करून दिली असे तरी सदरहू जमीन तुह्मी आपले दुमाला करून घेऊन तुह्मी व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें भोगवटा सुखरूप घेणें. चंद्र ९ रबिलावल बहुत काय लिहिणें हे विनंती.

बार

(याचें अस्सल पुण्यामधें रामचंद्रबाबांच्या वंशजांपाशीं आहे.)

समाप्त.

पुरवणी-परिशिष्ट.

(कांहीं मित्रांच्या सूचनेवरून.)

१ कुच्चरक ताम्रपट्टांतील उतारा.

विद्यानगर येथील प्रधान माधवराय (विद्यारण्य) यांनीं सावंतवाडी प्रांतांतील ' कोचरें ' हा गांव सारस्वत ब्राह्मणांस अग्रहार करून दिला त्याविषयीं-सर्व लेख सावंतवाडी संस्थानच्या वर्णनांत पहावा, पृ. २८७ यांतील ' पौम्निभट्ट ' ' मांगेशीपुत्र ' इत्यादि नांवें सारस्वतांचीं स्पष्ट आहेत, आणि अद्यापि तेथें वस्ती मुख्यत्वें सारस्वतांची आहे. शके १३१३.

" स्वस्तिश्रीशके त्रयोदशाधिकत्रिशतोत्तरसहस्रे गते वर्तमानप्रजापति-संवत्सरे वैशाखमासे कृष्णपक्षे अमावास्यायां सौम्यदिने सूर्योपरागपुण्य-काले स्वस्तिश्रीमन्महामंत्रीश्वर उपनिषन्मार्गप्रवर्तकाचार्यः श्रीमन्माधवरा-जः कुच्चरविषयवर्तिनं कुच्चरनामानं ग्रामं माधवपुरमिति प्रथितनामधेयं सर्वमान्यमग्रहारं कृत्वा पंचविंशतिवृत्तिकल्पनामाकल्य्य श्रुताध्ययनसंप-न्नेभ्यः चतुर्विंशतिब्राह्मणेभ्यः सहिरण्योदकदानधारापूर्वकं तं ग्रामं संप्रदद इति प्रदात्तं धर्मशासनं ॥ तेषां ब्राह्मणानां गोत्रनामविवरणम् ॥ भारद्वाज-गोत्रस्य ऋक्शाखाध्यायिनः अनंतभट्टपुत्रदामोदरभट्टस्य वृत्तिरेका १ वासिष्ठ गोत्रस्य ऋक्शाखा० महादेवपुत्रनंतभट्टस्य वृत्तिरेका २ आत्रेयगोत्रस्य ऋक्शाखा० नरसिंहभट्टपुत्रवासुदेवभट्टस्य वृत्तिरेका ३ भारद्वाजगोत्रस्य ऋक्शाखा० अनंतभट्टपुत्रदामोदर कानभट्टस्य वृत्तिरेका ४ आत्रेयगोत्रस्य ऋक्शाखा० वासुदेवभट्टपुत्रदामोदरभट्टस्य वृत्तिरेका ५ आत्रेयगोत्रस्य ऋक्शा० नारंभट्टपुत्रमहादेवभट्टस्य वृत्तिरेका ६ जामदग्न्यगोत्रस्य ऋक्-शा० महादेपुत्रवामनभट्टस्य वृत्तिरेका ७ आत्रेयगोत्रस्य ऋक्शा० दामो-दरभट्टपुत्ररामभट्टस्य वृत्तिरेका ८ भारद्वाजगोत्रस्य ऋक्शा० अनभट्टपुत्र कानभट्टस्य वृत्तिरेका ९ जामदग्न्यवत्सगोत्रस्य ऋक्शा० विठ्ठलभट्टपुत्र-पौम्निदेवभट्टस्य वृत्तिरेका १० कुत्सगोत्रस्य ऋक्शा० महादेवभट्टपुत्रानंत-

भट्टस्य वृत्तिरेका ११ जामदग्न्यगोत्रस्य ऋकूशा० केशवभट्टपुत्रानंतभट्टस्य वृत्तिरेका १२ आत्रेयगोत्रस्य ऋकूशा० गोविंदभट्टपुत्रजनार्दनभट्टस्य वृत्तिरेका १३ जामदग्न्यगोत्रस्य ऋकूशा० रामकृष्णपुत्रविष्णुभट्टस्य वृत्ति रेका १४ आत्रेयगोत्रस्य ऋकूशा० दामोदरभट्टपुत्रहरिभट्टस्य वृत्तिरेका १५ कौशिकगोत्रस्य ऋकूशा० मांगेशीपुत्रगोविंदभट्टस्य वृत्तिरेका १६ जामदग्न्यगोत्रस्य ऋकूशा० विठ्ठलभट्टपुत्रवासुदेवभट्टस्य वृत्तिरेका १७ कौशिक गोत्रस्य ऋकशा० गोविंदभट्टपुत्रपाग्निदेवभट्टस्य वृत्तिरेका १८ जामदग्न्य वत्सगोत्रस्य ऋकूशा० वाहरिभट्टपुत्रमहादेवभट्टस्य वृत्तिरेका १९ वासिष्ठगोत्रस्य ऋकूशा० नारायणभट्टपुत्रतानभट्टस्य वृत्तिरेका २० जामदग्न्यवत्सगोत्रस्य ऋकूशा० महादेवभट्टपुत्रभटंभट्टस्य वृत्तिरेका २१ भारद्वाजगोत्रस्य ऋकूशा० नामदेवभट्टपुत्रविठ्ठलभट्टस्य वृत्तिरेका २२ भारद्वाजगोत्रस्य ऋकशा० वामदेवभट्टपुत्रमहादेवभट्टस्य वृत्तिरेका २३ वासिष्ठगोत्रस्य ऋकूशा० गोविंदभट्टपुत्रकेशवभट्टस्य वृत्तिरेका २४ भारद्वाजगोत्रस्य ऋकूशा० अनंतभट्टपुत्रदामोदरभट्टस्य पुनर्महाजनैः अन्या दत्ता वृत्तिरेका २५ एवं पंचविंशतिवृत्तयः । कुच्चरिनामधेयस्य इदानीं कृतमाधवपुराभिधानस्याग्रहारस्य चतुःसीमाविवरणं ॥ पूर्वस्यां दिशि पाटग्रामस्य सीम्नि पर्वतशिरसि वटवृक्षपाषाणः ॥ दक्षिणस्यां दिशि ह्मापणग्रामस्य सीम्नि अरण्यमध्यस्थ परगाळीति क्षारी क्षेत्रांतर्गतं कृत्वा ततःप्रभृति पश्चिमदिगनुखारीप्रकारं समीपतः समुद्रवेलायां ह्रदश्च ॥ पश्चिमस्यां दिशि समुद्रः ॥ उत्तरस्यां दिशि परोल्यग्रामस्य सीम्नि प्रवाहादधः समुद्रपर्यंतं क्षारोदकनदीच ॥ एवं चतुःसीमांतर्गतं माधवपुराग्रहारं सहिरण्योदकदानधारापूर्वकं सर्वनमस्यं सर्वबाधाविवर्जितं निधिनिक्षेपजलपाषाणसिद्धिसहितं चतुर्विंशतिब्राह्मणाः सुखेन भुंजीरन् ॥ ”

१ ग आणि द यांचीं जुनी रूपें जवळ जवळ असल्यामुळें ‘ मांदेशी ’ असें चुकून सावंतवाडीच्या छापी लेखांत पडलें आहे.

२ श्री० गायकवाडसरकारचा ठराव. शके १८०५

हु. क. र. बु. नं. ४ श्री.

या प्रकरणाची हकीकत अशी आहे कीं, राजश्री गंगाधर यशवंत मैराळ यांचे गणपतिमंदिराकडेस बडोदे तालुक्यांतील वडीवाडी हा गांव

(शिक्का)

इनामी आहे. त्या गांवीं राजश्री नारायण रामचंद्र पेडणेकर शेणवी यांची कांहीं जमीन आहे. त्या जमीनीवर इनामदारांनीं इनाम कमेटीची लागत मागितली असतां नारायणराव यानीं मी ब्राह्मण आहे व ब्राह्मणांस इनाम कमेटीची लागत माफ आहे असें सांगून लागत देण्यास हरकत केली. यावरून इनामदारांनीं सीतारामजोसी यांस, शेणवाई लोक दानपात्र आहेत किंवा कसें, याजविषयीं अभिप्राय विचारिला. त्याजवरून सीतारामजोसी यांचे पुत्र राजश्री अंणाजोसी यांणीं असा लेखी अभिप्राय दिला कीं 'शेणवाई हे ब्राह्मणजातीची स्त्री व क्षत्रियजातीचा पुरुष यांपासून उत्पन्न झाले आहेत असें स्कंदपुराणांत धर्मारण्यप्रकरणीं सांगितलें आहे. त्यामुळें ते संकरवर्णाचे असल्यानें त्यांस दानग्रहण करण्याचा अधिकार नाहीं.' हा अभिप्राय इनामदारांनीं वहिवाटदार यांजकडे रुजू केल्यावरून इनामकमेटीची लागत देण्याकरितां नारायणराव शेणवी यांचे घरावर जप्ती आली. त्यावरून बडोद्यांतील प्रमुख शेणवाई लोक जमून, आपणांस संकरजाति ह्मटलें व दानग्रहण करण्याचे अधिकारास आक्षेप घेतला, त्याबद्दल कांहीं तरी तजवीज करावी, असा विचार करून राजश्री रामचंद्र गंगाधर भेंडे यांस सर्वांचे तर्फे मुखत्यार नेमिलें. त्याजवरून भेंडे यांनीं,

जातीची अन्न घेतल्याबद्दल अंणाजोशी यांजवर फिर्याद करण्याची परवानगी मागितली. परंतु तशी परवानगी न देतां प्रथम शेणवाई लोक ब्राह्मण असल्याबद्दल जे कांहीं आधार असतील ते रुजू करावेत ह्मणजे विचार करण्यांत येईल, असें त्यांस नामदार राजे माजी दिवाणसाहेब यांजकडून फर्माविण्यांत आलें. त्यावरून भेंडे यांनीं बरेच आधार रुजू केले आहेत यांतील मतलब असा आहे कीं—

ब्राह्मणांत पंचद्रविड व पंचगौड असे प्रकार आहेत. त्यांपैकीं पंच गौडांत सारस्वत ह्मणून भेद सांगण्यांत आला आहे (सह्याद्रिखंड. उत्तरार्ध अध्याय १) व शेणवई हे आपणांस सारस्वत ब्राह्मण ह्मणवितात. पूर्वीं परशुरामानें समुद्र दूर करून जी भूमि घेतली, त्या भूमींत यज्ञ, श्राद्ध वगैरे करण्याकरितां ब्राह्मण पाहिजेत, ह्मणून त्रिहोत्रपुराहून पंचगौडांतले दहा ऋषि परशुरामानें आणले, व त्यांस व त्रिहोत्रपुरांतील देवतांस गोमाचळावर स्थापन केलें, असें सह्याद्रिखंडाचे उत्तरार्धांत सांगितलें आहे. ह्या दशऋर्षीचेच शेणवाई हे वंशज समजले पाहिजेत; कारण येवढींच दहा गोत्रें शेणवयांत सांपडतात. व कुळदेवतांचें दर्शन घेणें झाल्यास त्यांस गोमांतकीं जावें लागतें. ब्राह्मणांस ज्याप्रमाणें व्रतबंधविधि सांगितला आहे, त्याप्रमाणेंच शेणवाई लोकांत तो आचरण्यांत येत आहे. व मुंज्यास गायत्रीउपदेश ब्राह्मणाप्रमाणेंच मुंजाचे बापापासून होतो, व भिक्षेचे समयींही ' भवति भिक्षां देहि, ' असें ह्मणतो, असा पुरावा दाखविला आहे. त्याविरुद्ध कांहीं दिसलें नाहीं. जर शेणवाई संकरजातीचे असते, तर त्यांच्यांत ब्राह्मणाप्रमाणें व्रतबंधविधि चालू न राहता तसेंच,

१ पहिले दहा गोत्रांशिवाय आणखी कित्येक गोत्रें मागाहून आलीं आहेत

ब्राह्मणांत ज्याप्रमाणें चतुर्थाश्रम आहे, त्याप्रमाणें शेणवयांतही आहे. व त्यांचे आचार्यांस ' शंकराचार्य ' अशी संज्ञा आहे.

शेणवाई संन्याशांचे मठ काशीपासून रामेश्वरापर्यंत जागोजागीं आहेत. त्यांपैकीं एक नाशिकास आहे, व त्याचे उत्पन्नास शाहु-छत्रपति यांनीं सायखेडा गांव लावून दिल्याची सनद आहे. तशीच दुसरी सनद माधवराव बल्लाळ पेशवे यांनीं कवळें व खानापूर येथील मठांकडे, मळवाडी, कर्यात काटगाळी, ह्या गांवची सनद, पूर्वी नानासाहेब पेशवे यांनीं करून दिलेली गाहाळ जाहाली या कार-णानें, नवीन सनद करून दिली आहे. हीं गांवें शेणवाईमठास मिळा-ल्यानें शेणवायांस प्रतिग्रहाचा अधिकार आहे असें निष्पन्न होतें. बडोद्यास गेले पन्नास वर्षांत ज्या शेणवाई लोकांनीं संन्यास घेतला त्यांचीं नांवें दिलीं आहेत. व त्यांस संन्यास देण्यांत देशस्थ, कऱ्हाडे व चित्तपावन संन्यासी होते, असें ह्मटलें आहे. चार आश्रम ब्राह्म-णासच विहित असल्याविषयीं वचनें दिलीं आहेत. त्यांत क्षत्रियास तीन व वैश्यास दोन आश्रम सांगितले आहेत. (आश्वलायन, वामनपुराण, निर्णयसिंधु. वर ज्या दोन सनदा सांगितल्या आहेत त्यांत छत्रपतीच्या सनदेंत, " तेथें अतीतअभ्यागतब्राह्मणसंतर्पण व अध्ययन अध्यापन होत आहे, " असे व पेशव्यांचे सनदेंत " शिष्यांतर्गत माधवराव बल्लाळ प्रधान साष्टांग नमस्कार, " असे शब्द आहेत. ' शिष्यांतर्गत ' या शब्दानें शेणवाईस्वामीनें गुरुत्व पेशवे यांनीं मानिलयासारखें होतें. व 'अध्यापन' या शब्दानें द्विजाती-

हून ब्राह्मणांस जीं तीन कर्में अधिक सांगितलीं आहेत, त्यांचा अधिकार शेणवाई लोकांस असल्यानें शाहुछत्रपतीचे दरबारांत संमत असल्याचें दिसतें. याशिवाय भेंडे यांनीं, काशीचे पंडितांनीं दिलेल्या तीन संमतिपत्रांच्या नकला रुजू केल्या आहेत. त्यांत दोन संमतिपत्रें महत्वाचीं आहेत. एक संमतिपत्र संवत् १६८७ चे सालचें आहे. त्यांत कुशस्थलीकुलोत्पन्नास यजनयाजनअध्ययनाध्यापनदानप्रतिग्रहात्मक षट्कर्मांचा, अग्निहोत्राचा, व चतुर्थाश्रमाचा अधिकार असल्याचें लिहिलें आहे. ते पंचगौडांतले आहेत. व ते मत्स्याहार करितात तो, त्यांचे देशांत उचित असल्यानें त्यांस दोष नाहीं, असेंही त्यांत ह्मटलें आहे. हें संमतिपत्र विठ्ठल शामराव ह्मणून कुशस्थलीकुलोत्पन्न एका गृहस्थास संन्यास देण्याचे संबंधांत देण्यांत आलें होतें. त्या गृहस्थास काशीचे पंडितांनीं संन्यास देऊन आपले देशीं मठस्थापना[1] करावी ह्मणून अनुज्ञा केली. आतां, हे कुशस्थलीकुलोत्पन्न गृहस्थ ह्मणजे सध्यां ज्यांस शेणवाई ह्मणतात तेच असावेत हें उघड आहे. या संमतीपत्रावर ३६ पंडितांच्या सह्या आहेत. दुसरें संमतिपत्र संवत् १९२२ चे सालचें आहे. त्यांतही शेणवयांस षट्कर्माधिकार असल्याचें ह्मटलें आहे. व शेणवाई मत्स्यभक्षण करितात ह्मणून ते ब्राह्मण नाहींत असा कोणी अपवाद घेईल तर तो बरोबर नाहीं; कारण शेणवाई हे पंचगौडांपैकीं आहेत व गौडांत मत्स्यमांसभक्षणाचा आचार आहे, असेंही त्या संमतिपत्रांत लिहिलें आहे. ह्या संमतिपत्रावर २७ पंडितांच्या सह्या आहेत. याशिवाय द्रविडांचे शंकरा-

---

१ मठाधिपत्य.

चार्यांचीं बडोद्याचे शेणवाईलोकांस आलेलीं दोन पत्रें रुजू केलीं आहेत; त्यांत 'षट्कर्मनिरत,' ह्मणून शेणवयांस ह्मटलें आहे. गोमंतकप्रांतीं कवळ्यास श्रीमंगेशमहारुद्रास आवर्तनें करण्यास पांच-सहा शेणवाई भिक्षुक व पांचसहा द्रविड भिक्षुक बसत असतात, असें ह्मणण्यांत येत आहे. याप्रमाणें ब्राह्मणत्वाविषयीं व षट्कर्माधिकाराविषयीं आधार रुजू करून, प्रतिग्रहाधिकाराचे संबंधांत संवत् १९२३ चे सालीं श्री० कैलासवासी खंडेराव महाराज यांनीं येथें गोप्रदानें वांटलीं त्यांतील १८ गोप्रदानें शेणवाई लोकांस मिळाल्याचा दाखला फडणीसी दप्तरांतून दिला असे. व अण्णाशास्त्र्याचे वडिलांनीं शेणवाई लोकांस गोप्रदानें दिलीं आहेत व केदारेश्वराजवळची दररोजची खिचडी शेणवाई यांस मिळते असें दाखविण्यांत येत आहे. अण्णाशास्त्री यांनीं स्कंदपुराणांत शेणवायांच्या उत्पत्तीविषयीं वचन असल्याचें लिहिलें आहे परंतु स्कंदपुराणांत त्याप्रमाणें कांहींएक वचन नसून अण्णाशास्त्री यांनीं 'जातिभेदविवेकसार' या ग्रंथाचे आधारें मत दिल्याचें कबूल केलें आहे. ह्या जातिभेदविवेकसारकर्त्यांचें[1] नांव दिलें नाहीं व त्यांत दिलेला श्लोक अशुद्ध असून तत्सदृश स्कंदपुराणांत कांहीं नाहीं, ह्मणून येथील एका गुजराथी शास्त्र्याचें मत दिलें आहे. व जो स्कंदपुराणांतला ह्मणून श्लोक दिला आहे, त्याचेच वरतीं (जा. भे. वि. सारांत) शेणवई हे गौडसारस्वत असल्याचें लिहिलें आहे असें दाखविलें आहे.

---

१ या पुस्तकांत ताडी काढणारे शुद्धबीज आणि इतर सर्व लोक संकरजातीय असें दाखविण्याचा प्रयत्न आहे! यावर नांव नाही पण हें एका भंडाऱ्यानेंच केलें आहे, आणि एका माळ्यानें छापविलें आहे.

या ज्ञातिवादाबद्दल हुजुरांतून वेदशास्त्रसंपन्न धोंडशास्त्री नीलकंठ-शास्त्री यांचा अभिप्राय विचारण्यांत आला होता. त्यांणीं आपलें मत असें दिलें आहे कीं, ' शेणवयांस तीन कर्मांचाच अधिकार असल्याबद्दल ह्मणण्यांत येतें व त्याप्रमाणें शतप्रश्नकल्पलतिकेंत लिहिलें आहे. परंतु तींत स्मृतीचा अगर पुराणाचा आधार दाखविला नाहीं. फक्त अशी कथा दिली आहे कीं, पूर्वी द्वादश वर्षे पर्यंत एकदां दुष्काळ पडला होता. त्या वेळेस दुर्भिक्षामुळें ब्राह्मणांस खाण्यास न मिळाल्यानें ते मत्स्यभक्षण करूं लागले. पुढें त्रयोदशवर्षी वृष्टि झाल्यानें ब्राह्मणांस मत्स्यभक्षणाबद्दल पश्चात्ताप होऊन ते ऋषीस शरण आले. ऋषींनीं त्यांस प्रायश्चित्त दिलें. परंतु त्यांस जातिबहिष्कृत करून त्रिकर्मांचाच अधिकार त्यांचा नियमित केला, ते हे ब्राह्मण, ज्यांस शेणवी ह्मण-तात परंतु याप्रमाणें इतर कोठें कथा आढळत नाहीं. शिवाय ब्राह्म-णांस तीनच कर्में स्मृतिपुराणांत कोठेंही सांगितलीं नाहींत; षट्कर्में सांगितलीं आहेत. भारतांत गदापर्वांत अशी कथा दिली आहे कीं, अनावृष्टिकाळीं दधीच ऋषीचा पुत्र सारस्वत यानें द्वादश वर्षे पर्यंत मत्स्याहार करून वेदज्ञान रक्षण केलें. इतर ऋषि उदरपोषणाचे कामांत निमग्न झाल्यानें वेद विसरून गेले व दुर्भिक्ष गेल्या नंतर साठ सहस्र ऋषि या सारस्वताचे शिष्य झाले, तोच ऋषि या शेणवयी लोकांचा पूर्वज. अशा प्रकारें शेणवई लोक आपल्यास सारस्वत ब्राह्मण ह्मणवितात व मत्स्याहार करितात. ''

हुजुरांतून वेदशास्त्रसंपन्न राजारामशास्त्री यांचाही अभिप्राय

विचारण्यांत आला होता;परंतु त्यांनीं निश्चयात्मक कांहीं मत दिलें नाहीं व आपले मतास कांहीं आधारही दाखविले नाहींत.

याप्रमाणें येथील तांत्रिक चौकशींत जें निष्पन्न झालें त्याचें तात्पर्य असें कीं अंणाशास्त्रीनीं जो शेणवई लोकांबद्दल अभिप्राय दिला तो निराधार असोन शेणवई लोकांचे ह्मणण्यास स्मृतीचा व आचाराचा आधार आहे.

याप्रमाणें हें समग्र प्रकरण श्रीमंत सरकार महाराज साहेब यांस समजाविण्यांत आलें. एकंदर आधार वगैरेंचा विचार करण्यांत आला. अशी आज्ञा जाहाली कीं, या कामीं शेणवई लोकांस प्रतिग्रहाधिकाराचे संबंधानें या राज्यांतील रूढि पहातां सरकारांतून शेणवयांस गोप्रदानें व इतर धर्मादाय देण्याचा पाठ आहे. तरी त्या पाठास व्यत्यय करण्यांत येऊं नये व इनामकमेटीचे लागतीचे संबंधानेंही त्यांस दानपात्र लेखावें. या ठरावाची नक्कल फडणीसकिडे व खानगीकिडे व सरसुभेखात्यांत पाठवावी. तारीख ७ दिसेंबर इ स. १८८३

(सही) विनायक जनार्दन कीर्तनें.

हुजूर आसिस्टंट. का. शा.

१०।१२।८३.

(या ठरावाच्या असलबरहुकुम नकला छापील कागदावर घेतलेल्या रा. सा. रामचंद्र बळवंत दाभोळकर माजिस्ट्रेट शहर बडोदें यांपाशीं व रा. रा. गणपतराव जगन्नाथ दळवी मुंबई, यांपाशीं आहेत.)

शुद्धिपत्र.

(या शुद्धिपत्रांत र्‍हस्व, दीर्घ, अनुस्वार, काना, मात्रा, वेलांटी यांकडे फारसें लक्ष न देतां अक्षरें भलतीं पडून अर्थविपर्यास करणारे जे शब्द दिसले ते मात्र प्रामुख्यानें दुरुस्त करण्याकडे विशेष लक्ष दिलें आहे—प्रकाशक.)

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
१	१२	देतांना	होतांना
"	१६	(काळघटनेमुळें)	कालघटनेमुळें
४	१	श्रुति (वेद)	श्रुति (वेद),
६	७	तीर्थस्नानांचे.	तीर्थस्थानांचें.
८	१०	सरस्वती–	" सरस्वती–
११	४	कुरुक्षेत्र	' कुरुक्षेत्र '
१४	१३	मुसलमान प्रांत	मुलतान प्रांत.
१९	२० टीप१	'भारत वनपर्व'	भारतवर्षीय
२७	२	पावगी	पावंगी
"	३	शास्त्री हे होतें	शास्त्री हे होतें.
"	५	आळी.	आली.
"	१२	पल्याबाहेर	पल्ल्याबाहेर
२९	५	जाण्याया	जाण्याच्या
"	११	वस्तू	वस्तूं
"	१५	"	"
"	१६	"	"
३३	२०	प्रांतांत	प्रांत,
५९	५	द्वैतवनात	द्वैतवनांत
"	११	विसावा	विसांवा

६४	११	जिज्ञासु	जिज्ञासूं
६८	५	आश्रमी	आश्रमीं
"	१२	क्षत्रियाचा	क्षत्रियांचा
७०	१५	घस्तू	वस्तूं.
७२	१४	रिकार्डांत	रिकार्डांचा
८०	४	' कौंडिण्य '	' कौंडिन्य '
"	२०	द्रवीड	द्राविड
"	२१	त्याचें	त्यांचें
८३	१	पंचद्रावीड	पंचद्राविड
"	११	कल्पनाहीं	कल्पना हीं
८७	१२	नागर, कोटिया	नागरकोटिया
९०	१६	रहिवाशी	रहिवासी
९१	११	रीतिरीवाज	रीतिरिवाज
"	२०	हें	तें
९६	७	काबूलचाराजा	३ अ. काबूलचाराजा.
१०३	१४	नेमणूक	नेमणुका
१०४	६	सियरमस्टर, मास्टर, जनरल,	सियर, मस्टर मास्टर जनरल
१३०	२१	विषेश	विशेष
१४२	१४	आंहे	आहे
"	१६	लिहिलें आहे	लिहिलें आंहे
१७५	३	धर्मान्ध्यक्षांचीं	धर्माध्यक्षांचीं